म. ग्रं. सं. ठाणे

विषय नाटक

सं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

लेखक गणेश सदाशिव लिमये

सन १९८६

पुस्तकाचें नांव वेणू

क्रमांक ९३४

938

म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. नं. १०९

मराठी ग्रंथ
ठाणे.
श्रीवीर महावीर विद्यालय
पुस्तकनंबर ४५१
शिवाजी.
सरस्वतीपुस्तकालय

वेणी

ही

कादंबरी

गणेश महादेव लिमये

असिस्टंट मास्तर न्यूइंग्लिशस्कूल, पुणें

यांनीं

रचिली

ती

शिराळकर आणि मंडळी यांनीं

पुणें येथें

' जगद्धितेच्छु ' छापखान्यांत छापविली.

सन १८८६.

(हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत १ रुपया. ट० ख० ८२.

मध्य रेल्वे
सेंट्रल
लायब्ररी
बिलासपुर

श्रीमंत

महाराज सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल समशेरबहादुर फरझंद-इ-खास-इ-दौलत-इ-इंग्लिशिया ,

यांची स्वारी

पुण्यपत्तनास आली असतां त्यांनीं विद्योत्कर्षा-
विषयीं जी उदारता प्रकट केली, तिच्या
स्मरणार्थ

ही लहानशी कादंबरी

त्यांस

तिच्या कर्त्यानें

परवानगीनें

अत्यंत आदरपूर्वक व नम्रतापूर्वक
अर्पण केली असे.

साधीभोळी लाजाळू पोर आहे, तिला सासुरवास करूं नका, तर पोटच्या गोळ्याप्रमाणें वागवून घ्या, एवढेच तिच्या कल्याणासाठीं दोन शब्द सांगून मी ह्या कन्यागतीं वेणूला वाचकांच्या पदरांत घालतों.

वेणू.

भाग पहिला.

आमच्या या गोष्टीला कांहीं फार वर्षें झालीं नाहींत. सायंकाळचे आठ वाजून गेले अहेत; कृष्ण-पक्ष असल्यामुळें जिकडे तिकडे अंधार पडला आहे; वरतीं आकाशांत तारांगण चकचक चमकत आहे; उन्हाळा होता तरी मनुष्याच्या अंगांत थंडी थोडथोडी शिरकाव करूं लागली आहे; व सायं-काळीं इतक्या गजबजून गेलेल्या पुराण शहरांतील रस्त्यांतून मनुष्यांची दाटी कमी होत चालली आहे.

बहुतेक जो पहावा तो घरीं जाण्याच्या धांद-लींत. न्यायानें किंवा अन्यायानें द्रव्य मिळवून तें आतां घरीं नेऊन ठेवण्याचा विचार करीत, व काल नव्याणव होते, आज हा एक त्यांत घातला, ह्मणजे बराबर शंभर रुपये झाले. आपण शताधीश झालों, आतां लवकरच सहस्राधीश व नंतर लक्षाधीश होऊं, ह्मणून मनोराज्य करीत कोणी चालला आहे; कोणी मी आज अमक्याच्या डोळ्यांत धूळ टाकिली ह्मणून आपल्याशीं संतोष मानीत चालला आहे; कोणी उद्यां काय करावयाचें याचा विचार करीत चालला आहे; कोणी आज इमानें इतबारें नोकरी केली, आजच्याप्रमाणें उद्यां आपल्या हातून घडो ह्मणून इच्छीत आहे, कोणी घरची ओढ लागून मी आपल्या बायकापोरांत

केव्हां जाऊन पडेन, प्रियेचा मुखचंद्रमा केव्हां पाहीन, व अस्मात्च जाऊन मी माझ्या दमनकाला केव्हां कडेवर घेईन, ह्मणून भराभर पाय उचलीत चालला आहे.

खांकेमध्यें काळी छत्री असून एथून तेथून पांढरा पोशाख केलेला एक गृहस्थ, ज्याची उमर पस्तिसां-पेक्षां अधिक दिसत नव्हती असा, गणेश आळीच्या रस्त्याला वळला. त्याचें पाऊल अगदीं मंद पडत होतें, यावरून असें दिसलें कीं, तो कांहीं तरी विचार करीत असावा. आणि या गोष्टीचा संशयच नको; कारण त्याचे ते मिटलेले ओंठ, व कांहींसे वर उचलेले डोळे, जसे कांहीं तो खालीं आपल्या पावलांकडे न पाहतां वरील आकाशांतील तारे मोजतो आहे, हीं तो गूढ विचारांत असल्याचीं साक्ष देत. हा गृहस्थ तसाच हळुहळु चालत एका मोठ्या दरवाजांत शिरून आंगणांत आला, आणि पाहतो तों ओटीवर दिवा नाहीं ! वाऱ्यानें गेला असेल ह्मणावें, तर वारा ही नव्हता; पण ओटीवर दिवा नाहीं यांत फारसें कांहीं वासुदेवपंतांस वाटलें नाहीं. पण जेव्हां ते ओटी वलांडून दरवाजा उघडाच होता, त्यांतून माजघरांत येऊन पाहतात, तों तेथेंही दिवा नाहीं ! घरांत जिकडे तिकडे अंधार ! "अरे ! याला काय ह्मणावें ! हीं गेलीं तरी कोठें ?" असें वासुदेवपंत मोठ्यानें बोलले, परंतु त्यांस कोठूनही उत्तर मिळालें नाहीं.

"कोणी नाहीं कारे घरांत ? वेणे—" उत्तर मिळेना.

" हा पोरटा तरी आला आहे काय ? का तोही गेला कोठें ? "

असें बोलून वासुदेवपंत तसेच मागें परतले, आणि ओटीवर येऊन उजव्या आंगच्या खोलीच्या दरवाजावर थापा मारून हांका मारूं लागले, " सदाशिव, सदाशिव, सदू, सद्या ! "

एक सुमारें पंधरा वर्षांचा मुलगा, प्रकृतीनें चांगला बळकट, खोलीच्या दारास आंतून कडी लावून दिव्याशीं स्वस्थ अभ्यास करीत बसला होता. तो बापाची घाईघाईनें मारलेली हांक ऐकून " ओ— कोण—बाबा !" म्हणतच गडबडीनें उठला. त्यानें दाराची कडी काढून दार उघडतांच वासुदेवपंतांनीं त्याला विचारलें, "अरे, हीं घरांतलीं मनुष्यें गेलीं तरी कुठे? कोठें दिवा नाहीं कांहीं नाहीं !"

"म्हणजे !" असें म्हणून सदाशिवानें बाबऱ्या बाबऱ्या आपल्या खोलींतील दिवा घेतला, आणि दोघेही घरांत शोधावयास निघाले.

माजघरांत व स्वयंपाकघरांत त्यांस कोणी दिसलें नाहीं, म्हणून ते निजावयाच्या खोलीकडे चालले, तों वेणूचा रडण्याचा स्वर त्यांच्या कानीं आला.

"हें काय बरें !" दोघांनीं आपआपल्या मनाशीं विचार केला. व एकही शब्द उच्चारावयास दोघांसही धीर झाला नाहीं, इतकी एकाएकीं दोघांची छाती दडपून गेली.

खोलीचें दार उघडून ते एकदम आंत शिरले, तों खालीं जमिनीवरच एके जुनेरावर वेणूची आई पडली होती. डोकीवरून एक लुगडें पांघरलेलें होतें. आणि बाजूस वेणू गुडघ्यांत मान घालून रडत बसली होती. " वेणे, कायगे झालें? " असें सदाशिवानें विचारलें,

तेव्हां तिनें वर पाहिलें तों तिचे सर्व तोंडावरून र-क्ताचे ओघळ गेलेले आहेत, असें त्यांचे दृष्टीस पडलें.

पुढें ते दिवा घेऊन पहातात तों तिचे कपाळास खोंक पडली असून त्यांतून अद्यापि थोडथोडें रक्त वाहत आहे, व तिच्या गालावरून रक्त वाळून गेलें आहे. वासुदेवपंतांनीं विचारलें, "तुझ्या कपाळाला काय लागलें नी ही कां अशी पडली?"

त्या शाहण्या मुलीनें उत्तर दिलें, "बाबा मोठेंसें कांहीं घाबरण्यासारखें झालें नाहीं; आईला जरासा ताप आला आहे, आणि मला येथेंच या पेटीशीं थो-डेंसें लागलें."

"एवढेंचना?" सदाशिव म्हणाला, आणि तो "आई, ए आई," म्हणून हांका मारूं लागला. परंतु तिनें मुळींच उत्तर दिलें नाहीं.

"तूं जारे भाऊ," वेणू आपल्या भावास त्रासून म्हणाली, "तूं आपल्या उद्योगाला जा कसा."

सदाशिवानें तेथील दिवा लावला, व दोघेही बा-हेर निघून गेले. वासुदेवपंतांच्या आंगावर अजून पोषाख तसाच होता तो त्यांनीं उतरला, व आपल्या-च हातीं पाय धुवावयास पाणीं घेऊन संध्या करावयास बसले.

वासुदेवपंतांच्या शरीराची बांधण आटपसर हो-ती. तें तेजःपुंज असून डोक्याला किंचित् टक्कल पडलें होतें. ह्या टकलाच्या योगानें हे गृहस्थ विशेष प्रौ-ढ दिसत. पोटाची कातडीही थोडीशी सुटली होती. एकंदरींत पुरुष पाहिला म्हणजे आनंद होत असे.

वासुदेवपंतांनीं वेणूस हांक मारिली. ती हांक दे-

ऊन तिकडे जात आहे तों तिची आई तोंडा वरील पांघरुण काढून म्हणाली:–"कार्टे, वेडें वांकडें कांहीं मांगितलेंस तर तुझें नाकच कापीन."

भाग दुसरा.

वेणू बापाजवळ आली. वासुदेवपंतांनीं व सदाशिवानें तिला खोदखोदून विचारलें, परंतु ती पत्ता लागूं देईना. डोकीला कसें लागलें, म्हणून विचारितां तिनें आईच्या पायावर पाय देतांना माझा तोल पेटीवर गेला आणि लागलें म्हणून सांगितलें. परंतु तें त्यांस खरें वाटलें नाहीं.

वेणू ही मुलगी थेट बापाच्या वळणावर गेली होती. हिचें वय ह्या वेळीं दहा वर्षांचें असून अद्यापि हिचें लग्न झालेलें नव्हतें. पोरगी मोठी सुरेख होती. रंगानें गोरी पान असून असल्या गोरेपणावरोवर येणारा जो फाजील नाजुकपणा तो हिचे अंगीं अगदीं नव्हता; कारण, बापाच्या प्रमाणेंच हिची आंगलट होती. वेणूला पाहिल्या बराबर वाटावें कीं ब्रह्मदेवानें खचित कोणा तरी भाग्यवाना करितां हिला निर्माण केलें असावें.

संध्या झाल्यावर वासुदेवपंत रमाबाईचे खोलींत गेले,—रमाबाई हेंच त्यांच्या स्त्रियेचें नांव—कीं तिची प्रकृति आपण स्वतः पहावी. रमाबाई तशीच पडली होती. त्यांनीं आंगाला हात लावून पाहिलें तों तिचें आंग त्यांना तापलेलें लागलें खरेंच. तिला जाऊन पलंगावर निजण्याविषयीं त्यांनीं सांगितलें. ती त्यांच्या सांगण्याप्रमाणें उठली तर नाहींच, परंतु

त्यांनीं कितींदा विनवणी करून पाहिलें तरी तिनें एक नाहीं दोन नाहीं.

रमाबाईला उठाविण्याविषयीं वेणूनें, सदाशिवानें, व वासुदेवपंतांनीं आपआपली पाळी फेडून घेतली, परंतु ती उठली नाहीं ती नाहींच. वासुदेवपंत मुकाट्यानें स्वयंपाक घरांत आले, आणि आपल्या हातीं चुलींतु विस्तव घालूं लागले, परंतु वासुदेवपंतांस स्वतां हातानें करावें लागलें नाहीं; वेडावांकडा भात वेणूनें केला. रमाबाईस पुन्हा जेवणाचे वेळीं हांक मारिली, परंतु ती उठली नाहीं. सर्व काम धाम आटोपून तीं सगळीं माणसें आपआपल्या जागीं निजावयास गेलीं, व पुन्हां तिची गोष्ट वासुदेवपंतांनींही काढली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळींसुद्धां रमाबाई तशीच पडली होती ती उठली नाहीं. कचेरी सकाळींच असल्यामुळें वासुदेवपंत उठून कचेरीस गेले. परंतु ते अकरा वाजतां येऊन पाहतात तों रमाबाई तशीच पडलेली !

त्या बिचाऱ्याच्या पाठीमागें कचेरीस जाण्याची घाई होती परंतु करतो काय? घरीं जेवणाची तयारी मुळींच नव्हती. वेणूनें आपल्या सामर्थ्याप्रमाणें स्वयंपाकाचें काम आरंभिलें होतें, परंतु तिला तो वेळेवर कसचा होणार ? वासुदेवपंतांनीं मुलांस तुम्हीं करून जेवा, असें सांगून आपण स्नानसंध्या आटोपून कचेरीस चालते झाले.

सायंकाळ होईपर्यंत वासुदेवपंत कचेरींतून परत आले नाहींत. बापड्याला सर्व दिवस उपास पडला

होता, व घरचाही पुष्कळ त्रास झाला होता, तरी घरीं येतांना वासुदेवपंतांची मुद्रा हर्षयुक्त दिसत होती! त्यांस मोठा आनंद झाला आहे हें स्पष्ट दिसत होतें. त्यांस आनंद झाला होता खरा, पण पहा विचाऱ्याचें काय दुर्दैव तें. ते घरीं येऊन पाहतात तों रमाबाई ओकसाबोकशीं रडत बसली आहे!

सांप्रत मजकूर वाचकांच्या ध्यानीं घेण्याकरितां वासुदेवपंतांची थोडीशी मूळची हकीगत सांगितली पाहिजे, म्हणजे त्यांत रमाबाईचेंही काय म्हणणें होतें तें कळून येईल.

वासुदेवपंतांचें आडनांव करंदीकर. हे त्या वेळीं पुराण येथें मामलेदार कचेरींत अव्वल कारकुनीच्या जाग्यावर होतें. यांजवळ एक पैशावांचून दुसरं कांहीं वडिलोपार्जित नव्हतें.

वासुदेवपंत व रमाबाई यांचा जोडा पहावयास गेलें तर कांहीं वावगा नव्हता; व दोघेंही एकमेकांस आवडलीं होतीं. वासुदेवपंता इतकी रमाबाई गोरी नव्हती, व किंचित् ठेंगणी असून आंगानें थोडीशी स्थूल होती. ह्या जोडयास सदाशिव हा मुलगा झाल्यानंतर पांच साडे पांच वर्षांनीं वेणूचें जन्म झालें. वेणूचें मागून त्यांना एक दोन मुलें झालीं परंतु तीं जगलीं नाहींत. वासुदेवपंतांचा स्वभाव गरीब पडल्यामुळें रमाबाईचें मान फारच चढलें होतें. तिला हट्ट हें एक मोठें अस्त्र मिळालें होतें, व त्याच्या साधनानें ती वासुदेवपंतांपासून हवी ती गोष्ट पैदा करून घेत असे.

सदाशिव व वेणू एवढींच दोन मुलें त्यांस अस-

ल्यामुळें दोघांचाही प्राण त्या मुलांकडे ओढत असे, परंतु रमाबाई तर त्यांस जीव कीं प्राण करीत असे. वासुदेवपंतांनीं जर का त्या दोघां मुलांतून कोणाला बोट लावलें, तर रमाबाई वासुदेवपंतांबरोबर भांडावयास उठत असे.

आपला पुढचा काय तो संसार, काय तें सुख ह्या मुलांवर, तेव्हां त्यांचें सर्व कांहीं यथास्थित करणें हें काय तें आपल्या ह्या देहाचें काम, व जन्माचें सार्थक्य, असें तिला वाटे. व तिच्या आतां मनांत घोळत होतें तें हें, कीं माझ्या मुलांचीं लग्नें केव्हां होतील, त्यांना मुलें केव्हां होतील, नातवंडें केव्हां होतील, ह्मणजे मी सासू केव्हां होईन, आजी केव्हां होईन, याची तिला पंचाईत पडली होती.

ह्या लग्नाच्या कामीं नवऱ्याची ढिलाई पाहून तिचा संताप होत असे. मुलीला चांगला नवरा पहात नाहीं, मुलाला एखादी नवरी पसंत करीत नाहीं, ह्याला काय करावें ? यःकश्चित् गरिबेंसुद्धां आपलीं मुलें लहान लहान आहेत तोंच त्यांचीं लग्नें उरकून घेतात, मग आमच्यांचीच कां रहावीं ? सदाशिवास पुष्कळ मुली सांगून आल्या होत्या; व येतील ह्यांत मोठें नवल नाहीं; परंतु त्यांतून आह्मीं अमकीच पत्करितों, असा वासुदेवपंतानीं कोणास रुकार दिला नाहीं, पण रमाबाईचा रुकार पांचपन्नास असामींस मिळाला होता.

मुलीच्या लग्नाविषयीं तर रमाबाईनें वासुदेवपंतांस नको नको हा संसार असें करून सोडलें होतें. वासुदेवपंत कचेरींतून येत तों अवकाश, हिनें अमकें

तें स्थळ पाहून या, अमकें तें ठरवा, अमकें तें पसंत करा, हुंडा अमुक द्या, अशी टुर टुर पाठीमागें लावून त्या दमून भागून आलेल्या विचाऱ्या नवऱ्यास पुरे हा जन्म असें करून टाकावें.

रमाबाईला वासुदेवपंतांचें ' मी आज स्थळ पहायला जातों, उद्यां जातों, ' याच्याशिवाय उत्तर मिळेना, व असें उत्तर मिळण्यास कारण एवढेंच कीं, त्यांस जावयास फावत नसे. वासुदेवपंतांसही मुलांचें कल्याण व्हावें असें अर्थात् वाटत असे, व त्याप्रमाणें त्यांनीं त्यांची जोपासनाही केली होती. सदाशिवाच्या विद्येविषयीं त्यांनीं काडीमात्र हयगय केली नाहीं, आणि वेणूसही फावल्यावेळीं नुकत्याच प्रचारांत आलेल्या रीतीस अनुसरून अक्षरओळख करून दिली होती. परंतु मुलांचीं लग्नें आतां झालींच पाहिजेत म्हणून हातांतलें काम पलीकडे सारून स्थळें पाहण्याकरितां वासुदेवपंत घरोघर धांवत सुटले नाहींत. मर मर कचेरींतल्या कामाखालीं मरावें, मग वरीं आंग टाकावयास आल्यावर इतर व्यापार त्यांस कसचे सुचणार ! बरें, त्याशिवाय आणखी एक त्यांच्या मनाला रोग जडला होता, तो तर त्यांस कांहींच सुचूं देत नसे. कित्येक वर्षेपर्यंत अव्वल कारकुनीचें काम केलें; त्यांच्या पाठीमागून लागलेले कित्येक असामी मामलेदार होऊन बसले; असें असतांना वासुदेवपंतासारख्या हुशार गृहस्थास बहडतीची जागा मिळूं नये, ह्या सारखी दुसरी दुःखाची गोष्ट कोणचीही नव्हती. वासुदेवपंतांस ह्या गोष्टीचा फार खेद होत असे, व आपल्या

अंगीं खुशामत करण्याचा गुण नाहीं ह्मणून त्यांस एखादे वेळीं वाईटही वाटे.

भाग तिसरा.

पण वासुदेवपंत असे तटस्थ बसले ह्मणून रमाबाईनें आपण स्वतः खटपट करण्याचें कमी केलें काय ? रमाबाई आपणाकडून स्वस्थ बसली नव्हती. हिला कोणीं मुलगी करतां का ह्मणून विचारलें पुरे, तिनें हांवरेपणानें ती मुलगी कोणाची, केवढी, कशी आहे, तिच्याचसारखी काळी कीं गोरी, हुशार कीं अर्धवट आहे, टिपणाला जमेल कीं नाहीं, हुंडा काय देतिल, इत्यादिकांची नाना प्रकारें चवकशी करावी. परंतु बहुतेक स्थळीं हुंड्याचेच बाबतींत तिचा हिरमोड होत असे. तिची ही चवकशी इकडे चालली असतां मुलीला कोठें एखादें चांगलें स्थळ मिळेल ह्मणून ती आंतून आंतून टेहळीत होतीच. झालें तर दोन्ही लग्नांचा एकदमच बार उडवून देण्याचें तिचे मनांत होतें. परंतु स्थळें शोधण्याच्या कामीं ही पडली एकटी ! वासुदेवपंत तर मागें सांगितल्या प्रमाणें टाळाटाळ करीत, यामुळें तिची फार धांदल उडत असे. जरा कोठें एखादा मुलगा लग्नाचा आहे एवढें कळलें कीं हिनें कोणीं तरी आपल्या कडून माणूस पाठवून त्याचा शोध करवावा. मनुष्यें पाठविण्याकरितां हिला बऱ्याच लोकांच्या पायधरण्या कराव्या लागत; कारण, आपला कामधंदा टाकून रिकाम्या खेपा घालावयास हिला कोण उभा राहतो ? एक

दोन शेजारी असत ते वासुदेवपंतांवर लक्ष्य ठेवून फाव-ल्या वेळास रमाबाईनें सांगितलेलीं स्थळें पाहून येत. जवळपास एकादें कोठें स्थळ ऐकलें तर हिनें स्वतः जाण्यास कमी केलें नाहीं. हिच्या अशा कारभारानें वासुदेवपंतांची बरीच नापत होई. व हीही बरीच फाजिती करून घेऊन परत येत असे. " अहो, " जर कोणीं तिला म्हटलें, " मुलें एवढालीं लग्नाचीं झालीं असून तुमचे यजमान स्वस्थ बसले आहेत, तर मग तुम्हांलाच एवढी उठाठेव ह-वी कशाला ! " लोक तुम्हांला आधीं नांवें ठेवतील कीं त्यांना ? " मग हिनें जरी वासुदेवपंतांचें अंगीं हा दोष अगदीं नव्हता तरी म्हणावें, " तो आळस काय सांगावा, बसल्या जाग्यावरून सुद्धां उठायाला नको. ओंठावर जांभूळ पडलें तरी सुद्धां तें आंत लोटायाला कोणी मनुष्य पाहिजे. " मग हिच्या चेष्टा उडाव्या, व हिनें खजील व्हावें.

तरी पण जीं स्थळें आढळत त्यांतील एकही हि-च्या मनास येईना. ' भट आहे तों तीथ नाहीं, आणि तीथ आहे तों भट नाहीं, ' असें होई. मुलगा रूपानें पोरीला साजेसा, वयानें बेताचा, आईबा-पांचा, बहीणभावडांतला, असा पाहिजे; बरें असा मि-ळाला; तो आपल्या तोलाचा,—एवढ्या मोठ्या हुंड्या-ला झेंपेसा पाहिजे. सर्व गुणांनीं संपन्न आहे, पण तो गरीबाचा आहे; तो उपयोगाचा नाहीं. प्रथम वर पाहिजे ही तर पहिली अट ! बरें चुकून वांकून असा एखादा सांपडला, तर तो इतके दिवस लग्नाचा राहिला कां, ही शंका घ्यावयाची; तीही फिटली

तर गणाचें घोडें पुढें सरावयाचें; आणि हें घोडें एकदां कां पाण्यांत बसलें, कीं हर हर महादेव!

स्थळ शोधतां शोधतां रमाबाई मेटाकुटीस आली. मुहूर्त वैशाखांत होते, व वैशाख लागावयास फार दिवस राहिले नव्हते. मुलीला आणखी ठेवावयाची नाहींच, येत्या महिन्यांत तिचें लग्न केलेंच पाहिजे, अशा रमाबाईचा कृतसंकल्प होता. चैत्राचा महिना असल्यामुळें शहरांत जिकडे तिकडे हळदी कुंकवाची गर्दीच गर्दी उसळून गेली होती, व स्वतां स्थळें शोधण्यास आतां ही रमाबाईस नामी संधी सांपडली होती; कारण, हळदी कुंकवाच्या निमित्तानें नवऱ्याचे देखत सुद्धां बाहेर पडावयास तिला हक्क बिनतक्रार मिळाला होता. तिला पुष्कळ घरीं जावयास सांपडे, बायकाही पुष्कळ भेटत. हळदी कुंकवाचें आमंत्रण आलें पुरे, कीं चालली रमाबाईची स्वारी शालजोडी पांघरून; एकदां बाहेर पडल्यावर आमंत्रणाची घरें असोत, नसोत, इतर बायका चालल्या कीं निघाली रमाबाई करंदीकरीण त्यांचे बराबर. लग्नाच्या गोष्टी निघाल्या पुरत, सरसावली रमाबाई पुढें. नाहीं कदाचित् गोष्टी निघाल्या तर ही मुद्दाम काढावयाची. ती बुध्या वेणूला बराबर घेत असे; मनांत कीं, तिच्यावरून आयत्याच लग्नाच्या गोष्टी निघतील, निदान आपल्यास तरी काढावयास सांपडतील. " बाई, बाई, ही केवढी लग्नाची मुलगी तरी, अजून हिचें लग्न कां करीत नाहींत ? " असें कोणीं म्हटलें म्हणजे रमाबाईनें आपण खजील झालों आहों असें दाखवून म्हणावें

" आम्हीं तर बाई स्थळें सोधून सोधून थकलों आतां तुमच्याच आढळांत एखादें असलें तर सांगा.' वेळ आल्यास ती आणखी असेंही घोडें पुढें ढकलीत असें कीं, "आमच्या सदूचेंही लग्न व्हावयाचें आहे तें आणि हें लागलीच उरकून टाकूं. " हें जास्त सांगण्याचें कारण, कोणीं तुमचा मुलगा लग्नाचा आहे काय, असें तिला विचारावें, व मुलगी आढळांत असल्यास सांगावें. 'तुमचा मुलगा' असें म्हटल्यावर तिला केवढी फुशारकी वाटे ! तिचा आणखी हें सांगण्यांत असाही हेतु होता कीं, जितक्या पुष्कळ मुली आपल्या बाळ्याला सांगून येतील, तितका आपला मोठेपणा अधिक. मग लोक म्हणतील कीं, " कायहो अमकी अमकीच्या मुलाला इतक्या मुली सांगून आल्या ! रमाबाई जाई सांगायला आपला मोठेपणा होईल म्हणून, पण निंदखोर बायका असत त्या हिला हंसत, आणि आपआपसांत म्हणत, " का हीच एक मुलगा प्रसवली आहे, आणि गांवांतल्या सगळ्या वांझ आहेत, इतका बढिवार सांगत बसते ती ! " कित्येक बोलतां बोलतां तेथल्या तेथेंच दांत पाडीत, आणि कांहीं तोंडावरही बोलून दाखविण्यास कमी करीत नसत.

काळजीनें तर रमाबाई निम्मे झाली होती. तिचा जिव थकून गेला होता, पण खेपा घालण्याचें तिनें सोडलें नाहीं. तिला कोणी म्हणावें, " अमकें अमकें तें स्थळ ना, वा किती उत्तम आहे तें. असलें श्रीमंताचें स्थळ मिळायला तुमच्या लेंकीची पुण्याईच पाहिजे; म्हणजे रमाबाईनें मोठ्या आशेनें तिकडे

जावें, आणि घरांत अठरा हात वेळू फिरतो आहे हें ऐकून तोंड हिरमुसलें करून परत यावें. लोक तर एखादे वेळस अशीच गंमत करीत. एखादी लग्नाचे कामांत मोडती येईल व आपल्याला पातक लागेल, म्हणून नऊ असामींनीं स्थळ उत्कृष्ट आहे म्हणून वर्णन करावें, आणि दहाव्याकडून पुष्कळ शोधा अंतीं, खरी स्थिति बाहेर यावी.

वैशाख लागला, आणि घरोघर मांडव उभारले; सर्व शहर तासे वाजंत्र्यांनीं गजबजून गेलें; रमाबाईच्या शेजारीं पाजारीं, मागें पुढें वाद्यांचा एकच कडकडाट होऊन गेला; वायका इकडून तिकडे आणि तिकडून इकडे मिरवूं लागल्या; अशा वेळीं रमाबाईची धांदल कांहीं पुसूं नये ! नवऱ्याची कचेरींत जावयाची घाई एके आंगासच राहिली, परंतु कोठें लग्नाला जावयाचें असल्यास रमाबाईचीच घाई उडून जात असे ! कुठली लग्नघटका भरत आली कीं कसला स्वयंपाक आणि कसलें जेवण ! वासुदेवपंतांच्या पानांत भात हिरवा तर हिरवा, मऊ तर मऊ, जळून खाक झालेला तर जळून खाक झालेला पडावयाचा. आणि जर का नवऱ्याला वाढीत असतांना जवळ रस्त्यांत कोठें ढुमढुम वाजूं लागलें तर रमाबाई हातांतील वेळणी सुद्धां टुणटुण उडावयाची !

भाग चवथा.

रमाबाई हट्ट घेऊन बसली होती ती ह्या लग्नांकरितांच. सर्व उपाय हरले तेव्हां तिनें हा उपाय यो-

जिला होता. त्या दिवशीं संध्याकाळीं बाहेरून त्रासून येऊन तिनें आपला राग वेणूवर काढला, व ह्या 'कार्टीकरतां मला इतकें सोसावें लागतें,' ह्मणून तिनें रागानें तिच्या डोक्यांत भांडें घातलें. हा प्रकार वासुदेवपंतांस वेणूनें सांगितला नाहीं, तरी रक्त आलें हें हिच्या माराचेंच फळ हें वासुदेवपंतांनीं ताडलें होतें.

रमाबाईचा हट्ट दुसऱ्या दिवशीं सुद्धां राहिला हें सांगितलें; ती तशीच संध्याकाळपर्यंत पडून होती. सबंध एक दिवस आणि रात्र अन्नपाण्यावांचून जमिनिवर एकसारखी पडून होती ह्मणजे धन्य त्या बायकोची असें ह्मटलें पाहिजे ! आंगाला कळा लागल्या तेव्हां आतां ह्याच्या पुढें कांहीं असेंच पडून राहवत नाहीं, ह्मणून रमाबाई उठली; पोटांत तर कांहीं नव्हतेंच तिची अवस्था भ्रमिष्टा सारखी झाली, व तिनें मोठ्यानें रडण्यास प्रारंभ केला.

वासुदेवपंत मोठ्या आनंदामध्यें घरीं येत होते, हें मागें सांगितलेंच, त्या त्याच्या आनंदाचें कारण हेंच कीं आज कित्येक दिवस मनांत धरलेला त्यांचा बहडतीचा हेतु सिद्धीस गेला होता. त्याच दिवशीं सायंकाळीं त्यांना चंदन तालुक्याच्या मामलेदारीचा हुकूम मिळाला, व ही अत्यानंदाची वार्ता आपल्या माणसांस सांगण्या करितां त्यांनीं घरीं येण्याची घाई केली होती. ते रमाबाईचा हट्ट व साऱ्या दिवसाचा उपास त्या हर्षांत विसरून गेले होते.

परंतु घरीं आल्यावर बायकोचा आक्रोश ऐकून

त्या पुरुषाचें मन किती विरस झालें असावें बरें ! सर्व हर्ष एकदम मावळून वासुदेवपंतांच्या डोळ्यांस ढळढळां पाणी आलें, व ' धिक् हा संसार, धिक् हें जगत्, ' असें त्यांस होऊन गेलें. शेवटीं ते बायकोला म्हणाले, " मुलीच्या लग्ना बद्दलच कीं नाहीं तुझें अवदसेचें हें कृत्य, कांहीं चिंता नाहीं, चंदनास गेल्यावर स्थळ आलें कीं ताबडतोब लग्न उरकून टाकतों. "

चंदनास दुसऱ्या दिवशींच निघून जाण्याचा हुकूम होता. जागा मिळाल्याचें रमाबाईला मागाहून कळलें पण मग त्या आनंदांत कांहीं राम नाहीं. त्यांनीं जेऊन खाऊन दुसऱ्या दिवशीं चंदनास निघण्याची तयारी केली, व त्या दिवशीं तें कुटुंब चंदनास जाण्यास निघालें. आपण ' मामलेदारीण ' या पदाप्रत पावलों या गोष्टीनें रमाबाईस आनंद झाला असेल स्वचित, परंतु नवऱ्यानें ' मुलीचें ताबडतोब लग्न उरकून टाकतों, ' असें जें तिला वचन दिलें होतें, तें मिळाल्यामुळें तिला अधिक आनंद झाला असावा. वाटेंत दुसऱ्याच मुक्कामाला रमाबाईची व एका विधवा बाईची गांठ पडली.

त्या बाईचें वय सुमारें पंचेचाळीस वर्षांचें असावें. बाई खूप थलथलीत होती व गालही भल्ले चांगले फुगीर होते. त्या बाईचें नेसलेलें लुगडें सहा सात रुपये किंमतीचें असून अंगावरून घेतलेली शुभ्र धोतराची चौघडी रेशीमकांठी होती. नांव विचारितां त्या बाईनें मला मावशीबाई म्हणतात असें सांगितलें. निघतां निघतां त्या बाईनेंच रमाबाईच्या आवडत्या म्हणजे लग्नाच्या गोष्टी काढल्या, व रमाबाईनें आपल्या चालीप्रमाणें

' आह्मीं होतों तेथें स्थळें सोध सोध सोधलीं, पण मनाजोगें एकही मिळालें नाहीं, आणि आतां मध्येंच इकडे बदली झाल्यामुळें इकडेच स्थळ पाहिलें पाहिजे, ' अशी बाईला मागची थोडीशी हकिगत सांगून 'तुह्मीं याच प्रांतांतल्या रहाणाऱ्या ह्मणतां तर आम्हांला इकडेच स्थळ सांगा,' अशी तिनें त्या बाईला विनवणी केली.

ती बाई बारीक स्वर काढून म्हणाली,—' कुठे बाई माझ्या तर आढळांत स्थळ नाहीं. पण हो हो, आहे-आहे, एक स्थळ आहे-पण तें तुमच्या काय उपयोगीं ? तें तुम्हांला झेंपेल-न झेंपेल ! बाकी स्थळ पण स्थळ, वाहवारे स्थळ ! असें बोलून ती बाई माना डोलवितच राहिली. " तुह्मीं सांगा तर पाहूं ! रमाबाई तिला म्हणाली, " मग झेंपेल कीं नाहीं तें पाहतां येईल. तुह्मी सांगा तर खऱ्या—"

" वाहवा, काय पण स्थळ सांगूं ! यांचेंच नांव स्थळ. सासू आहे, सासरा आहे; मुलीच्या आंगावर दागीने सूपभर घालतील; आधीं मुलग्याचा देवगण, तेव्हां तुमच्या मुलीचा कोणताही असला ह्मणून हरकत नाहीं. एक काय ती मोठी नड—"

" ती कोणची, ती कोणची ? " रमाबाई उतावळी होऊन विचारते.

" हुंडाची, " ती बाई ह्मणते, " पण हें पहा बाई, तुह्मीं सामर्थ्य असेल तर पांचशें नाहीं अधिक पडले तरी तें स्थळ गमावूं नका. " असें म्हणून त्या बाईनें त्या स्थळाचें अतोनात वर्णन केलें, व रमाबाईनें तें कुठे आहे म्हणून विचारलें तेव्हां ती बाई ह्म-

णाली, " तुम्हीं उद्यां चंद्रनास जाऊन उतराल. चंद्रनापासून तीन कोसांवर रेवगांव म्हणून एक गांव आहे, तेथें विष्टलपंत काळे म्हणून एक त्या दहा पांच खेड्यांत श्रीमंत असे सावकार रहात असतात, त्याचा मुलगा लग्नाचा आहे." यापुढें कांहीं वेळ बोलून "मी पुन्हा केव्हांतरी चंद्रनास तुमच्या घरीं येईन, ओळख विसरूं नका." असें सांगून ती आपल्या कामाकरितां शेजारच्या गांवीं निघून गेली.

दुसरे दिवशीं तीं सर्व माणसें चंद्रनास येऊन दाखल झालीं, व तेथें एक घर भाड्यानें घेऊन राहूं लागलीं.

चंद्रन हें त्याच नांवाच्या तालुक्याचें ठाणें. हें गांव पेशवाईंत लहान सहान नव्हतें. येथें हजारों रुपयांची घडामोड होत असे, व सर्व प्रकारचा माल उतरत असे. परंतु आतां ह्या सरकारच्या राज्यांत ह्याला निराळेंच रूप मिळालें आहे. ह्या गांवासभोंवती मोठा मातीचा कोट होता, परंतु तो जागजागीं पडून जाऊन त्याचे कोठें दहा हात, कोठें पांच हात, असे तुकडे मात्र राहिले आहेत, व कांहीं दिवसानीं तर येथें कोट होता कीं नव्हता अशी शंका घेण्यासही जागा राहणार नाहीं. गांवांत कोणास कशाला माती लागली म्हणजे त्यानें बेलाशक या तटाची पाडून न्यावी. आजानें किंवा पणजानें शत्रूपासून आपलें रक्षण व्हावें म्हणून ही भित घातली असावी, परंतु आतां त्याचा नातु किंवा पणतु, त्या भिंतीची माती काढून तिनें आपल्या घरांतील बिळें बुजवून उंदरांपासून आपलें रक्षण करून

घेतो. ह्या कोटाच्या मातीमुळें कुंभाराचें तर चांगलेंच फ़ावलें आहे; त्याला आंग मोडल्याशिवाय त्याच्या वाडवाडिलांनीं चाळलेली आयतीच गाळींव माती हवी तितकी लोकांच्या हातांत खापरें द्यावयास सांपडते. गांवांत सबंध पेठ अशी काय ती एकच राहिली आहे; बाकीच्या पेठांतील घरें मोडून जाऊन भिंताडें मात्र अर्धींमुर्धीं उभीं राहिलीं आहेत. कसें झालें, पडलें झडलें, तरी तें घर, ह्मणून निवडुंग रान सोडून ह्या घरांतून वास करूं लागले आहेत, व ते आता इतके प्रबल झाले आहेत का आपल हनन कोणीं करूं आल्यास त्याजवळ तरवार, भाले, असलीं लांबलांब हत्यारें पाहिजेत तीं त्याजवळ नाहींत, हें ते पक्कें ओळखून आंत कोणाला शिरकाव करूं देत नाहींत.

वासुदेवपंत ज्या घरीं राहिले होते त्याचे डावे-वाजूस अशाच प्रकारचें एक ओसाड घर होतें, व उजवे बाजूस मात्र एक चांगलें घर होतें. या घरीं त्यांचेच कचेरींतला एक कारकून राहत असे. मामलेदारसाहेब आपल्या शेजारींच राहिले आहेत, तर आपणास त्यांचे घरीं जात येत असलें पाहिजे ह्मणून तो कारकून त्यांचे घरीं जाऊं येऊं लागला. नवीन येणारे मामलेदार चांगल्या स्वभावाचे आहेत याची चौकशी कारकून लोकांनीं आधींच करून ठेविली होती. पण मामलेदारीण साहेबांचा स्वभाव त्यांस माहीत नव्हता; त्यामुळें हा कारकून त्यांच्या जवळ जपून जपून वागे. दादांची मर्जी प्रसन्न करून घ्यावयाची असेल तर

तें काम वहिनींच्या द्वारें चांगलें होतें, त्यांचा शब्द झेलला म्हणजे झालें. हा मंत्र त्या कारकुनास चांगला माहीत होता. त्यानें रमाबाईच्या तोंडा सारखें बोलावें, नेहमीं तिची नांवाजणी करावी, आह्मांला नवे यजमान फारच उत्कृष्ट मिळाले आहेत, असें सुख आह्मांला कोणाच्याच राज्यांत झालें नाहीं, असे वासुदेवपंतांचे गुण तिजजवळ गावे.

ह्या कारकुनाची चांगली घसण पडल्यावर नित्यतां नित्यतां एक दिवस मुलांच्या लग्नाविषयीं गोष्टी निघाल्या. रमाबाईनें लग्नाच्या कामीं वासुदेवपंत किती हायगय करतात याचें वर्णन तिखटमीठ लावून केलें, व "स्थळ आतां कोठें आल्यास वेणूचें लग्न यंदा करतों ह्मणून त्यांच्या तोंडून सोन्याचीं अक्षरें आलीं आहेत, तर तें आतां करून घेतलें पाहिजे, या कामीं तुह्मी मला मदत करा," अशी विनंति तिनें त्या कारकुनास केली. ती यजमानीणीनें केलेली विनंति, ती ऐकल्यावर तर कारकुनांनीं जास्ती जास्तीच हांजीहांजी करण्याचा आव घातला.

"अहो वामनराव, तुह्मांला रेवगांव माहित आहे?" असें रमाबाईनें विचारिलें.

"हो! अहो रेवगांव येथून तनि कोसांवर?"

तिनें ह्मटलें,—"काय तीन कोसांवर! इतकें जवळ."

"हो, तीनच कोस आहे. मध्यें काय तो एक डोंगर उल्लटावयाचा. बरें पण काय त्याचें?"

"तिथे विठ्ठलपंत काळे ह्मणून कोणी आहेत?"

"हो आहेत. विठ्ठलपंत मोठे सावकार आहेत."

"आणि त्यांचा एखादा लग्नाचा मुलगा—"

"वा, उत्कृष्ठ स्थळ, उत्कृष्ठ स्थळ, वाहवा! खाशी! फार नामी स्थळ!" अशी एकदम त्या कारकुनानें स्तुति चालविली. रमाबाईच्या आश्चर्याला तर अंतच नाहीं. आपणास मावशी बाईनें सांगितलेल्या स्थळाची वामनराव सुद्धां जर इतकी तारीफ करीत आहेत, तर आतां आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडून येण्याला फार अवकाश नको. मावशीबाईनीं सांगितलेलें सर्व यथास्थित जमलें, यावरून देव आतां आपणास सहाय आहे असें तिला वाटूं लागलें.

त्या कारकुनाचें व रमाबाईचें एक मत होऊन त्यांनीं असा बेत केला कीं, हेंच स्थळ कायम करावयाचें, व तें कायम करण्यांत वामनरावांनीं सर्व कामें एकीकडे ठेवून जिवापाड खटपट करावयाची.

परंतु हें बोलणें चाललें असतांना एक पन्नास पंचावन वर्षांचा म्हातारा मराठा विठ्ठलपंताच्या गांवा शेजारील एका खेड्यांतला तेथें मामलेदारांचे घरीं भाजी पोंचविण्याकरितां आला होता. तो वरील भाषण ऐकत होता. नंतर सावकाशपणें तो म्हणाला, 'काय म्हणतां तुम्हीं भाऊसाहेब? बाईसाहेबांची लेंक तेथें द्यायची म्हणतां? तर मग तुम्हांला त्यांचीं कांहींच माहिती नाहीं. विठ्ठलपंतानें पैसा पुष्कळ जमविला आहे खरा, पण त्याचा लेंक—"

"उगाच वैस म्हातारड्या," तो कारकून त्याच्या आंगावर ओरडून म्हणाला, "तुला बिरामणाच्या कारभारांत काय समजतें? तूं आपल्या गांवचे सगळे कागद हजर केलेस? जा, तुझा कुळकर्णी आणि तूं जाऊन कचेरींत हजर असा, तों मी आलोंच" इ-

तकें बोलत असतां कारकुनानें इतकें उग्र स्वरूप धारण केलें होतें कीं, पाटीलबावाची त्यापुढें बोलण्याची छाती झाली नाहीं.

रमाबाईचें लक्ष्य पुढें होणाऱ्या लग्नसोहळ्याकडे गुंतलें असल्यामुळें त्या भाषणाकडे मुळींच गेलें नाहीं. परंतु हा प्रकार चित्त लावून ऐकणारे तेथें दुसरें कोणीं नव्हतें काय ? बरें वाईट म्हणून ज्याला कळतें आहे, अशा अंतःकरणाचा कोणी प्राणी तेथें नव्हताच काय ? घरांत कांहीं का बोलणें होईना, आपल्याला त्याच्याशीं काय करावयाचें आहे, असेंच म्हणणारीं त्या घरांत सर्व माणसें होतीं काय ? खचित नाहीं. वेणू जवळच होती.

खालीं मान घालून आईनें दिलेले गळेसर वेणू तेथेंच ओंवीत बसली होती. जवळच्यास वाटावें कीं हिचें सर्व चित्त तिकडेच लागलें आहे; परंतु वर सांगितलेलें संभाषण चाललें असतां तिनें किती मणी ओंविले ते जर कोणीं मोजून पाहिले असते, तर त्याची लागलीच खात्री झाली असती कीं, हिचें चित्तच स्वतां दुसरीकडे कोठें ओंवून गेलें आहे. आणि तें कोठें असावें बरें ? अर्थात् तेथें चाललेल्या संभाषणांत.

तिच्या चित्ताची अशी स्थिति कां न व्हावी बरें ? चांगलें कोणचें, वाईट कोणचें, म्हणजे हवें कोणचें नको कोणचें, हें पांच वर्षांच्या मुलाला सुद्धां समजतें, मग तें आतां वेणूला कां न समजावें बरें? नव्या गोष्टीची, नव्या जिनसेची, नव्या स्थितीची, हौस कोणाला नाहीं ? वेणूला नवऱ्याविषयीं चालले-

ल्या गोष्टी ऐकावयास मनापासून आवडत. आईबापांस लग्नाच्या गोष्टी बोलतां बोलतां कंटाळा आला, पण तिला त्या ऐकण्याचा नाहीं आला.

आईचा व कारकुनाचा निश्चय झालेला पाहून पोरीच्या जाती प्रमाणें तिला समाधान वाटलें, पण पाटलानें जेव्हां मध्यें तोंड घातलें, व कारकून त्याला दात्रीत आहे त्याच्याकडे आईचें लक्ष नाहीं, असें जेव्हां तिच्या ध्यानांत आलें, तेव्हां तिचें सर्व समाधान जाऊन तिनें तोंड हिरमुसलें केलें; व तिला एका प्रकारचा धक्काही बसल्यासारखें झालें. ही तिची स्थिति त्या एका पाटलावांचून कोणाच्या लक्षांत आली नाहीं.

कांहीं न बोलतां तो पाटील तसाच तेथें थांबला. कारकून घरीं गेला म्हणजे आपण पाठीमागून बसूं असा त्याचा बेत असावासें दिसतें; परंतु उठते वेळीं कारकुनानें त्यास आपल्या बराबर घेतलें. बाहेर आल्यानंतर कारकुनानें त्यास कांहीं एक गोष्टीची खूण दिली, तेणेंकरून तो पाटील अगदीं भयाभीत होऊन गेला.

कारकून आपल्या घरांत शिरून पाटील पुढें वाटेनें जातो आहे तों वेणू हातांत कळशी घेऊन त्यास सामोरी आली. ती पाणी आणण्याचे निमित्तानें मागच्या दारानें बाहेर पडली होती.

पाटलानें तीस ओळखिलें. दोघेंही एकमेकांकडे पहात स्तब्ध उभीं राहिलीं. दोघांचेही तोंडून शब्द फुटेना. पाटलाचें मन कारकुनानें दिलेल्या शापानें ग्रस्त झालें होतें; पण वेणूनें काय बोलावें बरें?

ती पाण्याचें निमित्त करून बाहेर पडली खरी, ज्या-स्त माहिती कळवून घेण्याची तिची इच्छा होती खरी, परंतु 'माझा नवरा कसा आहे,' किंवा अ-गदीं मोघम 'मला स्थळ पहात आहेत तें कसें आ-हे,' असें तिच्यानें विचारवेल काय?

पाटील कांहीं बोलेना म्हणून वेणू जाऊं लागली तेव्हां पाटील म्हणातो,—"वेणूताई, तुमच्याकडे त्याचा काडी इतका बोल नाहीं, पण तुमच्याकरतां मीं त्या कारकुनाला आडवा येऊन पायावर धोंडा घालून घेतला. रावसाहेबानींही तेंच ठरवायाचें म्हटलें तर तुमचें कमनशीब खचीत समजा. होतां होईतों आईसाहेबास्नीं तें ठरवूं देऊं नका."

कारकुनाचे घराकडे एकदां पाहून पाटील पुढें जावयास निघाला. परंतु वेणूचें तोंड केंवीलवाणें पा-हून त्याला काकळूत येऊन तो म्हणाला:—

"बयाताई तुम्हीं भिऊं नका. तुमच्या पायीं माझें कांहीं झालें तरी हरकत नाहीं. जा, मंबी एकच सांगतों, जिवांत जीव आहे तोंवर हा पाटील तुम-च्या कल्याणाकरतां झटण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं."

त्या पाटलानें आणखी एकदां कारकुनाचे घराक-डे पाहिलें आणि तो तडक चालता झाला. बिचारी वेणू कळशी भरून घेऊन घरीं आली.

भाग पांचवा.

रेवगांव फार मोठा नाहीं. ब्राम्हण, सोनार, मराठे मिळून दोनशें घर असेल नसेल. सगळ्यांत ब्राम्हणाची वस्ती कमी. त्या गांवांत, इतकेंच नव्हे, सभोंतारच्या पांच सात गांवांत, मोठे सावकार काय ते विठ्ठलपंत काळे. पूर्वी यांचा आजा मोठा श्रीमंत होता, व त्या वेळेस त्याला कांहीं इनाम जमीनही होती. घर ब्राम्हणण्यासारखें नव्हतें, तरी तें मोठें अमून त्याला एक लहानशी ठेंगणी माडी होती. बाप वारल्यावर सर्व दौलत विठ्ठलपंतांचेच हातीं लागली. बापानें मिळवावें आणि लेंकानें घालवावें, याप्रमाणेंच येथें स्थिति झाली. विठ्ठलपंतांचे वडील उधळे निघाले होते त्यांनीं सर्व संपत्तीची तेव्हांच वाट लाविली. राहतां घर व तेवढी जमीन मात्र शिल्लक राहिली. हे वारल्यानंतर विठ्ठलपंतांचे हातीं काय लागलें तें एवढेंच. विठ्ठलपंतास बापाच्या मरणाच्या वेळेस चांगलें समजत होतें. बाप सगळेंच उधळून टाकतो आहे, आपल्याला कांहीं राहणार नाहीं, असें भय विठ्ठलपंताला फार होतें; म्हणून घर व इनाम जमीन गहाण टाकल्याशिवाय आपल्या हातीं आली, आतां कांहीं हरकत नाहीं, असा त्याला धीर आला. बापानें विठ्ठलपंतांच्या देखतच उधळपट्टी केल्यामुळें तिचा परिणाम काय होतो तो त्याच्या दृष्टीस चांगला आला होता. याकरितांच विठ्ठलपंतांनीं काटकसरीनें राहून पुनः संसार पूर्व रूपास आणावयाचा निर्धार

केला होता. " बसायाला घर सत्तेचें आहे, कष्ट केले तर इनाम जमीन पोटापुरती आहे, यावर मीं राज्य उभारीन, " अशी त्याला हिंमत होती, व ती त्यानें खरी करून दाखविली.

विठ्ठलपंतांस या कामीं साह्यकारी त्यांची पत्नी काशीबाई मिळाली होती. त्या दोघांनीं मागील सर्व डामडौल विसरून, लोक नांव ठेवितील तिकडे दुर्लक्ष करून, वेतावातानें राहून पैशाचा संचय करण्याचा क्रम चालविला. आणखी जमिनी विकत घेतल्या, त्यांवर व इनाम जमिनीवर शेतभात करून निर्वाह करीत, व उरलें सुरलें धान्य विकून टाकीत. पैसा जमवून त्यांनीं पुरून ठेविला नाहीं; देण्याघेण्याचा व्यापार होऊंनही जो पैसा उरे त्याचे त्यांनीं दागदागिने केले. नवऱ्याच्याच अनुमतानें काशीबाईची थोडीशी निराळी सावकारी होती.

वासुदेवपंतांप्रमाणेंच विठ्ठलपंतांस दोन मुलें होतीं; परंतु ह्यांची मुलगी थोरली व मुलगा धाकटा. हाच मुलगा रमाबाईचा भावी जामात.

ह्या मुलाचें नांव विष्णु. विष्णूचें वय ह्या वेळेस सोळा वर्षांचें होतें. विष्णु कसा निपजला हें सांगावयाचें झणजे विठ्ठलपंतांनीं व काशीबाईनें त्यास कोणच्या रीतीनें वागविलें हें सांगितलें, झणजे वाचकांची समजूत नीट पडेल.

विठ्ठलपंत पैशाच्या पाठीस लागलेला. सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं पुन्हां निजेपर्यंत तो आपल्या उद्योगांत असे. पैसा जमवून घरीं आणावयाचा एवढेंच त्याला माहीत होतें. घरीं आला झणजे एकदां

डोकीवर पाण्याचा हांडा ओतून घेऊन पानावर बसावयाचें; पुन्हां जेवण होईं तों अवकाश, कीं चालला आपल्या कामावर. आज कोठें शेतावर ह्मणून जा, उद्यां कोठें कामकरांच्या पाठीवर ह्मणून जा, परवां कोठें वसुलालाच जा, अम्मा तो सदा कामांत गुंतलेला असे; व मुलगा काय करतो ह्याची वास्तपुस्त करावी अम्मा विचार त्याच्या स्वप्नींही येत नसे. मुलें पांच वर्षांचीं झालीं ह्मणजे शाळेंत घालावयाचीं, त्याप्रमाणें गांवांत गांवठी शाळा होती, तींत विष्णूस लिहावयास घातलें होतें. तेथचें शिकणें झाल्यावर पुढच्या विद्याभ्यासाची त्याच्या आईबापांनीं कांहींच तजवीज केली नाहीं. यांच्या शेजारींच गांवांतील एका दोघांनीं पुढें शिकण्याकरितां आपलीं मुलें मोठाल्या शहरांतून पाठविलीं. त्यांना खर्च दरमहा दहा रुपयेपर्यंत येतो असें जेव्हां विठ्ठलपंत ऐकत तेव्हां त्यांना मोठें आश्चर्य वाटे. त्यांचें ह्मणणें असे कीं "ही विद्या शिकून फायदा काय? उद्यां हें राज्य गेलें कीं रडत बसावें लागेल. एकंदर टोपीवाले साडेतीन आहेत. त्यांतला हा राजा अर्धा टोपीवाला, लवकरच सगळ्या टोपीचा रूस येणार आहे, तो आला ह्मणजे ह्याला आपली अर्धी टोपी टाकून पळून जावें लागेल, व त्याची विद्या शिकलेल्या लोकांना तो एके रांगेनें उभें करून त्यांचीं शिरें उडवील. पैशा संबंधानेंही त्याचा असा हिशेब असे कीं, " हे दरसाल शें सव्वाशें रुपये व्यर्थ खर्च होतात. हे अगदीं कर्मांत कमी एकोण्या प्रमाव्याजीं लावले तर दरसाल साडेबारा रुपये उभे

होतात. सहज कोणाला आठ दिवसांच्या मुदतीनें एक रुपया दिला तर तो दोन पैसे व्याज देतो. तसा कांहीं यांच्या शिकण्यांत त्वरित फायदा दिसतो आहे का? पुढें म्हणतात फायदा होईल. पुढचें पाहिलें आहे कोणीं? हातचें सोडा, आणि पळत्याच्या पाठीस लागा एवढा कारभार आम्हांस नको. आमच्या विष्ण्याचें अक्षर चांगलें झालें म्हणजे झालें; हिशेब त्याला प्रसंग पडला म्हणजे करतां येतोलच. " सारांश, शाळा सुटल्यावर विष्णु रिकामाच होता. बापानें एकदां त्याला अक्षर वळवीत जा म्हणून सांगून ठेविलें होतें, परंतु अज्ञानें कां तो उनाड पोरगा ऐकतो? विठ्ठलपंत आपल्या बाहेरच्या उद्योगाला गेला, काशीबाई आपल्या घरांतल्या कामांत गुंतली, कीं फावलें विष्णूचें. तो रिकाम्या पोरांच्या संगतीस लागून बिघडत चालला; तंबाखू खाण्याचें व ओढण्याचें व्यसन त्याला केव्हांच लागून गेलें; कुळवाडी, मराठे यांच्या मंडळींत जाऊन लावण्या गावयास व खावटपणा करावयास शिकला; आपल्या व शेजारच्या गांवांत जाऊन मराठ्यांच्या बायकांच्या खोड्या काढूं लागला; याप्रमाणें त्याला भ्रष्ट होण्यास म्हणजे शिंगें यावयाचीं राहिलीं नव्हतीं. विठ्ठलपंतांस त्याला तूं काय करतोस म्हणून विचारण्यास मुळींच फुरसत होत नसे; काशीबाईला झालीच तर तो तिला जुमानीत नसे. आतांशा विष्ण्या माझें कांहीं ऐकत नाहीं, लिहायला सांगितलें तर आडवी रेघ म्हणून ओढीत नाहीं, असें कधीं काशीबाईनें विठ्ठलपंतास म्हटलेंच तर त्याला, "अं: कायरे, मला बनत नाहीं

ह्मणून गमजा लावतोस होय," असें त्यानें ह्मणावें, आणि आपल्या उद्योगाला निघून जावें.

काशीबाई एके रविवारचे दिवशीं तिसरे प्रहरीं ओसरीवर कांहीं काम करीत बसली होती, इतक्यांत वामनराव कारकून येऊन तिला ह्मणाले कीं मामलेदार साहेब आपल्या घरीं येत आहेत.

वामनराव या घरीं नवखा नव्हता असें येथं स्पष्ट दिसतें.

भाग सहावा.

वासुदेवपंत हरीपंताचे घरीं कां येत होते हें आतां आह्मांस सांगण्याची गरज नाहीं. व त्यास येथें येण्याची प्रेरणा कशी झाली यापैकींही कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. मामलेदारी मिळाली तरी त्या दिवसच्या गृहसौख्यापासून वासुदेवपंतांचा उत्साह एक दशांशसुद्धां राहिला नव्हता.

विष्णूला दुसरीकडून कोठून मुली सांगून आल्या नाहींत असें नाहीं. तो पैकेवाल्यांच्याच मुलांमध्यें मोडत असल्यामुळें त्यालाही कांहीं मुली सांगून आल्या होत्या, परंतु त्याचें अद्यापि लग्न न होण्याचें कारण पाटलाच्या मनांत वागत होतें तें नव्हे, तर ह्या मुलीचें न जमण्याचें कारण फक्त पैसा होय. विठ्ठलपंत व त्यांची पत्नी यांचा बेत मिळेल तितकी जवळच्या पैशांत भर टाकावयाचा असल्यामुळें त्यांची नजर मुलाचे हुंड्यावर होती. रमाबाईप्रमाणें काशिबाईस मुलाचें लग्न केव्हां होईल असें झालें नव्हतें; तर पिशवींत भर केव्हां पडेल असें झालें

होतें. विठ्ठलपंत व काशीबाई या उभयतांच्या मम-लती कांहीं वेगळ्याच होत्या. त्यांचेजवळ जो पैसा जमला होता तो अर्थांतच त्यांनीं मोठ्या कष्टानें मि-ळविला होता. मनुष्यानें कवडी कवडी करून जो पैसा मिळविलेला असतो तो त्याला कोठें ठेवूं आणि कोठें सांचवूं असें होतें. हा पैसा ठेवायाचा झटला झणजे त्यांचा किती बंदोबस्त, किती कुलपें, आणि किती गांठी असतात? परंतु विठ्ठलपंतांनीं असें केलें नाहीं. पूर्वी सांगितलेंच आहे कीं देवघेवीला जेवढा पैसा लागेल तेवढा निराळाच ठेवून बाकीच्याचे त्यां-नीं बायकोचे आंगावर घालण्याकरितां दागिने केले होते. ही अशी झळकफळक करण्यामध्यें त्यांचे दोन उद्देश होते. एक हा कीं, यांचें पूर्वी एवढें मोठें घराणें असून यांचे वडिलाचे वेळीं अगदीं वसलें होतें; परंतु हे पुढें पराक्रमी होऊन त्यांनीं पूर्वीचें नांव पुनः मिळाविलें, असें जर अनायासें लोकांत होत आहे तर कां सोडा? परंतु ह्याजपेक्षांही त्यांचा दुसरा उद्दे-श मोठा होता; तो हा कीं आपण अशा ढामडौलानें राहिलों असतां, व लोकांस आपण पुष्कळ श्रीमंत से वाटलों झणजे, सहज कोणीं शें दोनशें रुपये हुंडा जास्त देईल. रमाबाई करंदीकरणीसही आ-पल्या मुलाचा हुंडा पुष्कळ यावा असें वाटत असे, परंतु तो केवळ मोठेपणा यावा झणून. तिला आपल्या मुलीला ज्यास्त हुंडा द्यावा असेंही पण वाटत असे. सारांश काय कीं कोणी विचारावयास आला अस-तां सर्वांत प्रथम पैशाविषयीं बोलणें निघून तें जुळूं नये.

हे ऐन लग्नाचे दिवस. लोक मुलगा पहावयास येतात म्हणून तूं बाहेर कोठें जाऊं नको, अशी त्या उभयतां स्त्रीपुरुषांची विष्णूस ताकीद असे. काशीबाईनें त्याला चार सोयीच्या गोष्टी सांगितल्या, "बाळा, तुझें आतां लग्न व्हायचें. तुला कोणी पहायला येतात, त्यांनीं मुलगा कोठें आहे पाहूं म्हटलें म्हणजे इकडे सोध तिकडे सोध करायचें, यानें त्यांना काय वाटेल बरें! ते तुला नांवें ठेवतील, उनाड मुलगा म्हणतील, आणि अशांनीं तुझेंच लग्न होणार नाहीं." हें बाळ आईच्या अशा उपदेशानंतर बाहेर जात नसे.

मामलेदार आपल्या घरीं येणार आहेत अशी कुणकुण त्या स्त्रीपुरुषांस कळली होती. काशीबाई आपले होते तेवढे सर्व दागिने घालून बसली होती. विष्णूलाही नीट व्यवस्थेनें राहावयास सांगितलें होतें. व विठ्ठलपंतांचीही स्वारी जरा पांढरा पंचा नेसून, पागोटयाच्या पळ्या नीट सांवरून जवळच कामास गेली होती.

वामनराव आल्यानंतर लागलीच विठ्ठलपंत आले, व मामलेदारसाहेबांकरितां बैठक घालून आपण त्यांची वाट पाहत बसले. वामनराव म्हणाले, "हें जमवून आणण्यास आपण कारण आहों. विठ्ठलपंताची सोइरगत थोर अधिकाऱ्यांशीं व्हावी अशी आपली मनापासून इच्छा आहे; व त्यांत विठ्ठलपंताचें सावकारीच्या संबंधानें कल्याण आहे; याकरितां त्यांनीं स्थळ आलें आहे हें मोडूं नये." वामनराव आणखीं म्हणाले, "हें जमवून आणण्यास किती प्रयास पडले आहेत, हें माझें मला माहीत. बाईसाहेबांशीं तुमच्या संबंधानें बोलत असतां एकदां तुमच्या वाटण्या-

चा पाटील तुमची निंदा करूं लागला. परंतु मीं त्याला तेथल्या तेथंच दाबून कांहीं कामाला पाठवून दिला. ”

विठ्ठलपंत तेव्हां क्रोधास चढून म्हणाले, “ पहा कसा हरामखोर आहे तो; तेथें सुद्धां माझी निंदा करायला तो तयार आहे ! हा थेरडा पाटील मला जिथे तिथे नडतो. विठ्ठलपंताचे रुपये काढूं नका, उपाशी मेलां तरी पत्करलें, असा तो आपल्या गांवच्या लोकांस उपदेश करीत असतो ! ह्मणतोः— “ विठ्ठलपंताचे रुपये एकदां काढले ह्मणजे फिटतां फिटत नाहींत, तो तुह्मांला हिशेबांत फसवतो ! मीं त्यांना फसविलें तर ह्याच्या बापाचे तीन चव्वल का खरचले ? बापजन्मीं कुठें र ठ फ करायला शिकला होता, तेवढ्यांत त्या कुळांची खतें पाहून हिशेबाचा दिमाख मला दाखवतो. ” विठ्ठलपंत आतां अगदीं लाल होऊन गेले, व करकरां दांत खाऊन ह्मणाले, “ काय सांगूं हो ! याच नष्टानें माझे एका कुळाकडील रुपये अखलाशीं बुडवले; हा जर माझे एकदां तावडींत सांपडता, तर याचे तळभंजन करून सोडलें असतें; पण काय करावें, पडला गांवचा पाटील त्यामुळें इलाज चालत नाहीं. ”

इतक्यांत वामनराव ह्मणाले, “ अहो, पाटील पाटील ह्मणजे बिशाद काय ! एका क्षणांत त्याची पाटीलकी काढून त्याला धुळीचे दिवे खायला लावूं. हें बघा विठ्ठलपंत,—त्याबद्दल तुह्मी फिकीर करूं नका, तें काम मजकडे लागलें.

" अहो मीं तुह्मांला त्या दिवशीं मागच्या दुष्काळाच्या वेळीं त्यानें "—असें विठ्ठलपंत ह्मणत आहेत तों " मीं समजलों तुम्हीं काय म्हणतां तें," असें मध्येंच वामनराव म्हणाले. " मलाही त्या गोष्टीचा सुगावा लागला आहे. मीं याच संबंधीं परवां मामलेदारांचे दारांत त्याला खूण दिली तेव्हां तो असा चपापून गेला आहे म्हणतां—"

असें जों तो कारकून म्हणत आहे, तों वासुदेवपंत आंगणांत आले; व घोड्यावरून उतरल्यावर नमस्कार चमत्कार होऊन बैठकीवर येऊन बसले.

कांहीं वेळ इकडचीं तिकडचीं बोलणीं होऊन वामनरावांनीं रावसाहेब कशाकरितां आले आहेत तें विठ्ठलपंतास सांगितलें, आणि अशा प्रकारें तेथें लग्नाविषयींचें बोलणें सुरूं झालें. कसें तरी साधारण स्थळ पाहून बायकोनेंहात टेंकीस आणिलें म्हणून पोरीला एकदां गुंतवून टाकावयाची, असा वासुदेवपंतांचा निश्चय झाला होता. विठ्ठलपंत सावकार आहेत याविषयीं वासुदेवपंतांस संशय राहिला नव्हताच. घर पाहिलें तें वासुदेवपंतांचे मनास आलें. वासुदेवपंत नको नको म्हणत असतां, व विठ्ठलपंत एव्हां कांहीं ध्यायला हरकत नाहीं " म्हणून त्यांस सांगत आहेत तों, काशीबाई मध्येंच येऊन गूळ पाणी ठेवून गेली. तिचा तो दागिन्यांचा चकचकाट पाहून सावकारांच्या श्रीमंतीविषयीं वासुदेवपंतांची खात्री झाली. मुलग्याला पाहावयास म्हणून हांक मारली, पण मुलगाच कोठें ओ देईना. काशीबाईनें त्यास पुढें घालून आणिलें. लाजत लाजत येऊन बसल्यानंतर

वामनरावांचे सांगण्यावरून त्यानें आपली पुस्ती काढून दाखविली.

मुलानें अक्षरावर जरी इतकी मेहनत केली नव्हती, तरी त्याचें अक्षर केवळ टाकाऊ होतें असें नाहीं. दिसण्यांतही मुलगा वावगा नव्हता. आंगापिंडानें सशक्त असून नाकाडोळ्यांनीं तरतरीत होता. गोरेपण ही वेणूच्या गोरेपणाला साजेसें होतें. तोंडाकडे पाहिलें तर कांहीं दुर्गुण याचे अंगीं वसति करीत असतील असें कोणालाही वाटावयासारखें नव्हतें. मात्र हा फार लाजाळू आहे असें दिसे. परंतु हा लाजाळूपणा, मनुष्य भिडस्त स्वभावाचा असल्यामुळें. त्याचे अंगीं जो येतो त्यांतला आहे, कीं, आपण अगदीं नादान आहों, आपलीं कृत्यें दुसऱ्यांस न आवडण्यासारखीं आहेत, असें मनुष्याच्या मनांत वागतः असून मंडळीमध्यें जी त्याची त्यालाच लज्जा वाटूं लागते, त्यांतला आहे, हें पाहावयाचें आहे. जांवई तर वासुदेवपंतांनीं मनास आणिला; व त्याप्रमाणें त्यांनीं विठ्ठलपंताजवळ बोलणें लाविलें.

परंतु विठ्ठलपंतानें केवढा डौल आणला ! त्याचें कोठपासून धोरण ! मुहूर्त थोडे आहेत, आणि मामलेदार इतक्या तांतडीनें विचारावयास आले आहेत, यंदा लग्न झालेंच पाहिजे असा त्यांचा पक्का बेत दिसतो, व वामनरावांनीं तसेंच सांगितलें आहे, तेव्हां आतां दोन पैसे ज्यास्त मिळविण्याचा हाच हंगाम असें जाणून त्यानें ओढती घेतली. मनाप्रमाणें हुंडा द्यावयास केला तरी तो दाद देईना ! त्यानें बोलतां

बोलतां असा घाट आणिला कीं यंदा लग्न उरकून घ्यावयाचें आपले मनांत नाहीं असें वासुदेवपंतांस वाटावें. तो ह्मणाला—" आह्मीं बोलून चालून गरीब माणूस. आज पिकवायला कंवर बांधावी तेव्हां उद्यां खायला मिळणार. आम्हांला कांहीं तुमच्यासारखा दरमहा पायचा आहे? ना रोजगारी ना व्यापारी. पाऊस डोकीवर आला तेव्हां आह्मांला तिकडच्याच तयारीला लागलें पाहिजे; तर आतां यंदा लग्न उभारून कसें चालणार? लग्न करावयाचें खरें परंतु अशी घाईंत घाई काय उपयोगाची? ह्मणून बहुधा आमचा यंदा करण्याचा मानस नाहीं. "

अशा प्रकारच्या भाषणानें वासुदेवपंतांस तर ह्यांस ज्यास्त चिकटावेंसें वाटूं लागलें. वामनरावांच्याही बोलण्याची भर पडली. सारांश काय कीं ह्या वर्षीं तुह्मी आह्मांला पदरांत घ्याच, असा वासुदेवपंतांनीं आग्रह धरिला.

विठ्ठलपंत मग ओढत ओढत ह्मणाले, " अहो ह्मांला तयारी करायला अवधि अगदीं राहिला नाहीं आह्मी आडगांवचे रहिवासी. शहरांतून सामानसुमान आणावें केव्हां, आणि हें करावें कसें? तुमचें आपलें ठीकच आहे. चार माणसें तुमच्या हाताखालीं आहेत. " असा याचेपुढेंही विठ्ठलपंतानें पुष्कळ पाल्हाळ लाविला. तो ऐकून घेऊन सरशेवट वासुदेवपंत ह्मणाले, " बरें दैवयोगानें जमून आल्यास तीं तुमचीं नड आह्मी संभाळतों. येऊन जाऊन तयारीची तुमची नड कीं नाहीं? नका करूं तुह्मी, आह्मी सर्व तुमची तयारी करून देतों. एकीकडचे सामान

ध्यावयाचें तेव्हांच दोहींकडचें घेऊं. तुह्मीं उठून मात्र या. ”

विठ्ठल पंतानें युक्तियुक्तीनें असें वासुदेव पंतापा- न वचन काढून घेतलें. आणि मुलाचे लग्न कर- वास कबूल झाला. पात्रिका पहाण्याच्या संबंधानें काय करावयाचें इत्यादि अनेक गोष्टींविषयीं वाटा- घाट होऊन मुलगी पाहण्यास येण्याविषयीं वासुदेव पंतांनीं विठ्ठलपंतास आग्रह केला. त्यांस आपल्या मुलीच्या रूपाविषयीं व हुशारीविषयीं अभिमान ोता. व एकदां जर व्याही माझी मुलगी पाहतील, र मानाच डोलवीत सुटतील, अशी त्यांची खात्री ोती. परंतु व्याह्यांस मनुष्यापेक्षां पैशाची योग्यता धिक वाटत असल्यामुळें त्यांनीं वामनरावांच्या सां- गण्यावरच हवाला दिला. ठीकच आहे. मनुष्य क- सेंही असलें तरी चालेल, परंतु विठ्ठलपंतास हुंड्या- ांत रुपयांमध्यें एखादा काळा किंवा बोध रुपाया पला नसेल.

लग्नसंबंधीं सर्व ठराव होऊन वासुदेवपंत व वामन- व बरावरच निघाले. विठ्ठलपंत त्यांस पाळंदीचे लांविलेनों पोंचवायास गेले. ते बाहेर येतात तों तोंडा पाव[illegible]च विठ्ठलीनें जातांना वामनराव व विठ्ठल- पाटील आडव्या [illegible]! मुखांत कोणाचें बोलणें झालें पंत यांचे दृष्टीस पडला, [illegible] घोड्यावरोबर चालला, नाहीं. वामनराव मामलेदारांचे [illegible] दृष्टीआड झाला. व विठ्ठलपंत परत आला, तों पाटी[illegible]च

भाग सातवा.

मुहूर्त पांच सहा दिवसांतलाच ठरविला, त्यामुळें तयारीचें काम मपाऱ्यानें सुरूं झालें. वासुदेवपंताचे हाताखालीं शिपाई प्यादे असल्यामुळें, व ते अंमलदार पडले म्हणून इतर लोकही त्यांचे घरीं खपत असल्यामुळें तयारी करण्यांत कोणच्याही गोष्टीची हरकत आली नाहीं. शिवाय वासुदेवपंतांनां खर्च करण्यामही मागें पुढें पाहिलें नाहीं. या कामाकडे मन वासुदेवपंतांचें नव्हतेंच, व याकरितांच त्यांनीं हें स्थळ छडून पाहिलें नाहीं; तरी खर्चाच्या बाबतींत त्यांनीं हात आंखडता घेतला नाहीं; याचें कारण त्यांची उदासीनताच असावी. रमाबाईचा स्वभाव खर्चिक असल्यामुळें व लेंकीला स्थळ मनाप्रमाणें मिळत आहे म्हणून, तिनें ह्या वासुदेवपंतांच्या उदासीनपणाचा अव्हेर केला नाहीं. वासुदेवपंत जेव्हां स्थळ पाहून येऊन रमाबाईला बरें आहे म्हणून म्हणाले, तेव्हां 'मीं येथें येऊन पहा लवकर किती स्थळ शोधलें तें,' म्हणून तिनें त्यांच्या जवळ फुशारकी मारली; परंतु वासुदेवपंतांनीं हें स्थळ तुला कोणीं सांगितलें म्हणून एका अक्षरानें विचारलें नाहीं; यावरून त्यांचें मन किती उडालें होतें हें स्पष्ट दिसतें; तरी सोयऱ्या धायऱ्यांमध्यें तें तसें न दाखविण्याविषयीं त्यांनीं चांगलीच खबरदारी घेतली होती. शेजारी पाजारी बाया ज्या तयारी करावयास येत, त्यांच्या तोंडातून अमुक जिन्नस पाहिजे म्हणून निघे तों अवकाश, तो जिन्नस त्यांच्यापुढें येऊन पडलाच. "ह्याचें काय करावयाचें आहे ? हा इतका जिन्नस कशाला पाहि-

जे," अशांतला चकार शब्द त्या उभयतांतून एकानें-ही काढला नाहीं. अमूप जिन्नस असून घरधन्याची किंवा धनिनीची घासघीस नसल्यामुळें बायकांसही करावयास हौस वाटे. चार दिवस येऊन पोळ्या ग्राऊन जाणाऱ्या बायका त्या उभयतांचे देखत रमाबाईची नांवाजणी करूं लागल्या व वासुदेवपंताचे गुण गाऊं लागल्या, ह्मणजे रमाबाईनें आपण स्वतां चढुन वासुदेवपंतांस चढाविण्याकरितां बोलावें, "अमेंच करतलि मनांत आलें म्हणजे नेसायचें धोतर सुद्धां सोडून देतील."

तें सर्व घर सामानसुमानानें भरून गेलें, भाऊबंद, आप्तसोयरे यांच्या गर्दीनें दणाणून गेलें, आणि जिकडे तिकडे आनंदच आनंद दिसूं लागला, परंतु निच्याकरतां एवढा खटाटोप तिच्या जिवाला एकसारखी तळमळ लागून राहिली होती. पाटलानें तिला पुरें कांहींच न सांगितल्यामुळें तिला काय वाटावें बरें ? त्या लहान मुलीनें तर्क तरी कोणच्या कोणच्या प्रकारचे करावे? बरें, तिनें तर्क नानाप्रकारचे केले, काय तिच्या तर्कांचा उपयोग ? ती काय करणार ? तिनें तर्क केले, नाहीं, पाटलानें तिला प्रत्यक्ष येऊन सांगितलें कीं तुला मिळणारा नवरा अशा अशा प्रकारचा आहे; तर ती त्याला काय करणार ? त्यानें येऊन सांगितलें कीं, तुला ज्यास द्यावयाची ठरविलें आहे, तो दरोडेखोर आहे, मातृहत्या किंवा पितृहत्या करावयास सुद्धां चुकणार नाहीं; किंवा त्यानें अमेंही तिला सांगितलें ह्मणून समजूं कीं, तो कुष्टरोगी आहे अथवा भविष्य सांगितलें कीं, तिचें त्याच्याशीं लग्न

झाल्यावर दुसऱ्या दिवशींच तो मरणार आहे,—असल्या गोष्टी त्यानें तिला खऱ्याखऱ्या म्हणून सांगितल्या असत्या, व तिचाही विश्वास त्यांच्यावर बसला असता, तरी तिला हें लग्नाच्यापूर्वी देखील कळण्याचा काय उपयोग? हतभागे पोरी, तूं उगाच तडफड करून काय करणार! तुझ्या बऱ्या वाईटाचें तुझ्या हातीं काय आहे? एकतरी गोष्ट तुझ्या हातांतली आहे काय! कोठें पळून जावयाचें म्हटलेंस तर तें तुला करतां येईल? हट्ट घेऊन बसतां येईल? आणि तुला तो साजेल? किंवा निर्भिडपणें आईबापांस मला हा नवरा नको म्हणून सांगशील? आणि ते तुझें ऐकतील! धन्यानें गाईच्या गळ्याला दावें लावून तें तो ज्याचे हातीं देईल त्याचे घरीं तिला गेलें पाहिजे; मग तें घर कसायाचें कां असेना!

सदाशिवाच्या व वेणूच्या लक्ष्यांत त्यांच्या बापाची ह्या लग्नाच्या कामीं उदासवृत्ति आहे असें आलें होतें. वेणूला ह्या त्यांच्या वृत्तीचें कारण हें स्थळ त्यांचे मनास आले नसावें असें वाटत होतें, तरी तें प्रत्यक्ष आपल्या भावाजवळ, कीं जणूं काय ज्याचा आणि तिचा जीव एकच होता त्याजवळ, सुद्धां सांगण्यास तिला धीर झाला नाहीं, मग इतरांजवळ सांगण्याची गोष्ट कशास हवी?

वेणूला पाटलाची आशा होती कीं त्यानें दिलेल्या वचनाप्रमाणें तो कांहीं करील, परंतु तो तिच्या दृष्टीस मुळींच पडला नाहीं! लग्नाचा दिवस उजाडला, लग्न घटका येऊन ठेपली, तरी आपलें वेणूचें चिंतन! सरशेवटीं लग्न लागलें, व परस्परांच्या गळ्यांतून मा-

ळा पडून पुनः कधीं न सुटणाऱ्या अशा जन्माच्या गांठीं पडल्या, तेव्हां एकदम वेणूची मागील सर्व चिंता नाहींशी होऊन तिनें आपल्या मनाचें सर्व प्रकारीं समाधान करून घेतलें.

ह्यांचे आंगांत तर कांहीं उणेपणा नाहींना, अशी शंका उत्पन्न होऊन, तिची मान करवल्यांनीं दहादां खालीं हडसली, सतरादां मान खालीं कर म्हणून तिला त्यांनीं सुचविलें, व ती ऐकेना म्हणून पंचवीस वेळ तिला मागून बारीक चिमटे घेतले, तरी हळूच वेणूनें त्याच्याकडे पहावें. पांच सातदां पाहिल्यानंतर ह्यांच्या आंगांत कांहीं खोडी दिसत नाहीं, अशी तिची खात्री होऊन तिचें मन अधिकाधिक शांत होत चाललें.

लग्नामध्येंच व्याह्याकडील एकंदर मंडळी नादान आहेत, असें वासुदेवपंत व रमाबाई ह्यांच्या प्रत्ययाला येऊं लागलें. रमाबाईला तर तक्रार करावयास तोंडच नव्हतें, कारण ह्या लग्नाची एकूनएक गोष्ट तिच्याच कलानें होत होती, आणि वासुदेवपंतांनीं तर होईल तें होवो, म्हणून साधुवृत्ति धरली होती. ह्या अशा गोष्टीमुळें विठ्ठलपंताचें व काशीबाईचें चांगलेंच फावलें. त्यांनीं हवी ती अट घरून आपला हवा तसा फायदा करून घेतला. सर्व लग्नभर कोणचेंही कृत्य ज्यांत व्याह्यांनीं हावरेपणा व तक्रार केली नाहीं असें झालेच नाहीं. रुसवा फुगवा सगळे कांहीं शिष्टाचार झाले. वासुदेवपंतांस ही लग्नाची कटकट केव्हां आटपून जाईल असें झालें. परंतु लग्न आटोप-

तां आटोपतां विठ्ठलपंतानीं त्यांला एक मोठा टोला दिला तो असा.

विठ्ठलपंताच्या मुलीचें लग्न मोठें मासलेवाईक झालें होतें. तिला तीनचार कोसांवरच्या एका गांवांत दिली होती. त्या लग्नाची मूळ कथा अशी:—

विठ्ठलपंत कुळांना फार छळीत असे. त्यांच्यापासून पैसा दामदुप्पट करून घ्यावयाचा; कुळानें आर्जव केले, पाया पडला, त्याची पोरें उपाशी मरत असलीं, तरी एका पैचीही त्याला सूट मिळावयाची नाहीं. परंतु त्याजवर जुलूम ह्याच्या कामाचा! आतां जर कोठें भाकरीच्या तुकड्याकरितां काबाडकष्ट करावयास गेला नाहीं, तर घरांत पोरें उपाशी मरणार अशी बापड्याची स्थिति असते. असा हा त्याचा आणिबाणीचा प्रसंग असतो तरी सावकारानें आपलें काम करावयास त्यास बोलावलें कीं त्याला विनतक्रार गेलें पाहिजे. तें काम अगदीं क्षुल्लक कां असेना, किंवा त्यावेळेस नाहीं केलें तरी चालणारें कां असेना, त्या कुळास नाहीं होय ह्मणतां कामा नये. नाहीं तर टाक आतां रुपये ह्मणून सावकाराचा दस्त्या पाठीवर बसलाच. आणि एकदां विठ्ठलपंत पिच्छेस बसला, ह्मणजे कारकून आणि शिपाई कुळाचे दारांत! कुळाची खोड मोडावयाची असें जर सकाळीं विठ्ठलपंताचे मनांत आलें, तर संध्याकाळास सरकारचा कारकून आणि सरकारचाच शिपाई त्या कुळाच्या घरांतील हंडी मडकी बाहेर काढावयास तयार! इतक्या लवकर त्याला ही मदत कोठून मिळत असे बरें!

त्या गांवांतून ज्याला म्हणून विठ्ठलपंतांची माहिती होती त्याला त्याचा द्वेष करावासा वाटे. एवढेंच नव्हे तर काशीबाई व तिचीं मुलें ह्यांनाही ते लोक देखूं शकत नसत. सावकारांची निंदा त्यांच्या तोंडावर करण्यास कोणाला धीर झाला नाहीं. याचें कारण असें कीं, हेच कायते गांवांत मोठे सावकार; कधीं दाण्याची किंवा पैशा अडक्याची गरज पडल्यास यांची पायधरणी करावयास लागणार. परंतु पाठीमागें ह्या सावकाराच्या जोडप्याची मोठी नक्कल उडत असे. विठ्ठलपंतांची नक्कल करणें झाल्यास एकानें सावकार बनावें, दुसऱ्यानें त्याचें कूळ व्हावें, आणि मग कुळानें पायां पडत असावें. सावकारानें "रुपये कधीं देशील, कसे देशील, कोठून आणशील, नाहीं दिलेस तर काय करावयाचें," असे नानाप्रकारें त्यास प्रश्न करावे. गहाण ठेवण्याकरितां म्हणून जी वस्तु पुढें केली असेल. ती उलथी पालथी करून ती मोडे पावेतों चार चार घटका तिची चिकित्सा करावी. आणि शेवटीं कुळास बाबा मजजवळ पैसा नाहीं म्हणून मुसकट हालवावें. विठ्ठलपंतास त्याच्या अशा ह्या वर्तणुकीवरून, त्याच्या पोषाखावरून, बोलण्या चालण्या वरून, व सर्व काम आटपेल तेव्हां घरीं जेवावयास जावयाचें तों चौहोचा सुमार होई,—अशा ह्या त्याच्या चालीवर्तणुकी वरून, 'विठ्ठा सोनार' व काशीबाईस 'काशी सोनारीण' म्हणत असत. एखादा चांगला बोलका जर कोणी असला तर त्यानें बोलतां बोलतां विठ्ठलपंतास "असें काय अगदीं सोनारा सारखें करताहो," असें मुद्दाम बोलावें.

"आम्हांला तुम्ही नेहमीं कामास बोलावतां. तर ए-क दिवस तरी आमचा हात तुमच्या घरीं भिजूंद्या," अमें कुळांचें फार दिवस मागणें होतें. "मुलीच्या लग्नांत तरी आम्हां सर्वांना एक जेवण दिलें पाहिजे. नाहीं तर आम्ही मोडणार नाहीं, तुमच्या दारांत खळी काढून बसूं." अमें कुळांनीं विठ्ठलपंताम बजाविलें होतें. हुंडा ना पांडा; पोर गळ्याला लागली आहे ती कोठें तरी देऊन टाकली पाहिजे. म्हणून त्यांनीं एक भिकाऱ्याचा पण आईबापांचा पोरगा पाहून त्याचे गळ्यांत ती घातली. कुळांच्या जेवणाचें लचांड पाठी-मागें लागेल म्हणून विठ्ठलपंत गुपचुप जाऊन मुकाट्यानें ज्या गांवीं तिला द्यावयाचें ठरविलें होतें, त्या गांवीं तिचें लग्न लावून मोकळे झाले.

त्यावेळीं त्यानें कुळांम चुकाविलें परंतु आतां त्याम त्यांना चुकवितां येईना. हें मामलेदारांच्या घरचें लग्न तथ गाजत असल्यामुळ कुळांना विठ्ठलपतास जेवण देण्याची लगट लाविली. ह्याचें फार दिव-मांचें बंड मोडून टाकावें, व वाहत्या पाण्यांत हात कां धुवूं नयेत, म्हणून विठ्ठलपंतानें त्यांम आमच्या व्याह्याच्या घरीं चला म्हणून सांगितलें.

कदाकाळीं विठ्ठलपंताच्या तोंडचा आलेला शब्द तो, आणि मामलेदाराच्या घरीं लाडू पोळीला जा-णार, मग काय, सातशें वांगडी जाण्याम तयार झाली; पोरेंबाळें एकंदर मिळून हजाराजवळ अदमाम गेला. प्रयोजनाचे दिवशीं दुपारीं मामलेदारांचे दारांत हजार फौज खडी!

"अरे हें आहे काय? बंडावा तर नव्हेना!"

म्हणून जिकडे तिकडे घरांत धामधूम सुरू झाली. ही व्याह्याकडील मंडळी जेवावयास आली आहे हें ऐकून वासुदेवपंतांच्या तोंडचें पाणी पळालें. आतां धडगत दिसत नाहीं, अब्रू वचावणें कठिण आहे. म्हणून वासुदेवपंत अगदीं गडबडून गेले. ते म्हणाले,—" विठ्ठलपंतांनीं आह्मांला फार तर आमचीं पांचपन्नास मराठमंडळी येईल म्हणून सांगितलें, त्याप्रमाणें आह्मी शेंसव्वाशेंचा अदमास केला,—फार तर दीडशें पान जेवील, आणि आतां हें आहे काय! हजार मराठा म्हणजे! विठ्ठलपंत आहेत तरी कुठे?"

असें म्हणून ते विठ्ठलपंताची चौकशी करूं लागले, परंतु विठ्ठलपंताचा पत्ता नाहीं! त्यांच्याकडच्या वऱ्हाड्यांसही ते कोठें गेले तें ठाऊक नाहीं! लग्नामध्यें वामनरावांचा आणि त्यांचा स्नेह आहे असें आढळलें होतें, म्हणून मंडळी वामनरावांस शोधूं लागली, परंतु वामनरावही कोठें नाहींत!

भाग आठवा.

एवढें मराठ्यांचें पान जेवून उठतें कसें म्हणून लग्नघरीं जिकडे तिकडे हाहाकार उडून गेला. ब्राम्हणमंडळी तरी एकदां धडपणीं जेवून जावो, मग पुढचें पुढें पाहतां येईल, सगळाच गोंधळ नको, अशा तेथल्या मंडळीनें वासुदेवपंतांस उपदेश केला. ते वासुदेवपंतांस म्हणाले कीं, तुम्हीं स्वस्थ बसा, आह्मीं सर्व तजवीज करतों. तेव्हां वासुदेवपंतांस कांहीं धीर आला.

घरांत धान्य नव्हतें यथपामून तयारी! कचेरीं-

तल्या मंडळींनीं वासुदेवपंतांस धीर दिला खरा, परंतु त्यांचें त्यांना हें काम कठिणसें वाटूं लागलें. बाजार आठवड्यांतून एकच दिवस भरत असून तो दिवस बाजारचा नसल्यामुळें मंडळीस कांहीं सुचेनासें झालें. बाजारांत धान्याचीं दोन चार दुकानें ! त्यांतून तरी इतक्या पानांचें सामान कसें सांपडणार! निदान डाळ, तांदूळ व कणीक सांपडती तरी पुरे होती, परंतु ती सांपडावी कोठून ? त्या गांवांत कणीक सांपडणें तर लांबच, परंतु काय योगायोग तो गहूंसुद्धां बेगमीचा सांपडेना ! बाजार आठवड्याच्या आठवड्यास भरत असल्यामुळें तेथील वाणी या जिनसा कशा करतां सांठवून ठेवतील ? पांच्या घेऊन घरोघर भिक्षा गोळा करीत फिरावें, कोणीं दिलें तर बरें आहे, कोणीं दिलें नाहीं किंवा त्याच्या घरीं नसलेंच, तर अब्रूला केवढी हानि ! अशी सर्व प्रकारें पंचाईत येऊन पडली. कचेरींतली मंडळी ती भुकेबंगाल, महिन्याच्या महिन्यास पगार येतो त्यावर सुद्धां बापड्यांची कुटुंबसुद्धां निभवण्याची मारामार, त्यांच्या घरांत आयतें सांठवलेलें धान्य सांपडणार कोठून ? वासुदेवपंत लागेल तो खर्च करण्यास तयार झाले, परंतु त्यांनीं लाखों रुपये पुढें केले म्हणून काय झालें ?

आपल्यास ज्या मंडळीनें धीर दिला, तिचासुद्धां कांहीं उपाय चालत नाहीं, हें पाहून तर वासुदेवपंतांची काय अवस्था झाली असावी बरें ? आपण कसे झालों तरी ह्या तालुक्याचे मामलेदार, आज केवढी फजिती उडणार ? लोकांस तोंड कसें दाखवावें ? " आमच्या घरीं तयारी नाहीं, तुम्हीं सर्व परत

जा," अथवा " विठ्ठलपंताची आमची इतक्या मंड-ळीची बोल्ली नव्हती. मी इतक्यांस जेवावयास बो-लवित नाहीं." असें गांवकऱ्यांस सांगून त्यांस परत ला-वावयाचें, मग आपण एवढे अधिकारी असून आपली शोभा काय राहिली ! म्हणून वासुदेवपंतांस मोठी खंत वाटूं लागली. अनेक विचार मनांत उभे राहून त्यांच्या हृदयास धक्का बसला. आंगाचे पाणीच पाणी होऊन गेलें. " एवढा गांव असून काय उप-योगाचा आहे ! आणि म्हणतात तालुक्याचे ठाणें— "

एवढीं अक्षरें बोलून वासुदेवपंत धाडकन जमि-नीवर पडले. पाहतात तों ते अगदीं बेशुद्ध झाले होते. डोळ्यांस पाणी लावणें वगैरे उपाय सुरूं झाले.

ब्राह्मण जेवावयास बसावयाची ही वेळा, ह्याच वेळीं ह्यांच्या बेशुद्धीचा गवगवा झाला तर ब्राह्मण बसावयाचे नाहींत, सर्व गोंधळ होऊन जाईल, म्हणून पुढारी मंडळीनें होतां होईल तितकें करून बाहेर बोभाट होऊं दिला नाहीं; आणि सोंवळें नेमलेले असूनच त्यांनीं वासुदेवपंतांस उचलून अंथरुणावर नेऊन निजविलें, आणि सदाशिवाच्या हस्तीं उदक सोडवून ब्राह्मण जेवावयास बसविले.

वासुदेवपंताची अशी अवस्था पाहून रमाबाईचीही प्रकृति बेसुमार झाली. तिला भान नाहींसें होऊन ती लग्नाची सामुग्री ज्या कोठींत ठेविली होती, त्याच कोठीला आंतून कडी लावून घेऊन मोठ्यानें रडत ब-सली ! कारभारी मंडळी जिकडे तिकडे चुप झाली. विठ्ठलपंत तर दृष्टीस पडले नाहींत ते नाहींच. काशी

बाईस व व्याह्याकडील माणसांस जेव्हां हें कळलें तेव्हां तींही खापरासारखीं तोंडे करून बसलीं.

वासुदेवपंत येताहेत म्हणून सांगून जेवणार मंडळीचा समाचार सदाशिवानेंच घेतला, व मंडळीच्या समजुतीकरतां वेणू घांसाचा सोहळा करून मांडवाच्या पलीकडचे बाजूस ओटीवरील पडवीच्या खालीं आंचवावयास आली.

तों पुढें असणारी मराठमंडळी विठ्ठलपंताची सून पाहण्याकरितां उभी राहिली.

वेणूनें त्यांच्याकडे पाहिलें तों त्यांमध्यें एक टणका म्हातारा तिच्या ओळखीचा दृष्टीस पडला. त्यानें हिला पाहिलें व हिनें त्याला पाहिलें. दोघांची दृष्टादृष्ट होऊन दोघेंही क्षणमात्र एकमेकांकडे टकमक पाहत उभीं राहिलीं. तो म्हातारा तिच्यापुढें येऊन उभा राहिला.

" काय ! पाटीलबावा ! " वेणू म्हणाली, व मग ती गोंधळल्यासारखी झाली; " काय तुम्हीं,—बरें तें सध्यां राहूंद्या. आज आधीं केवढें संकट येऊन पडलें आहे तें पहा ! बाबांची अवस्था तर तशी झाली आहे, आज आम्हांला या संकटांतून कोण काढील ! देवा, आज आम्हीं कांहींही द्यायला केलें तरी त्याचा काय उपयोग ? ही अब्रूची गोष्ट तरी कोणाजवळ काढावी ? "

" मुली, " पाटील म्हणाला, " तूं अब्रूची गोष्ट म्हणून काय बोलतेस तें मला समजले. तूं कांहींही द्यायला तयार झाली आहेस असें म्हणतेस, तर आपल्या ह्या आंगावरचे सर्व दागिने देशील ? "

"आतां ह्याच्या दुप्पट दागिने दिले म्हणून काय होणार? पण हे दुसऱ्याचे दागिने; ते मी देईन असें कसें बोलूं? त्यांवर माझी काय सत्ता आहे? ही माझ्या हातांत आंगठी आहे ही, हिच्यावर मात्र माझी सत्ता आहे," असें बोलत बोलत तिनें आंगठी काढून पाटलाच्या हातावर टाकली, आणि म्हणाली, "ही मी पाहिजे त्याला देतें."

पाटलानें क्षणमात्र तिच्याकडे टक लावून पाहिलें, आणि तेथून जों तो तिरासारखा मागें उलटला, तों दिसेनासा झाला. बिचारी वेणू वेड्यासारखी पहातच उभी राहिली!

ब्राम्हण मंडळी जेवून विडे घेऊन जात आहे तों तिसरा प्रहर होत आला. घरांत स्थितीवर असें आस्थेचें माणूस कोणीं नसून वेणू व सदाशिव ह्यांच्यावरच सर्व जबाबदारीचें काम पडलें होतें. जिकडे तिकडे अव्यवस्था झाली होती तरी त्यांनीं हुशारीनें सर्व गोष्टी जेथल्या तेथें थावटून धरल्या.

वेणूचा मनःपूर्वक ईश्वराचा धांवा चालला होता. आपल्या लग्नामध्येंच एवढें विघ्न आलें म्हणून तिला मनस्वी वाईट वाटलें. पाटलाच्या अशा वर्तनाचा हेतु काय असावा ह्याचा तिला उमज पडेना. एकदां तिला वाटे कीं आपल्याला संकटांतून काढण्याचें पाटलाच्या स्वाधीन आहे म्हणून तो न बोलतां असा परतला. परंतु तिला एकदां असेंही वाटे कीं त्याच्या स्वाधीन काय असणार! बाबांसारखे मोठमोठे जेथें हातटेकीलीं आले, तेथें या पाटलाचा काय पाड? हें संकट मुळीं अशा बैागड्याच्या हातून निवारण हो-

ण्याजोगें नाहींच आहे. याप्रमाणें तिचें मन तिला कांहींच खात्री देईना.

" ताई, आतां बाबा असे पडले आहेत, आईही खोलींत कोंडून घेऊन बसली आहे. आतां करायचें कसें? " असें सदाशिव तिला म्हणाला.

वेणू म्हणाली, " आईनें आंतून कडी लावून घेतली आहे त्यामुळें उपाय नाहीं, पण बाबा आतां सावध होतील. "

" आणि इतक्या माणसांची तजवीज कशी होणार? " सदाशिवानें विचारलें.

" भाऊ, " वेणू त्याला धीर देऊन म्हणते, " तूं खरें पुसशील तर मला इतकी धास्ती नाहीं वाटत. "

" ती कशी? वेड आहे कीं काय इतकें माणूस दारांत येऊन बसल्यावर– "

" ती कशीही असो. माझी मनोदेवता मला सांगते आहे तें मी तुला सांगतें. देव आपली बाजू संभाळून घेईल. "

" ती कशी पण मला सांगशील कीं नाहीं; देव उगाच काय करतो? "

" देवच काय तें करील; तो कोणाचा अंत पाहत नाहीं. आधीं चल जाऊं आपण त्या जेवणार मंडळीकडे. कदाचित् त्या अडाणी जातीला वाटलें असेल कीं, आम्हीं एकदम इतके आलों म्हणून हीं घाबरलीं असतील. त्यांना जाऊन आपण बेफिकीर आहों असें दाखवूं चल. "

" पण तें तूं कोणत्या आधारावर दाखवणार? "

" तुला काय त्याचें तूं चल तर खरा. "

वेणूनें आग्रह केला म्हणून सदाशीव तिजबराबर मराठमंडळी बसली होती तिकडे गेला. व दोघांनीं त्यांतील पुढारी मंडळीशीं बोलून त्यांची मंडळी किती, ती किती गांवची ह्या सर्व गोष्टींची माहिती करून घेतली, व बोलतां बोलतां त्यांस असें कळाविलें कीं, कदाचित् जेवावयास मात्र थोडीशी रात्र होईल.

आतां आपण त्या पाटलाकडे वळूं.

तो म्हातारा मागल्या पायीं जो निघाला, तो मध्यें न थांबतां दीड कोस आपल्या गांवीं परत आला.

त्या पाटलाचा वाटण्यामध्यें मोठा मान असे. बायकापोरें त्याला वचकत असत. गांवांत कांहीं कृत्य कोणाला करणें झाल्यास तें पाटीलबुवांस पाहिल्यानें विचारल्याशिवाय होत नसे. कोणाला कसली सल्ला मसलत पाहिजे असल्यास ती त्याला ह्या पाटलाकडून मिळत असे. विष्टलपंताचे रुपये काढूं नका म्हणून हा गांवच्या लोकांस वारंवार उपदेश करी. विष्टलपंत लबाडी करून कुळांस फसवितो असें जेव्हां त्याचे लक्षांत आलें, तेव्हां आपल्या वयाकडे न पाहतां त्यानें अक्षरओळख करून घेतली. मग तो विष्टलपंतास हिशेबाच्या कामीं कांहीं लटपट करूं देत नसे. विष्टलपंताचें आणि पाटलाचें वाकडें येण्याला मुख्य कारण हेंच. विष्टलपंतास वामनरावांची जर मदत नसती, तर ह्या पाटलानें विष्टलपंताची आपल्या गांवांत डाळ शिजूं दिली नसती. सरकारचा कारकून आणि सरकारचा शिपाई असला म्हणजे झालें: गांवातली अडाणी जात फसली. कुळांकडून पाहिजे तसा पैसा वसूल

करण्यास ह्या सावकाराला वामनरावांची मदत असे. पाटलाची पाटीलकी वामनरावांचे हातांत, तेव्हां तेथें पाटलालाही कांहीं बोलतां येत नसे.

पाटलाचा मान ह्या गांवांत असण्याला आणखी एक कारण होतें. तें हें कीं पूर्वी पाटलाचें घराणें मोठें बडेजावीचें होतें. ह्याचे पूर्वज पूर्वी पेशवाईंत कामें केले संवरलेले होते, व त्याप्रमाणें संपत्तिमानही होते. पाटलाला ह्यावेळीं मागें पुढें कोणीं नव्हतें, ह्मणून आपण मेल्यानंतर ही पाटीलकी कोणाचे हातांत द्यावी ह्याची त्याला पंचाईत पडली होती. घर पूर्वीचें मोठें चौसोपी होतें, परंतु त्यांतील आतां मोडकेतोडके दोनच सोपे कायम राहिले होते. ह्यांतील एकाला निरंतर कुलुप असून एकांतच कायतो पाटलाचा वावर असे.

वाटण्यांतील सर्वच मनुष्य वासुदेवपंतांकडे लुटून गेलें नव्हतें. पाटलानें गांवांत आल्यावर दहावीस घरीं जाऊन सुमारें वीस पंचवीस गडी बाहेर काढला. हा भाकरी खाण्याचा मधला वखत असल्यामुळें गडी घरीं आयतेच सांपडले. त्या सर्वांस बरोबर घेऊन पाटील आपल्या घरीं आला.

घरांत आल्यावर पाटलानें नासक्या धान्यानें एक बुडकुलें भरलेलें होतें तें ओतलें, आणि त्यांत सांपडलेली किल्ली घेऊन तो आपल्या सोप्याचें कुलुप उघडूं लागला. बरावर आलेल्या मनुष्यांनीं हें कुलुप काढतांना पाटलाला कधींच पाहिलें नव्हतें. त्यांची आजपावेतों अशी समजूत होती कीं पाटलानें त्याचा संसार होता त्या वेळची मोडकीतोडकी अडगळ ह्या सोप्यांत टाकून ठेविली आहे, बाकी ह्या सोप्यांत

मोठेंसे कांहीं एक नाहीं. पाटलाचा आतांचा उद्देश तर ह्या मंडळीस कांहीच कळला नव्हता, ह्या मुळें तो पुढें काय करतो, व त्यानें आपल्याला येथें कशा ला बोलाविलें, हें जाणण्याविषयीं ते फार उत्सुक झाले होते.

पाटलानें खोलीचें दार उघडलें तों आंत जिकडे तिकडे गुडुप अंधार आहे असें बाहेरच्या लोकांच्या दृष्टीस पडलें. सोप्याला तिहीं आंगांनीं भिंती असून खिडकी वगैरे कांहीं एक नव्हतें, ह्यामुळें हा अंधार होता. पाटील चांचपडत पुढें गेला आणि तसाच "चो-र, चोर! " ह्मणून ओरडत परत आला!

चोर हीं अक्षरें ऐकतांच बाहेरचे लोक आंत घुसूं लागले. दरवाजा लहान असल्यामुळें दाराच्या तोंडींच गर्दी होऊन गेली. पांचसाहा असामी पुढें गेलें होते तेही " चोर, चोर, " " हाणा," " मारा," असें ह्मणत कोणाला रट्टे लगावीत आहेत असें दारा-रच्या गड्यांस ऐकूं आलें, परंतु त्यांतून कोणालाच आंत जातां येईना ! जो तो आपण तेवढा पुढें जा-ण्याला उत्सुक असल्यामुळें बाकिच्यांस एकीकडे लोटूं लागला, ह्यामुळें कोणाचाच निघाव होईना !

आंतून आतां त्यांच्या हे शब्द कानीं पडूं लागले:—

" अरे राम्या मल्हारे कां मारतोस ? "

" अरे मी गोंदजी तुमच्यांतलाच, अरे म-ल्हारे कां ? "

" अरे हें काय ! आपल्याच माणसांला काय मारतां ? अरे थांबा, अरे हें काय ? "

दिले. मला वाटलें असती तर ती मघांशींच माझ्या खरेंच दादा हरला म्हणाला.
चोर आले नमतील ? "

" आनू दादा आह्मीं आतां त्या दोहों तपेल्यांत नेंच उकरलेलें, नाहीं तर कोणी ? " अशी खात्री मिळ-
एक म्हणाला.

अशा प्रकारें त्यांच्यांत एकमेकांच्या बोलण्यावर कोटचा निघून सरशेवट चोर खचित आला होता असें त्यांच्या मनानें घेतलें, व ते पुन्हां ती आंतली जागा तपासण्यास तयार होऊन तिकडे जाऊं लागले, तों पाटील त्यांस तिकडे जाऊं देईना. तो म्हणाला कीं आधीं अन्नाची तयारी करा, नाहीं तर मग नुक-सान नू फजिती होईल त्याला पारावार नाहीं.

" रोज आमच्या लांकडें गोंवऱ्या चोरून नेतो, तोच चोर हा असेल. " एक म्हणाला.

" कोणीही असो, आमच्या तावडीला जर का-तो आज सांपडता, तर त्यानें मारच खाल्ला असता. " दुसरा म्हणाला.

" नुसता मार ! " तिसरा म्हणाला, " परवां त्यानें माझा कडबाच चोरून नेला नू माझी गाय उपाशी मेली. मी त्या चोराला आतां ठारच केला असता. "

पाटलानें त्यांच्या बोलण्यांत न मिसळतां त्यांच्या कडून आपलें काम झराझर करून घेतलें. सर्व अन्ना-ची सिद्धता झाली. पोळ्यांनीं पराता भरल्या. भांड्यां-स वांसे घालून चव्हाटें लावलीं, आणि पाटलाच्या हुकुमावरून गड्यांनीं तीं भांडीं उठविलीं. " होईल तितकी जलदी करून धांवा, " तो म्हणाला, " नी

" अहो तुम्हींचना त्या अंधेरांत माझे पाय धरले, नी अब्रू रक्षण करा म्हणून रडूं लागलां ? नी आतां अमें उत्तर ?"

" हं:, तूं पाटील मूर्ख आहेस, तुला चांगला हातच दाखविला पाहिजे. " अमें वामनराव बोलून तडख चालते झाले. विठ्ठलपंत त्याच्याबराबर निघाले.

पाटील आश्चर्य करीत पावघटका बसला. नंतर तो चंदनास निघाला. पांचाचे सुमारास अन्न वहाणारे गडी व तो असे मामलेदारांचे दारांत आले.

पाटील पाहतो तों सर्व मंडळी जेवावयास बसली आहे !

वासुदेवपंतांस धीर देणाऱ्या मंडळीनें पाहिलें होतें कीं आतां आपला कांहीं उपाय चालत नाहीं. त्यांच्या कडून जमवेल तितकें त्यांनीं सामान जमविलें, परंतु तें इतक्या मनुष्यांच्या पासंगास सुद्धां लागणारें नव्हतें. सर्व उपाय हरले, व तोंडानें त्यांस निघून जा म्हणून सांगतां येत नाहीं, म्हणून कारभारी मंडळींनीं ही युक्ति काढली:—काय असेल तें सर्वांस वाटून टाकावें, आणि पुन्हां तिकडे जावूं नये कीं आंत काय आहे आणि काय नाहीं याचा पत्ता सुद्धां लागूं देऊं नये. अशानें त्यांस नाहीं म्हणावयास न लागतां सर्व मनुष्यांचा आपले घरीं हात भिजल्या सारखें होईल.

मंडळीनें अशी तोड काढली, पण बापड्या वेणूच्या मनाची काय स्थिति झाली असावी बरें! घरांत होतें नव्हतें तेवढें सर्व अन्न भरीला घालून मंडळीचीं पानें वाढलीं, तरी वेणूला ईश्वर आपला अंत पाहील असें वाटेना. ईश्वरावर तिची इतकी श्रद्धा होती कीं

तो आपल्याला खचित सोडणार नाहीं असें तिला वाटे. घरांतलीं सर्व माणसें तोंडें चुकवून घरांत जाऊन बसलीं, परंतु वेणूला तें बरें वाटेना. काय होईल तें होवो, आपण तिकडे जावें असें तिला वाटून ती मंडळी जेवत होती तेथें जाऊन उभी राहिली.

परंतु आतां तिच्या आनंदाला सीमाच नाहीं! 'भात मात,' 'पोळी पोळी,' ह्मणून जेवणारांस ओरडण्यास अवकाशच झाला नाहीं. नवीन आलेले लोक धूम वाढीत आहेत, आणि हे लोक पोट भरभरून जेवीत आहेत! तों पाटील पंक्तींतून फिरतांना वेणूच्या दृष्टीस पडला. "रावसाहेब ह्मणताहेत," त्याचे शब्द वेणूच्या कानीं आले, "सावकास होऊंद्या. काय असेल त्यांत मागून घ्या. आणि ह्या त्यांच्या वेणूताई, आमच्या विठूतात्याच्या सूनबाई, तुमचा समाचार घ्यायला ह्या येथें उभ्या आहेत."

अहाहा, वेणूला काय हर्ष झाला असावा बरें? आपण बघत आहों हें खरें कीं खोटें असें तिला वाटूं लागलें. तिच्यानें उभ्या जागेवरून हलवेना. मंडळीची जेवणें आटपण्याची वेळ येई तों ती तेथें उभी राहिली.

परंतु तिला आतां एकाएकीं एका गोष्टीची आठवण झाली. बाबा व आई हीं ही गंमत पहावयास नाहींत त्यांना बोलवावें, असें तिच्या मनांत आलें. तिला वाटलें कीं ज्या संकटामुळें बाबांस मूर्च्छा आली, तें संकट निवारण झालेसें पाहून त्यांच्या मनाला फार समाधान वाटेल, व फार आनंद होईल. ती वासुदेवपंताच्या खोलींत गेली. वासुदेवपंताची मूर्च्छा

जाऊन तिच्यामुळें आलेल्या शिणानें त्यांस झोंप लागली होती.

"बाबा, बाबा, उठा." वेणूनें त्यांस हातानें हलवून म्हटलें.

"ऊं, काय वेणू." त्यांनीं जागें होऊन विचारिलें.

"मंडळीचा समाचार घ्यायला उठतांना!"

"मंडळी म्हणजे!" वासुदेवपंत एकदम घाबरून म्हणाले, "मीं पडलों म्हणून ब्राह्मण अजून जेवायाला नाहीं बसले! केवढा मी चांडाळ तरी!"

असें वासुदेवपंत पश्चात्ताप पावून म्हणतांहेत तों वेणू हंसून म्हणाली, "बाबा, ब्राह्मण तर केव्हांच जेवून गेले. आतां मराठ्यांचीं पानें मांडलीं होतीं; चला लवकर त्यांच्या समाचाराला ते उठायला झाले आहेत."

ती काय म्हणे तें त्यांस समजेनाच. त्यांना वाटलें कीं आपली गुंगी अजून गेलीच नाहीं. कारण आतां नुक्तीच जी त्यांना झोंप लागली होती, तींत त्यांना कांहीं स्वप्नें आलेलें संकट निवारण झालें म्हणून पडलीं, व कांहीं फजिती उडाली म्हणून पडलीं. हाही प्रकार त्यांतलाच नसेलना, म्हणून ते खडबडून उठले व आंग मोडून बाहेर आले. त्यांनीं कारभारी मंडळीस हटकलें, परंतु हे मंत्री कोठें दडा मारून बसले होते त्यांना मागाहून झालेला प्रकार कांहींच माहीत नव्हता. त्यांनीं आपण काय काय तजवीज केली ती सांगितली. परंतु वेणूचा त्या सर्वांस असा आग्रह पडला कीं, "तुम्ही एकदां तेथपर्यंत येऊन पहा चला, म्हणजे सर्व मंडळी यथेच्छ जेवली आहे कीं नाहीं हें तुमच्या दृष्टीस पडेल."

ती सर्व मंडळी बाहेर आली, आणि पाहतात तों सर्व माणूस उठून गेलें आहे! त्यांनीं जें आतां पानें भरभरून अन्न टाकलें होतें, त्यावरून त्या मंडळीची खात्री झाली कीं, ह्यांना नकोनको इतकें अन्न वाढलें होतें खरें.

हें अद्भुत घडून आलें कसें म्हणून मंडळी आपआपल्यांत आश्चर्य करूं लागली.

"मी सांगूं का बाबा?" वेणू म्हणाली. "तो पलीकडे पाटील असेल त्याला विचारा.

"कोठला पाटील?" वामनराव कारकुनानें विचारलें.

"तो आमच्या घरीं कधीं कधीं भाजी घेऊन येतो तो—"असें वेणूनें उत्तर दिलें.

ज्या ठिकाणीं आणलेलीं स्वयंपाकाचीं भांडीं उतरलीं होतीं त्या ठिकाणाकडे वेणूनें बोट दाखविलें. त्या भांड्यांसभोंवार फार गर्दी जमली होती. वामनरावांनीं वाटवें गांवच्या पाटलाची खूण वासुदेवपंतांस पटवून दिल्यावर त्या गर्दीकडे मंडळी चालूं लागली.

त्यांना असें दिसून आलें कीं येथें गरीब लोकांस अन्न वांटून देत आहेत. पुढें मंडळी येऊन पाहते तों तें अन्न रुप्याच्या भांड्यांतून! पाटलाला पाहतात तों तो पाटील कोठें दिसत नाहीं! इकडे तिकडे शोध केला पाटील कोठें नाहीं! वेणूनें, तसेंच ज्यांनीं पाटलाला तेथें पाहिलें होतें त्यांनीं म्हणावें, "अत्तां येथें होता, अहो तो अत्तां येथें होता." परंतु पाटलाचा पत्ता नाहीं! अन्न वांटणाऱ्या मंडळीसही विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, "उरलेलें अन्न वांटून टाका,"

असें आम्हांला सांगून पाटलाला फार वेळ झाला नाहीं; आह्मी इकडे गुंतलों असल्यामुळें तो कोणीकडे गेला हें आम्हांस पहावयास सांपडलें नाहीं !

कोणी ह्मणाला पाटील घरीं गेला असेल, ह्मणून त्याचे घरीं पाठविण्यास मनुष्य तयार केला. वासुदेव-पंत त्या पाटलाला पहावयास इतके उतावळे झाले होते कीं, त्यांनीं त्या पाटलाच्या घरीं जाणाऱ्या मनुष्यास लवकर जातां यावें ह्मणून आपला बसावयाचा बोडा दिला. तो मनुष्य दौडत जाऊन एक तासाचे आंत मान हालवीतच परत आला. तो ह्मणाला कीं मला शेजारच्या माणसानींही सांगितलें कीं पाटील अन्नाबराबर गेला तो पुन्हां परत आला नाहीं. तो मनुष्य आणखी मोठ्या आश्चर्याची ही मात सांगूं लागला कीं, मीं गेलों तों पाटलाच्या घराचीं सर्व दारें सपाट उघडीं असून खोलींत तांब्याचीं दोन मोठ मोठालीं तपेलीं मात्र पडलीं आहेत.

आतां मंडळीस जो कांहीं अचंबा वाटला त्याचें कितीही वर्णन केलें तरी तें पुरेसें होणार नाहीं. जो तो तोंडांत बोट घालून उभा! अन्नाचा इतका तोटा होता, त्याचा एकदम इतका अगदीं वेळेवर पुरवठा कसा झाला, हीं रुप्याचीं भांडीं कशीं आलीं, हें सर्व कृत्य त्या पाटलाचें ह्मणतात तर त्याला सर्व वर्षभर म्हारकी करूनही पुरेसें पोटाला मिळतांना मारामार हें सर्वांस ठाऊक, तर हें सर्व त्याचें कृत्य, असें ह्मणणें कसें संभवतें ! बरें, हें सर्व जर पाटलानें केलें ह्मणावें, तर तो कोठें निघून कां जावा? निघून जावा इतकेंच नव्हे, तर कितीही शोध केला तरी सांपडूं नये असा क-

सा नाहींसा व्हावा? त्यांनीं पुनः पुनः वेणूला कसें झालें म्हणून विचारावें, व वेणूनें मोठ्या नवलानें पुनः पुन त्यांस सांगावें, " मी अशी बाहेर आलें, तों पाटील मजपुढें येऊन उभा राहिला. मी म्हणालें कीं आलेलें संकट टाळणारास आम्ही पाहिजे तें देऊं. तूं हे दागिने देशील का म्हणून पाटलानें विचारलें. मी म्हणालें कीं हे दागिने लोकांचे आहेत, पण मी ही माझी आंगठी त्याला देईन, असें म्हणून भाऊकडून मला मुद्दाम बाबांनीं भाऊबिजेचे दिवशीं माझ्या नांवाची आंगठी करवून ओंवाळणीला घालविली होती. ती मी त्याचे हातांत दिली. ती घेऊन तो हंसला नी तसाच पळत पळत नाहींसा झाला. " त्यांना वेणूचें मोठें कौतुक वाटलें; परंतु पाटलाविषयीं त्यांनीं नानाप्रकारचे तर्क केले तरी कोणाचीच मति चालेना. त्यांतून एक म्हणाला, " अशा गोष्टी आपण भुतां राक्षसांच्या पुस्तकांतून वाचलेल्या ऐकतों, प्रत्यक्ष कधीं पाहिल्या नव्हत्या त्या आज पाहिल्या. "

रात्र झाली, आणि सर्व मंडळी आपआपल्या घरीं आश्चर्य करीत जाऊं लागली. भांड्यांची व्यवस्था काय करावी त्याची पंचाईत वासुदेवपंतांस पडली. पाटलाची दारें उघडीं पडलीं होतीं, व अन्न आणणारे गडीही वेठीचे धरून आणले होते, त्यांबरोबर भांडीं परत पाठविणें योग्य दिसेना, म्हणून मंडळीच्या साक्षीनें सर्व भांड्यांची यादी करून भांडीं कुलुपांत टाकलीं, व वाटण्याचींही दोन्हीं भांडीं बंदोबस्तांत ठेवविलीं.

वासुदेवपंतांस आलेला प्रसंग निभावला म्हणून

एकअर्थीं बरें वाटलें खरें, तरी आपल्यावर आपल्या नांतवाईकांनीं असा प्रसंग आणला होता, त्यांतून पार पडणें आपल्याच्यानें झालें नाहीं, तें काम एका भिकार लंगोट्यानें केलें, आपण त्याचे ओशाळे आहों, ह्मणून त्यांस थोडें असमाधान वाटलें. त्यांनीं वचन दिलें कीं, " पाटलानें हजार माणूस माझे दारांत जेवावयास घातलें आहे, तर मी त्याचे नांवानें हजार रुपये काढून ठेवतों." परंतु पाटील लवकर सांपडेना. व ज्याच्याजवळ एवढालीं रुप्याचीं भांडीं, त्यानें हें कृत्य ह्मणजे पैशाकरितांच केलें असावें असें दिसत नाहीं, असें वासुदेवपंतांस वाटून त्यांनीं तेच हजार रुपयें जो कोणी पाटलाला त्यांचे जवळ घेऊन येईल, त्यास बक्षीस ह्मणून लाविले.

भाग दहावा.

लग्न आटपल्यानंतर ' विठ्या सोनार ' त्यानें वासुदेवपंतांवर असा प्रसंग आणिला होता ह्मणून लोकांचे जोडे खात आपल्या गांवीं परत गेला. पाटलाच्या घरची हकीगत कोणाला माहित नसल्याकारणानें त्यासंबंधीं त्याची व वामनरावांची कोठें फजिती झाली नाहीं, परंतु इतकें माणूस मामलेदारांचे दारांत कसें गेलें ह्मणून लोकांनीं विठ्ठलपंतास बोलून बोलून पुरेसें केलें. तुह्मी अमुकच मनुष्यें या असें न सांगतां नुसतें मोघम सर्व कुळांस चला ह्मणून ह्मटलें ही माझी चूक आहे असें लोकांनीं त्याच्याकडून कबूल करविलें.

लग्न होऊन आठपंधरा दिवस होऊन गेले बरी पाटलाचा कोणाला पत्ता लागला नाहीं. त्यानें केलेल्या महत्कृत्याची चर्चा तर सगळीकडे सुरू झाली होतीच, परंतु त्यानें असें कां केलें ह्याचें कारण कोणाला कळलें नाहीं. त्याच्या घरांत आयत्या वेळेस धान्य कसें उभें राहिलें, ह्याचाही अद्दमास कोणाला लागेना; मात्र लग्नाचे पूर्वी एक दोन दिवस पाटील कोठें दिसला नाहीं इतका पत्ता लागला. त्याचे घरांत चोर शिरला होता त्याविषयीं ही लोकांनीं वाटतील ते तर्क केले, व उकरलेली जागा व त्याचेमुळें उघडकीस आलेलें भुयार हीं त्यांनीं तपासून पाहिलीं, परंतु कोणाचा तर्क चालेना.

काशीबाईही तोंडांत मारल्यासारखी मानापमानाबद्दल आतां फारशी तक्रार न करतां गांवीं परत आली. तिचा आणि रमाबाईचा लग्नांत क्षणोक्षणीं तंटा झाला, पण तो सांगण्यांत कांहीं हंशील नाहीं.

नवऱ्याचें नांव विष्णु असल्यामुळें वेणूला सासरचें नांव लक्ष्मी असें मिळालें, तरी या पुस्तकास तिचें माहेरचेंच नांव दिलें आहे.

रमाबाईच्या मनाप्रमाणें तिच्या मुलीच्या आंगावर दागिने पडले होते, आणि ते पडतील ह्यांत कांहीं नवल नाहीं. सणंगें वगैरे, म्हणजे ज्या फाटून नासून जाणाऱ्या जिनसा, त्या रमाबाईच्या लेंकीला तितपतच मिळाल्या.

पहिल्याच खेपेला वेणू जेव्हां सासरीं आली, तेव्हां गांवांतील मुली तिचे घरीं येऊं लागल्या व त्यांची हिची मैत्री जमली. मुलींचें पहिलें बोलणें

दागिन्यांचें, तें कांहीं दिवस चालून नंतर खेळणीं सुरू झालीं. लक्ष्मीच्याच शेजारीं तिच्यापेक्षां वयानें वर्षा दोन वर्षांनीं मोठ्या अशा दोन मुली राधा व यमुना ह्या नांवाच्या रहात असत. पूर्वी सांगितलेंच आहे कीं विठ्ठलपंतांचें घर जुन्यांतलें होतें. ह्या घराला असणारी विहीर बुजून गेली होती, ह्मणून ह्या घरीं शेजाऱ्यांच्याच विहिरीचें पाणी आणीत असत. शेजारघर दूर असल्यामुळें ही विहीर लांब पडे, तरी विठ्ठलपंतांनीं आपली विहीर दुरुस्त केली नाहीं. ह्या विहिरीच्या संबंधानें राधा यमुना ह्यांच्याशीं लक्ष्मीचा फारच स्नेह जमून आला. या मुलींसंगतीं खेळण्यांत व सासरीं माहेरीं जाण्या येण्यांत वर्ष केव्हांच गेलें आणि आतां वर्षसण आला.

आजपर्यंतचे जे सण झाले त्यांत रमाबाईनें काशिबाईचें आपल्याकडून कांहीं कमी पडूं दिलें नाहीं, तरी लग्नाचे वेळीं जी आपली लोकांनीं फजिती उडविली तिचा सूड रमाबाईवर मी केव्हां उगवीन असें काशीबाईला झालें होतें. तिला आजपर्यंत झालेल्या सणांत अशी संधि सांपडली नाहीं, परंतु ह्या शेवटच्या सणांत तरी मी हिला थोडें तरी जाणवीन अमा काशीबाई संकेत करून होती. तिनें आपण नेहमीं लग्नांत पाहतों अशीच गोष्ट केली. ह्मणजे पहिल्यानें आमचें इतकें पान जेवावयास वाढण्याचें कबूल केल्याशिवाय आह्मी वर्षसण घेत नाहीं असें सांगून पाठवन नंतर आयत्या वेळीं फक्त कबूल केलेली कंठी उपटण्याकरितां जांवयास मात्र पाठवून दिलें. इतर मंडळी कां येत नाहीं असें विचारतां काशीबा-

ईन सांगून पाठविलें कीं, " आमच्याकडून गेलेलीं माणसें जेवायला घालायला तुह्मांला सामर्थ्य नाहीं असें लग्नांत अनुभवाला आलें, याकरितां आमच्याकडून एक कुत्रें सुद्धां तुमच्याकडे येणार नाहीं. " एकंदरींत तिनें वासुदेवपंतांचें सर्व अन्न फुकट दवडविलें.

ह्या गोष्टीलाही कांहीं महिने गेले, आणि वासुदेवपंतांची कांहीं दिवस दुसऱ्या लांबच्या जागीं बदली झाली, म्हणून कुटंबसुद्धां तिकडे जाण्याचा त्यांचा बेत ठरला. वेणू ह्यावेळीं सासरीं होती, ह्मणून विठ्ठलपंतांस त्यांनीं सांगून पाठविलें कीं " आठ दहा दिवसांत आमच्या बदलीच्या जागीं आम्ही जाणार आहों, तिकडे आम्ही बरेच दिवस राहूं, याकरितां आम्ही निघावयाचे वेळीं वेणूला मागारी पाठवूं त्यावेळीं तिची रवानगी करून द्यावी. "

वेणूला पाठविण्याचा काशीबाईचा व विठ्ठलपंताचा बेत ठरला, आणि त्याच दिवशीं सायंकाळीं वेणू जवळच ऐकत आहे अशी संधि पाहून विठ्ठलपंत काशीबाईला म्हणतात.

" कायग, ए, तूं हिच्या पाटल्यांना भर घालायची म्हणून म्हणत होतीसना ! "

" हो; पण तिकडे फावेल तेव्हांना ! "

" मला साऱ्या जन्मांत देखील फावायचें नाहीं, पण ती उद्यां माहेरीं जायची, केव्हां परत येईल याचा नेम का आहे ! याकरितां तिच्या तेवढ्या पाटल्या काढून दे ह्मणजे ती जायच्या वेळेपावेतों भर घालून आणूं. "

"फावत असल्यावर माझें तरी काय गेलें?" असें रमाबाईनें ह्मणून वेणूच्या हातांतल्या पाटल्या काढून विठ्ठलपंताचे हवालीं केल्या.

दुसरे दिवशीं वेणूच्या व काशीबाईच्या गोडगोड गोष्टी चालल्या असतांना काशीबाई एकदम उसळल्यासारखें करून ह्मणते, "काढ बघूं ती सरी ती! काय बाई, पोरीनें सरी मोडून किंहो टाकली! हं:! काय ही ह्या फांशाची दशा! दे बघूं, तूं जायच्या वेळेपर्यंत मला ती नीट करवून तरी आणूं दे; पहा किती वांकडी झाली आहे ही!" असें ह्मणून तिनें तिच्याकडून सरी काढवून घेतली.

दोन दिवस गेले आणि रात्रीं निजावयाची वेळ होत आहे तों काशीबाई वेणूला ह्मणते, "कायग बाई पोर तरी ही, हजारदा सांगितलें कीं निजतेवेळीं नथ काढून ठेवावी. पण ही कांहीं बाई ऐकायची ह्मणून नाहीं!"

"मी रोज निजतेवेळीं नथ काढून ठेवीत असतें." वेणू ह्मणाली.

"तर मग हीं मोत्यें अशीं कां दिसतात! काढ आण बघूं इकडे!" असें बोलून काशीबाईनें तिच्या नाकांतून नथ काढून घेऊन दिव्याशीं परीक्षा करीत करीत ह्मणाली, "खरेंच, हीं खालचीं मोत्यें बाई अगदीं नासून गेलीं! निजतांना काढून ठेवतें ह्मणतेस तर तूं तीं चावीत असशील ह्मणून हीं मोत्यें चिवडलीं. पुष्कळ पोरींना अशीच संवय असते नथ चावायची."

"पण मी कांहीं नथ चावीत नाहीं." वेणू ह्मणाली.

" तूं नाहीं चावीत ह्मणतेस तर त्याला माझा काय उपाय ? पण बाई सध्यां आह्मांला भुरदंड भरायला हवा. येथें हीं काढून दुसरीं मोत्यें लावलीं पाहिजेत, नाहीं तर उद्यां तूं तिकडे गेलीस म्हणजे आम्हांलाच लोक हंसतील. " असें म्हणून काशीबाईनें नथ घेऊन ठेविली.

आणखी दोनचार दिवस गेल्यावर वेणूचे देखत विठ्ठलपंत काशीबाईस ह्मणतात, " कायग ए, काय शिंचें आजपर्यंत मला फावलेंच नाहीं ! तूं परवां मला सरी नी पाटल्या नी नथ नीट करायला म्हमून काढून दिलीस, तर आणखी कांहीं द्यायचें असलें तर देऊन टाक. मी आतां सोनाराकडे जातों आहे, एकदम सगळें नीट करून आणीन. "

" आतां नाहीं कांहीं फारसें. " काशीबाई ह्मणाली. " पण एवढे कुडुक नी बाळ्या वांकड्या तिकड्या झाल्या आहेत, त्या नीट करून आणाव्या मोत्यें गळतील बिळतील म्हणून. ह्या बांगड्याही जरा मोड्या करून आणाव्या पोरीच्या हाताला घट्ट होतात त्या—"

" आण आण आणखीं काय आहे तें, एकदम निघुंदे. "

" तेवढी पुतळ्याची माळ नीट पटवून आणायची—"

" ती सोनारका पटवून देईल ? बरें आण इकडे आणखीं काय—"

आणखीं कांहीं नाहीं, पण हीं डोकीचीं डागळलीं आहेत नीट करायचीं असलीं तर ? "

" आण आण इकडे. "

" असूंदत तेवढीं तरी पोरीच्या डोकींत, अगदीं-च वाईट दिसतें. "

" नको नको. तिला लांब जायचें आहे, किती दिवस राहायची कोण जाणें. तर—आपला—आपला-एकूनएक दागिना नीट करून आणावा तें बरें. "

दोनचार दिवशीं वेणूला माहेरचें बोलावणें आलें, तेव्हां काशीबाई ह्मणते, " हें काय हें! मेले दागिने नाहीं का अजून नीट झाले. "

" काय करूं, " विठ्ठलपंत ह्मणाले " मी आपला कामधंदा टाकून त्या सोनारड्याच्या पाठीला लागलों, पण शिंचा अजून आला नाहीं ! "

" मग दागिने तरी तसेच द्यावे. बापडी तशीच घालून जाईल. "

" दागिने येथें आहेत कुठे? ते तर राहिले सोनाराजवळ ! "

" तर मग तिला तशीच पाठवून द्यायची ? "

" त्याला काय चिंता आहे ? पाहिजे तर दागिने मागाहून पाठवून देऊं. "

" असा गोंधळ कराल असें मला भविष्यच कळलें होतें; जा बाई लक्ष्मी, आईनें विचारलें तर तिला सांग कीं दागिने असे असे नीट करायला दिले आहेत, आम्ही मागाहून देऊं. "

अशा रीतीनें त्यांनीं दागिन्यांशिवायच मसलतीनें वेणूची रवानगी करून दिली. तिला अशी पाठविलेली पाहून वासुदेवपंतांस आमचा ह्यांना भरंवसा नाहीं हें पाहून मनस्वी वाईट वाटलें, परंतु आपल्या

लेंकीला अशी लांडीबुच्ची केलेली व तिच्या नाकांत फुटक्या मोत्यांचें सुंकलें अडकविलेलें पाहून रमाबाईचा जो कांहीं थैमान झाला आहे त्याला सुमारच नाहीं.

भाग अकरावा.

वासुदेवपंतांची बदली झाली होती तिकेडच नऊ दहा महिने गेले. पुढें ते चंदनास आले. त्यानंतर सरासरी दोन महिन्यांनीं वेणूला रेवगांवास नेली.

परंतु काशीबाई वेणू आल्याबराबर तिच्या साड्या चोळ्या पाहते तों त्या जुन्यापान्या! ज्या फाटून गेलेल्या साड्या वेणू जातांना काशीबाईनें तिजबराबर दिल्या होत्या, त्याच साड्या, तितक्याच फाटलेल्या, तितक्याच विटलेल्या वेणू परत घेऊन आली. नवें चिरगूट वासुदेवपंतांनीं एकही घेऊन दिलेलें नाहीं हें पाहून काशीबाईला व विठ्ठलपंताला जो क्रोध आला त्याला सुमार नाहीं. त्यांची खात्री झाली कीं आपण जातांना हिजबरोबर जीं जुनीं चिरगुटें दिलीं होतीं, तीं आमचीं तशींच वर्षभर करंदीकरांनीं ठेवून मुलगी पाठवितांना तींच तिजबराबर पाठवून दिलीं.

सकाळीं वेणू चंदनाहून आली, आणि सायंकाळीं काशीबाई तिच्यापुढें दाण्याचें दोपलें हपटून ह्मणतः—

" जा; एवढें दळण दळून आण. "

" नी मला. एकटीला जातें येईल ? " वेणूनें विचारलें.

" येईल तर काय झालें. आईबापांनीं उगाच [illegible] खोडी वाढवून ठेवली आहे ? " [illegible] आतांशा

सासूबाईंची ती रागावलेली मुद्रा पाहून वेणू मुकाट्यानें टोपलें घेऊन दळावयास गेली. तिनें कसें बसें ओढून ओढून तर दळलेंच, परंतु रात्रीं तिच्या हाताला जो ठणका लागला आहे त्यानें तिला रात्रभर झोंप आली नाहीं. इतकेंच नव्हे, तर ते करवंदा एवढाले फोड पाहून ती धाईं धाईं रडत होती.

सकाळीं उजाडतांच काशीबाईनें उखळावर तांदूळ सडावयास टाकले आणि वेणूला म्हणाली, " लक्ष्मी, सड एवढे तांदूळ. "

कालच्याप्रमाणें आजचीही सासुबाईंची मर्जी खप्पा झालेली पाहून लक्ष्मी मुकाट्यानें तांदूळ सडावयास लागली, परंतु तिच्यानें मुळींच मुसळ धरवेना!

" मुसळ चालूंदे, हातांकडे काय पहात बसलीस?" काशीबाई तिच्या अंगावर ओरडून म्हणाली.

वेणूनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिनें पुनः पुनः धीर करून मुसळ धरावें, परंतु तिच्या हातांला तें रुतून फोड पटापट फुटावे, व तिचा जीव घाबरून जावा.

" आहे आहे मला ठाऊक मोठी श्रीमंताची मुलगी आहेस ती ! हात झाझरले म्हणून मेलीस नाहीं अगदीं ! कांड लवकर तांदूळ, मग पाणी आणायला हवें. " असें काशीबाईनें म्हणतांच वेणूला रडें कोसळलें. तिनें तें आपल्याकडून दाबलें, परंतु तें राहिना.

" आहे आहे ठाऊक रडून साजरें करतेस ती ! आपल्या आईला हवी तर मामलेदारणीचा तोरा लावून बसते ती येथें काम करायला आणायाची होती— नाहीं तर आजे बसतें तला काम सांगितलें. "

वर्षभर माहेरीं राहून जें सुख भोगलें त्याचें उट्टें आतां निघत आहे हें लक्ष्मीला कळून आलें. काशीबाई अशा रीतीनें रमाबाईचा राग तिच्या मुलीवर काढूं लागली, तेव्हां वेणूला पाटलाची आठवण घडोघडीं होऊं लागली. तिला याचेपूर्वी लग्नांत झालेला चमत्कार आठवत असे व पाटील नाहींसा झाल्याबद्दल वाईटही वाटे. तिला अलीकडे पाटलाची जशी फार आठवण होऊं लागली, तसें आपल्या नवऱ्याच्या वर्तणुकीकडेही तिचें लक्ष्य लागूं लागलें. ती ह्मणजे आतां लहान मुलगी होती असें नाहीं. विष्णुपंत आपल्या आईबापांचें ऐकत नाहींत हें तिच्या लक्ष्यांत येऊन चुकलें होतें. त्यांस काशीबाईचा आंतून सुनेला न कळत उपदेश चाललेला असे हेंही तिला कळलें होतें, परंतु आतां सून मोलकरणीपेक्षांही मोलकरीण जेव्हां ठरली, तेव्हां काशीबाईनें आतां तिच्या तोंडावर आपल्या मुलास उपदेश चालविला.

एकेदिवशीं सायंकाळीं सुमारें पांच वाजावयाचे सुमारास विष्णुपंत घरीं येऊन आईला लवकर जेवायला वाढ ह्मणून घाई करूं लागले. तेव्हां काशीबाई त्याला विचारते:—

"कां इतकी घाई करून कुठें जायचें आहे तरवार हाणायला ?"

"जायचें आहे आपलें कुठें तरी, तुला काय त्याचें ? तूं आपली मला वाढ ह्मणजे झालें."

हें त्याचें उत्तर ऐकून काशीबाई रागावून ह्मणते, "तुला लाज नाहीं वाटत गाढवा, तुला काय त्याचें ह्मणून विचारतोस तो ? आतांशा

तूं काय आरंभलें आहेस ? रात्रीचासुद्धां घरीं असत नाहींस याला ह्मणावें काय ? काय करीत असतोसरे रात्रीचें बाहेर ? कोणाच्या घरीं निज़त असतोस ? ”

“ आई मी घरींच निजत असतों, मी कोठें जातों बाहेर ? मला तूं बाहेर जातांना पाहिलेंस का तरी ? ”

“ विष्ण्या, तूं खरें बोलतोसना हें ? तूं नाहीं बाहेर जात ? ”

“ नाहीं. ” नाहीं ह्मणतांच काशीबाई त्यास मारावयास गेली. त्यानें तिला चुकविलें. तेव्हां काशीबाई संतापून ह्मणाली—“ कार्ट्या आज मी किती दिवस पाहतें आहे. आमच्या देखत अंथरुणावर निजतो; नी बरीचशी रात्र झाली कीं आह्मांला झोंप लागलीशी पाहून हळूच उठून चालता होतो. मी आज एकसारखी चार दिवस रात्रीची येऊन अंथरुणावर चांचपून पाहातें, विष्ण्या अंथरुणावर नाहीं ! तुला जर असें बाहेर जायचें असेल, तर एंकदां बाहेर गेलास म्हणजे मी पुन्हां तुला घरांत घेणार नाहीं. हो; साफ सांगतें. ”

“ अग मी गेलों तरी मी आपल्या सोबत्याकडेसच्च जात असतों. ”

“ काळतोंड्या, ” काशीबाई दांत ओंठ खात त्याच्या पाठीस लागते. “ काळतोंड्या, कोणरे तुझे सोबती आहेत असे ? ”

विष्णू तिच्या तावडीस सांपडला, व तिनें फाड दिशीं त्याच्या तोंडांत दिली.

लक्ष्मी जवळच होती, व ती हा सर्व प्रकार आ-
डून पाहत होती. विष्णूला हा तिच्या देखत आपला
अपमान झालेला सहन झाला नाहीं. त्यानें संतापून
आईला उत्तर दिलें, " मी जाणार बाहेर जा; मग
तुझें काय म्हणणें आहे ? "

" तूं घरांत राहूं नको. "

" नाहीं रहात. राहूं नको एवढेंच कीं नाहीं ? "

" मेल्या, काट्र्या, नष्टा, " म्हणून काशीबाई
त्याला शिव्या देऊं लागली. " निसंतान्या, असा
निपजशील असें मला माहीत असतें तर मी तुझें लग्न
तरी कशाला केलें असतें ? काळतोंड्या, असा निघ-
शील हें मला काय माहीत? तेवढी टूक धरून दुसां-
जा गिळायला तेवढा तयार ! त्यांचे हातपाय चालतात
तोंवर गिळशील, पण काट्र्या उद्यां भीक का मागा-
यची आहे ? "

" परंतु गिळायला मी तुमच्या घरांत राहतों
आहे कशाला ? "

" मांगा, " काशीबाई आणखीं चेवून म्हणते,
" तूं कुठें काळें तोंड करशील; पण ती लोकाची पोर
घरांत आणली आहेना ? तिची वाट काय! "

"कोणाच्या उपकाराला लोकांची पोर घरांत आ-
णलीत ? माझ्या ?"

" बघा बघा," काशीबाई लक्ष्मीकडे पाहून म्हण-
ते, " बघ कसा माजोरी कार्टा विचारतो तो ? खा-
परतोंड्या, तुझ्या नाहीं तर कोणाच्या उपकाराला
आम्ही एवढी खटपट केली ? ही लोकाची पोर तु-
झ्या करतां नाहींतर— "

" बस बस, माझ्याकरतां नाहीं. आह्मांला कोणाची जरूर नाहीं. "

" जरूर नाहीं पण—— "

" नाहीं आह्माला जरूर. आह्मी जाणार. "

काशीबाई संथ होऊन त्याला सोईच्या गोष्टी ह्मणून सांगते. " हें काय वरें बाळा. उगच्चि मला काय म्हणून छळतोस ? नीट सोईनें वागावें. आज लिहिलेंस पुसलेंस तर उद्यां तुझ्या उपयोगीं पडेल. मेलें आह्मीं नाहीं कांहीं तुझ्या करतां मिळवून ठेवलें तरी तुझा सासरा मामलेदार आहे, सहज कोठें गुंतवून देईल. "

" मला सासऱ्याची गरज नाहीं नी कोणाचीही गरज नाहीं. "

" हें काय बरें असें ? उद्यां ह्या पोरीला नहाण यायला झालें. "

विष्णुचा राग शांत झाला नव्हता, तो म्हणाला " न्हाण नाहीं नी फाण नाहीं. मी शपथ वाहून सांगतों कीं मला तुमची गरज नाहीं. तूं जेवायला नाहीं घालीत तर हा मी चाललों पहा. असें म्हणून तो चालता झाला. जसें कांहीं त्याला त्या रात्रींच्यारात्रीं हजारों रुपये मिळून त्याला कोणाचीही गरज राहणार नाहीं.

तो निघून गेला तो रात्रीची जेवणाची वेळ टळून गेली तरी येईना, तेव्हां हा आतां येत नाहीं असें ठरलें. विष्ठलपंत आल्यावर त्यांचे कानीं हा मजकूर गेला तेव्हां ते म्हणाले " जातो कुठे येईल उद्यां. "

विष्ठलपंत कुळांशीं घासघिस घालून दमून आलेले

असत, यामुळें जेवल्याबरोबर निजावयास जाण्याचा त्यांचा परिपाठ असे. ते निजावयास गेले, व काशीबाईचे मनालाही विष्णूमुळें स्वस्थता नव्हती म्हणून ती कामें आटोपल्याबरोबर अंथरुणावर पडली, तों तिचा लागलीच डोळा लागला. लक्ष्मी तिजजवळच निजत असे, परंतु तें तिचें काम आटपेल तेव्हां. काम आटोपून लक्ष्मीचीही निजावयाची वेळ झाली. ती निजणार, तों तिला ओसरीवर दिवा टिकटिक जळत होता तो आंत आणून ठेवण्याची आठवण झाली. दिवा आंतील तेल सरून जाण्याच्या बेतांत होता; लक्ष्मी त्याला हात वालावयास गेली, तों तेथेंच एका घडी केलेल्या कागदावर लक्ष्मी हिला अशीं अक्षरें तिच्या दृष्टीस पडलीं, तों इतक्यांत दिवा गेला !

ही चिट्ठी माझ्या नांवाची मलाच कोणीं लिहिली असावी काय ? घरांत अंधेर बाहेर अंधेर ! चिट्ठीला हात तरी कसा घालावा !

आपल्यालाच ही चिट्ठी कोणीं लिहिली असावी, असा लक्ष्मीच्या मनानें संशय घेतला. ती तेथें अंधेरांत समईशीं बसली, व चिट्ठी पाठविणारें कोण म्हणून आपल्या मनाशीं शोधूं लागली, परंतु अशा रात्रीं, ती अशी चोरून, आणि तिच्याच नांवची,—म्हणजे जी गोष्ट कधींही होण्याचा संभव नाहीं,—असें चिट्ठी लिहिणारें तिला कोणीं आढळेना.

ही चिट्ठी आज निघून गेलेल्या आपल्या नव-ऱ्यानें तर आपल्याला लिहिली नसेलना ? मना, तूं फार वेडें आहेस !

भाग बारावा.

सर्व विचार खुंटले, आणि दिवा लावून ह्या चिठ्ठींत काय लिहिलें आहे तें पहावें हाच निश्चय लक्ष्मीचा झाला. परंतु दिवा कसा लावावा? सामूबाई कदाचित् जाग्या असल्या, किंवा आतां त्या जाग्या झाल्या, तर कांग लक्ष्मी पुन्हां दिवा लावलास ह्मणून विचारतील !

काय होईल तें होवो असें ह्मणून लक्ष्मी चिठ्ठी घेऊन चुलीशीं गेली; तेथें तिनें विस्तव उकरून एक काडी पेटविली, आणि घाईघाईनें डाव्या हातानें चिठ्ठी उघडून तिनें हीं अक्षरें वाचलीं:—

"कसेंहीकरून तुझ्या सासऱ्याच्या खोलींतील कागदपत्रांचे रुमाल कोणास न कळवितां घरांत नेऊन आतांच ठेवावे, यांत कल्याण आहे."

खालीं नांव नाहीं कांहीं नाहीं ! लक्ष्मी बुचंकळ्यांत पडली. चिठ्ठी पाठविणाराचा कागदांच्या रुमालांशीं काय संबंध असावा बरें? नवऱ्याचें अक्षर तिला माहीत नव्हतें, तरी तो ही चिठ्ठी पाठविता तर त्याचा कांहीं निराळ्याच प्रकारचा मजकूर असता असें तिला वाटलें. रुमाल नेऊन ठेवण्यांत कल्याण कसें होणार? त्याप्रमाणें आपल्यास रुमाल न्यावयास कसे सांपडतील? ही गोष्ट कोणास न कळवितां कशी होईल? तीही गोष्ट आपण केली; तर ती आपण आपल्या कल्याणाचीच करतों आहों ह्मणून कशावरून? कोणी लुच्यानें किंवा दरोडेखोरानें आपला दुष्ट हेतु साधण्याकरितां असें लिहिलें नसेल कशावरून?

अशा नानाप्रकारच्या विचारांनीं तिचें मन व्याप्त होऊच ती पुन्हां अंधेरांत चुलीशीं गूढांत पडून राहिली !

नंतर ती कांहीं न सुचून ओटीवर आली, परंतु तें कशाला हें तिचें तिलाच समजेना ! घरांत पहावें तर जिकडे तिकडे शुक, बाहेर आंगणांत पहावें तर अंधारी रात्र नुस्तीच निवळत चालली आहे.

विष्ठलपंताच्या घराचें तोंड पूर्वेकडे होतें. दारांत मोठें अफाट आंगण असून त्याचे कांठीं एक आवळीचें झाड होतें. दोन चार हाताची पडवी वलांडली ह्मणजे मनुष्य ओटीवर आलें. ह्या ओटीवर डावे आंगास विष्ठलपंताची खोली व उजवे आंगास माडीवर जाण्याचा जिना. ओटीवर विष्णु निजत असे. कधीं कधीं त्याचे सोवतीस त्यांचा गडी असे, परंतु त्याचें घर गांवांतच असल्यामुळें तो नेहमींच असे असें नाहीं. ह्या दिवशीं ओटीवर कोणींच नव्हतें.

काशीबाई लक्ष्मीला घेऊन माजघरांत निजत असे, व विष्ठलपंत आपल्या खोलींत निजत असत. ह्या खोलींतच विष्ठलपंताचे कागदांचे रुमाल होते. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें, व खोलींत पैसा अडका नसून पुष्कळ दिवसांच्या अनुभवावरून कसली भीतीही बाळगण्याचें कारण नव्हतें म्हणून, विष्ठलपंत आपल्या खोलीचें दार सुमारवट उघडेंच ठेवीत असत.

लक्ष्मीचा बेत कायम झाला. कांहींही होवो, जें कोणीं आपणाला असें लिहिलें आहे, तें आप-

ल्या कल्याणाकरितां म्हणून नसेल कशावरून ? रुमाल घरांत नेऊन ठेवावे हा कांहीं कोणाचा कपटाचा उपदेश नव्हे. ह्मणून तिनें रुमाल घरांत नेऊन ठेवण्याचा निर्धार केला.

हळुहळू मध्यान्हीचा सुमार आला होता. काशीबाई घरांत गाढ निजली होती. लक्ष्मीनें धैर्यानें जाऊन विठ्ठलपंतांच्या दाराशीं कानोसा घेतला तों त्यांचें ही घोरणें तिला ऐकूं आलें. रुमाल कोठें असत तें तिला माहित होतें. ती आंत जाऊन ते रुमाल बाहेर आणण्याकरितां आपल्या आंगीं धैर्य आणूं लागली.

सासरा जागा होऊन त्यानें कोण ह्मणून जर विचारलें तर काय उत्तर द्यावें बरें ? आपण एवढ्या रात्रीं अंधेरांत त्याचे खोलींत शिरतों आहों, आणि अशावेळीं जर आपण सांपडल्या गेलों, तर गोष्टी कोणच्या थराला जातील बरें ? असे पुनः पुनः विचार तिचे मनांत येऊन तिचें पाऊल मागें घेऊं लागले.

तिनें आतां एकाएकीं मोठें धाडस केलें, आणि पाऊल न वाजवितां हळूच तेवढे रुमाल बाहेर आणले. रुमाल माजघरांतील फडताळांत नेऊन ठेवण्यास तिला कठीण पडलें नाहीं. तिच्या हातून हें कृत्य तर होऊन गेलेंच; पण काय होईल कोण जाणें ह्मणून तिचें काळीज धडधडूं लागलें.

आतां आपण निजावें अमें तिला वाटून ती हळूच जाऊन मामूशेजारीं निजली खरी; तरी ह्या रात्रीं कांहीं तरी मोठा अनर्थ खास आहे अमें तिला वाटलें. आपणांवर संकट येणार आहे ह्मणून जर आप-

ल्याला कळलें आहे, तर आपण सावध असलें पाहिजे; व प्रसंग पडल्यास इतरांसही सावध केलें पाहिजे; म्हणून लक्ष्मीनें न निजतां हुशार राहण्याचा विचार केला.

उठून माजघरचे दाराशीं ती आली. आणि बाहेर कांहीं प्रकार झाल्यास तो आपण न दिसतां आपल्यास सहज दिसावा म्हणून दाराला फट ठेवून ती तींतून बाहेर पाहत उभी राहिली. ह्मावेळीं रात्र चांगली निवळली होती, व लक्ष्मीची नजर एकसारखी आंगणाकडेसच लागली असल्यामुळें तिला आंगणांत कोणीं आल्यास स्पष्ट दिसेल इतकें न्यहाळतां येऊं लागलें.

ती एक तासपर्यंत उभी राहिली. तिचे डोळे अंधारांतून एकसारखी टक लावून पहात असल्यामुळें ताटकळून गेले. मध्यान्ह उलटून गेल्यामुळें संकटाची वेळ टळून गेली असें तिला वाटूं लागलें, व रुमाल परत नेऊन ठेवावे कीं काय ह्मणून तिचें मन घोटाळूं लागलें. तों अकस्मात् आंगणांतून कोणीं गेल्याचा तिला भास झाला. लक्ष्य लावून पाहते तों कोणी तरी पुरुष आंगणांतून इकडून तिकडे गेला खचित म्हणून तिची खात्री झाली.

ती तशीच धैर्य धरून उभी राहिली. तों आणखी एक मनुष्य जात आहेसे तिला वाटलें. हा मनुष्य पहिला मनुष्य गेला होता तिकडेच ह्मणजे आंवळीच्या झाडाकडे जात आहे तों आणखीं तिसरा मनुष्य तिकडे जातांना तिनें पाहिला. तो तिकडे जाऊन पोंचतो न पोंचतो तों चवथा मनुष्य तिच्या समोरून जाऊं लागला.

बिचारी लक्ष्मी तर जागच्या जागींच थिजून गेली! तिचें सर्वांग थरथर कापूं लागलें ! तिनें दाराला बळकट जर धरलें नसतें, तर ती धाडदिशीं जमीनीवर पडून भलताच कांहीं गोंधळ होऊन जाता !

ह्या चवथ्या मनुष्याच्या पाठीमागून आणखी कोणी जातांना दिसला नाहीं. पूर्वीं जे तीन मनुष्य पुढें गेले त्यांच्यामध्यें आणि ह्या चवथ्या मनुष्यामध्यें पुष्कळ फरक दिसून आला. हा त्या सर्वांपेक्षां लहान दिसत होता. त्यावरून तो मुलगा किंवा नि-दान आडवाप्या तरी असावा. आणि सर्वांत विशेष गोष्ट ही कीं पूर्वींच्या तिहींच्याही आंगावर कांहीं पांढरें वस्त्र दिसत नव्हतें, परंतु हा चवथा पांढरें धोतर नेसला असून त्याचे आंगावरही पांढरें आंगवस्त्र होतें.

ते चौघे त्या आंवळीच्या झाडाखालीं कांहीं खलबत करीत आहेत असें दिसलें.

तेथें सुमारें पावघटका त्यांचें तें खलबत चाललें होतें. आतां त्यांतील चवथा इकडे घराकडे येऊं लागला. त्याचा घरांत येण्याचा विचार खास आहे असें पाहून लक्ष्मीला वाटलें कीं आतां बळ असेल तेवढें करून खूप ओरडावें, अथवा मुकाट्यानीं सासूला उठवावें.

ती त्या येत असणाऱ्या मनुष्याकडे पाहत आहे, तों तिला एका विलक्षण गोष्टीचा भास झाला. हा येणारा मनुष्य आपला नवरा तर नसेलना ? निदान त्याच्या उंचीवरून, थोडथोडी शरीराची बांधण दिसते आहे त्यावरून व चालण्यावरून, आणि त्याच्या

पांढुरक्या वस्त्रांवरून त्याच्यासारखा कोणी तरी आहे अशा प्रकारचा संशय उत्पन्न होऊन त्यानेंच लक्ष्मीचें तोंड बंद केलें !

तो मनुष्य जोतें चढून वर आला आणि वेधडक विठ्ठलपंताचे खोलींत शिरला ! काय करावें हें लक्ष्मीस समजेना ! हा कदाचित् आपला नवरा असला-तरी तो चांगल्या हेतूनें अशावेळीं घरांत शिरला नाहीं. रुमालांविषयींचा तिचा संशय दृढ झाला. त्या रुमालांकरतांच जर ही स्वारी असेल, तर आपण आतां उगाच बोभाट करूं नये, कारण कीं आपल्याला संशय आलेलाच हा गृहस्थ असल्यास आपण बोभाटा केल्याचा परिणाम चांगला होणार नाहीं.

तो आंत गेलेला मनुष्य आंत गेला तसा लागलीच परत आला. तो आंगणांत उतरला तेव्हां त्याचे हातांत कांहीं नसावे असें वाटलें. तो आपल्या मंडळींत गेला तेव्हां तेथें कुजबुज सुरू झाली. लक्ष्मीला स्पष्ट असें कांहींच ऐकूं आलें नाहीं. परंतु त्या तिघांतील कोणींएकानें त्या मनुष्यास कांहीं विचारलें त्याचें उत्तर अर्धवटसें लक्ष्मीच्या कानावर आलें:—

" देवाच्यानू मी खोटें बोलत नाहीं. तेथें नाहीं नच ते. "

आतां एक प्रश्न लक्ष्मीच्या कानावर आला तो हा—" आम्हीं जाऊन पाहूं ? "

" खुशाल. " असें उत्तर मिळालें.

शब्द तर थेट आपल्या नवऱ्या प्रमाणें आहे असें तिला वाटलें !

जरा थोडा वेळ लावून त्या तिघांतले दोन पूर्वी-च्या मनुष्याप्रमाणें विठ्ठलपंताचे खोलींत शिरले; आणि चार पांच पळें फार तर गेलीं असतील, इ-तक्यांत विठ्ठलपंत एकदम घाबरल्यासारखे ओरडले !

लक्ष्मीनें सासूजवळ जाऊन तिला घाईघाईनें उठ-विलें. त्यांनीं होईल तितक्या त्वरेनें दिवा लावला, आणि भीत भीत विठ्ठलपंताचे खोलींत येऊन विचार-पूस सुरू झाली.

ते ह्मणाले, "कोणीं तरी येऊन माझ्या आंगावर पाय दिला."

"तें तुह्माला स्वप्न पडलें असेल !" काशीबाई ह्मणाली.

"नाहीं, स्वप्न नाहीं." मीं या दारांतून परत जातांना कोणाला पाहिलें खचीत. त्याचा मला पाय लागल्याचा भास होतो. तुह्मीं येथेंच बसा,भिऊं नका आंतून कडी लावून घ्या, असें सांगून एका हा-तांत कोपऱ्यांतील काठी व एका हातांत तेथील दि-वा लावून घेऊन विठ्ठलपंत पुढें सरसावला. काशी-बाईनें त्यानें एकट्यानें पुढें जाऊं नये ह्मणून पुष्कळ हरकत केली, परंतु त्यानें ऐकलें नाहीं.

विठ्ठलपंतानें सगळीकडे शोधलें, आंगणाचे चारी कोंपरे धुंडाळले, काठी वाजवीत वाजवीत आणखींही पुढें जाऊन पाहिलें, परंतु कोठें कोणीं नाहीं !

विठ्ठलपंत परत आले, आणि 'कोणीं नाहीं' असें ह्मणत ह्मणत बसतात तों एकाएकीं "बुडालों बुडा-लों, सर्वस्वीं बुडालों," ह्मणून ते ओरडले !

काशीबाईनें ते पहात होते त्या कोनाड्याकडे पा-

हिलें तेव्हां भयाचें कारण तेव्हांच तिच्या लक्ष्यांत आले.

" खतांचे रुमाल गेले ! " ती ह्मणाली.

" खतांचे रुमाल गेले ! " तो ह्मणाला.

तीं दोघेंही घाबरीं होऊन एकमेकांचे तोंडाकडे पाहूं लागलीं. विष्टलपंताचे पाय मोडून तो मटकण खालीं बसला ! लक्ष्मी तेथें होती, परंतु तिच्यानें बोलवेना. रुमाल मीं घरांत नेऊन ठेवले आहेत ह्मणून सांगावें, तर तिला चिठ्ठीपासून सर्व हकीगत सांगावी लागणार ! आपण विष्टलपंताचे खोलींत शिरलों. रुमाल घेतले –व चोरांची वाट पहात बसलों; चोर आपल्या दृष्टीस पडले –त्यांत आपल्या नवऱ्याचा संशय आल्यामुळें आपण ही बातमी तुह्मांस दिली नाहीं, इतकें सांगावें लागणार ! ह्मणून तिचें तोंड बंदच राहिलें. शिवाय कोणाला कळवूं नये असें त्या चिठ्ठींत होतेंच.

" घरांत तरी मेल्यांनीं कांहीं जिवंत ठेवलें आहे का " अशी एकाएकीं आठवण होऊन काशीबाई दिवा घेऊन उठली. विष्टलपंतासही तोच धाक वाटला, आणि तीं तिघेंही घरांत गेलीं.

घरांत पेटी वगैरे सर्व कांहीं होतें तसेंच यथास्थित होतें. तेथें चोरटे शिरले नाहींत हें पाहून काशीबाई समाधान पावून माजघरांतील आपल्या फडताळाकडे चालली. त्यालाही कुलूप होतें. तिची नजर फडताळाखालील खिडकीकडे गेली. तेथें खतांचे रुमाल तिचे दृष्टीस पडले !

" हे पहा येथें रुमाल ! " ह्मणून हर्षानें ती ओर-

डली. विठ्ठलपंताचाही आनंद पोटांत मावेना ! तीं स्त्री पुरुषें रुमाल येथें आले कसे ह्मणून आश्चर्य करूं लागलीं.

" येथें रुमाल मी यावत्जन्मांत अद्याप ठेवले नाहींत. " विठ्ठलपंत ह्मणाले.

" मी त्या रुमालांला आज सहा महिन्यांत शिवलें सुद्धां नाहीं. " असें काशीबाई ह्मणाली.

त्यांनीं वाटतील ते तर्क केले. एकमेकांवर आठवण नसल्याबद्दलचे आरोप घातले. आणि सर शेवटीं ही जगदीशाची करणी ह्मणून ठरविलें.

ती रात्र त्यांनीं तशीच बोलत बसून घालविली. परंतु लक्ष्मीनें कशाचीही ओळख दिली नाहीं.

भाग तेरावा.

ते दोघे विठ्ठलपंतांच्या खोलींत शिरलेले चोरटे रुमालांचा कोनाडा शोधीत असतां त्यांतील एकाचा विठ्ठलपंतांस ढका लागला, आणि विठ्ठलपंत जागे झाले. ओरड होतांच त्या चोरांनीं आपला पाय बाहेर काढला, आणि सगळे असामी मिळून आपला जीव घेऊन पळून गेले. विठ्ठलपंतांचे घरांत दिवा लावून शोधाशोधीची तयारी होत आहे तोंच ते जवळचें टेंकाड चढून 'गार झाले. आपण आतां कोणाला न सांपडूं इतक्या दूरवर आलों असें पाहून ते चार असामी एका झाडाखालीं बसले, व धांपा टाकून थोडेसें अवसान आल्यावर त्यांतील एक ह्मणाला, " मसलत फसली. "

"मसलत फसली तर फसूं दे रे राम्या, पण आम्ही मांपडलों न्हाईं बग! माझा पाय नेमकाच त्येच्या आंगावर पडत होता." असें दुमरा म्हणाला.

"तुमचें आपलें ठीकच आहे." असें ज्याच्या विषयीं लक्ष्मीला हा आपला नवरा असेल अशी शंका आली होती, व ज्याच्या आंगाचा कंप अजून गेला नव्हता, तो बोलूं लागला, "तुम्ही आपलें कार्यसाधण्याकरतां मजवर मात्र संकट आणलें होतें."

"तुम्ही ब्राह्मणभाई असेच रडायचे;" एक म्हणाला, "हातानें काडीचें काम न्हाईं होणार, आन्—लवाडी तेवढी करायला तयार. मला तुझ्याच लवाडीचा संशे येतो. का सदबा!"

"त्ये व्हाउं दे;" सदबा म्हणाला, "लवाडीन् त्ये संमद व्हाऊंदे. ह्ये पहा त्येला परसंग हये. इक्या सोनाराशीं गांठ बगा. त्यो ब्राम्हण सोडणार न्हाई. इबाई मामलेदार! आम्हांस्नी धरल्याबिगर न्हाईं व्हाणार!"

अशी सदबाची त्यांस सूचना मिळतांच पुढें येणाऱ्या संकटाविषयीं त्यांचें संभाषण सुरूं झालें, व शेवटीं हें प्रकरण मामलेदारांचे कानापर्यंत गेल्यास काय तजवीज करावी ह्याची चर्चा ते करूं लागले. नंतर येथें असें बोलत बसणें धोक्याचें आहे, म्हणून ते उठले. "जा तर ब्राह्मणा तूं," राम्या म्हणाला, "सदबा म्हणतो त्यापरमाण मावशी बोडकीला बोलावूनशानी आण. आम्ही पाटलाच्या घरीं हवो." तो ब्राह्मण अशी आज्ञा मिळतांच परत रेवगांवास निघाला, व बाकीचे तिघे मराठे वाटण्यास आले,

आणि नाहींशा झालेल्या पाटलाच्या ओटीवर येऊन बसले.

"खरच गड्या ह्ये काय बर ? " राम्या ह्मणाला,

" रुमाल न्हाई ह्मणून हा ब्राह्मण म्हणाला, पण तुमच्यापरमाणच मला त्येचा इश्वास न्हाई. "

" त्ये व्हाऊंदे ह्मणून मगापुन मी सांगतोना तुम्हास्नी ? " सदबा त्यास दटावून ह्मणतो, " आतां काय त्येच व्हायल ? पाहुन घेऊं. सध्याच्च काय त्ये बगा. "

" पण अस का व्हाव ? कायर सोनजी ? "

" दादा, " सोनजी ह्मणाला, " ब्राह्मणाची न्हाई लचाडकी दिसत. मी सवता आंत गेलों तवा अक्षी त्या कोनाड्यावरच्च माझा हात पडला बगा. पण आंत कायबी नव्हत. "

" त्ये संमद व्हाउं द्या राव, " सदबा ह्मणाला, " मी तुह्मांस्नी हात जोडतों. तुह्मांस्नी कायबी संशे येवू, तुह्मी त्या भटाला दावू नका. का ह्मणाल तर तिथच पुष्कळ हये. त्यो ब्राह्मण न्हाई बिथरला तो संमद्या गोष्टी उरकून टाकू. देवाच्या कुरपेन आम्हास्नी जागाबी चांगली मिळाली बसायला. बापडा कुट गेला, का नाहींसा झाला, का मेला, पत्या नाहीं. त्यो मामलदार लई गुणाचा, ह्मणूनशानी त्येची भांडीं त्यानं धरून धरून ठेवल्याती; आतां संमद, ह्ये घरची जाईल सरकारांत न्हाई सांपडला तर. "

" आतां सदबादादा तं बी बोलूं नको, आह्मीबी बोलत नाहीं. मावशी येई तों गप बसूं. " अशी एकाचा सूचना मिळतांच ते स्वस्थ बसले. व सुमारें एक तासा-

नें तो परत गेलेला ब्राह्मण एका विंचवेम घेऊन आला. तो ब्राह्मण ह्मणाला, " कांहीं केल्या मावशीबाई उठेचना; पण मी तिचें दार उपडून काढलें आणि तिला पुढें घालून येथें आणिली. "शाबास बामणगडी," सदबा ह्मणाला, "आतां तुह्मीं हुशार खचित. "

ही मावशीबाई कोण हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. रमाबाईला चंदनच्या वाटेवर जिनें विष्ठलपंताच्या स्थळाची शिफारस केली तीच ही मावशीबाई. मावशीबाई रेवगांवांतच रहात असे. हिला मागेंपुढें कोणी नव्हतें. हिचें घर ही स्वतांचें नव्हतें. गांवांत एक मारुतीचें देऊळ होतें, त्यांतच एके आंगास कूड घालून ही बाई रहात असे, व एके आंगास एक सोनार रहात असे. ह्या बाईच्या संगतीलाही असाच मनुष्य लागे. ही बाई ह्या गांवांत फार तर वर्षांतून चार महिने असे, ह्यामुळें हिची एवढी मिजास कशी चालते हें कोणास माहित नव्हतें. लोक हिजजवळ हजार पांचशें-ची माया आहे ह्मणून बोलत, परंतु खरा अंदाज कोणाला लागला नाहीं. कावाडकष्टाचें कोणाचें काम पडल्यास ही बाई करणार नाहा, परतु लफगेबाजीचा ज्यांत प्रकार आहे, तें काम ही बाई हटकून उचलावयाची.

त्या चौघां चोरांमध्यें प्रमुख सदबा होता त्यानेंच फक्त त्या बाईशीं बोलावें असें ठरलें होतें, ह्मणून तोच मात्र तिजशीं बोलूं लागला. त्यानें तिला झालेली सर्व हकीकत सांगितली, तेव्हां ती बाई ह्मणते, " माझी वामनरावाशीं चांगलीच ओळख आहे; तुह्मी ह्म-

णतां त्याप्रमाणें तो जर माझ्या सांगण्यावरून माम-लेदारांपाशीं एक शब्द बोलेल तर तुमचें खटलें त्यांच्याकडे गेलें असलें तरी ते त्याच्याकडे पहाणार सुद्धां नाहींत. पण मला ही तुमची खट-पट करण्यापासून किफायत काय? तुम्ही दहा पांच बोलाल, पण मा तुम्हांला एकच सांगतें दोनशें रुपये आज रोख घेतल्यावांचून मी ऐकायची नाहीं."

बाईनें एवढी रक्कम मागितलेली ऐकून त्या मरा-ठ्यांचें बोलणेंच खुंटलें. त्यांनीं तिचे आर्जव केले कीं फार तर पंचवीस रुपये देण्याचें आपलें सामर्थ्य आहे. परंतु ती बाई दोनशेंची रक्कम ह्मणून सोडीना. शेवटीं तें पटलें नाहीं, तेव्हां मावशीबाई झटकन्यासरशी उठून चालूं लागली.

आतां पहांटेची वेळ होती. त्या मराठ्यांचीही घरीं जाण्याची वेळ झाली, ह्मणून ते निरुपाय हो-ऊन उठून गेले. तो ब्राह्मणही उठून रेवगांवाकडे चालला, व त्यानें मावशीबाईला गांठलें.

"विष्ण्या तूं चांगला रोजगार आरंभला आहेस हं;" मावशीबाई त्याला ह्मणाली, "थांब आतां तु-झ्या बाबांला जाऊन सांगतें."

"हें काय बरें मावशीबाई!" विष्णु ह्मणाला, "आह्मीं अशाकरतांच ही गोष्ट तुह्मांला कळविली का?"

"अशा करतांच. ही चोरी करण्याला तुझें काय नडलें होतें? नी रुमालांची चोरी करण्यांत त्यांचा तरी काय फायदा? त्यांनीं मला सांगितलें नाहीं."

"हें बघा मावशीबाई, कोणचीही गोष्ट करणें

त्यांत स्वार्थ नी परमार्थ साधले पाहिजेत असें ह्मणतात. हीं कुळें कीं नाहीं, आमच्या बाबांच्या सावकारीनें अगदीं जेरीस आलीं आहेत. बापड्यांना आतां पोटाला मिळायला मारामार पडली आहे. ते ह्मणतात कीं विठ्ठलपंतांचे कर्ज फिटेल तर आह्मी आपले पोटापुरतें मिळवून खाऊं. पण तें कर्ज कसें फिटणार? याकरतां त्यांनीं अशी कल्पना काढली कीं मुळीं खतेंच नाहींतशीं करावींत. खतांचे रुमाल चोरून नेले ह्मणजे ते आपआपलीं खतें काढून घेतील; बाकीचीं जीं खतें आहेत, तीं आह्मी ज्यांचीं त्यांजला विकणार होतों; पन्नासाच्या खताचे पांच रुपये घेतले तरी हव्वे तितके रुपये जमतील. त्यांचेंही काम झालें असतें, आपलेंही काम झालें असतें. याकरितां मावशीबाई मी तुमच्या पायां पडतों माझें नांव बाबांला नका सांगूं. "

"नाहीं सांगत; पण मला काय देशील? "

"मी आतां काय देऊं बरें? रुमाल सांपडते तर कांहीं खतें विकून दिलें असतें, पण आतां मी काय देऊं बरें? रुमालं नाहींसे कसे झाले त्याचा मलाही चमत्कार वाटतो. मी ते संध्याकाळीं तेथें पाहिले होते, परंतु रात्रीं पहातों तों ते तेथें नाहींत. "

"तूं कांहींही कर, मी तुजपासून तरी दोनशें रुपये घेतल्याशिवाय सोडणार नाहीं. दोनशेंचा निदान ऐवज तरी मला पाहिजे. "

दोनशें रुपये कसे मिळवावे त्याची युक्ति तिनें त्याला सांगितली, व ह्मणाली कीं तूं मला कांहीं द्यायला केलें आहेस हें आपल्या साक्ष्यांजवळ बोलूं

नको, नाहीं तर ते तुझ्या आह्मांला कांहीं आण ह्मणून पाठीस लागतील. त्यांना तूं माझा अमाच निरोप सांग कीं त्यांनीं मला दोनशें रुपये दिल्यावांचून मी ऐकणार नाहीं; नाहीं तर त्यांचीं नांवें मी थेट मामलेदाराजवळ सांगेन.

पुन्हां रुमालांविषयीं गोष्ट काढून विष्णु ह्मणाला, "मावशीबाई, रुमालांचें राहून राहून मला आश्चर्य वाटतें. ते नाहींसे कसे व्हावे तें मला समजत नाहीं. तुमचा कांहीं तर्क चालल्यास मला सांगा. ह्या गुलामांनीं माझ्या आधींच कोणाला पाठवून रुमाल नेले नसतीलना? त्यांना जसा माझा संशय येतो, तसा मलाही त्यांचा संशय येतो. मी काल घरांतून निघून आलों आहें. रुमाल घरांतले जर का खरोखरच नाहींसे झाले असले, तर घरीं परत जाणें थोडेसें विचाराचें आहे. याकरितां तुह्मी आमच्या घरीं जा, आणि कसें काय झालें याची चौकशी काढून आणा. तुह्मीं सांगितल्याप्रमाणें मीं तुमचा ऐवज देतों."

मावशीबाईनें ती गोष्ट कबूल केली; नंतर तीं दोघे निरनिराळ्या वाटांनीं निघालीं. चांगलें उजाडतांच मावशीबाई विठ्ठलपंताचे दारीं हजर.

मावशीबाईची ह्या घरीं चांगली ओळख होती. लक्ष्महि तिला ओळखीत असे. ही तिची ओळख रेवगांवांतच पडलेली; चंदनच्या वाटेवर मावशीबाई भेटल्याची तिला आठवणसुद्धां नव्हती.

"सकाळींच कोणीकडे आज आपली स्वारी वाट चुकली?" काशीबाईनें तिला विचारलें.

"वाट कशाची मी मुद्दामच आलें ती."

काशीबाईचें व ह्या बाईचें बोलणें चाललें होतें त्या जाग्यापासून लक्ष्मी कांहीं फारशी दूर नव्हती. तिजकडे पाहून मावशीबाई ह्मणते:—"तुम्हांला बाई काम करणारी वस्ताद सून मी आणून दिली, म्हणून कांहीं तिजवरच नको सगळें काम टाकायला."

"सगळें काम केलन् ह्मणून झालें आहे काय त्या रेड्याला? भल्ती चांगली अशीच गोंड्याला लावीन तेव्हांच तिचीं हाडें मोकळीं होतील नी वठणिवर येईल."

"असें काय ताई तुमचें तिनें केलन् तरी?" त्या बाईनें विचारलें.

"अहो काय ह्मणजे? परवां सगळे दागिने काढून घेऊन माहेरीं पाठवली नी जुन्या साड्या बरोबर दिल्या ह्मणून तिच्या आईनें त्याच जुन्या साड्या आमच्या आमच्याकडे तिजबराबर पाठवून दिल्या. दोन नव्या साड्या घेऊन पाठविती तर त्यांच्या लेंकीलाच झाल्या असत्या. आतां जेव्हां तिच्या कार्टीला अशी झाजरीन तेव्हां सर्व सुख तिला कळेल."

आपल्याविषयीं काय बोलणें चाललें आहे तें ऐकण्याविषयीं लक्ष्मी उत्सुक झाली; व मावशीबाईचा तर हाच उद्देश होता असें दिसतें. लक्ष्मीच्या झाजरण्याबद्दल तिला यत्किंचित्ही काळजी नसावी. ती बाई आतां बोलूं लागली:—"हो; मी ज्या कामाला आलें तें काम एकीकडेसच राहिलें. आज रात्रीं बाई,—कायग ए लक्ष्मी, तूं काय ऐकतेस? अगदीं कांहीं सासूच्या ढुंगणा भोंवतीं भोंवती नको असायला सा-

सूची लाडकी झालीस तरी. कायग बाई आतांच्या काळच्या पोरी तरी आज रात्रीं कीं नाहीं ताई,—"

रात्रीं झालेला प्रकार लक्ष्मीच्या मनांत एकसारखा घोळत होता, व आपण कलल कृत्य कोणाला कळल तर नसेलना, म्हणून तिचें मन तिला डंवचीत होतें. मावशीबाईचें वरील बोलणें ऐकून लक्ष्मीची पांचावर धारण बसली. तिचें तोंड काळें ठिक्कर पडलें. मावशीबाई तिच्याकडे संशयी मुद्रा करून पाहून म्हणते:-

" काय बाई चोरी करण्याची तऱ्हा तरी ! "

" काय बाई चोरीचें झालें तरी काय ? " काशीबाईनें विचारलें, "आमच्या घरच्या चोरीचें तुम्हांला कसें कळलें ? अजून आम्हीं कोणाजवळ बोललों सुद्धां नाहीं !"

लक्ष्मीची मुद्रा कावरीबावरी झाली. मावशीबाई तिजकडे पाहत पाहत काशीबाईच्या कानांत हळुहळु कांहीं सांगते; त्या तिच्या सांगण्यांत फक्त 'लक्ष्मी' व 'विष्णु' हे शब्द तिच्या कानावर येतात ! आणि जेव्हां जेव्हां मावशीबाई तिजकडे पाहत असे, तेव्हां तेव्हां काशीबाईही तिजकडे पाही.

लक्ष्मी तर काळवंडूनच गेली. तिच्या मनाची स्थिति काय झाली असावी बरें ? काशीबाई मोठ्यानें बोलूं लागते:—" खरेंच सांगूंका मावशीबाई—"

"हळुहळु !" मावशीबाई तिला ओरडून म्हणाली, व मग काशीबाई तिच्या कानांत सांगूं लागली:—

" आमच्या घरींसुद्धां तोच प्रसंग आला होता, पण नारायणानें वाजू संभाळली म्हणून बरें झालें. "

"खरेंच का ताई !" मावशीबाई लक्ष्मीकडे पाहू-

न व पुढचे दोनच शब्द तिला ऐकूं जाण्यासारखे मोठ्यानें उच्चारून काशीबाईच्या कानांत म्हणेतः— "तुमच्यावर सुद्धां का असा प्रसंग आला होता ! खरेंच बाई पण त्या 'लक्ष्मी' कांत 'विष्णूची' कृपाच झटली पाहिजे. तुमचा कोण कोण जाणें, पण आमचा कुळस्वामीच तो, त्याच्या कृपेवांचून सर्व व्यर्थ आहे. बरें झालें बाई कांहीं गेलें आलें नाहीं! असे कितीसे चोर आले होते ? हळु बोला."

"किती बाई आले होते कोण जाणें; पण त्यांना झोंप लागली होती तिथे आंगाला एकाचा पाय लागला. त्या मेल्यांना त्या खोलींत शिरून काय न्यायचें होतें हरी जाणे, पण खतांचे रुमालच जर असतील, तर ते कांहीं त्यांना सांपडले नाहींत. रुमाल बाई मोठ्या चमत्कारानें घरांत कसे आले त्याचेंच आह्मांला मोठें नवल वाटतें."

"खतांचे रुमाल. धाडसच कठीण !" मावशीबाई लक्ष्मीकडे पाहून मोठ्यानें ह्मणते, जसें कांहीं काशीबाईनें विचारलेल्या प्रश्नाचें तिनें हें उत्तर दिलें.

"धाडस कठीण तर खरेंच." काशीबाई मोठ्यानें बोलूं लागली; तिला मावशीबाई ह्मणाली "हळू हळू."

नंतर ती मावशीबाई काशीबाईला कानांत विचारते, "आतां बाई तुह्मी ह्याची तजवीज करणार का ?" तिला काशीबाई हळूच उत्तर देते. "तजवीज करायला तिकडे कुठे फावतें आहे ? सकाळींच उठून कामावर जाणें झालें. म्हणाले कीं आमचें कांहीं गेले नाहीं नी आलें नाहीं, मग उगाच पदरची भाकरी खाऊन सरकारांत खेपा घालीत कोण

बसतो ? पोर निघून गेला त्याची काळजी एक मला लागली आहेच. ”

“ अहो तो रात्रीं बहिरोबाच्या देवळांत निजला होता. ” मावशीबाई तिला हळूच म्हणाली. “ तुम्ही त्याची काळजी करूं नका, झकत परत येईल. मी सुद्धां ताई तर कांहीं खटपट करीत नाहीं. मेल्यांनीं फकस्त माझें दार उपटलें. बरें, आंत आले असते तरी त्यांना काय सांपडलें असतें ? चुलीचे तीन धोंडे ! माझ्याजवळ आहे काय ? आतां तुम्ही असें करा:— मी ही गोष्ट कोणाजवळ बोलत नाहीं, तुम्हीही बोलूं नका. विष्णूला माहित नाहीं तर त्याजवळसुद्धां बोलण्याचें काम नाहीं. बाहेर माव फिर्याद करतोंन् हें करतोंन् तें करतोंन् असा बोभाटा करून द्या, म्हणजे चोर पुन्हां यायचे नाहींत.

काशीबाईनें ती गोष्ट पत्करिली, व मावशीबाई लक्ष्मीकडे डोळे खोंचून पहात पहात घराबाहेर आली. आणि तेथून ओरडून काशीबाईला म्हणाली, “ मी असें सांगितलें म्हणून कुणाला ओळख देऊं नका हं; ” आणि ती निघून गेली.

चिट्ठीपासून साद्यंत मजकूर मनांत उभा राहून लक्ष्मीच्या जिवाला एकसारखी कातर लागून राहिली होती.

जेवणाच्या वेळेवर विष्णुपंताची स्वारी घरीं आली. त्यास मावशीबाईनें काय उपदेश करावयाचा तो करून आणखी त्याच्या साथ्यांस सांगण्याकरितां म्हणून हा निरोप सांगितला कीं, “ विष्ठलपंत मामलेदारांचे कानावर हा चोरीचा मजकूर घालण्याकरितां

गेले होते. तुमची मुटका होणें कठीण आहे. परंतु जर मी सांगितल्याप्रमाणें ऐवज पटवून द्याल, तर मी तुमची अब्रू राखण्याची खटपट करीन. ”

भाग चवदावा.

सर्व गोष्टी आपल्या ओघाओघानें व्हावयाच्याच. सृष्टींचें रहाटगाडगें जें अपरंपार. काळापासून चाललें आहे, त्याला खळ म्हणून कधीं मिळावयाचीं नाहीं. सर्व गोष्टी तशी त्यांची वेळ आली म्हणजे त्या व्हावयाच्याच. जीं मुलें आज दोन तीन वर्षांमागें जन्मलेलीं म्हणून आपण म्हणत होतों, तीं आज चांगलीं बोलतीं चालतीं होऊन आपल्या जननींच्या मागूनं आई आई म्हणून धांवूं लागलीं आहेत. अशीच स्थिति चांगली किंवा वाईट हरएक बाबतींत दिसून येते, त्यांत शिताफी कोणाचीही नाहीं किंवा दोषही कोणाचा नाहीं; परंतु एकादे वेळीं अमा प्रसंग येतो कीं जी गोष्ट इतर प्रसंगीं झाली असतां फार सुखदायक व आनंदकारक होते, तीच कांहीं विकट प्रसंगीं घडून आल्यास तिच्यापासून सुख प्राप्त न होतां उलट दुःख मात्र होतें.

लक्ष्मीचे हे दिवस ऐन संकटाचे, तसेच ते ऐन उमेदीचे होते. काळजीनें तिचें मन ग्रस्त झालें असतां ही गोष्ट अशी व्हावी काय? परंतु सृष्टिक्रमाला कोणाचा उपाय आहे? दुर्दैवाची करणी ती, तिला अशा वेळीं ऋतु प्राप्त झाला.

तिचे माहेरीं जाण्याचे दिवस भरले होते, परंतु एकाएकीं हा सोहळा सासरीं घडून आल्याचा प्रसंग

आल्यामुळें माहेरचीं माणसें सासरींच येतील असा योगायोग आला होता.

सासूसासऱ्यास चालीप्रमाणें आनंद झाला असेल, परंतु लक्ष्मीला स्वतांला ही गोष्ट विषतुल्य वाटली. तिच्यावर तसाच प्रसंग आला होता. अशा प्रसंगीं सुखाविषयींचा विचार तिच्या मनाला शिवलासुद्धां नाहीं. तिला आधीं चिठ्ठी पाठविणारें कोण तें कळेना. पुन्हा तिनें रुमाल जाऊन आणण्याचें जें धाडस केलें तें तिला आठवून अशी गोष्ट करण्यास आपल्याला धीर तरी कसा आला असावा, म्हणून तिचें तिला कसलेंसेंच वाटे. ज्या कोणीं आपणाला चोरून चिठ्ठी पाठविली, त्यानेंच तें आपलें कृत्य चोरून बसून पाहिलें नसेलना ? बरें, हा सगळ्या गोष्टींकडे जरी दुर्लक्ष्य केलें, तरी उजाडतांच मावशीबाई येऊन सासूबाईशीं कानगोष्टी करूं लागली हें काय ! मावशीबाई रात्रीच्या गोष्टीविषयीं तर निःसंशय बोलत होती; तिनें आपलीं दोघांचीं नांवें तर निःसंशय घेतलीं; त्या दोघी बोलत असतांना आपल्याकडे निःसंशय पाहत होत्या; तर मग आपल्या रात्रीच्या कृत्याविषयीं त्यांच्या कानगोष्टी चालल्या होत्या यांत शंकाच नाहीं ! रात्रीच्या चोरींत मीसुद्धां सामील आहें असें झालें नसेल कशावरून ? रात्रीं घरांत अंधेरांतून मीच वावरत होतें; मीच सासूबाईंना उठविलें; मलाच आतां कोणी तूं असें असें केलेंस म्हणून बजावील. अमा जर लक्ष्मीच्या मनाला भुंगा लागून राहिला होता, तर तिला असले घातकी सुखसोहळे कसे आठवतील ?

चाल्लीप्रमाणें चंदनास साखरपुंडा गेला होता, व करंजीकरांस सोहळ्यानिमित्त निमंत्रणही झालें होतें. काशीबाईनें आपल्या लेंकीच्या घरींही बोलावूं पाठविलें होतें, परंतु तिला सासरच्यांनीं पाठविलें नाहीं.

रमाबाईच्याच फारफार आग्रहा वरून प्रसंग साजरा करण्याकरितां वासुदेवपंतांनीं तिची रवानगी करून दिली. कारण ती तर मी ऑपल्या लेंकीचा सोहळा केव्हां पाहीन म्हणून हापापली होती. जुन्या साड्याविषयीं जो मागें बोभाटा झाला होता, तो होण्याचा रमाबाईनें आपणाकडून प्रसंग आणला नसता; परंतु जेव्हां वासुदेवपंतांनीं मुलीला सगळे दागिने हिसकावून घेऊन व बराबर चिंध्या देऊन पाठविलेली पाहिली, तेव्हां त्यांनीं मुद्दामच तिला आली तशी परत पाठवून दिली.

गर्भाधानाच्या दिवसांपर्यंत जे दिवस गेले, त्या दिवसांत काळजी लागण्यासारखें लक्ष्मीला कांहीं नवीन कळून आलें नाहीं. मावशीबाईचें काशीबाईशीं जें खलबत झालें होतें, त्या खलबताविषयीं लक्ष्मीच्या मनाची अशी समजूत होऊन होती गेली कीं, सध्यांचे चार दिवस म्हणून काशीबाई आपला राग बाहेर दाखवीत नाहीं, परंतु ती आंतून फार जळत असेल. त्या दिवसांत विष्णुपंतांच्या कृतीकडे लक्ष्मीचें लक्ष्य विशेष जाऊं लागलें हें स्वाभाविकच आहे. तिच्या लक्ष्यांत येऊन चुकलें कीं, अद्यापसुद्धां विष्णुपंताची स्वारी रात्रीं घरीं निजण्याचें निमित्त करून जिकडे तिकडे सामसूम झालें कीं उठून चालती होते. असो. तो ने

मलेला मुहूर्ताचा दिवस आला; व त्या सोहळ्यासंबंधीं घरांत जिकडे तिकडे उपाध्येबुवांची आणि घरच्या माणसांची, त्यांत विशेषतःरमाबाईची धांदल सुरू झाली.

तों इतक्यांत हळदीकुंकवास वगैरे येणाऱ्या बायका बोलूं लागल्याकीं रावीं कुळकर्ण्याचे घरावर दरोडा आला होता! ही गोष्ट ऐकून तर लक्ष्मीला कांहीं सुचेनासें झालें. आपले पतिराज तर त्यांत नसतील म्हणून तिचें मन खाऊं लागलें. तिनें आपल्या मनाची येवढ्याशा संशयावरून लागलीच इतकी कल्पना करावयास नको म्हणून समजूत केली, पण कांहीं केल्या ती समजूत होईचना!

सायंकाळपावेतों तिच्या कानावर मजकूर आला तो असाः—कुळकर्ण्याचे घरांत दोन चार चोर शिरून बायकांचे आंगावरील दागिने काढावयास पहात होते, परंतु त्यांतील एक बायको जागी होऊन तिनें ओरड केली व चोरांची ती मसलत फसली. घराचे मागचे बाजूस तिकडून कोणी आल्यास आपल्या साथ्यांस बातमी देण्याकरितां म्हणून एक चोर उभा होता, त्याला ही आंत झालेली ओरड ऐकूं गेली नाहीं, म्हणून तो तसाच तेथें उभा राहिला. इतक्यांत कुळकर्ण्याचा गडी येऊन त्यानें त्याच्या पायावर असा एक धोंडा घातला कीं बहुतकरून त्याचा पायच मोडला असावा. थोडक्यांत चुकलें नाहीं तर तो चोर तेथेंच पडून सांपडला असता. पुढें लक्ष्मीला असेंही कळलें कीं कुळकर्ण्यानें ही चोरीची सर्व हकीगत सरकारास कळविण्याचा बेत केला आहे.

विष्णूचा संशय घेण्यास इतरांस कांहीं कारण नव्हतें, परंतु लक्ष्मीला तमा अंदेशा असल्यामुळें तिचें चित्त त्याच्या पायांकडे गेलें, तों एका पायावर तिला एक काळा चट्टा दिसला. विष्णुपंत तो चट्टा दडविण्यास जपत असतात हेंही तिच्या लक्ष्यांत येऊन चुकलें, व तिचा सर्व संशय फिटला.

रात्र झाली. आणि लक्ष्मीची थट्टा करण्याला मुलींनीं आरंभ केला. जो तिच्या मैत्रिणींचा विनोद तिचें मन स्वस्थ असतांना तिला चांगला रुचला असता, तो तिला अशा मनाच्या स्थितीमध्यें मुळींच खपला नाहीं;तरी तिनें बाहेर कांहीं एक दाखविलें नाहीं. भर्त्यासंनिध प्रवेश करविते वेळीं स्त्रीजातीप्रमाणें लज्जेस्तव लक्ष्मीनें पुष्कळ आढेवेढे घेतले हें स्वाभाविकच आहे. पुष्कळ ओढाताण करून एकदांचा तिच्या समवयस्क सख्यांनीं तिजकरवीं अंतर्गृहांत प्रवेश कराविला; आणि लक्ष्मी आंत जाऊन पाहते तंव पतिराज खुशाल तोंडावरून शाल घेऊन यथेच्छ पहुडले आहेत.

ती जाऊन एका कोंपऱ्यांत उभी राहिली. तिचें सर्वांग थरथर कांपत होते. आंगावर रोमांच उठले. तनु एथून तेथून घामानें डवडवून गेली. उभें राहण्यास पाय अवसान देईनात. पण हें सर्व कां? तर आज आपली एका दरोडेखोर रामोशाशीं गांठ आहे ही कल्पना तिच्या मनांतील कांहीं केल्या जाईना! सख्यांनीं उपदेशिल्याप्रमाणें वर्तन करण्यास ती आपलें मन दृढ करीत होती, परंतु भीतीनेंच तिच्या मनाला ग्रासून टाकलें.

पळें गेलीं, घटका गेल्या, याम गेले, मध्यान्ह उलटून जाऊन दोनएक वाजण्याचा सुमार झाला, खोलींत दिवा टिकटिक जळतो आहे, लक्ष्मीबाई वर सांगितल्याप्रमाणें एका कोंपऱ्यांत उभ्या आहेत, आणि विष्णुपंतअण्णा डोळ्यांवरून पांघरून घेऊन गुपचुप निजले आहेत. ते खचित जागे आहेत; त्यांचे मधून मधून मोठमोठाले सुस्कारे चालले आहेत; ते पांघरुण्याच्या आंतून आपला दुखावलेला पाय हळुहळु चेंपीत आहेत.

"उभें राहून राहून पायांला तर कळ लागून गेली ! आपण आतां येथेंच कोंपऱ्यांत मुरकुंडी मारावी काय ? काढलें,—त्यांनीं आपल्या तोंडावरचें पांघरुण काढलें ! त्यांची स्वारी बिछान्यावर उठून बसली !"

आपल्याला झोंप लागली होती, व आपण अद्यापि झोंपेच्याच गुंगींत आहों, असा बहाणा करून विष्णुपंत खालीं मान घालून पाव घटका स्वस्थ बसले, आणि नंतर त्यांनीं डोळे वर करून लक्ष्मीकडे पाहिलें. तिजकडे त्यांनीं कांहीं पळें टक लाविली.

"भांचोद !" विष्णुपंत ओरडले. लक्ष्मी गर्भगलित झाली. "बाबांच्या रुमालांला हात कोणीं लावला होता ?" विष्णुपंतांनीं विचारलें. लक्ष्मीचें तर भानच नाहींसें झालें.

विष्णुपंतांनीं राहून राहून हा प्रश्न तीन वेळ केला. लक्ष्मीचें उत्तर नाहीं.

"हा कारभार कोणीं सांगितला होता ?" विष्णुपंतांचा दुसरा प्रश्न आला. त्याचीही दोन तीन

वेळ उजळणी झाली. त्यांच्या रागाचें मान तर फार चढत चाललें. लक्ष्मीचें उत्तर नाहीं.

" ह्मणूनच आज आह्मांला तुरुंगांत जाण्याची पाळी येणार. अशी बायकांची बुद्धि असते. "

बायकांच्या बुद्धीवर अशी कोटि झडून विष्णुपंतांची स्वारी कांहीं वेळ थांबली, आणि मग ह्मणाली:—

" व त्याबद्दल त्यांनीं तसेंच प्रायश्चित्त भोगलें पाहिजे. आंगावरचे सर्व दागिने .कादून येथें मजपुढें टाकावे.

लक्ष्मी तर भिंतीवरच्या चित्रासारखी तेथल्या तेथेंच खिळून राहिली; हाल नाहीं चाल नाहीं. तिला पुढचें सर्व धोरण कळून आलें.

" टाक. " विष्णुपंत ह्मणाले.

" टाक. " ते तिला दटावून पुन्हां ह्मणाले.

" टाक. " पुन्हां ते ओरडले. " तीन वेळ टाक ह्मणून सांगितलें आहे. आणखीं एकदा सांगेन नी स्वतां उठून हिसकावून घेईन. टाक. "

आणि विष्णुपंताची स्वारी उठली.

घरचे, लोकांचे दागिने घालून लक्ष्मीला फुलवून काढली होती. कुठचे दागिनेनू कुठचें काय, मला एकदां जीव घेऊन पळूंदे म्हणून लक्ष्मीनें दरवाजाकडे धांव घेतली—दाराची कडी काढली—दार उघडणार, तों विष्णूनें तिच्या वेणीला हात घालून तिला खसादिशीं मागें ओढलें.

तिला मागें ओढून त्यानें तिच्या गळ्यांतील दागिन्यांस मानेशीं ह्मणजे वेणीखालीं हात घातल्या. सरी, पुतळ्यांची माळ वगैरे त्याच्या हातीं लागलीं.

तीं तो तिच्या डोकींतून वर ओढूं लागला. परंतु पुतळ्यांची माळ तिच्या खोंप्यांतील नगांत अडकली, ती वर निघेना ! त्यानें ती सोडून दिली. शेवटीं मुठींत फक्त सरीच राहिली. सरी तिच्या डोकींतून निघेना ! तिचे कान ओरबाडले, कुडुक बाळ्यांचा चेंदामेंदा उडाला, तरी त्या मांगानें ती सरी वर ओढून काढली.

इतक्यांत लक्ष्मी त्याचे हातून निसटून घाईघाईनें दार उघडून सटकण बाहेर पडली. तिला बाहेर गेलेली पाहून या राजश्रीनीं पोबारा केले.

भाग पंधरावा.

अद्यूही कोणाला नको आहे काय ? लक्ष्मी जाऊन आतां बाहेर ओरड करील, सर्व माणसांस जागें करील, म्हणूनचना विष्णु पळाला ? परंतु लक्ष्मीला अद्यूची भीती थोडी होती काय ? खोलींतून त्या काळाचे हातून निसटल्याबराबर तिनें घरांत धांव घेऊन जिकडे तिकडे बोभाट केला नाहीं. दिवसाच्या धांगडधिंग्यानें घरांतील सर्व मनुष्यें गाढ निजली होतीं तीं ह्या दादलाचायकोच्या गडबडीनें जागीं झालीं नाहींत. खोलीच्या दारांतून बाहेर पडल्याबराबर एकें आंगाम सरून ती काळोखांत लपून बसली, व विष्णुपंताची स्वारी पार निघून गेली असें पाहून तिनें पुन्हां खोलींत शिरून दाराला आंतून कडी लावून घेतली.

तिचे कान ओरबाडून रक्तबंबाळ होऊन गेले होते. तरी त्याचें तिला फारसें वाटलें नाहीं; परंतु तिनें दिव्याशीं जाऊन कानांतील दागिने काढून तपासून

पाहिले. ते चेपटून जाऊन वेडेवांकडे झाले होते, ते तिनें सरळ केले. परंतु भोंकरापैकीं दोन चार मोत्यें पडलीं आहेत हें पाहून तर तिच्या तोंडचें पाणी पळालें ! तीं मोत्यें खोलींतच कोणीकडे उडालीं असतील म्हणून तिनें दिवा घेऊन बाकी राहिलेली रात्र सारी खोली धुंडाळली, परंतु तिला तीं सांपडलीं नाहींत.

रात्रीचा प्रकार कोणासच माहित झाला नसल्या कारणानें उजाडल्याबरोबर भेटेल ती बायको लक्ष्मीची थट्टा करण्यास तयार ! तिनें आपल्या कानांवरून पदर घेतला होता, परंतु तिच्या मैत्रिणींनीं, " कां, डोळेबिळे तर अगदीं लाल होऊन गेले आहेत; रात्रीं जागरण थोडेंच कां नाहीं केलें. " इत्यादि शब्दांनीं मनमानेल तशी तिची थट्टा आरंभिली. लक्ष्मी आपली रडकथा सांगत बसली नाहीं. त्यांच्या थट्टेस मान देऊन तिला लाजावें लागलें, तिला गालांतल्या गालांत हसावें लागलें, तिला खालीं मान घालून निरुत्तर व्हावें लागलें, जशा कांहीं तिच्या सख्यांनीं विचारलेल्या गोष्टी खरोखर रात्रीं घडून आल्या; त्यांतील एकही गोष्ट तिच्यानें नाकारवत नाहीं.

पुढें लक्ष्मीची व तिच्या आईची एके आंगास गांठ पडली, आणि तिनेंही तिला विनोदानें कांहीं म्हटलें. तेव्हां तर वेणूला रडेंच कोसळलें; तें कांहीं केल्यानें तिला आवरेना !

" अग हेंग काय पोरी ! " रमाबाई म्हणाली, " अशी सणासुदीची कां ती रडतीस ! " व असें

बोलत ती आपल्या पदरानें तिचे अश्रु पुसूं लागली, तों तिची दृष्टि तिच्या कानाकडे गेली !

" हें कुठे लागलें ? कसें लागलें ? कान कशानें ओरबाडले ? हे इतके सुजले कशानें ? " अशाप्रकारचे हजारएक प्रश्न रमाबाईनें वेणूला विचारले असतील, परंतु तिचें एक रडण्यावांचून दुसरें उत्तर नाहीं ! " आणखीं कुठे कांहीं लागलें आहे का ? तुला रात्रीं खोलींत—कोणीं बोचकारली का ? खोलींत—कोणीं मारली का ? खोलींत—कोणीं चावलें का ? " अशाही रमाबाईनें नानाप्रकारच्या शंका घेऊन तिला विचारलें, परंतु वेणूचें उत्तर नाहीं तें नाहींच.

रमाबाई तिच्यावर फारच संतापली, तेव्हां वेणू ह्मणाली, " सरी गेली ! " त्यावरही रमाबाई तिला " कुठें गेली ? कशी गेली ? " ह्मणून नानाप्रकारीं विचारूं लागली. शेवटीं वेणूनें त्रासून ह्मटलें, " आई, आतां त्याची विचारपूस करून काय होतें ? गेली खरी. ती कशी गेली हें माझ्यानें सांगवत नाहीं नी तूं विचारूंही नको. सरीची आशा तर सोडून दिलीच आहे. आतां तूं एवढेंच सांग कीं आलेला प्रसंग निभवावा कसा; कारण कसल्या प्रकारच्या माणसांशीं गांठ आहे हें तुला ठाऊक आहेच".

सरशेवट रमाबाईनें तिला स्पष्ट विचारलें, " तुझ्या नवऱ्यानें का तुजजवळ सरी मागितली नी तूं देईनास ह्मणून त्यानें तुला मारलें ? सांग काय तें. काय प्रकार आहे तो खराखरा सांग, मी त्याचें निवारण करतें." रमाबाईनें अतीच आग्रह केला, व

आईला सांगितल्यावांचून तर गत्यंतरच नाहीं असें वेणूनें पाहून तिनें रात्रीचा प्रकार सांगितला व ती " सरी नी मोत्यें गेलीं, सासूबाईंच्या कानांवर गेलें तर कठीण प्रसंग आहे, " म्हणून घळांघळां रडूं लागली.

मग रमाबाईच ती ! तिचा राग पोटांत मावेना ! ती काशीबाईवर तरवार उपसावयास चालली ! वेणूनें तिचे पाय घट्ट धरून तिला पुढें जाऊं दिलें नाहीं. ती रडत रडत तिला म्हणाली, "आई, तूं मला एवढी तरी भिक्षा घाल. तूंच उलटा कांहीं उपाय सांगावास, ती तूंच का प्रथम आग लावून देणार ? "

" ही माझी सरी नी तुझी सरी अगदीं एकसारख्या होत्या नवे? " रमाबाई म्हणाली, " घे तर ही. पुढें पाहून घेतां येईल कसा काय तमाशा होतो तो." असें रमाबाईनें म्हणून आपली सरी तिच्या पुढें टाकली. " पण मोत्यांचें काय करावें बरें ? तीं आतां सोधावीं तरी कुठें ? नवीं घ्यावींत तर तीं मिळतात कशीं आणि भोंकरांना लागतात कशीं ! "

असें जों रमाबाई वेणूला म्हणते आहे, तों घरांत मोत्यांचा बोभाटा झाला. " हीं दोन मोत्यें येथें पडलीं कोठून ? " म्हणून काशीबाई जिकडे तिकडे विचारूं लागली. सासुबाई इकडेच येत आहेत असें पाहून लक्ष्मी सरी घालून पुढें झाली. तिला काशीबाईनें विचारलें तेव्हां तीं माझ्याच भोंकरांचीं म्हणून तिला सांगणें भाग पडलें. तपासून पाहतां भोंकरांस आणखी दोन मोत्यांचा तोटा येतो असे ठरलें.

तीं घरांत सांपडेनात, तेव्हां काशीबाईला आज आपली सर्वस्वी हानि झाली असें वाटून तिला मरणप्राय दुःख झालें. तिनें रागानें मोठेमोठे डोळे करून लक्ष्मीकडे पहावें, व विहिणीकडे पाहून आंवडा गिळावा. " बाकीचे दागिने तरी सगळे जिवंत आहेत का ? कां त्यांतलेही लागले आहेत एक एक वाटेला ?" असे काशीबाईनें वेणूला विचारलें.

हे काशीबाईचे शब्द रमाबाईच्या काळजाला झोंबले. तिचा क्रोधाग्नि लग्नापासून धुमसत होताच. त्याला मधून मधून बऱ्याच झुळका लागल्या हात्या. हल्लीं चाललेल्या सोहळ्यांत तिच्या हौशीसारखें कांहींच होत नव्हतें-म्हणून तिनें वेणूला द्यावयास आणलेले दागिनेसुद्धां सर्वांदेखत पुढें नकरतां मुकाट्यानीं वेणूच्या हवालीं करून ठेविले होते-यामुळें तो क्रोधाग्नि चाळवला होताच, आणि आतां ह्या काशीबाईच्या शब्दांचा झपाटा लागतांच तो भडकला.

"वेणे, टाक सगळे त्यांचे दागिने काढून," रमाबाई ओरडून म्हणते, " नी पुन्हां घातलेस तर खबरदार. एकदा त्यांनीं खोड मोडली आहे त्याची लाज नाहीं तुला कार्टे वाटत ? " असें तोंडानें बोलत बोलत रमाबाईनें आपणच होऊन वेणूच्या आंगावरचे दागिने भराभरा ओरपले आणि काशीबाईच्या आंगावर फेंकून दिले, व तोंडानें बोलते:-" पोरीचा एकएक कान सुजून वड्याएवढा झाला आहे नी येथें चाल ल्या आहेत मोत्यांच्या चौकशा ! " वेणूची आई ला दात्रतां दाबतां पुरेवाट झाली. काशीबाईनेंही तोंड

देण्यास कमी केलें नाहीं. "द्या फेंकून; आह्मी गरीबच आहों—आह्मीं आपल्या भरतों. आमच्या घरीं दरमाहा नाहीं झडत!" असें बोलत बोलत तिनें ते सर्व दागिने भरले.

विष्णुपंत रात्रीं आपल्या खोलींतून पळाले हें सांगितलेंच, त्यांनीं आपली सरीची जी घट्ट मूठ धरली होती, ती खोलीच्या बाहेर आल्यावर सैल केली; व त्या वेळेसच त्या हातांत आलेलीं मोतें आणि त्यांबरोबर लक्ष्मीच्या मानेवरील उपटून आलेले केश खालीं पडले. विष्णु तेथून तडख निघाला तो मारुतीच्या देवळांत मावशीकडे आला, आणि तिला उठवून त्यानें ती सरी तिच्या हवालीं केली. मावशीबाईनें ही सरी तुला कोठून मिळाली ह्मणून विचारलें नाहीं.

"आतां मात्र तुझें नांव मी तुझ्या बाबांना सांगणार नाहीं." मावशीबाई त्याला ह्मणाली. "पण तुझ्या सोबत्यांनीं मला कांहीं अजून आणून दिलें नाहीं, याकरतां मी त्यांचीं नांवें मामलेदारांच्या कानावर घालणार."

"हें काय बरें मावशीबाई!" विष्णु तिचें आर्जव करून ह्मणतो, त्यांचीं नांवें तुह्मीं सांगितल्यावर मग माझें नांव पुढें यायला राहील का?"

"तें कांहीं मला ठाऊक नाहीं. मला त्यांनीं कांहीं दिलें नाहीं तर मी काय करावें? कालचीही चोरी मी बाहेर फोडीन."

"आमच्या कटामध्यें आडवीं तुह्मांला घेतल्याचा हाच का आह्मांला फायदा? तुमचा आमचा पहिला ठराव कीं—" क चंदना.

" जळूंदेरे तो ठराव ! " मावशीबाई त्याला ओरडून ह्मणते. " आतां ह्या सोनाराच्या घरांत कोणीं नाहीं ह्मणून आह्मांला मोठ्यांनीं बोलायला हरकत नाहीं. " असें ह्मणते पण ती हळू बोलूं लागते, " तो ठराव राहूं दे. तुह्मीं दोन चोऱ्या केल्यात, मला कांहीं तुमच्यापासून प्राप्ति झाली का ? "

"अहो पण मावशीबाई, मागच्या आमच्या घरच्या चोरीची हकीगत तुह्मांला माहित झाली आहेच ती कशाकरतां केली होती ती. आतां कालची जी चोरी, ती तुह्मीं आह्मांला जी धमकावणी दिली होतीत कीं मामलेदाराला जाऊन कळवीन ह्मणून, तिच्या करतां-हें बघितलेंत माझ्या पायाला काय झालें तें, बघा हात लावून. एवढाच कायतो प्रसाद मिळाला."

नंतर विष्णूनें तिचें फार आर्जव केलें व सरी कशी आणली तें त्यानें तिला सांगितलें. मावशीबाईचा शेवटीं त्याला एकंदर उपदेश मिळाला तो असाः— " तूं जर सरी अशी अशी उपटून आणली ह्मणतोस, तर तुला आतां घरीं जातां कामास नये. तुला आजपासून घर वर्ज्य झालें. तुझ्या सोबत्यांचें तर मी नांव बाहेर फोडल्याशिवाय नाहींच रहाणार. वाटेनें मनरावांकडून मामलेदारांस सांगून मी त्यांना चांगली सजा देवविते. "

नंतर विष्णूला सर्व खटपटींतून सोडविण्याकरितां ह्मणून मावशीबाईनें त्याला सांगितलें कीं आतां तूं पहांटेचा याच पायीं लांब हिंदुस्थानांत पळून जा तो पुन्हां घरांत येऊं नको. त्यानें ती गोष्ट कबूल

केली व तो तसाच निघाला. तो निघून गेल्यावर माधवीबाई आपल्याशीं म्हणते, " पिडा गेली. एकदा लांब कोठें गेला म्हणजे मला सरी दिली म्हणून नांव घ्यायचा नाहीं; लोक समजतील का सरी घेऊन पळून गेला. "

इकडे विष्ठलपंताचे घरीं जेवणाची वेळ झाली तरी विष्णूचा पत्ता नाहीं! तो बाहेर केव्हां गेला हेंच कोणाला माहित नाहीं. लक्ष्मीला तर लोकांनीं विचारून विचारून वेडावून सोडली. तिला कोणत्याही प्रकारचें कसलेंहि उत्तर देतां येईना! तोंड कोठें दडवावयास सांपडतें तर बरें झालें असतें असें तिला झालें. त्या तसल्या प्रसंगीं तिला रडण्याचीही चोरी होती!

जेवणार मंडळी तिष्ठत राहिली. विष्णु कोठें सांपडत नाहीं, व तो परतही येत नाहीं असें ठरलें. तेव्हां काशीबाई लाल होऊन रमाबाईचे तोंडावर हे शब्द बोलली:—

" लग्न झाल्यापासून पोराचा पाय म्हणून घरांत नाहीं असला आहे पाय गुण, नी नांव ठेवलें आहे म्हणे लक्ष्मी!

रमाबाईच्या हे शब्द कानीं आले मात्र, आणि तिला वाटलें कीं ह्या काशीबाईला खाऊं का सगळीच गिळूं! तिनें भराभर आपल्या बरोबर आलेल्या माणसांस हांका मारल्या, आणि ती बायको त्या तसल्या उन्हाची लोक आडवे आले तरी त्यांस न जुमानतां कीं पुढें केलेल्या करंड्यांतून कुंकवाचें बोट न लावतां उपाशी बेधडक चंदनाम पार्यांच चालती झाली!

विष्णु नाहींसा झाला, रमाबाईही अशी निघून गेली, तेव्हां त्या दिवसचा गोंधळ कांहीं सांगून पुरवत नाहीं. परंतु लक्ष्मीची अवस्था एखाद्या चोरामारखी झाली. आईनें येऊन आपल्याला सुख द्यावयाचें तें एकीकडेसच राहिलें, परंतु उलटी तिनें आग मात्र लावून सोडली आणि आपण चालती झाली,म्हणून तिला पराकाष्ठेचें दुःख झालें. तो दिवस गेलाच; दुसरे ही एक दोन दिवस गेले. विष्ठल पंतांनीं व काशीबाईनें विष्णूचा शोध ठेवला होता, परंतु त्याचा पत्ता लागला नाहीं. काशीबाईनें तर लक्ष्मीला बोलण्याचा एकमारखा धडाका लाविला. तिचा पायगुण तिनें घटकेंतून तिनदा काढावा; तिच्या आईला व तिला शिव्या द्याव्या; आईमारखीच तूं, चांगली कोठून निपजशील म्हणून तिनें तिला टोमणे मारावे. सर्व निमूटपणें सहन करण्यापरता लक्ष्मीला दुसरा रस्ता नव्हताच. आपलें तोंडसुद्धां कोणाला दाखवूं नये इतकी लज्जा उत्पन्न होऊन तिनें सारा दिवस आपलें तोंड खालींच करून वागावें.

कुळकर्ण्याच्या घरच्या चोरीचा गांवांत गवगवा बराच झाला. विष्ठलपंतही आपल्या घरच्या चोरीची हकीगत लोकांस सांगू लागले. विष्ठलपंतांकडे द्रव्याकरतांच चोर आले असावेत, व कुळकर्ण्याकडेही त्याचकरितां आले होते, म्हणून लोकांनीं असें अनुमान बांधलें कीं कोणी तरी बाहेरचे दरोडेखोर म्हणजे मांग, रामोशी, कातकरी ह्यांच्यासारखे कोठें डोंगरांत येऊन राहिले आहेत,ते रात्रींच्या अ-

शा स्वाऱ्या करतात. अशी समजूत होऊन गेल्या-वर कित्येक गमती व रिकामटवळे "आज आह्मीं अमक्या दरींत वीस रामोशी जेवण करतांना पाहि-ले," "आज संध्याकाळीं एक दोन असामी अम-क्याच्या घराभोंवतीं फिरून टेहळ करतांना माझ्या दृष्टीस पडले," अशा नानाप्रकारच्या वाता झोंकून देऊं लागले. तेव्हां लोकांनीं भिऊन बंदोबस्तीचें काम आरंभिलें. चावडीवर लोक निजावयास पाठवूं लागले. पाटलाच्या घरीं कांहीं गड्यांनीं निजावें असें ठरविलें. गांवांत जवळ कांहीं ओलावा आहे अशीं जीं घरें होतीं, त्या घरींही जागले ठेवून दिले. कोणी आप-ल्या पडक्या भिंती दुरुस्त करूं लागले; कोणीं घ-रावरचीं ओंवणें मजबूत केलीं; आणि कोणीं आपलीं कुंपणें बळकट केलीं.

असा बंदोबस्त गांवांत होता तरी कांहींनीं आपलें द्रव्य पुरून ठेविलें. कित्येकांनीं बायकांच्या व पो-रांबाळांच्या अंगावरचे दागिने बुचाडून कांहीं येथें, कांहीं तेथें, थोडके मडक्यांत, थोडके भांड्यांत, व कांहीं अशा जागीं कीं तेथें ते असल्याविषयीं चोरांचे मनांत शंकासुद्धां येऊं नये, अशा ठिकाणीं ठेविले; आणि कित्येकांनीं तर सोय नसली तरी ती मुद्दाम करून दागिन्यांसुद्धां बायकामुलें परगांवीं पाठविलीं, "व ह्यारे आतां मादरचोदानों आमचें काय घेतां तें," असें म्हणत बसले. असा कडेकोट बंदोबस्त होता तरी रात्र आली कीं सर्वांची पांचावर धारण बसत असे. काळोखी रात्र म्हणजे त्यांना राक्ष-शिणीप्रमाणें खावयास उठे. घराच्या आसपास ज-

रा कोठें खुमबुमलें कीं घरांतील माणसांची गाळण उडत असे. त्यांनीं खांकरून खांकरून, काठचा जमिनीवर आपटून व हिकडेतिकडे दिवे नाचवून आह्मी सर्व सावध आहों असें दाखवावें. गांवांत पाचसात घरीं कुत्रीं होतीं, त्यांतून एखादें ओरडूं लागलें कीं दूरदूरच्या घरवाल्यांनीं त्याला कुत्रा कां भोंकतो ह्मणून आरोळी ठोंकून विचारावें. गांवांत अशा प्रकारची आरोळाआरोळी सुरू झाली ह्मणजे ती चार चार घटका थांबत नसे. घरें लांब लांब असल्यामुळें दुसऱ्या घरीं कोण कसली आरोळी मारतो हें कळलें नाहीं, म्हणजे एकानें विचारावें, "कायरे राघू, आरोळी कसली हये !" ह्मणजे राघूनें आरोळी मारून सांगावें कीं, "गणवा भोंसल्या विठ्याला विचारतो कीं सदूला म्हणाव भिवाजीला विचार गवळ्याच्या घरीं कुत्रा कां ओरडतो !" रात्रीं गुरें गाताडीवर शिंगें वगरे आपटतात, व बसता उठताना धडपड करतात, त्या मुळें भय वाटतें ह्मणून घरांतून गुरें काढून त्यांनीं त्यांस लांब बांधण्याची सोय केली. विठ्ठलपंताचे घरींही अशाप्रकारचा बंदोबस्त ठेवण्यांत आला होता.

लक्ष्मीच्या मनाला ही एक टोंचणी होतीच. विष्णुपंत कोणच्या नादाला लागले आहेत ह्याची ति. ला त्यांनीं सरी उपटली त्या रात्रीच्या प्रसंगावरून बिलकुल शंका राहिली नव्हती. रुमाल्यांच्या चोरींत आपण होतों हें त्यांचें त्यांनींच तिजपाशीं कबूल केलें, व कुळकर्ण्याच्या घरच्या चोरींत ही हे होते अशाविषयीं त्यांच्या पायावरच तिला पुरावा मिळाला; तेव्हां आतां विष्णुपंतांचा रोजगार काय

आहे तो तिला कळून आला. घरांत आईचा धाक असतांना जर असलीं कृत्यें त्यांच्या हातून घडून येत होती, तर आतां धडधडीत बाहेर पडल्यावर ते काय करतील याचा सुमार नाहीं. सरीला सरी मिळून तिजबद्दल घरांतल्यांनीं शंकासुद्धां घेतली नाहीं, परंतु ती सरी कोणच्या ठिकाणीं गेली आहे, व ती कसल्या कामीं लागली आहे, ह्याचा तर्क लक्ष्मीच्यानें होईना. ते चोरीच्या नादाला तर लागलेच. तो नाद त्यांचा सुटावयाचा नाहीं. ते रात्रीचे दरोडे घालण्यास संवकले आहेत, जर त्यांनीं गांवांत असा कडेकोट बंदोबस्त झाला असतांना एखाद्या घरावर मोहीम केली, तर गोष्टी कोणच्या परिणामाला जातील बरें ?

विष्णु नाहींसा झाल्यापासून एक दोन दिवस गेले हें सांगितलेंच. नंतर एके दिवशीं सूर्य असा मावळावयास गेला होता, लक्ष्मीची सासू कोठें आपल्या कुळाकडे गेली होती, व लक्ष्मी घरांत एकटीच केर काढीत होती, तों इतक्यांत ओटीवर कोणीं आल्याचा तिला भास झाला. ती बाहेर येऊन पाहते आहे मात्र, तों एक सुमारें एकोणीस वीस वर्षांची ब्राह्मणाची स्त्री ओटीचें जोतें वर चढून येऊन आपल्या खांकेंतील लुगडें एके आंगास फेकून देऊन ओकसाबोकशीं रडत जमिनीवर गडबडां लोळूं लागली !

भाग सोळावा.

लक्ष्मीला काय वाटलें असावें बरें ? आपल्या

पतिराजांच्या प्रतापाचें कांहीं तरी फळ दृष्टीस पडणार हेंच भय प्रथम तिच्या मनांत उभें राहिलें. ती बाई गडबड लोळत होती ती लक्ष्मीकडे पाहिना सुद्धां !

लक्ष्मीचा ह्या वेळीं काय विचार झाला होता तो सांगितला पाहिजे. गांवांतील एका चार पांच वर्षांच्या पोरीनें तिला "पळपुट्या नवऱ्याची बायको" ह्मणून ह्मटलें, 'य तें लक्ष्मीच्या अंतःकरणाला फारच खोंचलें. ह्या पोरीच्या ह्मणण्यावरून लक्ष्मीच्या मनांत एकएक नवानवा विचार येऊं लागला. 'पळपुट्या नवऱ्याची बायको' ह्मटलें ह्मणून तें आपल्या मनाला कां लागावें? आपण ते शब्द ऐकले ह्मणजे खजिल कां व्हावें? येथून लक्ष्मीचे विचार सुरू झाले. आपण ज्याअर्थीं असे शब्द ऐकून खजिल होतों, त्याअर्थीं आपला तसाच संबंध आहे. मला लोकांनीं असें ह्मणूं नये असें आपल्या मनाला वाटतें, म्हणजे आपल्याला अब्रूची भीति आहे. पण ही अब्रूची भीति मुळीं उत्पन्न कां व्हावी? निघून जातें कोण, नी अब्रूचें भय कोणाला? तर आपलें तसेंच नातें आहे. ह्या जन्माच्या गांठी आहेत. देवानें तशीच सांगड घालून दिली आहे कीं एकाच्या वाईट कृत्यांबद्दल दुसऱ्यास लज्जा वाटावी. इतकें आपल्याला समजतें खचित; आणि अब्रूची भीति वाटते तेव्हां तें समजतें यांत शंकाच नाहीं. आज एका पोरीनें आपल्याला असें ह्मटलें, उद्यां सगळा गांव ह्मणेल. पळून गेल्यानेंच जर आपल्याला असें नांव मिळालें, तर उद्यां चोऱ्या उघडकीस आल्या,

किंवा त्या चोऱ्यांमुळें भलतेंच कांहीं घडून आलें, तर लोक आपल्याला काय ह्मणूं लागतील! अमक्या अमक्याची अमकी ही असें ते बोटानें दाखवतील! मग आपली अब्रु कोठें राहिली? आपली अब्रु अशींच कृत्यें पुढें चालतील तर खचित राहणार नाहीं. आणि कृत्यें काय चाललीं आहेत हें आपल्याला कळूनसुद्धां आपण स्वस्थ बसावें काय? आपण कांहींच का यत्न करूं नये? आपल्या हातीं कांहींच का नाहीं? समजून उमजूनसुद्धां आपण आपल्या डोळ्यांवर पांघरूणच का ओढावें? काय होईल तसें होवो ह्मणून मनाची समजूत होत नाहीं. अब्रु आडवी येते. ती मनाला दोष लावते. आपण आपल्या नांवाकरितां आपल्या सामर्थ्याप्रमाणें जपलें पाहिजे. आपण होईल तितकें करून पांघरूण घातलें पाहिजे.

याप्रमाणें नाना तरंग मनांत उभे राहून लक्ष्मीचा असा विचार झाला होता. ती बया ओटीवर येऊन जेव्हां सर्व ओसरीभर लोळूं लागली तेव्हां लक्ष्मीच्या मनांत हेच विचार जागत होते.

त्या बाईचा आक्रोश सपाट्यानें चालला होता. लक्ष्मीला तिला काय झालें ह्मणून विचारावयास सुद्धां सांपडेना. ही बाई येथें येऊन असें कां करते हेंही लक्ष्मीला समजेना. बाईच्या आंगावर पहावें तर फुटका मणी नव्हता. लुगडें पहावें तर त्याच्या चिंध्या लोंबत होत्या. तिच्या आंगावर ह्मारणीचा कळा आलेली दिसत होती. तिच्या झिपऱ्या दोन विती लांब असून त्याही मोकळ्या सुटलेल्या असल्यामुळें तो

लोळूं लागली तेव्हां त्या इकडे तिकडे पिसकारत व तिच्या तोंडांत जात. त्या तिच्या कैंसांस पाण्याचा किंवा वेणीफणीचा संस्कार कधीं झाला होता कीं नाहीं याची भ्रांति वाटे. तिच्या एका हातांतच कायत्या बांगड्या असून एका हातांत कांहींच नवतें. अर्थात् त्या तिच्या हातांतल्या बांगड्या पिचून गेल्या होत्या. ही अशी अवदसा कोण असें लक्ष्मी आपल्या मनाशीं ह्मणत आहे तों तिला ओळख पटलीसें वाटून ती चपापली ! " काय ! वन्सें ! तुम्ही ! असें काय करतां ! झालें तरी काय ! " तिनें तिला विचारलें.

ती खरोखरच तिची नणंद होती. लक्ष्मीचें व तिचें दर्शन लग्नांत मात्र झालें होतें; त्यानंतर लक्ष्मी जेव्हां वर्षभर माहेरीं गेली होती, त्या वेळेस ही बया हिकडे आली होती.

" असें वन्सें झालें तरी काय ? " लक्ष्मीनें तिला पुन्हां विचारलें.

"फुटलें माझें कपाळ! नी जळलें आईबापाचें घर!" असें ह्मणून ती ताडताड आपलें डोकें जमिनीवर आपटून घेऊं लागली !

" हें काय हें ! अहो नीट सांगा ! नीट बोला ! " लक्ष्मी म्हणाली.

" हें पाहिलेंसका काय तें; " ती आपला हात पुढें करून लक्ष्मीला दाखविते; " जळले मेल्यांचे हात ते ! "

लक्ष्मीनें पाहिलें तों एक सुपारीएवढा तरतरीत फोड तिचे तळहातावर दृष्टीस पडला. " अग बाई, हें काय हें! भाजल्याचा का फोड हा ! " असें लक्ष्मी

म्हणत आहे तों तिची नणंद ओरडून म्हणते, " हो हो, भाजल्याचा. तुला नाहीं का दिसत ? फुटले का तुझे डोळे ? "

लक्ष्मीला ह्या कैदाशिणीचें स्वरूप कळून आलें; तिनें तिला तुमचा हात कसा भाजला म्हणून विचारलें नाहीं. " जळले मेल्यांचे हात ते, " म्हणून ती पुन्हां गळा काढून रडूं लागली आणि एकाएकीं विचारते, "अग, भाऊ कुठें आहे तो सांग पाहूं आधीं? त्या मेल्यानें इतकें केलें. "

हे तिच्या तोंडचे शब्द ऐकून लक्ष्मीला वाटलें कीं आपण तर्क केला तोच खरा होत आहे. " पुढें काय सांगा तर खरें. " ती तिला म्हणाली.

" सांगायचें काय तुझें डोंचकें ? त्या मेल्यानें इतका अनर्थ केला. तो घरीं नाहीं का आला ? मला कोणीं म्हणालें कीं आमच्याच गांवांत लपून बसला आहे. "

मागें सांगितलेंच आहे कीं लक्ष्मीचा निराळ्याच प्रकारचा विचार झाला होता; म्हणजे, आपली अद्यु रक्षण्याकरितां आपण जपावयाचें. तिला वाटलें कीं ह्या बाईपासून आपल्याला कांहीं तरी नवीन कळून येईल, व त्याप्रमाणें आपल्याला उपायही केला पाहिजे. म्हणून ती तिला म्हणाली:—"आतां तुम्ही वन्सं उठा. लुगडेंबिगडें नीट सांवरून नेसा. हे केंस आवरून नीट बांधा. एखाद्यानें पाहिलें तर काय म्हणेल बरें ?"

"तर मग मला त्या—ह्यानें सांगितल्याप्रमाणें तो तिकडेच असेल. मला तो मोकाशी म्हणाला कीं तुझा

भाऊ मी त्या जाधवाच्या पोराकडे येतांना एकदा दोनदा पाहिला; मी ह्मटलें असेल. तो पळून गेला वाटतें?"

"तुह्मी सांगाना एवढें घरांत मीं असें असें ऐकलें ह्मणून." लक्ष्मी ह्मणाली.

"मी सांगेन, पण माझ्या नथेची अवस्था काय? तो पळून गेला तर त्यानें ती मोडून खाल्ली असेल."

"तुह्मी नथेचें कांहींच कोणाजवळ बोलूं नका. आधीं पत्ता तर लागूंदे."

"तूं मोठी शहाणीच आहेस वहिनी बोलूं नको ह्मणतेस तर! आज माझी पंधरा रुपयांची नथ गेली ह्मणजे?"

"नथ एवढीचना? कांहीं चिंता नाहीं; मिळेल. तुह्मी निघून आलें ह्मणून सांगणार नाहींच अहांना? खोटें बोलायचेंच आहे तर मग शोभेल असें तरी कांहीं सांगा. मला शोध लागला ह्मणून कळवायला आलें ह्मणून तरी सांगा, ह्मणजे उलटी तुह्मांला शाबासकीच मिळेल."

लक्ष्मीनें तिला असा उपदेश करून ठेविला. काशीबाई बाहेरून आंल्याबरोबर तिला तिच्या लेंकीनें आपण आणलेली बातमी सांगितली. विठ्ठलपंत आल्यावर त्यांच्याही ती कानावर गेली. त्यांनीं आपल्या लेंकीला शाबासकी देऊन सकाळीं मुलाचा शोध करण्यास जाण्याचें ठरविलें. त्यांनीं मोकाशी, जाधव वगैरेकडे जाऊन दुसरे दिवशीं शोध घेतला, व त्यांना यशही आलें. विष्णूला पुढें घालून त्यांनीं घरीं आणिलें.

घरांतील मनुष्यें सरीची गोष्ट केव्हां काढतील ह्मणून विष्णु पावलोपावलीं विचकत होता. बहिणीच्या घरींही केलेली थापाथापी केव्हां बाहेर निघेल ह्मणून त्याला भीति होतीच. परंतु संध्याकाळपावेतों एकही गोष्ट बाहेर आली नाहीं तेव्हां तो समजला कीं आपण अधिक बिथरून जाऊं ह्मणून ह्यांनीं मागची गोष्ट बाहेर न काढण्याचा बेत केला असावा.

परंतु लक्ष्मीच्या नणंदेनें लक्ष्मीला हळूच विचारलें, "वहिनी, तूं नथेची गोष्ट बोलूं नको ह्मणतेस तर मला तूं नथ कोठून देशील?"

"वन्सें," लक्ष्मी ह्मणाली, "त्या गोष्टीची आजच का कांहीं घाई सुटली आहे? सध्यां तुह्मी कांहीं एक बाहेर काढूं नये, नाहीं तर आतांच आगींत तेल ओतल्याप्रमाणें होईल. नथ गेली तर मेली आज नाहीं उद्यां मिळेल, पण प्रसंग पाहून कोणचीही गोष्ट करावी."

"तूं आपला जातेस प्रसंग पाहायला पण माझी जाते नथ. मी आतां बोललें नाहीं नी वेळ टळून गेली कीं मला काय मिळणार? आतांच भाऊजवळ असली तर मिळेल तरी. पुढें तुझें तरी काय ह्या?"

"माझा इतका विश्वास नाहीं का वन्सें तुह्मांला?"

"तुझें चेणार काय? मी मात्र नथेला मुकेन."

अशा रीतीनें पुढेंही त्या दोघींचें संभाषण झालें, पण लक्ष्मीची नणंद कांहीं केल्या तिचें ऐकेना. शेवटीं जेव्हां नथीइतका ऐवज ठकीनें तिजपासून घेण्याचें कबूल केलें, तेव्हां तिनें तिला पाहिल्यानें सोडलें; कारण कीं घटकाभऱ्यानें तूं काय तें आतां मला दे ह्मणून तिनें

आग्रह धरिला, व तिजपासून मूद काढून घेतली. " व्या तर ही, " ती तिला ह्मणाली, "पण मी दिली ह्मणून सांगूं नका हो; नाहीं तर माझी आई आधींच आग लावून गेली आहे, आणखीं वर जर सासूबाईंना कळलें कीं तिनें त्यांना न कळवितां मूद परस्परच माझ्या स्वाधीन करून दिली, तर मग विचारायलाच नको. " तिच्या नणंदेनें ही गोष्ट कबूल केली, व जेव्हां काशीबाईनें तिला तुझ्या नाकांत नथ कां नाहीं ह्मणून विचारलें, तेव्हां तिनें सांगितलें कीं, " तुम्हीं मूद नाहीं दिलीत ह्मणून त्यांनींच ती मला करून दिली; आणीक मामंजी ह्मणाले कीं एक मोठी थोरली टिकेची नथ करणार आहों. "

तरी अशा रीतीनें आपल्या वहिणीचें तोंड बंद झालें आहे हें विष्णूला काय माहित ? त्याला आंतलें गूढ काय तें कळेना ! तिला विचारून पहावें हाच काय तो त्याला एक उपाय दिसला.

विठ्ठलपंतास रात्रीं यावयास बराच उशीर झाला होता. जेवणेंखाणें आटपून जात तों बरीच रात्र होऊन गेली. विठ्ठलपंत जेवल्यावर एका कुळाच्या व्याजाचा हिशेब करीत निजावयास गेले. पुढें काशीबाईचीही निजावयाची वेळ झाली, तेव्हां ती आपल्या लेंकीला ह्मणाली, " ठके, तिला जाऊंदे आपल्या खोलींत, नी तूं ये मजजवळ निजायला. " आणि आपण जाऊन निजली. विष्णूचा उद्देश काय होता तो सांगितलाच आहे, त्याप्रमाणें त्यानें ठकीला बोलण्यांत गुंतविलें; नंतर आईला झोंप लागलीशी पाहून त्यानें नथेचा प्रकार आईला सांगितलास का

ह्मणून तिला विचारलें. तिनें नाहीं ह्मटलें. लक्ष्मी आडून ऐकत होतीच, कारण कीं हें बोलणें इतकें चोरून चाललें नव्हतें. विष्णूनें जेव्हां आईला न सांगण्याचें कारण विचारलें, तेव्हां तिनें सांगितलें कीं, मला वहिनीनें नको सांगूं ह्मणून सांगितलें, ह्मणून मी सांगितलें नाहीं. यावर ती झोंप आली ह्मणून आ-ईशेजारीं जाऊन निजली, व तिलाही लागलीच झोंप लागली.

विष्णुपंत बसल्या जाग्यावरच विचार करीत बसले. लक्ष्मी होती तेथेंच अंधेरांत उभी होती. दो-घांचेही निरनिराळे विचार चालले होते. विष्णु मनांत ह्मणत होता कीं माझें हिला काय काय आ-णि तें कसें कळलें तें समजत नाहीं. सरीचा हिनें चोभाटा किती केला तोही प्रकार समजून येत नाहीं. अक्काला हिनें नथेचें सांगूं नको ह्मणून कां सांगितलें ह्याचेंही कारण कळत नाहीं. लक्ष्मीचे विचार तर स्पष्ट असे कांहींच नव्हते. आपण कसें वागावें हें तिला समजेना, परंतु आपण हातपाय हलविले पा-हिजेत खचित एवढेंच तिला वारंवार वाटे.

घरांत बाकीच्या माणसांस झोंप लागून गेली होती, व हींच दोघें जागीं होतीं. तीं अशीं पाव घ-टका असतील. तों विष्णुपंत लक्ष्मी जिकडे अंधेरांत उभी होती, तिकडे तोंड करून ह्मणतात, " तूं ख-रोखरच मला—"

तों इतक्यांत घराच्या बाहेर कोणीं शीळ घातल्याचें ऐकूं आलें. ही शीळ ऐकतांच विष्णु-

पंतांची स्वारी उमळून उठली, आणि तडख बाहेर चालती झाली !

परंतु ही शीळ लक्ष्मीलाही ऐकूं आली होती! विष्णुपंतांस त्या शिळेवरोवर निघतांना पाहून तिला काय वाटलें असावें वरें ? विष्णुपंत निघाल्यावरोवर तीही घावरून पुढें झाली, परंतु तें कशाला हेंच तिला समजेना. ती बाहेर आंगणाकडे पाहते तों काळोख गडद पडला होता; कारण आकाशांत ढगें फार निघून चांदणेंही नव्हतें.

भाग सतरावा.

कदाचित् विष्णुपंत आपल्या चोरांच्या मंडळींतच जावयास निघाले असतील, या करितां आपण तिकडेसच वळूं.

सदवा व राम्या हेच काय ते दोघे वाटण्यामध्यें पाटलाच्या ओटीवर येऊन बसले होते. पुष्कळ वेळ होऊन गेला तरी दोघांतून एकानेंही चकार शब्द काढला नाहीं. जेव्हां बसून बसून कंटाळा आला, तेव्हां राम्या ह्मणाला, " का सदवा, तुमची बी वाचा बसून गेली ? "

" तुझी बी वाचा बसून नाहींना गेली ? बोल बोल ? "

"मावशी कशाला येणार हये ? तिचा मतलब काय हये ? "

" आर लेका मला तर काय ह्माईत ? ह्मणून तर आज आपुन, हथ आलों. त्या दिवसापुन आपुन हा नादची सोडून दिला. अक्षी वंगाळ. "

" आपुन बी हा नाद सोडून दिला. एवढ प्वाट नळत, म्हंजी मरन्याची पाळी नसती आली. "

"आनू प्वोटाला न्हाई का ? कराजदारामुळ ना ?" सदवान विचारल.

"त्यो कराजदार मरता तर बर होत. मरल बी."

" त्ये तुझ भाकित न्हाउंदे; पण आपली ही अशी दशा त्या सोनारड्याच्या पार्यां ना ? त्याच कराज नाहींस करण्यासाठीं आपुन त्येच्या घरावर पहिली सवारी केली. पण न्हाई दैवाच्या मनांत येश देयाच. मावशीला बी इगुतवाली ह्मणून आपुन आपल्या इचारांत घेतली, पण ती आमच्याच हुरावर बसली ! तिच्यापार्यां कुरकुरण्याच घर बघितल; तिथ तर त्या बामणान मारच खाला–त्यो ब्राह्मण येत बी नव्हता,–आह्मी बी गेलो असतो तुरगांत. आतां मावशी येणार ती कशाला ? तिला कांहीं आह्मांपुन न्हाई मिळाल ह्मणून. ती आह्मांस्नी दपटशा देनारच. "

"पण ती ह्मणाली इश्न्याला आधीं बोलावूं नका?"

" असल काय बी, समजल आतां–पण ह्या सावकारापार्यां इतका गोंधुळ झाला. त्येच्या कर्जाखालीं आपुन दडपुन गेलो. न्हाई तर आह्मांला असल्या गोष्टीची काय गराज पडली होती ? राम्या ऐकतो हयेसना ? ह्ये बग:–गेल्या सालीं दोन खंडी दाणा पिकवला, मोजून अक्षी दोन खंडी, योक दाणा कमी न्हाई. त्ये समदे दाणे जर न्हाते, तर आज कशाची बी गराज न न्हाती. मीठ मिरची समद समद त्यांत झाल असत बगा. पण ह्यो सावकार,–त्याला मोजून

वर्तावळ्यासुद्धां सव्वा खंडी दाणा घातला, आन् आमच्या प्वोटाला सारा पंधरा मण दाणा न्हायला. आम्ही इतक्या माणसांनीं त्यांत कसा गुजारा करावा ? ओली कोरडी करतो, मीठ हये तर हये, न्हाई तर न्हाई, मिरची मिळाली तर बर, न्हाई तर बर, इतक करूनशानी देखील दोन तीन महिने उपाशी मरन्याची पाळी येती. हाच जर समदा दाणा माझ्या घरांत न्हाता, तर आज राजा, मी राजा झालों असतों ! ”

हें त्याचें बोलणें सरत आहे तों मावशीबाई आली, व तिनें विष्णु येथें आला आहे कीं काय म्हणून त्यांस विचारलें. नाहीं असें उत्तर मिळतांच तिनें आपलें बोलणें सुरू केलें. ती म्हणाली, “ बाहेरून जरी तुह्मांला तसें ऐकूं येत नाहीं, तरी आंतून तुमचीं कृत्यें वामनरावांचे कानावर गेलीं आहेत. लवकरच तीं मामलेदारांचे कानावर जाणार आहेत. मी वामनरावांकडून आजच आलें, तर याची तजवीज काय करायची ? ”

“ मावशीबया, ” सदबा म्हणाला, “ आम्ही समदे तुम्हास्नी दंडवत घालतो. आह्मांला तूं कस बी कर, पण या तरासांतून सोडीव. ”

“ मी मागितलेला ऐवज मला पटवून द्या म्हणजे झालें. ” मावशीबाई म्हणाली.

“ आम्ही तुह्मास्नी तो ऐवज पटवून देयाचा म्हणून काय किरित केल त्ये तुह्मास्नी ठाव हये. आतां बुवा आपुण पराण गेला तरी कुठं काई करणार न्हाई. कसय बी करून पंचवीस रुपये आह्मी

तुमच्या पुढें ठेवतो, त्यांत समजूत मानूनशानी घ्या, पुंना तुमची आमची ओळख न्हाई. ”

“ बरें, ” मावशीबाई म्हणाली, “ मी तुम्हांला हा ऐवज मिळविण्याची युक्ति सांगितली तर ? तुम्ही त्याप्रमाणें कराल ? ”

“ आम्ही न्हाई आतां चोरी करणार ! ” राम्या म्हणाला, “त्या रेवगांवांत म्हंजी आज कोण बंदिस्ती.”

“ मी चोरी करायला नाहीं सांगत तुम्हांला. ” मावशीबाई म्हणाली. “ त्याला थोडी युक्ति. पण तुम्ही ऐकाल तर. ”

“ बर बोला. ” सदवा म्हणाला.

“ तुम्ही आतां विष्ण्याला बोलावून आणा. त्याच्या पाठीला हा एवढा ऐवज आणून दे म्हणून लागा. तो कोठून आणूं म्हणून विचारील, तेव्हां सांगा कीं तुझ्या बायकोच्या आंगावरचे सगळे दागिने आणून दे. ”

“ आन् तो न्हाई म्हणाला तर?” राम्यानें विचारलें.

“ तुम्ही त्याला तसाच धाक दाखवा. ” ती म्हणाली.

“ तो कसा धाक? ” सदवानें विचारलें.

“ तुम्ही दोघे तिघे असतांना धाक कसा म्हणजे ? येथें घर ओसाड आहे, आज काळोख हवा तसा आहे, कोणी पाहायला येत नाहीं. ओरडूं लागला तर तोंडाला—”

“ बोळा. ” राम्या म्हणाला. “ पण असय करून तो नाकबूल झाला तर? ”

"तर मग मी तुह्मांला ऐवज सोडीन जा. तुह्मी असें करा. पुढची तजवीज मी योजून ठेवली आहे. त्याला लंबे केला ह्मणजे तो बाहेर बोभाटा करीलच. याकरतां तो कबूल झाला तर पुढचा उपाय मी तुह्मांला सांगेन. नाहीं कबूल झाला, तर त्याला सांगा कीं तूं घर सोडून हिंदुस्थानांत लांब तिकडे पळून जा, नाहीं तर आह्मी तुझी पिच्छा सोडणार नाहीं. ही गोष्ट तुह्मी त्याच्याकडून कबूल करवून त्याला घालवून लावा. ह्मणजे मी माझा ऐवज तुह्मांला सोडला."

थोडासा विचार होऊन त्यांनीं ती 'गोष्ट कबूल केली, व विष्णूला बोलावणें पाठविण्याचें ठरलें. "जा तर राम्या तूं," सदबा ह्मणाला, "आधीं सोनजीकड जा; संभाळ त्याचा बाबा न्हाई तर बया जागी असल; तिथ त्याला शीळ घाल, आनू मग रेवगांवाला जा."

"आनू शीळबराबर त्यो ब्राह्मण येईल?"

"आपली मागची शपथ तर कुठ अपुन मोडली हये? शीळ ऐकूनशानी त्याला आलच पाहिजे."

"पण माझें नांव सांगूं नको हो राम्या त्याला." मावशीबाई ह्मणाली, "नाहीं तर तो यायचा नाहीं. मी येथेंच बसतें या पाटलाच्या घरांत आंतल्या आंगाला. उई! या मेल्याच्या घरांत पावलें कोणाचीं वाजलीं!"

"पावल!" सदबा हंसून ह्मणाला, "उंदीर घूम कोणी खमबामल्ल असल."

निरोपाप्रमाणें राम्या निघाला.

भाग अठरावा.

आतां आपण लक्ष्मीकडे वळूं.

विष्णुपंतांची स्वारी गडबडीनें उठून गेली तेव्हां लक्ष्मीही घाबरून पुढें झाली हें सांगितलें. पुढें येऊन मी काय करणार होतें म्हणून ती आपल्याशीं आश्चर्य करूं आगली. परंतु तिचें तें आश्चर्य जाऊन तिला आतां वाईटही वाटूं लागलें. विष्णुपंत चांगल्या कामाला तर खास निघाले नाहींत असें ती तेव्हांच समजली. आपल्याच्यानें त्यांना जरी आडकाठी करवली नसती, तरी मी जर तशीच पाठी मागून गेलें असतें, तर फार बरें झालें असतें असें तिला वाटूं लागलें. या गोष्टीवरून तिचें मन तिला फार खाऊं लागलें. कांहींही होवो, आपली अब्रु रक्षण करण्याकरतां आपण आपल्या मनाचा घडा केला पाहिजे, व आपल्या मनुष्यांस आपण ताब्यावर आणलें पाहिजे, तें काम आपण नाहीं केलें तर दुसरें कोण करील, आपल्याला ज्याच्याशीं जन्म काढावयाचा त्याच्या वर्तणुकीकरतां सदासर्वदा जपणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असा दिवसानुदिवस तिच्या मनाचा निश्चय होत चालला होता. तिला विष्णुपंतांच्या आपण आड आलों नाहीं म्हणून फार चुटपुट लागून गेली. बायकांची जात फार भित्री म्हणून तिनें आपणास दोष दिला. ती आपल्या मनाशीं म्हणाली, आज जर मी कळूं न देतां त्यांच्या निदान पाठीमागून गेलें असतें, तर काय प्रकार आहे तो सर्व कळून आला असता. जपून हळु

हळु पाठीमागून गेलें असतें ह्मणजे झालें असतें. आतां हें खरें आहे कीं, तशा जाण्यानें मी आपल्याला संकटांत घालून घेतलें असतें. पण कितीही संकटें आलीं तरी काय करणार? आपलेंच लंगडें पडलें, तेथें संकटें आलीं काय, नी अब्रु गेली काय, त्याची पर्वा काय ह्मणून करावी? मी गेलें असतें, नी सांपडलें असतें, तर बरोबर ह्मणजे माझ्या पुढेंच आपलेंच माणुस होतेंना ?-मग बाहेर घर सोडून आल्याबद्दल मला कोणीं दोष दिला नसता. फार तर त्यांचीं त्यांनींच मला मारली असती, नाहीं तर माझा जीव घेतला असता, नाहीं तर पाहिजे तें केलें असतें. ह्या जिवाचे ज्यांचे ते मुकत्यार होते. माझ्या जिवाचें कांहीं कां होतें ना, मी चोरी किंवा दरवडा किंवा लबाडी असें कर्म करतांना खचीत आडवी आलें असतें. पण आतां संधि गमावली ह्याला काय करूं ? मी गेलें असतें तर मला त्या मंडळींतून कोणीं तरी पाहिलें असतें, ह्यांत तर संशयच नाहीं. कारण कीं कितीजण साथी आहेत कोण जाणें ! एक मेला तर येथें शीळ घालून बोलावून घेऊन गेला. त्यानेंच मला पाठीमागून गेलेली पाहिली असती. परंतु ह्या सर्व गोष्टी, पुढें येणारें संकट जें कदाचित् मी गेलें असतां टाळलें असतें, त्याशीं ताडून पाहतां कांहींच नाहींत.

लक्ष्मी अशा प्रकारचे विचार जों जों मनांत आणूं लागली, तों तों आपण गेलों असतों तर बरें झालें असतें अशीच तिच्या मनाची समजूत होत गेली.

परंतु होऊन गेलेल्या गोष्टीस आतां काय उपाय आहे ? आतां आपण जाऊन स्वस्थ निजावें, अशी मनाची समजूत करून ती आपल्या खोलींत गेली, आणि अंथरूण घालून आतां दिवा मालविणार, तों कांहीं निराळ्याच प्रकारचा विचार मनांत येऊन तिनें दिवा मालविण्याकरितां आपला पुढें केलेला पदर मागें घेतला.

मागच्याप्रमाणें आमच्याच घरांवर आज संकट येणार नाहींना, म्हणून तिच्या मनानें शंका घेतली. मागें जशी आपल्या घरावर स्वारी आली होती, तशी आज येणार नाहीं म्हणून कशावरून ? ह्या शंकेची ती आपल्या मनाशीं वाटाघाट करते आहे तों तिला दुसरी एक शंका उत्पन्न झाली; ती ही कीं, आपल्या घरावर जरी आज स्वारी नसली, तरी ती गांवांत दुसऱ्या कोणाच्या तरी घरावर नसेल म्हणून कशावरून ? गांवांत कडेकोट बंदोबस्त म्हणजे अशा प्रकारचा झाला आहे कीं पटाईत दरोडेखोरालासुद्धां पळतां येणार नाहीं; गांवांतले लोक इतके सावध झाले आहेत कीं झाडाचें पान वाजलें तरी ते कावरेबावरे होऊन धांवत येतात, मग अशा कधीं न अनुभवलेल्या चोरांचें त्यांच्यापुढें काय चालणार ? ते खचित सांपडणार, आज आप-ल्याला खचित कांहीं तरी भलतेंच झालेलें ऐकूं ये-णार, असेंच वेड लक्ष्मीच्या मनानें घेतलें. ह्याच गोष्टीवर तिचे नाना प्रकारचे तरंग उठूं लागले. ती तशीच दिव्याशीं हातांत पदर धरून उभी राहिली.

आतां असेंच विचार करीत उभें राहणें व्यर्थ

आहे, दिवा तेवत ठेऊन आपण अंथरुणावर पडावें असा तिनें विचार केला. खोलीचें दार लावावें कीं न लावावें, कडी आंतून घालावी कीं न घालावी, अशाविषयीं विचार करितां कडी घालूं नये एवढेंच नव्हे, तर दारसुद्धां सगळें लावूं नये, असें तिच्या मनानें ठरविलें. तिनें खोलीच्या दारास थोडीशी फट ठेविली, आणि दिवा अशा रीतीनें आड करून ठेविला कीं दाराच्या फटींतून बाहेरून कोणाला आंत दिवा आहे असें दिसूं नये, परंतु आपणाला मात्र बाहेर काय चाललें आहे तें दिसावें किंवा ऐकूं यावें.

दार उघडें ठेवलें म्हणून तिला फार भय वाटूं लागलें, परंतु तिनें त्या भयास जुमानिलें नाहीं. ती जाऊन अंथरुणावर पडली, तों एकाएकीं बाहेरून एक शीळ ऐकूं येते !

" काय ! कोणी शीळ घातली ! " ती आपल्या मनाशीं म्हणते, " शीळ तरी पण खचितच का ? " ती आपल्या कोंपरावर टेकून कानाला बोट लावून कान देऊन राहिली, परंतु तिला पुन्हां कांहीं ऐकूं येत नाहीं ! " ही मनुष्यानें शीळ घातली म्हणावें कीं पांखरूं ओरडलें म्हणावें ! पांखरूं तर खात्रीनें नव्हे. पांखराच्या शिळेंत व मनुष्याच्या शिळेंत पुष्कळ अंतर आहे. ही शीळ मनुष्याची. बरें ही शीळ मनुष्याची तर ती आतां कशाकरतां असावी बरें ? काय तिचें कारण ? ज्या माणसाकरितां इशारा म्हणून ही शीळ घातली असावी, तें माणूस तर केव्हांच निघून गेलें, आणि त्या वेळेसही अशाच प्रकारचा शिळेचा इशारा झाला होता ! "

पण ऐका ! आणखी एक शीळ ! लक्ष्मी झटदिशीं उठून दारापाशीं येऊन लपून उभी राहते, आणि बाहेरचा कानोसा घेऊं लागते ! बाहेर पहावें तों जिकडे तिकडे अंधेर ! जिकडे तिकडे स्तब्ध !

लक्ष्मीचे पाय लटलटां कांपूं लागले. काळजांत धडकी भरली. जाऊन सासुसासऱ्यांस उठवावें असें तिला एकदा वाटलें, परंतु हा विचार तिनें रहित केला. तसाच प्रसंग आहे अशी पुरती खात्री करून घेतल्यावांचून त्यांना उठवावयाचें नाहीं असा बेत करून ती आपण आधीं काय केलें पाहिजे याचा विचार करूं लागली.

आतां एक तिसरी शीळ लक्ष्मीच्या कानीं येते ! तिला ही एक गोष्ट नवीन आढळून आली कीं अगदीं पहिल्यानें विष्णुपंत असतांना जी शीळ वाजली, तिशीं आतां ह्या ज्या एकसारख्या तीन शिळा वाजल्या त्या ताडून पहातां त्या पहिलींत कांहींच हंशील नाहीं,परंतु ह्या शिळा एकाच मनुष्याच्या असोत किंवा तीन निरानिराळ्या मनुष्यांच्या असोत, खूप सणसणीत वाजल्या खऱ्या.

निश्चय लक्ष्मीचा झाला. दरवडा आमच्याच घरावर येतो खचित ठरलें. न जाणों आपलेंच दार उघडें असून आंत दिवा असल्यामुळें चोरटे आपल्याच खोलींत शिरतील अशी तिला भीति पडली. दिवा मालवून टाकावा कीं काय हेंच तिला समजेना. तिच्या आंगावर दागिने कांहीं फारसे नव्हते, कारण रमाबाईनें फेंकून दिल्यावर काशीबाईनें दागिने बाहेर काढले नाहींत, परंतु जें कांहीं तिच्या आंगावर रा-

हिलें होतें तें तिनें काढून बिछान्याखालीं दडपून टाकलें, आणि हळूच आपल्या खोलीचें दार लावून घेऊन मोठा धीर करून ती ओटीवर आली.

आपण पुढें तर आलों खऱ्या, सोक्ष किंवा मोक्ष, कांहींही होवो, भ्यावयाचें म्हणून नाहीं, अशा हिंमतीनें मनाचा धडा करून, ओटीवरून आंगणांतील कांहींच दिसेना तें पुढें जाऊन तरी दिसेल, अशा हेतूनें लक्ष्मी वळचणीपर्यंत गेली आणि तेथें उभी राहिली. परंतु तिला काय दिसणार? डोळ्यांत बोट घातलें तरी दिसणार नाहीं इतका बाहेर काळोख पडला होता; कारण ढगांनीं आकाश पहिल्यापेक्षां अधिक कोंडून टाकलें होतें.

मध्यान्हीला फार अवकाश होता असें नाहीं. अशा समयींची काळोखी रात्र ह्मणजे किती भयंकर समजावयाची! संपूर्ण जगांतील अत्यंत अनन्वित, अतिशय भयंकर, अशा महाघोर कर्मास प्रारंभ व्हावयाचा तो ह्यावेळीं. रामोशी घरें फोडण्यास, खुनशी मनुष्य आपला सूड साधून घेण्याकरितां खून वगैरे करण्यास ह्यावेळीं निघावयाचे. ह्याचवेळीं दुष्टांनीं लोकांच्या घरास आग लावावयाची. अशा या परम घोर समयीं एक मुलगी वेडीपिशी होऊन वळचणी खालीं उभी आहे!

लक्ष्मी मनांत ह्मणत होती:—"मी इतकी पुढें आलें तरी मला बाहेरचें कांहीं दिसत नाहीं, तर मला चुकवून कोणीं घरांतर नसेलना शिरलें! आतां पुढें जावें, मागें फिरावें, का येथेंच उभें रहावें? चहूंकडे न्यहाळून पहावें पण कोठें कांहीं दिसत नाहीं.

पण काय मेल्या बांगड्या ह्या, जरा हिकडे का. हिकडे कोठें वळलें कीं खळखळ वाजतात— ”

अशी ती बांगड्यांस दोष देत आहे, तों कांहीं धवदिशीं तिच्या पायांवर पडलें ! तिची तर पांचावर धारण बसली ! व जें काय पायावर पडलें, तें मनुष्याच्या आंगासारखें लागलें असा जेव्हां तिला भास झाला, तेव्हां तर तिची बोबडी वळून ती बेशुद्ध होऊन धाडदिशीं खालीं पडली !

भाग एकाणसावा.

घरामध्यें बाकीच्या त्रिवर्ग माणसांस गाढ झोंप लागली होती, त्यांतून कोणीं हा वेळ पावेतों जागें झालें नाहीं. परंतु आतां मोठ्यानीं बाहेर लक्ष्मी धाडदिशीं पडली, त्या आवाजावरोबर विष्ठलपंत जागे झाले.

चोरीचा गवगवा गांवांत असल्यामुळें कांहीं खुसबुसलें कीं मनुष्यें जागीं होत, घ लागलीच चोरीची शंका घेत, तशाच प्रकारचा चोरीचा संशय विष्ठलपंताचे मनांत आला.

त्यांनीं काशीबाईस जागी करून दिवा लावावयास सांगितलें. ठकीही त्या गडबडीनें जागी झाली. तीं त्रिवर्ग दिवा घेऊन बाहेर येऊन पाहतात तों विष्णु अस्ताव्यस्त होऊन पडला आहे, व त्याचेच आंगावर लक्ष्मी तशीच पडली आहे ! दोघेंही मेलीं कीं जिवंत !

अशा रीतीचा रात्रीच्या तशावेळीं तेथील भयंकर प्रसंग पाहून कोणाला काय वाटेल बरें ? आणि वि-

ढलपंत व काशीबाई यांच्या मनाची कशी अवस्था झाली असेल बरें ! अगापिच्छा कांहींच माहित न-सता झापतून घाबरून उठल्यावर आपल्या मुलगा सुनेची वळचणीखालीं अशी दशा पाहून त्या नवरा बायकोनें काय समजावें ? तीं कितीही निष्ठुर स्वभावा-चीं असोत, किंवा कितीही आपल्या मुलांविषयीं त्यांना काळजी नसो, त्यांच्या दृष्टीस त्यांची अशी दशा जर पडते आहे, तर त्यांची अर्थातच गाळण होऊन जाईल.

आणि तीं एकमेकांवर पडलेलीं ! किती विलक्षण ! किती भयंकर ! नवराबायको एकमेक एक-मेकांच्या आंगांवर प्रेताप्रमाणें पडलीं आहेत ह्मणजे किती भेसूर ! दोघांनीं मिळून एकदम त्रागा नाहीं ना केला ? किंवा एकमेकांनीं एकमेकांचे जीव नाहींना घेतले ? काय हें अरिष्ट !

काशीबाई ह्मणाली, " ह्यानें हिचा जीव घेऊन आपला जीव दिला, कीं हिनेंच ह्याला मारून टाकून आपल्या जिवाला कांहीं करून घेतलें ?"

त्या तिघांनीं लागून त्या दोघांस आधीं वळचणी-खालून काढून ओसरीवर आणिलें. त्यांस उलथीं पालथीं करून विठ्ठलपंतानीं त्यांचीं अंगें दिवा घेऊन तपासून पाहिलीं. ते ह्मणालेः—

" दोघांच्याही आंगावर कोठें रक्ताचा डाग, किं-वा कोठें मारल्याची कांहीं खूण, कोठें टेंगूळ किंवा काळें झालेलें, कांहींएक दिसत नाहीं. ह्या बाबतींत तर शंका नकोच."

"तर मग !" काशीबाई ह्मणते, " दोघांनीं एकदम

विष खाल्लें ! काय बाई ह्मणावें तरी काय ! आह्मांला निजून कांहीं फार वेळ नाहीं झाली. तोंपर्यंत दोघें चांगलीं हुशार होतीं. वीपत्रीप कांहीं असतें तर तेव्हांच गडबड होऊन गेली अमती ! ह्यांना कोणीं चावलें ह्मणावें ! पण दोघेंही येथें कशीं आलीं ? आतां बाई काय करूं ! " असें ह्मणून ती मोठ्यानें शोक करूं लागली.

" अग ए," विठ्ठलपंत तिला दटावून ह्मणाले, "असें रडायला काय झालें. तूं भलतेंच कांहीं समजतेस वाटतें ? हीं पहा दोघांचींही आंगें कशीं गरम लागत आहेत तीं. हे पहा दोघांचेही श्वास चालले आहेत. भलत्याच कांहीं गोष्टी मनांत नको आणायला; रडें आटोप. कांहीं उपाय तर करूं लागशील कीं नाहीं?"

" आतां मी काय उपाय करूं ? देवा, केवढा हा प्रसंग आणला आहेस ! असा आह्मी काय तुझा अन्याय केला होता ? आतां माझीं पोरें मला मुकलीं!" असें ह्मणून ती पुन्हां रडूं लागली.

" आतां काय ह्या बायकोला ह्मणावें," विठ्ठलपंत ह्मणाले, "अग ए, घरांतून पाणी तर आण जा. ठके, दोन पाण्याचे तांबे भरून आण पाहूं. मी ह्या दोघांनाही बसलीं करतों, प्रथम त्यांच्या डोक्यांवर पाण्याच्या धारा धरूं."

ठकीनें भांडीं भरून आणलीं. विठ्ठलपंतानें खाल्लीं बसून मोठ्या प्रयासानें जपून दोन्हीं मुलांस आपल्या दोन गुढघ्यांशीं टेंकून धरून बसविलीं, व एकाचे डोंकीवर ठकीस धार धरावयास सांगून दुसरीचे डोंकीवर काशीबाईस धार धरावयास लाविलें.

ठकी म्हणाली, " गांवांत वैद्य तरी मिळायचा आहे का ? जळ्ळा मेला काका वैद्य आहे तो काय भूत ! पण बाबा, आई, कांहीं भुताबिताची तर नाहीं ना ही चेष्टा ! दोघांसही खोलींतून वळचणीच्या खालीं कोणीं आणून टाकलें ! ',

"चुप बस पोरी," विठ्ठलपंत म्हणाले, "भलभलतेंच कांहीं नको बोलूं येथें. तूं पाण्याची नीट धार धर. ह्याच उपायानें तीं सावध होतील; नाहीं जर म्हालीं तर मग काकांला बोलावणें पाठवूं, नाहीं तर शिरोळ्याला बोलावूं, त्याला मंत्र तंत्र कांहीं कळतें. "

" पण कोणी बोलवायला तरी जायला आहे का ? मेला गडी तोसुद्धां आज दोन दिवस निजवून घेत नाहींत. " असें म्हणून काशीबाई जशी तिनें देखील त्याचकरितां या गोष्टींत कानाडोळा केला होता तरी आणखी विठ्ठलपंतास बोलते, " मेला गडी घरीं निजवून घेतला म्हणजे त्याला कोर अर्धी भाकरी द्यावी लागेल ! "

" पण ही पहा ! ही पहा बाबा ! " ठकी म्हणते, " ही पहा बाहिनी सावध होत चालली ! हा पहा तिनें हात वर केला ! "

लक्ष्मी सावध होत चालली होती खरीच. तिनें डोळे उघडिले; आंगाचीही चळवळ करूं लागली. ती हळु हळु शुद्धीवर आली, आणि इकडे तिकडे पाहून आपण सासऱ्याच्या आंगावर टेंकलों आहों असें जेव्हां तिच्या ध्यानांत आलें, तेव्हां ती चटदिशीं उठून एके आंगास गेली.

आपण होतों कोठें, पुढें झालें काय, कसा प्रकार घडला, वगैरे एक एक जेव्हां लक्ष्मी आपल्या ध्यानांत आणूं लागली, तेव्हां सर्व गोष्टींचा तिच्या मनांत उजेड पडला. आपल्या पायाशीं किंवा पायांवरच मनुष्याच्या आंगासारखें कांहींएक मऊसें येऊन पडलें, ह्या गोष्टीची तिला आठवण झाली तोंच नवरा सासऱ्याच्या मांडीवर आहे हें तिनें पाहिलें ! मग काय ! लक्ष्मीनें एकच किंकाळी फोडली, आणि ती धाडकण पुन्हां बेशुद्ध होऊन जमिनीवर पडली !

लक्ष्मी अशी पडल्यामुळें तीं माणसें फारच गडबडून गेलीं, व बाहेर हांकाहांक करून माणसें गोळा करणें जरूर आहे असें दिसलें. ह्मणून विठ्ठलपंतांनीं शेजारीं राहणाऱ्या मराठ्यास आंगणांत होऊन हांक मारिली.

परंतु ह्या एवढ्याच हांकेनें गांवांत काय गंमत उडून गेली पहा ! विठ्ठलपंताची हांक सभोंवार ज्या ज्या घरीं पोंचली, व ज्या ज्या घरीं कोणीं ह्मणून जागें होतें, किंवा ह्या हांकेनें जागें झालें, त्या त्यानें एकदम " विठ्ठलपंताचे घरावर दरवडा आला, धांवारे ! " ह्मणून एकच ओरड करून दिली !

गांवांत हांकाहांक करून द्यावयास पहिल्या दोन चार असामींच्या आरोळ्या बस झाल्या. आधींच गांवांत चोरीविषयीं चळवळ सुरू होऊन जो तो अशी केव्हां तरी वेळ येईल ह्मणून समजूत होऊन बसलेला, त्यांत विठ्ठलपंत मोठे सावकार ह्मणून त्यांच्याच घराचा चोरट्यांनीं खचित रोंख धरला आहे

अशी जो तो समजूत झालेला आणि विठ्ठलपंतांच्या घरीं बंदोबस्त कमी असें सर्वांस माहित असलेलें, अशा गोष्टी असल्यामुळें अशा रात्रीच्या वेळीं विठ्ठलपंत जेव्हां घाबरल्यासारख्या हांका मारतो आहे, तेव्हां दरवडाच खचित अशी झोंपेतून उठल्या बरोबर,—ती झोंप अशी कीं न जाणों त्या झोंपे मध्येंही त्यांस दरवड्याचीं स्वप्नें पडलीं असतील,—अशा प्रकारची लोकांची एकदम अटकळ व्हावी हें साहाजिक आहे.

चोहोंकडून विठ्ठलपंतांचे घराकडे लोक धांवून येऊं लागले. लहान, थोर, ज्याला ह्मणून थोडीबहुत धमक होती, ज्याला ह्मणून गंमत पहावयाची होती, किंवा ज्याला ह्मणून धमकही नाहीं आणि गंमत ही नाहीं तर तिकडे जावयाची ओढ, मग ती कां तें त्याचें त्यालासुद्धां माहित नाहीं, ते सर्व झाडून सारे विठ्ठलपंताच्या घराकडे उड्या घालीत आले. धमकदार होते त्यांनीं आपल्या हातांतून आपआपल्या अवसानाप्रमाणें लहानमोठ्या काठ्या, सोंटे, कळक, सांपडेल तें किंवा हातीं लागेल तें आणिलें. कांहीं नाहीं हाताला लागलें तर येतांना वाटेंतील चार गुंडे दगड त्यांनीं बरोबर घेतले. कित्येक वहादरांनीं चोरांस बांधण्याकरितां दोऱ्या व चऱ्हाटें बरोबर घेतलीं. गंमत पाहणारे होते त्यांनीं गंमत पाहण्याकरितां भल्या मोठाल्या चुडी पेंटवून बराबर घेतल्या. त्यांनीं आपल्या मनाशीं असा न्याय केला कीं, "आह्मी कांहीं ह्या चुडी घेऊन मजा पाहयला नाहीं चाललों आहों, तर जे कोणी चोरटे धरण्याकरितां

पुढें सरतील त्यांना उजेड अर्थांतच पाहिजे, तो आ-
ह्मी नेत आहों; आह्मांला चोरांचीं तोंडें आपोआप
दिसतील तीं गोष्ट वेगळी. परंतु जे विचार केल्यावांचून
उठून पळत सुटले, त्यांनीं बराबर कांहीं घेतलें नाहीं तर
नाहींच, परंतु धांदलीनें अंधारांतून येत असतां धोतरें,
घोंगड्या फाडून घेतल्या, गुढघे फोडून घेतले, व कुं-
पणामध्यें धडपडत जाऊन सर्व आंग व तोंड ओरबाडून
फाडून रक्तबंबाळ करून घेतलें.

विठ्ठलपंत हांक मारीतों अवकाश, तों पहिल्या
सपाट्याबराबर इतकी गडबड होऊन गेली. पांच
पंचवीस असामी जे पहिल्यानें उड्या घालीत पुढें
आले, ते विठ्ठलपंताचे घरीं पोंचतांच त्यांस त्यांच्या
हांकेचें खरें कारण कळून आलें; व त्यांनीं हा दरो-
डा नव्हे तर सावकाराच्या मुलाची व सुनेची अ-
शी अशी अवस्था झाली आहे ह्मणून परत, जे अ-
जून 'काय झालेंरे, काय झालेंरे' ह्मणून विचारीत
होते त्यांस पुकारलें. हीही बातमी गांवांत ते-
व्हांच हांकाटली गेली, तरी एकदा लोक जे बाहेर
निघाले, ते विठ्ठलपंताचे घरीं आलेच, आणि अशा
रीतीनें त्यांचे घरीं पांचपंन्नासांचा जमाव झाला.

पांचपंन्नासांसांजवळ पांचपंन्नास उपाय! त्या
जोडप्यास असें बेशुद्ध पाहून जो तो आश्चर्य क-
रूं लागला,—जो तो काय झालें तें मुळापासून
सांगा ह्मणून घरच्या माणसांस ह्मणूं लागला,—जो
तो आपआपल्यापरीं तर्क करूं लागला,—व जो तो
आपआपली अक्कल चालवून जो तो आपआपले उ-
पाय सांगूं लागला. ज्याला त्याला आपलाच उप-

चार चालावा ह्मणून इच्छा, व ज्याचा त्याचा हेंच करा ह्मणून आग्रह!

इतक्या लोकांनीं जे इतके उपाय सुचविले, ते सांगत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. गांवांतील मंत्री शिरोळे हजर होते, व त्यांनीं आपलें छांछू चालविलेंच होतें. काका वैद्यांचे घरीं आरोळी पोंचवून त्यांस पाचारण केलें, आणि त्यांची स्वारी येऊन धडकली.

वैद्यबुवांची स्वारी आल्याबरोबर इतर फारसें आपलें शहाणपण न लावतां गप बसले; आणि काकांचे नाडीपरीक्षण सुरूं झालें. "हं," काका खोल विचार केल्यासारखें करून म्हणतात, "हं कांहीं हरकत नाहीं; हीं दोघेंही आतां सावध होतील पहा." असें ह्मणून त्यांनीं एक श्लोक ह्मटला, व मग ह्मणतात, "हं, ह्या दोघांनाही वायु झाला आहे. कांहीं हरकत नाहीं. भिण्याचें कारण नाहीं."

वैद्यबुवांनीं नाडी पाहून श्लोक ह्मटला, श्लोक ह्मणून वायु सांगितला, तेव्हां त्यांचीच परीक्षा खरी, अशी समजूत होऊन सभोंवारची अडाणी जात एकमेकांचे तोंडाकडे पाहत स्तब्ध उभी राहिली. वैद्यबुवांचें आश्वासन मिळतांच त्यांना धीर आला, व जो तो आपली परीक्षा चुकीची ह्मणून समजून राहिला.

"ह्याला उपाय, ह्याला उपाय," वैद्य बुवांस पुष्कळजण एकदम ओरडले.

"मस्तकावर डागण्यावांचून दुसरा कांहीं नाहीं." वैद्य बुवांचें एकदम उत्तर आलें.

"डागा तर डागा," असें कोणीं बोललें. आणि सर्व जण आतां 'डागा डागाच' करूं लागले.

शेगड्या धडकावून पेटविल्या, पळ्या व डागण्या तापवून लाल केल्या, व थोडक्याच पळांत डाग देण्याची सर्व सिद्धता झाली.

दोघांसही एकदम डागावयाचें ठरून तसें करणें सोईवार पडावें म्हणून दोघांसही एकमेकांजवळ धरलीं.

विस्तवांतून लाल लाल डागण्या काढ़ंल्या, आणि त्यांच्या मस्तकांवर ठेवणार, तों इतक्यांत सभोंवारच्या गर्दींत "अं हा हा" म्हणून कोणी ओरडला.

" छे छे, डागूं नका, डागूं नका, डागून उपयोगीं नाहीं," असें म्हणत एक पटकुऱ्या पुढें आला, आणि सर्व गांवकरी त्याच्याकडे पाहतात तों त्यांच्याच गांवचा भिकारी!

"वा वा डागतां काय म्हणून!" तो भिकारी ओरडला.

"कुठलें बाई हें एक नवेंच भिकारेंड येऊं लागलें आहे आमच्या गांवांत." काशीबाई म्हणाली.

त्या भिकाऱ्याला हरकत करतांना पाहून सर्वजण त्याची टर करूं लागले. ज्याच्या त्याच्या तोंडून "गप वैस भिकारड्या, तुला काय समजतें म्हातारड्या, तूं तुकडे मागावेस, तुझें काय येथें काम आहे थेरड्या, चल जा, चालता हो येथून म्हातारड्या," अशा प्रकारचीं निंदेचीं भाषणें येऊं लागलीं, व सर्वजण त्याचें पटकूर उडवून त्याची ओढाताण करूं लागले.

"तुम्ही कांहीं केलें तरी मी ह्यांना डागूं देणार

नाहीं. " तो भिकारी आवेशानें ह्मणाला.

त्याच्या आवेशास न जुमानतां डागणारे त्या जोडप्याला डागणार, तों तो भिकारी मंडळीच्या हातून निसटून त्या दोघा मुलांच्या डोक्यांवर जाऊन पालथा पडला.

त्यानें त्यांच्या डोंक्यास मगरमिठी मारली ती कोणाला सुटेना ! तो तोंडानें ह्मणत सुटला होता कीं, " तुम्ही यांना डागूं नका; तुमच्या डागण्यावांचून हीं आतां शुद्धीवर येतील पहा. "

त्याला सोडवितां सोडवितां डागण्या तर विझून गेल्याच. परंतु आतां तो भिकारी त्यांच्या डोक्यावरून उठला तों तीं दोघेंही सावध होत आहेत ! होतां होतां तीं दोघें हीं चांगलीं सावध झालीं. जो तो त्या भिकाऱ्याविषयीं नवल करूं लागला, आणि म्हणूं लागला कीं डाग दिले नाहींत म्हणून बरें झालें.

त्या मुलांस काय प्रकार झाला होता, व त्यांची अशी कां अवस्था झाली, इत्यादि त्या वेळेस विचारणें गैर आहे, म्हणून त्यांस निरानिराळ्या ठिकाणीं नेऊन निजविलें; व सर्व माणसें मनाला वाटेल तें बहकत आपआपल्या घरीं निघून गेलीं.

भाग विसावा.

परंतु दुसरे दिवशीं आपली तशी अवस्था गेल्या रात्रीं कशानें झाली हें त्या नवराबायकोंतून एकही कोणाला सांगेना ! उजाडल्याबराबर पुष्कळ गांवकरी विठ्ठलपंताचे घरीं ह्या गोष्टीची चौकशी करण्याकरितां आले, त्यांनीं निरनिराळ्या प्रकारें त्यांस वि-

चारलें, परंतु त्या दोघांतून एकही पत्ता लागूं देईना ! विष्णूनें सांगितलें कीं रात्रीं मी खोलींत निजलों होतों, लक्ष्मीही म्हणाली कीं मीदेखील खोलींत निजलें होतें ! लोकांनीं कोणच्याही गोष्टीचा माग न लागे तेव्हां असें अनुमान केलें कीं दोघांच्याही पोटांत कांहीं मादक पदार्थ गेला असावा व त्यामुळें त्यांस तशी भूल आली असावी. परंतु तीं दोघें वळचणीखालीं कशीं जाऊन पडलीं ह्याबद्दल कोणाचा तर्क बसेना.

मावशीबाईचीही स्वारी येऊन काशीबाईला कसें झालें काय झालें म्हणून विचारूं लागली. काशीबाईनें तिला सर्व मजकूर सांगितला तेव्हां मावशीबाई म्हणते:—" खरेंच सांगूं का मी ताई, ह्या अशा गोष्टी बाहेरवसा झाला म्हणजे होत असतात. ह्या गोष्टीला बाई त्यांच्या चेष्टा म्हणतात. तरी बरें, ह्या नवराबायकोला घट्ट बांधून कुठें लांब डोंगरांत नाहीं नेऊन टाकलें, नाहीं तर झाडाला नाहीं टांगून ठेवलें ! "

" मी असेंच म्हणालें, " ठकी म्हणते, " पण मला आई नी बाबा रागवायला लागलीं भलभलतें बोलूं नको म्हणून. ऐक आतां आई मावशीबाईचें, मावशी तुमचा असाच तर्क होतोना ? "

" अग हो. " मावशीबाई म्हणाली, " भुतांचे एक एक खेळ मी पाहिले आहेत. तरी पण तुमचें नशीब म्हणायचें त्या दोघांनां त्यांनीं जेरबंद करून नाहीं टाकलीं ! लक्ष्मी, तुझें आंग नाहींना दुखत ? "

" नाहीं. " लक्ष्मी म्हणाली.

" बरें त्याचें विचारा. " असें ह्मणून विष्णु लांब होता त्याला मावशीबाईनें हांक मारिली, आणि तिनें त्याला तसेंच तुझें आंग दुखतें का, कोणीं मारल्यासारखें वाटतें का ह्मणून विचारलें, व विष्णूनें नाहीं ह्मणूनच सांगितलें. नंतर मावशीबाई उठतां उठतां काशीबाई-ला ह्मणाली, " ताई, ह्याचा उपाय केल्यावांचून तू-ह्मी राहूं नका. ही आपली त्यांनीं तुह्मांला पाहिल्यानें सू-चना दिली आहे. कोणाला कोंबडें बकरें द्यायला करा नी चुकलें माकलें मागून घ्या. मी हवा तर माझा एक देव आहे त्याला कौल लावून त्याचा अं-गारा आणून देईन. "

काशीबाईनें ती गोष्ट कबूल केल्यावर मावशीबा-ई निघाली. विष्णूजवळ ती रात्रीच्याच गोष्टी बो-लण्याच्या निमित्तानें उभी राहिली, आणि जातां जातां त्याला ह्मणते:—" विष्ण्या, तुझी मसलत कळ-ली मला बर.का. असें ढोंग करून सुटशील का? "

" काय मावशीबाई, " विष्णूनें विचारलें, " क-सली मसलत ? कसलें ढोंग? ? "

" काय तें समजेल. " असें म्हणून मावशीबाई चालती झाली. ती गेल्यावर विष्णु आपल्याशीं पुट-पुटतो, " काय बुवा ही मसलत कसली म्हणते, नी मीं ढोंग कसलें केलें ! "

लक्ष्मीला तर कांहींच उमजेना. आपण वळचणी खालीं उभ्या असतांना आपल्या पायांशीं मनुष्य पडल्यासारखें जें बदकण वाजलें ते विष्णुपंतच अशी तिची खात्री होऊन गेलीच होती. परंतु त्यांची तशी अवस्था कशानें झाली हें तिला कळेना. मावशीबाईनें

भुतांचा प्रकार सांगितला तो तिला खरा वाटला नाहीं, कारण विष्णुपंत तिच्या डोळ्यांदेखत बाहेर निघून गेले होते. कोठें चोरी करतांना त्यांस मार बसून अशी अवस्था झाली ह्मणावी, तर मारांची कांहींएक खूण नाहीं. तिला आतां आणखी एक विचार सुचला त्यामुळें तिची मति तर गुंगच होऊन गेली. एकंदर चार वेळां ज्या शिळा वाजल्या, त्या सगळ्या एका घटकेच्या अवकाशांत ! एक पहिल्यानें आणि तीन नंतर. आतां जर विष्णुपंत बाहेर गांवीं कोठें गेले असावेत ह्मणावें, तर ते एवढ्याशा अवकाशांत आपलें कृत्य आटपून कसे येतील ? पुन्हां, ते गांवांतच गेले ह्मणावें तर रात्रीं सगळा गांव जागा झाला होता, परंतु चोरीचा कोणी शब्द सुद्धां काढला नाहीं ! रात्रीं विठ्ठलपंतांचे घरीं दरोडा आला अशी ओरड आपण बेसावध पडल्यानंतर गांवांत झाली होती असें मग लक्ष्मीला कळलें, परंतु विष्णुपंत आपल्याच घरीं चोरी करावयास आले होते ह्या विचाराचा जम लक्ष्मीला बसेना !

ती पूर्वीप्रमाणें आपली कालक्रमणा करूं लागली. तिच्या मनांत फार होतें कीं आपली नणंद येथें आली आहे, तर तिच्या सहाय्यानें तरी आपण आपला इच्छित हेतु साध्य करूं. परंतु तिला लवकरच कळून आलें कीं, ही अगदींच कुचकामाची आहे. तिच्या हातावर जो भाजल्याचा फोड उठला होता, त्याला लक्ष्मीनें औषध पाणी केलें, तेव्हां ठकीस वाटलें कीं वहिनी ह्मणजे जिवाच्या पलीकडे.

" कळला का तुला हा फोड वहिनी कसला आ

ला होता तो. " तिनें लक्ष्मीलो विचारलें.

" तुम्ही सांगितल्या शिवाय कसा कळणार ? "

" हे प्रताप आहेत तुमच्याच पतिराजांचे. तो आमच्या घरीं आला तेव्हां मी घरांत एकटीच होतें; मला म्हणाला कीं सहज हिकडे आलों. माझी मोडली होती नथ; मामंजी कांहीं नीट करून आणीनात; सासुबाईंनीं ती ठेवली पाळ्यांत टाकून; मी म्हटलें भाऊ, एवढी नीट करून आणशील ? भाऊ हो म्हणाला. मी त्याजवळ ती दिली. भाऊ म्हणाला मी ती उद्यां आणीन. भाऊचा दोन दिवस झाले तरी पत्ता नाहीं ! सासुबाईंनीं पाळ्यांत पाहिलें तों नथ नाहीं ! त्या लागल्या मला विचारायला. मी म्हटलें मला काय ठाऊक! सकाळपासून मला त्या म्हणत होत्या कीं माझी तूं उडदाची डाळ खालीस म्हणून,नी आतां नथीवरनें त्यांना आला होता राग,त्यानीं आपलें काय केलें, चुलींत घातली पळी तापत, नी मला धरून कबूल हो म्हणून दिला माझ्या हाताला डाग ! मग का मी त्या मेलीच्या घरांत राहतें ! लुगडें घेतलें नी माहेरची वाट धरली. असा बाई तुझा नवरा प्रतापी आहे बरें. पण वहिनी, तुला हें मी सांगितलें खरें, पण तूं माझी सख्खी मैत्रीण आहेस ना ? "

लक्ष्मी हो म्हणाली तेव्हां ठकी डोळे मिटून आवळून धरून तिला विचारते,"अगदीं सख्खी–सख्खी–सख्खी, सख्खी !" आणि असें बोलत ती तिच्या गळ्यांत हात घालते.

लक्ष्मीला तर तिची ती बोलण्याची तऱ्हा आणि तो पोरकटपणा पाहून हसूंच आलें. जों जों तिचें संभ

ट्टण या बाईशीं जास्त होऊं लागलें, तों तों तिचा पोरस्वभाव हिला स्पष्ट कळून आला. ती लक्ष्मीपासून उपटलेली मूद आपल्या वीतभर केंसांत घालून मुरकें मारूं लागली. तिनें दिवसांतून पंन्नास वेळां लक्ष्मीला मला मूद कशी शोभते ह्मणून विचारावें. तिनें बरी दिसते ह्मटलें कीं हिनें ह्मणावें, "काय करूंग, आतां मला नथ कधीं मिळेल तेव्हां मिळो;" आणि विष्णूच्या नांवानें शिव्या द्याव्या. ह्या गोष्टीवरून तर लक्ष्मीला तिचा कंटाळा आला, व: तिला तिनें कोणच्याही कामाला नादान ठरविलें.

तरी ठकीला मी आपल्या वहिनीला कोठें ठेऊं आणि कोठें नाहीं असें झालें होतें. हिच्याशीं आपण काय काय बोलूं, काय काय खेळूं, असें तिला वाटे. जरा कांहीं बोलावयाचें झालें तर तिला तिच्या गळ्यांत हात घातल्याशिवाय बोलतांच येऊं नये. "तुझी गडी मी कध्धीं कध्धीं तोडणार नाहीं," ह्मणून आपणच गांवातल्या मारुतीच्या आणि बहिरोबाच्या शपथा वहाव्या. सागरगोट्यांनीं खेळण्यांत तर तिनें लक्ष्मीची पाठ पुरविली होती. वारंवार तिला ह्मणावें, "काय करूंग वहिनी, शेजारच्या पोरी मजबरोबर भांडतात, नाहीं तर आपण कित्ती कित्ती खेळ खेळलों असतों." तिला जरा कांहीं तिच्या आईनें काम सांगितलें कीं—चल वहिनी; तांब्याभर पाणी आणावयाचें असलें तर—चल वहिनी. एक काडी उचलावयाची असली तर अर्ध्या काडीला वहिनीनें हात लावला पाहिजे. आणि हें सगळें

कशाकरतां ? तर तिची तिची 'कध्धीं कध्धीं' न तुटणारी 'सख्खी' मैत्री होती ह्मणून !

एक दिवस, उजाडलें, दोघीनींही अजून तोंडें धुतलीं नव्हतीं, तों ठकी ओटींत कांहीं घेऊन खात खात लक्ष्मी जवळ आली. तिनें तिच्या गळ्यांत हात घातला, आणि ओटींतून एक मूठ भरून काढून आपण आधीं एक बकाणा मारला, व दुसरी मूठ भरून काढून मोठ्या लाडालाडानें तिनें ती मूठ लक्ष्मीच्या ओंजळींत घातली. लक्ष्मी पाहते तों उडदाची डाळ! ती भावजयीनें उडदाची डाळ घेतली नाहीं म्हणून नणंदेला केवढा राग आला ! ती म्हणाली कीं माझ्या सासूबाईंनीं मजवर एकदा डाळ चोरल्याचा आरोप आणला होता हें मी तुला सांगितलें म्हणून तूं ही डाळ घेत नाहींस. लक्ष्मीनें तिला मी अजून तोंड धुतलें नाहीं, व मला डाळ आवडतही नाहीं म्हणून सांगितलें, तरी शेवटीं तिच्या नणंदेनें ठरविलें कीं आपण मात्र हिच्या मैत्रीसाठीं मरमर मरावें पण तें हिच्या गांवींही नाहीं.

ह्या गोष्टीनें ठकीचा लक्ष्मीला तिरस्कार आला एवढेंच नव्हे, तर तिचा तिला किळसही आला.

असें चाललें असतांना एक दिवस मावशीबाईची स्वारी आली. तिनें ठकीला एके अंगास घेऊन विचारलें कीं, " ठके, मी तुझ्या गांवाला गेलें तेव्हां तुझी सासू ह्मणाली कीं तूं पळून इकडे आलीस. तुझ्या सासूनें माझ्याबरोबरच तुझ्या आईला निरोप पाठविला आहे." ठकीनें तिचें आर्जव करून तिला सांगितलें कीं भाऊचा शोध कळवायला आलें म्हणून मी येथें सां-

गितलें आहे, तर तुम्हींही तसेंच सांगा. मावशीबाईनें विचार केला कीं हें दुसऱ्या कोणाकडून काशीबाईला कळेलच, मग आपण तरी अपेश कशाला घ्या ? तिनें उलटें काशीबाईला सांगितलें कीं चार दिवस मुलीला राहून घेऊन लवकर तिची रवानगी करून द्या असें ठकीच्या सासूनें सांगितलें आहे.

"ताई माझी कांहीं गरज करतां का ?" मावशीबाईनें काशीबाईजवळ येऊन विचारलें, " मी तुमचे रुपये फार दिवस ठेवणार नाहीं. "

" नाहींबाई, अलीकडे रुपयेच कोणाकडून येत नाहींत. नाहींतर दिले असते. असे कितीसे हवे होते रुपये ? "

" फार नाहींत कांहीं, साठ. "

" नाहींत बाई. नाहींतर तुम्हांला का नाहीं म्हटलें असतें ?"

" हाहा, " मावशीबाई तिच्यापुढें हात ओंवाळून बोलते, " केवढें चढवणीचें बोलणें बोलतां पण ! माझें काय तुम्ही पाहिलें अहां असें ? "

" काय म्हणजे ? तुमची ऐपतच आहे तशी. मावशीबाई म्हणजे आज झांकलें माणिक आहे आमच्या गांवांत. "

" अशी काय ती माझी ऐपत तुम्हीं पाहिली ? "

" ही ऐपत दिसते आहे ही तुमच्या आंगावर ! लांब नको जायला. गेला बाजार नेसायचें लुगडें तर दहा रुपयांचें असेल. ह्या आंगावरच्या घनवडीला तर आज पंधरा रुपये वाटचा चोर देईल. "

" हा हा, पंधरा रुपये देईलना ! पंनास नी शंभर

नी हजार नी दोन हजार नाहीं का द्यायचा ? उगीच मेलें काय बोलावें ? पण मला तुम्ही अशी विकायला का काढणार ? मेले रुपये नाहींत तर नाहीं म्हणून सांगा. हवातर कांहीं ऐवज आणून देईन. ”

“ ऐवज का ? तरी पण रुपये नाहींतच. तो मला संत्या धूवड आज संध्याकाळ पर्यंत रुपये देतों म्हणाला आहे, त्याच्याकडे आतां जातें. मिळाले, तर देतें तुम्हांला. ”

“ बरें मी जातें ऐवज आणायला; तोंपर्यंत तुम्ही रुपये आणून ठेवा. ” असें मावशीबाई म्हणाली. नंतर सहजगत्या लक्ष्मीकडे आपलें चित्त गेलेंसें करून ती काशीबाईला म्हणते, “ तुम्ही तरी मोठ्या मसलतीच दिसता मला ताई, पोरीला काम करायला लावायची ती लावायचीच, आणखी झिजतील म्हणून तिच्या आंगावरचे दागिने काढून ठेवायचे का ? तरी तुम्ही करतां तें एका अर्थी ठीकच म्हणायचें, कारण असें केलें म्हणजे सांडायलोटायची भिती नाहीं. ”

“ भिती नाहीं तर काय झालें ? तिनें आम्हांला घातलान आहे थोडासा गंडा. ” काशीबाई म्हणाली.

“ तो कसला ? ” मावशीबाईनें घाबरल्यासारखें करून विचारलें.

“ अहो तिनें परवां दोन भोंकराचीं मोत्यें किंहो सांडलीं ! ”

“ एवढेंचना ? आणखी नाहींना कांहीं तिनें तुमचें सांडलें ? हो खरेंच, हा घ्या अंगारा. मला मेल्ली आ-

णायची इतके दिवस आठवणच नाहीं झाली. तुमचे उपाय झालेच असतील, पण मेला माझा एक असूंदे त्यांत अंगारा. ”

“ आह्मींही कांहीं देवाचीं देणीं राहिलीं होतीं तीं देऊन टाकलीं. ” काशीबाई ह्मणाली.

“ तुह्मीं रुपये आणायला जा; मी जिंनस जाऊन आणतें. ” असें मावशीबाई बोलून निघून गेली. ती गेल्यावर काशीबाई मुलींस ह्मणते, “ लबाड मेली साऱ्या मुलखाची. रुपये घेऊन उद्यां कोठें नाहींशी झाली तर हिचें काय घ्या ? बरें, ऐवजतरी काय आणते पाहूं. ”

पाव घटकेंत मावशीबाई आली, आणि उभ्या-नींच एक सरी काशीबाई पुढें टाकून तिनें जरा का-णा डोळा करून लक्ष्मीकडे पाहिलें. नंतर पाय मो-डल्यासारखें मटकन बसून ती डोळ्यांला पदर लावून गळा काढून रडूं लागली !

“ हें काय हो मावशीबाई ! असें काय करतां !” काशीबाईनें तिला विचारलें.

मावशीबाईनें पदरानें डोळे झांकलेच होते. ती पूर्वीपेक्षां अधिकच हेल काढून तिला ह्मणते, “ काय करूं हो—अँहह—मेले—होते—आज सात वर्षें झालीं. लहानसहान का दुखणें तें ! अँहह—कष्ट केले—नाहीं देवाच्या मनांत—यश द्यायचें. अँहह—सगळें घरदार औषधपाण्याखालीं गेलें. अँहह—एवढी एवढी—सरी माझ्या गळ्यांत शेवटीं राहिली. प्राण सोडतांना ह्मणाले—एवढ्या सरीला जप बरें. ही तुला निदानींच्या प्रसंगीं तरी उपयोगीं पडेल. दळण

कांडण कोणाचीही मोलमजुरी कर, पण लांडी लबाडी करूं नको. सरीला हातलावूं नको. अँहह."

"उगी बाई," काशीबाई म्हणाली, "रडून काय होणार? मेल्याबरोबर तर मरवत नाहीं. उगी. मी आलें त्या धवडाकडे जाऊन. दिलेन त्यानें रुपये. तुम्ही म्हटलें येतां कीं नाहीं कोण जाणें, म्हणून ठेवले फडताळांत नेऊन."

"ही सरी मला ताई अडल्या गरजेला उपयोगीं पडते बरें. गरज लागली कीं तुमच्यासारख्यांच्या घरीं नेऊन ठेवावी. मग सावकास कोणाची मोलमजुरी करून सोडवून न्यावी."

लक्ष्मी फार लांब नव्हती. तिला सरीचा संशय आला; कारण कीं तिची सरी जशी जेथें वांकडी झाली होती तशी हीही आहे! तिनें जरा जवळ उभें राहून पाहिलें तों ती तिचीच सरी अशी तिची खात्री झाली. तिची सरी फांशाजवळ खरचटली होती, हीही तशी आहे! तिच्या सरीचा एके जागीं थोडासा पीळ उलगडला होता, हिचाही तसाच उलगडलेला आहे! तिनें वापरलेली सरी ती, ती तेव्हांच तिनें ओळखली! काशीबाईनें घरांतून जाऊन रुपये आणले. मावशीबाईनें डोळे पुसून नाक शिंकरून रडें आटपलें. खरोखरच अश्रु आले होते कीं नव्हते हें तिच्या डोळ्यांसच माहित! बाईचे गाल गोरे व गुबगुबीत असल्यामुळें ते पदरानें चोळून चोळून मात्र लाल झाले होते!

काशीबाईचा व तिचा व्याजाचा ठराव झाला. तिनें मोजून वाजवून साठ रुपये पदरांत घेतले, व काशी-

बाईनें सरी आंत नेऊन ठेवण्याकरतां उचलली.

" संभाळा बरें माझ्या सरीला," मावशीबाई ह्मणते, " नाहीं तर बदलालबिदलाल एखादी. उगीच माझ्या गरिबाच्या जिवाशीं घोळ नको. बदलाल वर का? ह्मणजे तुह्मी मुद्दाम नाहीं, असलीच जर तुमच्या घरांत एखादी असली, तर दोन्हीही बदलून जायच्या. तुमचाय तोटा नको नी आमचाय नको."

"मी तुमची सरी निराळीच ठेवतें." काशीबाई म्हणाला.

" निराळी ह्मणजे तुमच्या फडळांतच ना? नको तसें करूं. तुमची आमची बदलून जाईल. मला पाहून तरी ठेवूं दे. आणा पाहूं तुमची !"

"नाहीं हो बदलत. मी घरीं आल्यावर हवी तर तुमच्या सरीच्या गळ्यांत चिठ्ठी बांधून ठेववतें तुमच्या नांवाची."

"नको हो, नको हो, तसें करूं नका! ती चिठ्ठीबिठ्ठी मला कांहीं नको नी पुरुषांच्या हातांत माझा दागिना जायला नको. पुरुष मेले संशयखोर असतात. लागलीच दादा ह्मणतील कीं एवढी सरी साठ रुपयांवारी ह्या मावशीनें कशी ठेवली ! ती कांहीं पंचाईत मला नको. तुमची सरी मला दाखवा ह्मणजे झालें."

" माझी तर हिच्याहून मोठीच आहे येऊन जाऊन हिची सरी बदलायची."

" आणा पाहूं मला ती पाहून ठेवूंदे." असें ह्मणून तिनें तिच्याकडून ती सरी आणविली. व दोन्ही लावून पाहतां एकसारख्या निघाल्या. ह्या सऱ्या बदलूं नयेत ह्मणून त्यांच्या खुणा त्यांनीं तपासून

ठेविल्या. त्यांत लक्ष्मीच्या ओळखीच्याही खुणा होत्या, परंतु ती काय कोणच्या तोंडानें बोलणार !

लक्ष्मीच्या मनाचा गोंधळ किती झाला असावा बरें ? नवऱ्याच्या चोरीमध्यें मावशीबाई सामील आहे काय ? दोन्ही सऱ्या ताडून तिनें जो इतका तमाशा केला ह्याला काय ह्मणावें !

मावशीबाई रुपये घेऊन निघाली. वरीचशी लांब गेल्यावर ती आपल्याशीं पुटपुटते, "हे रुपये नेऊन त्या मेल्या वामन्याच्या मढ्यावर घालायचे. गुलाम पत्ता लागूं देत नाहीं रमाबाईनें त्याला काय काय सांगितलें आहे तें. मला ह्मणाला कीं रमाबाईच्या जांवयानें सरी चोरून नेली आहे तिचा शोध तुह्मांला लागला तर सांगा. हें त्यानें मला सहजींच विचारलें कीं खरोखरच माझें त्याला कांहीं कळलें आहे ह्याचा अद्दमास लागत नाहीं. एकंदरींत मी केलें आहे हें ठीकच आहे. ज्याचा माल त्याच्या दरांत नेऊन टाकला आहे. मुद्दा मजजवळ नसल्यावर मी कोणाच्या बापालाही दाद द्यायची नाहीं. सरी मोडून टाकावी तर मेला सोनारही गेला आहे तो येत नाहीं. वाटवेकरांच्या किंवा विप्ण्याच्या एव्हांशीं वाटेला जाऊं नये. हे रुपये वामनरावाला आधीं नेऊन द्यावे, ह्मणजे–त्यांतला–हिस्सा द्यायला–मी त्याच्या उरावर बसेन. कांहीं चिंता नाहीं–त्या घरांत तरी निदान मी भोंक पाडणारच."

भाग एकविसावा.

काशीबाईच्या लैंकीला डाळींची ह्मणजे

मोठी आवड. सगळ्यांत उडदाच्या डाळीची फार. तिच्या सासरीं सासूनें डाळ करून मडकें भरून ठेवावें: पांच सहा दिवशीं मडकें रिकामें! बापड्या उंदीर घुशींला उगाच श्राप. आपल्या घरांत चालती बोलती घूस आहे, हें त्या बिचाऱ्या सासूला फार दिवस कळून आलें नाहीं. एक दिवस मुद्दाम ती हातांत बडगा घेऊन जागत बसली; इतक्यांत ही दोन पायांची घूस हळुच जाऊन डाळ ओटींतूं घेऊं लागली तों मागून पाठींत बडगा बसलाच. इकडे माहेरीं आल्यापासूनही तिनें बहुतेक उडदाच्या डाळीचा फडशा पाडला. ओटींत डाळ घेऊन तिनें जातां, येतां, उठतां, बसतां, ती खात असावें. तिचा उद्योगच तो. वहिनीची आपली फारच गडी, ह्मणून तिनें मोठ्या प्रेमानें वहिनीच्या पुढें डाळ करावी, आणि वहिनीनें ती नाकारावी. "वहिनी," मग ठकी तिला ह्मणे, "मी सासरीं होतें तेव्हां सासुबाई मला डाळ चोरून खाल्लीस ह्मणून म्हणत, पण मला येथें कांहीं ती चोरून घेतली म्हणून नाहीं कोणी म्हणणार. माझ्या आईच्या डाळीवर माझी सत्ता आहे, तूं घेतलीस म्हणून कांहीं हरकत नाहीं."

पण लक्ष्मी कसली मरूख, तिला ती डाळ आवडेचना! आपण मोठ्या प्रेमानें पुढें केलेली वस्तु लक्ष्मी घेत नाहीं तेव्हां ती कपटी ठरली. मग ठकीनें ह्मणावें, "वहिनी, मी माझ्या सासरची गोष्ट सांगितली ती सगळी लबांडी बरें का; मी मुळीं सासुबाईंच्या डाळीला हातय लावला नाहीं, त्यांनीं मला चोरय ह्मटलें नाहीं, नी" तिनें हातावरील फोड पदराखालीं

झांकून ह्मणावें, " नथी करतां त्यांनीं माझ्या हाताला डागय दिला नाहीं ! "

एक एक दिवस ह्या बयाचा लक्ष्मीला अधिक अधिकच वीट येऊं लागला. तिच्या स्वभावाची तिला ओकारी आली. तिची ती टाळाटाळ करूं लागली; कारण आपल्या नणंदेचा आपल्याला जो तिटकारा आला आहे तो झांकण्यास होईल तितका तिच्याशीं कमी परिचय ठेवावा हाच काय तो तिला उपाय राहिला होता. विष्णुपंतांच्या वर्तणुकीचा अलीकडे लक्ष्मीला कांहींच पत्ता लागेना. काशीबाईनें त्याला विचारलें तेव्हां त्यानें मी खोलींतच निजतों ह्मणून सांगितलें. लक्ष्मीला ही गोष्ट खरी नाहीं म्हणून सांगण्याचा मुळींच धीर नाहीं ! विष्णुपंत पूर्वी ओटिवर निजत असत त्या वेळीं त्यांना काशीबाईच्या भीतीस्तव निदान मध्यान्हीपर्यंत तरी घरीं असावें लागे. आतां ओटी सुटल्यापासून काशीबाईच्या दृष्टीआड खोलींत जाऊन निजलों आहेसें निमित्त करून त्यांना लवकरच बाहेर जावयास सांपडे. ह्या रात्रीं कोठून कांहीं अनर्थ झालेला ऐकूं येतो कीं काय अशा धास्तीनें लक्ष्मीनें आपल्या खोलींत रात्रीच्या रात्री जागून काढाव्या. जरा डोळा लागल्यास तिनें दचकून उठावें. तिला भलभलतेंच कांहीं झाल्याचीं स्वप्नें पडावीं. मावशीबाईनें तिच्या स्वप्नांत हजार वेळ यावें. अशी ह्यावेळीं लक्ष्मीच्या मनाची स्थिति होती, आणि आपल्या हातून कांहींच उपाय होत नाहीं, ह्मणून तिला तळमळ लागून राहिली होती.

अशावेळीं आपल्या शेजारच्या मुली तरी कांहीं

उपयोगीं पडतील ह्मणून लक्ष्मी त्यांच्यांशीं विशेष परिचय ठेवूं लागली. तिनें आधीं त्यांच्याजवळ कांहीं सांगितलें नाहीं; कांकीं त्यांच्या मनाचा हिला पुरता अंमल्या नाजुक गोष्टी सांगण्यासारख्या अद्‌-मास लागला नव्हता. ह्या मुलींशीं आपल्या भावजयीचें अमें संघट्टण पडत असलेलें पाहून ठकूआक्कांच्या कपाळाला तर तिडिकच गेली. लक्ष्मीविषयीं तिच्या मनांत वाईट येऊं लागलें. तिनें लक्ष्मीला वारंवार बजावलें कीं शेजारच्या मुली फार वाईट आहेत, त्या माझ्याशीं भांडतात, याकरतां त्यांची संगत तूं धरूं नको. लक्ष्मीनें तिच्या उपदेशाकडे लक्ष्य दिलें नाहीं, तेव्हां तिला फारच संताप आला. राधा व यमुना ह्या लक्ष्मीशीं स्नेहभावानें वागूं लागल्या. तुला काय येतें, मला काय येतें, हिला काय येतें अशा एकमेकींच्या चौकशा होऊन त्या एकमेकींस जें कांहीं येत नसेल तें शिकवूं लागल्या. लक्ष्मी पुराण येथें असतांना चोळ्या चांगल्या शिवावयास शिकली आहे, अमें जेव्हां त्या मुलींस कळलें, तेव्हां त्या आमच्या चोळ्या शिवून दे ह्मणून तिच्या पाठीस लागल्या. लक्ष्मीला पुढचा हेतु साध्य करावयाचा होता, ह्मणून तिनें ही त्यांची गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली. तिनें त्यांचें तें काम पत्करिलें, परंतु तें करावयास तिला सोईकर अशी जागा सांपडेना. शेवटीं तिला आपल्या घरची माडी आढळली. ह्या माडिवर विष्टलपंतांनीं धान्याच्या हांड्या व कणंगी लावून ठेविल्या होत्या, तेथेंच एके आंगाला जागा सारवूनसुरवून तिनें आपल्याला बस-

ण्याकरतां जागा केली, व वेळांत वेळ काढून, आणि सासुबाईचें आतां कांहीं नडणार नाहीं असें पाहून ती तेथें ठकीचे नकळत जाऊन बसूं लागली. लक्ष्मी आपल्याला चुकवून कोठें जाऊन बसते, असें जेव्हां ह्या आक्काच्या आढळांत आलें, तेव्हां ती लक्ष्मीचा द्वेष करूं लागली. शेवटी तिनें तिची बसण्याची जागा हुडकून काढली. आणि जेव्हां ही येथें बसून आपल्या वैरिणींचीं कामें करून न देत असते असें तिला आढळलें, तेव्हां तिनें तिला आपल्या आईपर्यंत नेऊन तिची फटफजिती केली. इतका प्रकार झाला तरी लक्ष्मीनें माडीची जागा सोडली नाहीं. आक्का तिचा शोध करीत आली ह्मणजे हिनें आपलें काम मात्र दडवून ठेवावें.

एके दिवशीं वामनरावांचा विठ्ठलपंतांस निरोप येऊन पोंचला कीं कांहीं जरुरीच्या कामाकरतां मी तुमची भेट घेण्याला आज सायंकाळपर्यंत येईन, याकरतां तुह्मी घरींच असावें. विठ्ठलपंत त्याप्रमाणें घरीं राहिले. हे आतां उन्हाळ्याचे दिवस आले होते, ह्मणून दुपारचें जेवण झाल्यावर विठ्ठलपंत आपल्या खोलींत जाऊन निजले. घरांतलें सर्व कामधाम आटपल्यावर काशीबाई व ठकी ह्याही निजल्या, आणि लक्ष्मी आपलें काम करावयास माडीवर जाऊन बसली.

ज्या भिकाऱ्यानें मध्यें आडवें येऊन विष्णूला व लक्ष्मीला डागूं दिलें नाहीं, त्या भिकाऱ्याची भिक्षेला येण्याची हीच दुपारची वेळ असे. तो आज ह्या वेळीं येऊन भिक्षा घाला हो ह्मणून ओरडून ओ-

रडून थकला, तरी त्याची हांक कोणाला ऐकूं गेली नाहीं; कारण लक्ष्मी माडीवर असून बाकीच्या मनुष्यांस खालीं झोंप लागली होती. शेवटीं त्यानें एक मोठ्यानें हांक मारली, आणि ती लक्ष्मीला ऐकूं गेली. तिनें तेथीलच मूठभर धान्य घेऊन खालीं येऊन त्या भिकाऱ्यास भिक्षा घातली. परंतु त्या भिकाऱ्याच्या हांकेनें ठकीही जागी झाली होती, ती त्याला भिक्षा घालण्याकरतां येत आहे तों तो म्हाताऱ्यारा परतला होता, व लक्ष्मी आपल्या माडीवर जाऊन बसली होती. म्हाताऱ्यानें मागें मुरडून ठकीला सांगितलें कीं "मला भिक्षा मिळाली," आणि तो पुढें चालूं लागला. त्याला तसा जातांना पाहून ठकी एकदम ओरडली, "बाबा धांवाहो, वाहिनीनें तुमचें सगळें घर लुटलें!"

त्या बराबर विठ्ठलपंत धडपडून उठले, " त्यांला ठकी म्हणाली, "बाबा तुम्हीं म्हणत होतां ना माडीवरच्या डाळी नी बाजरी नी कशी नाहींशी होते म्हणून ? घूस म्हणावी तर ती माडीवर येत नाहीं. तर पहा आतां वाहिनीनें त्या म्हाताऱ्याला काय दिलें आहे तें. मी त्याला भिक्षा घालायला येत आहे तों तिनें माडीवरून त्याला कांहीं देऊन वाटेला लावला; मी त्याला हांक मारतें तर तो मला भिक्षा मिळाली म्हणून पुढें चालता होतो!"

मग विठ्ठपंताचा तो राग! लक्ष्मी वर होती तिला त्यांनीं हांका मारल्या, त्या बरोबर काशीबाईही जागी झाली. लक्ष्मीला त्यांनीं विचारलें तेव्हां ती म्हणाली मी फक्त त्याला मूठभर बाजरी घातली.

परंतु त्यांस तें खरें वाटेना. विठ्ठलपंतांनीं जाऊन त्या भिकाऱ्याला फराफर ओढीत आणलें, आणि त्याच्या झाडा घेतला, तों त्याजवळ शेरभर बाजरी मिळाली ! त्यानें सांगितलें कीं मी ही घरोघर भिक्षा मागून मिळविली आहे, तरी त्यांनीं त्याजपासून ती बाजरी परत घेतली, व आपल्या कणंगींत नेऊन टाकली. त्या ह्याताऱ्याला ओढून आणीत असतांना, त्याच्या पटकुरामध्यें जें भिक्षेचें ओलें अन्न होतें, तें मातींत पडून गेलें. एवढ्यानेंच विठ्ठलपंतांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं त्या ह्याताऱ्याच्या तोंडांत अशी एक दिली कीं त्याचे शेष राहिलेले दोन दांत पडून गेले. नंतर ते लक्ष्मीच्या आंगावर धाऊन गेले, व तोंडानें म्हणाले, " तुझा बापच कीं नाहीं तो: त्या दिवशीं तुला त्यानें डागू दिलें नाहीं म्हणून. आंगांतून एक एक रक्ताचा थेंब काढावा, तेव्हां एकएक दाणा मिळतो. " नंतर त्यांनीं ते कुळांस ज्या प्रकारच्या शिव्या देत असत, त्या प्रकारच्या शिव्यांचा तिजवर वर्षाव केला; आणि काशीबाईनें तिच्या आईचा मामलेदारणीचा झोंक नी फणकारा, तिच्या बापाची मामलेदारी नी तिची गर्भश्रीमंती, चटसारें बाहेर काढलें; व ठकीनें बाबांस खचित ही लक्ष्मी भिकेला लावणार ह्मणून आपल्या आईच्या मंगळसूत्राची शपथ वाहून सांगितलें !

ह्या सर्वांस लक्ष्मी काय उत्तर देणार ! आड कोठें तरी जाऊन बसून अश्रु ढाळावे हेंच तिचें उत्तर. तिनें आपलें दुःख कोणाजवळ सांगावें ! तिचें समाधान कोण करणार ! तिचा कोणाला दव येणार !

तिचे ओंचे हेच तिचें समाधान करणार, तिचे अश्रु पुसणार, त्यांनाच तिचा द्रव येणार. रडून रडून ओंचे ओले करावे हेंच तिच्या मनाचें सांत्वन.

लक्ष्मी आड जाऊन रडत बसली ती मागीलदारच्या पडवींतील खोलींत. तिनें दार ओढून घेतलें होतें. घटकाभऱ्यानें वामनराव विठ्ठलपंतांकडे आले. वामनरावांस जें कांहीं त्यांच्याशीं बोलावयाचें होतें, तें ओटीवर एक दोन कुळें येऊन बसलीं असल्यामुळें त्यांस तेथें बोलतां येईना, म्हणून ते दोघेही मागीलदारचे पडवींत येऊन बोलूं लागले. लक्ष्मीला ते खोलीच्या दाराशींच उभे असल्यामुळें बाहेर निघतां येईना; तेव्हां ती तशीच आंत राहिली.

लक्ष्मीला आपल्याला उगीचच्या उगीच बोलून घ्यावें लागलें म्हणून वाईट वाटलें तर खरेंच, परंतु ज्याची मान लटलट कांपते आहे, ज्याच्या डोळ्यांनीं धड दिसत नाहीं, ज्याचा अस्थिपंजर मात्र उरला आहे, आणि ज्याला मृत्यु लवकर कां सोडवीत नाहीं असें झालें आहे, त्या म्हाताऱ्याची तिला फारच कींव आली. त्याचें भिक्षा मागून मिळविलेलें तें अन्न, त्या अन्नांत माती घातली, आणि म्हातारपणचे दोन दांत राहिले होते तेहीं गेले, हें पाहून तिचें तर हृदय उलून गेलें !

वामनराव म्हणालेः—" सरकारांतून गेल्याच्या मागच्या महिन्यांत जाहिर करण्यांत आलें आहे कीं आजपासून सहा महिन्यांचे आंत पाटील न सांपडल्यास त्याची दौलत सरकारजमा केली जाईल. "

" असे आजपर्यंत पुष्कळ हुकूम आले. " विठ्ठलपंत म्हणाले.

" आले तरी हा शेवंटचा यांत संशय नाहीं. हीं दोन तीन वर्षें वासुदेवपंत होते म्हणून त्यांनीं तशी व्यवस्था केली. परंतु आतां हा सरकारचा शेवटचा निकाल आहे. येथें पाटील सांपडण्याचा संभव आहे वगैरे कांहीं लटपट चालावयाची नाहीं. "

" मग तुमचें काय म्हणणें आहे ? "

" हातांतला ससा जाऊं द्यावयाचा नाहीं. "

" त्याला तजवीज ? "

" कर्ज रोखे. तें काम आमच्याकडे लागलें. धनकोनाम तुम्ही कबूल असा म्हणजे झालें. "

" आणि पाटील सांपडला तर ? पुढें कसें ?"

" तो काय सांपडतो हो मी त्याला काळ्या पाण्यावर पाठवला ना. "

" तें तुमचें काळें पाणी सध्यां राहूं द्या. असा प्रसंग आला तर काय तजवीज ती बोला. "

" मागें आपण केलेली तयारी पुढें आणायची. तें नाहीं तर हें, पण शिकार गमवितां उपयोगीं नाहीं. "

" तें काम आतां साधेल ? साक्षीदार पूर्वीसारखे आतां कबूल असतील ? "

" मोळा आणे. मी एक विधवा म्हणतों तिनें तर सव गोष्टींचा पत्कर घेतला आहे. ती म्हणाली कीं, दोन तीन असे तुम्हांला तरणे पट्टे ज्वान देतें कीं शाबास."

" बरें, हें आमच्या जवळचें त्या साक्षीदारांना कळलें कसें असा प्रश्न निघाला तर ? "

" त्याचीही तजवीज ती विधवा सोळा आणे कर-

तें म्हणाली. तुम्ही तिच्याविषयीं बेफिकीर असा. मात्र, दोन हिस्से तुमचे, एक हिस्सा आमचा, आणि एक ती सोडणार नाहीं. तिचें साह्य मला पुष्कळ आहे. पहिल्यानें मीं तुम्हांला जी गोष्ट सांगितली, तिच्या साक्षीदारांकरतां मला साठ रुपयांची गरज होती, ते तिनें मला तत्काळ आणून दिले. तुम्ही एवढ्या गोष्टीची खात्री द्या कीं, मागें दुष्काळामध्यें त्यानें तुमच्या घरीं रुप्याची परात आणून ठेवली होती म्हणतां, तर ही गोष्ट कोणाला माहित आहे कीं काय?"

"त्यानें मुळीं आमच्या घरीं ती दडवूनच आणून ठेवली. आणि त्यावरून मी तर्क केला कीं येथें कांहीं तरी जास्ती आहे. तुम्हीं म्हणाला कीं जाऊन ह्या गोष्टीची खात्री करून घेऊं. आपण गेलों, पण जिवावर बेतली होती."

"तें मागचें आतां राहूं द्या. तुम्ही प्रसंग पडल्यास दोहोंतून एका गोष्टीस कबूल असा म्हणजे झालें. दोन्हीही गोष्टी संभवण्याजोग्या आहेत. तुम्ही मोठे सावकार आहां. तुमचें घराणें इनामदारीचें आहे."

"तुम्ही पाहिजे तसें करा. आम्ही होचे धनी. आंगावर न शेकण्यासारखें करा म्हणजे झालें."

"हें काम लवकरच करून टाकलें पाहिजे. पुढें वासुदेवपंतांचें काम आमच्याकडे फार येईल. त्यांच्या घरीं लग्न उभें राहणार आहे. त्यांच्या बायकोनें सरीचा घोळ घालून ठेवला आहे तो वेगळाच."

नंतर ते निघून गेले. त्यांचें तें पाटलाविषयींचें बोलणें ऐकून लक्ष्मीच्या आंगावर कांटा उभा राहिला,

आणि वामनरावांच्या तोंडचे सरीवद्दलचे शब्द ऐकून तर तिचें काळीज चर्र झालें.

भाग बाविसावा.

त्या दिवसापासून लक्ष्मीची माडी बंद झाली, व मैत्रिणींचें कामही बंद झालें. आक्कानें तिला 'भली झाली,' 'खोड मोडली,' म्हणून वरचेवर ह्मणावें.

आतां अशी वेळ येऊन ठेपली कीं लक्ष्मीचें आणि ठकीचें विशेष संघट्टण घडून यावें. ती वेळ ही कीं काशीबाई आजारी पडली. ती आजारी पडल्यावरोबर घरांतील स्वयंपाकाची पंचाईत येऊन पडली. स्वयंपाक करावा कोणी? ठकी व लक्ष्मी दोघीही आतां लहान होत्या असें नाहीं. त्यांत ठकी तर शुद्ध ओंडा. तिनें मला अमुक करतां येतें, तमुक करतां येतें, म्हणून आईजवळ आडवी जीभ घालून सात सात हात बाता माराव्या एवढेंच, पण ढेंमा चुलीशीं जाऊन बसला कीं विस्तव पेटवितां येण्याची मारामार. असो. सर्व अधिकार लक्ष्मीकडे आला. त्यांत तरी आक्कानें स्वस्थ बसावयाचें होतें! डाळ कुडकुडु तोंडानें खात लक्ष्मी करील त्यांत ढवळाढवळी करावी, तिला करतां येत नाहीं ह्मणून नांवें ठेवावीं, आणि हिनें अमुक मीठ नासलें नी अमुक डाळ खरचली ह्मणून आईजवळ जाऊन ओरड करावी. लक्ष्मीच्या भावाच्या लग्नाचें ठरत आहे असें तिनें वामनरावांच्या तोंडून ऐकलें होतें, परंतु आई गेल्यापासून तिकडची वार्ता काय आहे ह्याचा तिच्या कानावर एक देखील शब्द आला नाहीं; तिनें सरीचा घोळ घा-

तला आहे तो किती तें समजत नाहीं. सर्व दुःखांचा व काळजीचा भार अंतःकरणांत वाहून लक्ष्मीनें सारा दिवस कामाचे गाडे ओढीत असावें, ह्यामुळें तर आपल्याला दुखणें येईल कीं काय अशी तिला भीति पडली. कामाची फार ओढ ह्मणून तिनें मोठ्या पहांटेस उठावें. केर पोतेरें सडासारवण एवढ्या घराचें होई तों उजाडे. नंतर तिनें सासूच्या जोपासनेस लागावें. तोंड धुण्यास ऊन पाणी आदि करून तिचे सर्व उपचार झाले ह्मणजे काका वैद्यानें सांगितलेल्या औषधांचा तिला काढा करून द्यावा. नंतर धुणेंपाणी वगैरे आटपून स्वयंपाकाकडे लागावें. आक्काला ती मला अमुक एक काम करूं लागा असें म्हणत नसे कीं ती लागत नसे. उलट तिचें सर्व काम हिजवरच पडे. रात्रीचीं जेवणें खाणें आटपा, भांडीं घासा, तों सहज मध्यान्हीची वेळ येई. नंतर तिला आंग टाकावयास फुरसत मिळे. काळजीपुढें तिची झोप तर पळालीच होती, परंतु चुकूनमाकून आपला डोळा लागल्यास पहांटेस उठतां येणार नाहीं, ह्मणून तिनें भुईवरच पडावें.

याच वेळेस मावशीबाई आपल्या घरीं फार येत असते असें लक्ष्मीला आढळून आलें. काशीबाईच्या समाचाराला ह्मणून ती वरवर येते, परंतु ठकीच्या आणि तिच्या बराच वेळ कानगोष्टी चाललेल्या असतात, असेंही तिला कळून आलें. लक्ष्मी मावशीबाईचा तिटकारा करीत असे, व तीही हिला दुष्टासारखी पहात असे. ठकाईमावशी आपल्यावर काय कंवटाळ आणतील कोण जाणें अशी त्या

विचारीला फार धास्ती होती. मावशीचा अद्दमास तिला लागेना; आक्का तर तिचें न्यून केव्हां पडेल आणि केव्हां तें मी बाहेर काढीन म्हणून सदा टपलेला असे.

हा उन्हाळा होता हें मागें आम्हीं सांगितलेंच आहे. एक एक दिवस लोटत चाललाच होता. काशीबाईची प्रकृति ह्मटलें असतां आतां स्वयंपाक हातांत घेण्याजोगी बरी झाली होती, परंतु आयतेंच पंक्तीला बसायला मिळाल्यावर रिकामा उपद्व्याप कोण करतो? विठ्ठलपंताला आतां शेजारच्या गांवांतून वसुलाला जावयाचें असे, ह्मणून ते लवकरच ह्मणजे बारा वाजतां जेवून जात. एके दिवशीं विठ्ठलपंत व विष्णु एके पंक्तीला, आणि काशीबाई दुखणेकरीण ह्मणून आणि ठकी माहेरवाशीण ह्मणून त्यांच्या समोरच्या पंक्तीला जेवावयास बसलीं होतीं, व लक्ष्मी त्या सर्वांस वाढीत होती. विठ्ठलपंतांस बोलावयास फुरसत काय ती जेवणाचे वेळीं; ते आतां काशीबाईला ह्मणाले:—

"ऐकलेंस का तुझी विहीण काय ह्मणते ती!"

"काय? मी नाहीं ऐकलें. काय ह्मणते?"

"तरी मी परवां वामनरावांच्या तोंडून निसुटतें ऐकलें, पण मी गडबडींत होतों, तिकडे इतकें लक्ष्य गेलें नाहीं. तुमच्या विहिणीनीं सरी सांडली आहे; त्या ह्मणतात कीं रेवगांवास मी गेलें होतें तेव्हां काळ्यांच्या घरीं सांडली!"

"अं:!" काशीबाई आश्चर्यानें ह्मणते, "काळ्यांचे घरीं सांडली ह्मणतात! मग आमच्या घरीं

येथेंच रमाबाई असतांना नाहीं कोठें बोभाटा झाला तो ? ”

“ ती पहिल्यानें नवऱ्याला कांहींच पत्ता लागूं देईना ! शेवटीं तिनें कुभांड रचलें कीं रेवगांवास काळ्यांच्या घरीं सरी सांडली. ”.

“ काळ्यांनीं चोरली नाहींना म्हणत ! काय बाई ढालगज बायको तरी ! जातांना तमाशा करून गेली तेवढा नाहीं पुरेसा झाला. आतां आमच्यावर असला आळ घालते ! ”

“ घालीना का. आम्ही कुठें तिला इतके भितों आहों. मी बोलत नाहीं तोंपर्यंत. जोडे काढून दोन पायपोस नाहीं मारणार ! ”

“ पण कसा त्या बायकोचा चमत्कार आहे पहा. हंः ! शाबास ग शाबास. ! ” मग लक्ष्मी भात वाढीत होती तिच्याकडे पाहत पाहत काशिबाई म्हणते, “ पण तुम्ही घरांत येथें कांहीं कमी समजूं नका हो ! खाण तशी माती. एक एक गोष्टी आहेत मला ठाऊक. मला कांहीं समजत नाहीं म्हणत असेल, पण मी म्हणतें पोर आहे, थोडकी बाच, असूं दे. वेळ आली म्हणजे सांगेन. ”

“ खरें म्हणशील कीं नाहीं, ” विठ्ठलपंत म्हणाले, “ रमाबाईसारख्या माणसांशीं नातें असणें म्हणजे मोठें लांछनच आहे. आतां पोराला पोरगी कोणाची करते पाहूं. मला तर बुवा ती असें असें म्हणते म्हणून ऐकलें तेव्हां लोकांला तोंड दाखवायला लाज वाटूं लागली. ”

“ वाटेलच. तरी बरें ! आमच्या घरांत अम-

क्यानेंच सरी चोरली म्हणून तिनें नाहीं नांव घेतलें. ती कमी करायची नाहीं. आम्हींच चोरली म्हणत असेल तर ये म्हणावें घे आमच्या घराचा झाडा. तूं अधिकारीणच आहेस, तुझ्या हातांत सरकार नी सरकारचे शिपाई आहेत. घरांत आज तीन सऱ्या आहेत, घे त्यांत तुझी असली तर ? ”

“ दोन आपल्याच घरांतल्या दोघींच्या दोन. ” विठ्ठलपंत थट्टेनें म्हणतात, “ पण तिसरी कोणाची ? तिचीच कीं काय ? ”

“ हो. येते आहे तिची. लागलीच ती गहाण ठेवणारी उरावर बसेलना मामलेदारणीच्या तिनें माझी म्हटल्यावर ! ” काशीबाईनें उत्तर दिलें.

“ अशी कोणाची सरी तूं गहाण ठेवली आहेस. सांग तरी मला. ”

“ नाहीं सांगायची, ” काशीबाई हंसून म्हणाली. “ बारा तोळ्यांची सरी साठ रुपयांवारी ठेवली आहे. तिची मालकीण कोणाला नांव सांगूं नका म्हणाली आहे. ”

“ तुझा सावकारणीचा माझ्यावर ताण आहे ग. ” विठ्ठलपंत उठतां उठतां तिला विनोदानें म्हणाले.

विष्णु बांवरून जाईलच, पण बापड्या लक्ष्मीनें काय करावें बरें ? ती आपल्या सासुसास-यांच्या बोलण्यांत तोंड घालील काय ? ती काशीबाईला म्हणेल काय तुझा मुलगाच सरीचा चोर आहे ! ती विठ्ठलपंतांस म्हणेल काय कीं तुमच्याच डाव्या बाजूला जो आतां जेवीत बसला आहे तो दरोडेखोर आहे ! किती का तिच्या आईबापांस शिव्या मिळेनात,

तिला मुंकाव्यानीं त्या ऐकल्या पांहिजेत. परंतु काशीबाई जें तिला बोलली कीं मला एकएक गोष्टी ठाऊक आहेत म्हणून, त्या तिच्या बोलण्यानें तर तिला खचून गेल्यासारखें झालें. तिची आई म्हणजे रमाबाई पुढें काय काय आणील, ठकाई व मावशीबाई काय सांगतील आणि तिला कोठपर्यंत गुंतवतील, यां प्रकारचे नाना तरंग तिच्या मनांत येऊन,तिनें आपल्या पुढें पान वाढून घेतलें होतें, परंतु तिच्यानें अन्नाला शिववेना.

सकाळींच धुणीं धुवून आणावींत तर विठ्ठलपंतांम उशीर होतो, संध्याकाळीं आणावींत तर तीं त्या वेळपावतों कुजतात म्हणून सासुबाईंचा बोल. आज धुणीं हा वेळेपावेतों राहिलींच होतीं, तीं धुवून तरी आणावीं, म्हणून तिनें आपलें पान झांकून ठेवलें, आणि धुणीं घेऊन ती शेजारच्या विहिरीवर धुवावयास निघाली. तिला चारपांचशेंच पावलें जावयाचें होतें, पण जमीन इतकी तापली होती, व उन्हाचा चटका इतका बसत होता कीं,—चैत्र वैशाखींचें ऊन तें,—त्या सुकुमारीची काय दशा झाली असेल! पोटांत अन्न नाहीं; कंबरेवर सर्व धुणीं एके ठिकाणीं गुंडाळून घेतलीं आहेत, चटाचट पाय भाजतात म्हणून भराभर पावलें टाकीत आहे, तोंडानें हाय हाय चाललेंच आहे, अशी बापडीची त्रेधा उडून गेली होतीं. तिच्या पायांची होळी होऊन गेली; काय करते बिचारी! तिची तनु कोमल होती पण दैव कठोर होतें ना!

ती अशा उन्हाची डोळ्यांत प्राण घेऊन तळत-

ळत विहिरीवर आली, पण कोठें सावलीला वसून आंगाची आग निवविल्याशिवाय तिच्यानें धुण्यांस हात घालवेना. सावलीला जागा दुसरी कोठें ? जवळ काय तें तिच्या मैत्रिणींचें घर. त्या घरांत शिरल्या-बराबर तिनें धुणीं जमीनीवर टाकून दिलीं, आणि ती आंगाची आग शमविण्याकरतां जमीनीवर गड-बडां लोळूं लागली. तिच्या मैत्रिणी जवळ आल्या, आणि त्यांनीं तिला इतक्या उन्हाची कां धुत्रावयास आलीस म्हणून दोष दिला. त्या मैत्रिणींचे ते मम-तेचे शब्द ऐकून तिला सकाळपासून मिळालेलें सुख आठवलें, आणि तिच्या नेत्रांतून टपाटप अश्रु गळूं लागले. इतक्यांत आक्काबाईची स्वारी तेथें येऊन थडकली !

" वहिनी, " ती तिला म्हणते, " धुवायचें निमित्त करून आलीस नी येथें रडत बसली आहेस नाहीं का ! आईनें औषधें उन्हांत ठेवायला सांगितलीं होतीं तीं ठेवलींस का ? लोकांच्या घरीं येऊन आ-पल्या आयाबहिणींजवळ रडत बसलीस तर काम करायला आपली आई आणली आहेस वाटतें. उ-ठलीसुटली बसली शेजारघरीं येऊन. ह्या पोरी आहेत रिकामटेंकड्या, बसतात तुझ्या बराबर बाता छाटीत. जेवल्या कीं हातपाय पसरून बसल्या. तसें का बाई तुझें आहे ? त्या आहेत माहेरीं, ह्यांतली एक तर आहेच, तूं आहेस सासरीं. जाशील कधीं मा-हेरीं त्यावेळेस बैस हातावर हात नी पायावर पाय डाकून; पण येथें तें कांहीं चालायचें नाहीं. ह्याची तुला नाहीं का अक्कल ? ऊठ. धुणींमुद्दां तशींच

पडलीं आहेत. आधीं औषधांचें ताट उन्हांत टेवून ये, नी मग धुणीं धू. अग वा ! ती जास्तच रडायला लागली ! काम सांगितलें कीं लागलीच बाप स्वर्गाला गेला. लहान आहेस का घोडी तूं रडायला ! अहारे, जसें कांहीं पाळण्यांतलें बाळ उपड्यानींच खातें आहे. रडा, रडा हं, आणखीं रडा; थांब ग तुझी आईला सांगून खोडकीच जिरवते. ”

त्या शेजारणी तर एकमेकींकडे टकमक पहातच राहिल्या. यमुना ठकीला म्हणते, “ तुम्ही एवढ्या उन्हाच्या इकडे आल्यात, तर तुम्हीच तेवढें ताट उन्हांत करता तर ? ”

“ मी तुमच्याशीं बोलत नाहीं. मी आपल्या मावजयीशीं बोलतें आहे. ऊठ वहिनी.”

“ पण तेवढें ताट उन्हांत ठेवतां तर झिजला नसतां. ”यमनीनें म्हटलें.

“ तें काय म्हणून ! तें काम माझें नव्हे. मी माहेरीं आहें.” आक्का मोठ्या तोऱ्यानें म्हणाली.

“ अहा हा, कळलें तुमचें माहेरपण. पळून यावें नी म्हणावें मी माहेरीं आहें. सासुसासऱ्यांनीं निश्चय केला आहे तो पुन्हां न्यायची नाहीं म्हणून !”

हें ऐकतांच आक्काला मुंगळा झोंबला. तिला वाटलें कीं हें ह्यांना लक्ष्मीनेंच सांगितलें. ती तशीच घरीं पळत सुटली. तिनें आईला जाऊन सांगितलें कीं तुम्ही जें मघाशीं वहिनीच्या आईचें बोलत होतां, तें वहिनी आतां जाऊन शेजारच्या घरीं रडत सांगत बसली आहे. लक्ष्मीला भविष्य कळलेंच होतें; ती धुणीं पिळून घरीं आली तों तिच्यावर काशीबाईचा

एकएक डोळा वचकेएवढा ! तिनें " अशी कशी चहाडबुचकी कार्टी मला मिळाली कोण जाणें," म्हणून तिचे गालगुच्चे घेतले; आणि तिचे गाल तिच्या हातांत सांपडेनात म्हणून तिनें तिच्या दोन्हीं गालफडांत आपले आंगठे घातले, आणि ते दोहों आंगास फांसले.

भाग तेविसावा.

आक्काचा आणि लक्ष्मीचा असा बेबेनावें होऊन राहिला. माहेरवाशीण करी तें पचे, परंतु सासुरवाशिणीचें खपलें जात नसे. या दोघींच्या मधून विस्तव जात नाहीं असें झाल्या दिवसापासून आपण काय करतों आहों याच्या चौकशीवर आपली सणंद असते असें लक्ष्मीला समजलें. तिला कोणचेंही काम चोरून करावयाचें असें नव्हतेंच, तरी ती जें कांहीं करावयाचें तें ठकीच्या देखतच करीत असे. परंतु ठकी आपण काय करतों आहों याचा मागमूस देखील लक्ष्मीला लागूं देत नसे. लक्ष्मी तिच्या वाटेला कधींच जात नसे, तरी आक्कानें डोळे फाडून म्हणावें, " कशी बघते आहे," " कसे डोळे फुटताहेत," " माती पडेनाका त्या डोळ्यांत मी जिकडे जाईन तिकडे लावतेस ती !" परंतु त्या बिचारीनें हिच्या भयास्तव कळीचें तोंड काळें म्हणून आपलें काम असलें तरी ठकी असेल त्या बाजूला जाऊं नये कीं तिच्याकडे पाहूं नये. तरी पण, " नको बाई, माझ्या वाऱ्याला दिखील उभी राहूं नको, माझ्या तोंडाला काय झालें

आहे? तुझेंच खापरतोंड आहे म्हणून मला तूं दाखवीत नाहींस." असे ठकीचे तिला टोमणे असतच.

उन्हाळा असो, पांवसाळा असो, हिंवाळा असो, दुपारच्या वेळीं थोडेंबहुत ताणावल्याशिवाय आक्काचा वेळ जात नसे. आतां तर कडकडीत उन्हाचे हे दिवस, तेव्हां आक्का संध्याकाळपावेतों घोरत पडलेली असे. काशीबाईदेखील आपल्या खोलींत झोंप घेत असे. विसांवा नाहीं काय तो लक्ष्मीला!

अशा एका दोनप्रहरीं लक्ष्मी मागील दारचे पडवींत काम करीत बसली होती, तों घरांत कांहीं खडबड वाजलें, म्हणून लक्ष्मीनें बसल्या जाग्यावरूनच विचारलें, "कोण आहे घरांत?"

"मी तीं," ठकी तिजजवळ येऊन म्हणते, "ठाऊक असतांना मुद्दाम मुद्दाम कशाला विचारतेस कोण आहे म्हणून? घरांत कोणीं चोर शिरला आहे का कोण म्हणून विचारतेस ती? चालली आहे मोठी सत्ता दाखवायला! मूठभर खायला डाळ सुद्दां घेऊं नये वाटतें?"

"तसें नवे वन्सें," लक्ष्मी नम्रतेनें तिला म्हणाली, "त्यांच्या फडताळाचें कुलुप वाजल्यासारखा भास झाला, म्हणून मीं विचारलें."

"अग चलजा," आक्का मोठ्या फणकाऱ्यानें म्हणते, "मोठ्ठी आली आहे सासूबाईचा नी सूनबाईचा दिमाख लावायला!"

ह्यानंतर त्या दोघींचें कांहीं भाषण झालें नाहीं. सायंकाळीं मावशीबाईची स्वारी मिरवत आली. आल्याबराबर पहिल्यानें काशीबाईचा समाचार घेण्या-

ची तिची चाल असे, परंतु तसें न करतां तिचें व ठकीचें कांहीं खलबत झालें. मावशीबाई उठतांना हळूच तिला म्हणाली कीं, " मी तुझ्या आईचा समाचार घ्यायला जातें, हांक मारली म्हणजे तूं तेथें ये. " ठकी तिला तेव्हां म्हणाली, " तुमचे अडकावून ठेवले आहेत त्याची तुम्हांला आठवण मात्र असूं द्या. "

मावशीबाई नंतर काशीबाईच्या समाचाराला गेली; आणि तिच्या प्रकृतीची पुसतपास करून म्हणाली, " ताई तुम्हीं रुपये माझ्याकडे फार दिवस ठेवलेत, त्याचे माझ्यावर मोठे तुमचे उपकार आहेत. आतां रुपये आणले आहेत, हे घ्या. व्याज मात्र मला गरिबाला पैसा दोन पैसे सोडलेत तर पहा. "

" मी कांहीं रुपयांची तुम्हांला निकड लावली नवती, " असें काशीबाईनें म्हणून हिशेब करून तिजपासून रुपये घेतले. आणि कूळ मोठें शहाजोग म्हणून मावशीबाईची प्रशंसा केली.

" ठेवा बघूं आतां रुपये ते उशाखालीं घालून; " मावशीबाई तिला म्हणते, " असे रुपये कधीं बाहेर टाकूं नयेत. "

काशीबाईनें उशाखालीं रुपये सारून ठेवले, व तिची सरी तिनें तेथेंच एका तांबुळाच्या तपेल्यांत पुरून ठेवली होती, ती काढून तिला दिली, व तोंडानें म्हणाली, " तुम्हीं सांगितल्याप्रमाणें मी तुमची सरी निराळीच ठेवली होती बरें. नी घरांत तिकडेसुद्धां तुमचें नांव सांगितलें नाहीं. "

मावशीबाईनें ह्या गोष्टींवरून तिचे उपकार

मानले, व नंतर ती तिला विचारते, " तुमच्या लॅं-कीशीं तुमची सून भांडतेचना अजून ? "

" होय बाई. " काशीबाई ह्मणते, " तिथे तर माझा नाइलाज आहे. दोघींचें घटकाभर म्हणून जमत नाहीं. "

" नाहींच जमायचें. थांबा हो, मी दोघींनाही विचारतें. " असें बोलून मावशीबाईनें त्या दोघींस हांका मारून जवळ बोलाविलें, आणि ह्मणाली:— " कायग लक्ष्मी, ठकू, असेंच भांडायचेंना. ? "

ठकी ह्मणाली, " मी कुठें भांडतें आहे ? हीच मजजवळ भांडते. "

" अहो ती कार्टी नसराळी अशी आहे, " मावशीबाई लक्ष्मीकडे हात करून ह्मणते, " मला ठाऊक आहे ती पाहिल्यापासून. ह्मणूनच मी ह्मणणार होतें कीं असली कार्टी करूं नका, पण म्हटलें जाऊंदे. ताई ठकी कसली गरीब पोर आहे म्हणून सांगूं ! जशी कांहीं अल्लाची गाय. "

ठकी रडावयास लागते. तिला मावशीबाई ह्मणते, " उगी, उगी रडूं नको हं, पोर किती गरीब म्हणून सांगूं ! "

काशीबाई म्हणाली:— " यासाठींच मी ह्मणत होतें कीं पोरटीला सासरचें सुख नाहीं तें नाहींच,—मेलीं कसलीं नष्ट माणसें मिळालीं आहेत तीं,—पण ह्मटलें तिला माहेरीं सुख लागेल,—तिला काय आह्मी जास्ती देणार आहों, जेवील, असेल,—पण तेंही सुख तिच्या कपाळीं नाहीं. "

" नाहींच मिळायचें तिला सुख. गुलामानीं तिच्या

नाकांत दुसरी नथ तरी करून घालायाची होती ! " असें बोलून मावशीबाई लक्ष्मीकडे वळून म्हणाली, " पहा आतां कशी आहे ती. आपल्या गोष्टीतर गोष्टीच ऐकत बसली. जा आपल्या कामाला ? "

असें सांगतांच लक्ष्मी निघून गेली. वन्संच्या नथेबद्दल काय काय बोलतात तें तिच्या मनांत ऐकावयाचें होतें. नथेचें बोलणें मावशीबाईनेंच काढून मावशीबाईनेंच जर मला धुडकावून लावलें, तर ती बया आपल्या आंगावर कांहीं तरी कुलंगडें आणते खचित, अशी लक्ष्मीला धास्ती पडली होती. परंतु तो काय करते ? निमूटपणें चालती झाली.

काशीबाई मावशीबाईला म्हणाली, " खरेंच पोरीचें नाक बाई अगदीं बुच्चें दिसतें. मेल्यांनीं मूद नसती दिली तरी चाललें असतें. पण त्यांनीं तीं दिली आमच्या नाकावर ठेंचण द्यायला ! पोरीच्या नाकांत नथ नाहीं म्हणजे काय ? "

" मी गेलें होतें परवां, त्या गांवांत गेलें तेव्हां तिच्या घरीं. " मावशीबाई रेंगाळत म्हणते, " अशा गोष्टी निघतां निघतां तिची सासू बोलली कीं, आम्ही आतां लवकरच नथ करून पाठवणार आहों. "

" केवढ्याची केवढ्याची, केवढी, केवढीशी नथ, " ठकीनें घाईघाईनें विचारलें.

" ती बाई मोठी नथ म्हणाली, " मावशीबाइ म्हणते, " मग पन्नासाची असो, शंभराची— "

" मेल्लीरे पाठवणार ! " काशीबाई मध्येंच म्हणते,

" मेल्यांना पोटाला मिळतांना मारामार, तीं देताहेत नथ पंन्नासाची नी शंभराची ! "

" अग आई देतील तर काय झालें ? " ठकी म्हणते, " मामंजी असे दिसतात पण त्यांचें मडकें पुरून ठेवलेलें आहे हो कुठेसें ! "

नंतर त्या तिघींमध्यें वाद सुरू झाला, त्यांत काशीबाईला ह्या दोघींनीं मोडून काढलें. कांहीं वेळानें मावशीबाई निघून गेली.

सायंकाल झाला, रात्रीची जेवणें उरकलीं, आणि निजावयाची वेळ झाली. निजतांना काशीबाईचे मनांत आलें कीं उशागतींचे रुपये काढून फडताळांत नेऊन ठेवावे. ती किल्ली पाहूं लागली तों किल्ली जाग्यावर नाहीं !

किल्लीचा शोध घरांत सुरू झाला. सर्व माणसें किल्ली जागची नाहींशी व्हावी कशी म्हणून आश्चर्य करीत सगळें घर धुंडाळूं लागलीं. ठकी 'अग्ग आई,' 'अग्ग बाई,' करीत मागील दारून पुढील दारीं आणि पुढील दारून मागील दारीं नाचूं लागलीं— काशीबाई बडबड करीत सुटली—विष्णुपंत हिकडचा मुद्दा तिकडे आणि तिकडचा इकडे फेंकून देऊं लागले—आणि विठ्ठलपंत माडीवर जाऊन किल्ली उंदरानें नेली असेल म्हणून तेथें धान्याच्या कणंगी उपसूं लागले!

" वहिनी तूं आपल्या खोलींत तरी बघ जा, " ठकी आपल्या भावजयीला म्हणाली. लक्ष्मीनें आपल्या खोलींत जाऊन शोधलें, किल्ली सांपडली नाहीं. लक्ष्मीनें आपल्या अंथरुणांतलीं चिरगुटें झाडलीं, तों किल्ली ठणादिशीं खालीं पडली !

" ती वाघितलीस आई किल्ली वहिनीच्या अंथरुणांत ! " ठकी ओरडून म्हणाली. लक्ष्मीला विचारतां ती म्हणाली कीं किल्ली माझ्या अंथरुणांत कशी आली तें मला माहित नाहीं.

काशीबाईनें फडताळ, उघडलें, आणि पाहते तों आंत सगळी उडवा उडव ! वाटींत शेंसवाशें रुपये ठेवले होते तेही नाहींत !

आतां ह्या सर्व मनुष्यांचा तर्क काय व्हावा बरें ? किल्ली लक्ष्मीनें अंथरुणांत दडवून ठेवली होती ! रुपये तिनेंच चोरले ! ठकीनें शिव्यांचा धडाका सुरू केला, काशीबाई तोंड फोडून घेऊं लागली, 'हाणा-मारा-चोपा,' म्हणत विष्णुपंत उड्या मारूं लागले, आणि विठ्ठलपंताचा लोभ जागृत होऊन तो हातांत दिवा घेऊन तोंडानें बडबडत घरांत सैरावैरा हिंडूं लागला !

हीं चौघें घसरल्यावर ती हतभाग्य पोरगी काय उत्तर देणार !

" माझी नेहमीं औषधाची खडी साखर जाते, " काशीबाई ह्मणते, " नेहमीं घरांत कांहीं खाण्याचा पदार्थ करून ठेवला कीं तो गेलाच.पोर आहे याकरतां थोडकी बाब ह्मणून मी कानाडोळा केला. आतां कुलपें फोडायला शिकली, उद्यां दरोडे घालील ! "

ठकी आपल्या फोड झालेल्या तळहाताकडे पहात होती.

आणि आतां विष्णुपंताची सूचना अमलांत आणण्याचा बेत ठरला. त्या सर्वांनीं दोऱ्या आणून त्या गाईला ओटीवरच्या खांबाशीं करकोंचून बांधलें.

विठ्ठलपंत तिला 'बोल बोल' म्हणून दोन बोटां-एवढी वेताची जाडी कांठी घेऊन झोडपीत सुटले, काशीबाई तिच्या तोंडांत आंगठे घालून तिचे गाल 'टाक रुपये' म्हणत फासटूं लागली, विष्णुपंत मागून तिची वेणी धरून 'पुन्हां चोरी करशील' म्हणून तिला विचारीत तिचें डोकें ताडताड खांबावर आपटूं लागले, आणि लक्ष्मी जेव्हां "मी नाहीं हो, मी नाहीं हो, मी तुमच्या सगळ्यांच्या पायां पडतें हो, मला कोणी तरी दया येऊन सोडंवा हो, मी कोणाच्या काडीला देखील हात लावायाची नाहीं हो, मग चोरी कशी करीन," असें म्हणून गयांवायां रडूं लागली, तेव्हां ठकूआक्कानें एका हातानें तिच्या डोळ्यांसमोर दिवा धरला, आणि एका हातानें तिच्या तोंडांत शेणाचा गोळा कोंबला—लक्ष्मीला दुसऱ्याचें नांव ठाऊक असलें तरी सांगतां येऊं नये, आपण स्वतां चोरी केली असल्यास तेंही बोलतां येऊं नये, तिला सासुसासऱ्यांच्या आंगावर उडेल म्हणून तें शेण थुंकतां देखील येऊं नये!

त्या चौकडीनें लक्ष्मीची अवस्था काय केली असेल त्याची कल्पना करण्यास सदय वाचकांवरच सोंपून आह्मी या भागाचा येथेंच पडदा पाडतों.

भाग चोविसावा.

त्या मारानें लक्ष्मी पंधरा दिवस कण्हत होती. चोरीचा पत्ता तर लागला नाहींच. हिला तिच्या मैत्रिणींचें घर वर्ज्य कीं त्यांना हिचें वर्ज्य. तिला आतां कोणी त्राता नव्हता येवढेंच नव्हे, तर आपलें

दुःख कोणाला सांगेन किंवा मनांतलें कांहीं बोलेन, असें तिनें झटलें तर घरांतलीं चार माणसें आणि पांचवी मावशीबाई यांच्याशिवाय सहावें तिला त्या घरांत कोण कशाला भेटतें ? तिनें मावशीबाईच्या तोंडूनच ऐकलें कीं वासुदेवपंतांस त्यांच्या मुलीनें आपल्या सामूच्या फडताळांतले रुपये चोरले असें कळलें आहे, आणि झणून इतःपर तिचें तोंड पहावयाचें नाहीं असां त्यांनीं निश्चय केला आहे. मावशीबाईनें सरी सोडवून नेली हें तर लक्ष्मीला कळलें, आणि तें अर्थातच कळणार; परंतु सरी आयती आपल्या घरांत येऊन पडली असून आपणाला तिचा पत्ता लागला असतांना आपण कशाचीच कोणाला ओळख दिली नाहीं, झणून तिला फार चटपट लागून गेली.

शिरस्त्याप्रमाणें तिसऱ्या प्रहरीं ठकूआक्का आणि तिची आई घोरत पडलेल्या असावयाच्याच. ज्या भिकाऱ्यानें विठ्ठलपंतांच्या हातचा मार खाल्ला होता तो भिकारी याच वेळेस यावयाचा. मार खाल्यावर एक दोन दिवसच कायतो तो भिकारी त्यांचे दारांत आला नाहीं, परंतु तो पुढें येऊं लागला. एक दिवस लक्ष्मीची सासू आणि नणंद घोरतच पडल्या होत्या, आणि लक्ष्मी भांडीं घासावयास नेत होती, तों इतक्यांत तो भिकारी 'भिक्षा घाला' झणून ओरडत तिचे दारांत आला.

"थांबरे झाताऱ्या, मी तुला भाकरी घेऊन येतें," असें सांगून लक्ष्मीनें त्याला थांबविलें, आणि तो आपल्या काठीवर अवसान घालून बसत बसत खालीं

वसला. लक्ष्मीनें घरांतून भाकरी आणून त्या म्हाता-
ऱ्याच्या पटकुरांत टाकली, आणि म्हणाली, जा, खा
जा, तुला आज अधिक फिरायला नको. जा त्या
पलीकडच्या झाडाखालीं, तेथें भाकरी सावकास खा.
पाणी हवें असलें तर पुन्हां येथें ये म्हणजे मी तुला
घालीन. ”

त्या म्हाताऱ्यानें एकदां आपल्या पदरांतल्या अ-
न्नाकडे पहावें, एकदां या मुलीच्या तोंडाकडे पहावें!

“असें कां करतोस म्हाताऱ्या ?” लक्ष्मी म्हणाली.

म्हातारा तिच्या तोंडाकडे टकटक पाहूं लागला.
त्याची मान फारच कांपूं लागली. डोळ्यांत पाण्याचें
भरतें आलें. पुढें कांहीं दिसेनासें झालें.

तें पाहून लक्ष्मीच्या हृदयांत दुःख दाटलें. तोंडावाटे
शब्द निघेना. तिनें आपलें तोंड पदरानें झांकून घेतलें.

म्हाताऱ्याची काठी खालीं पडली. भाकरीची घों-
गडीही हातांतून गळाली.

तें पाहून लक्ष्मी रडें आवरून म्हणतेः—

“अँहा, म्हाताऱ्या, ती भाकरी तेथें ठेवूं नकोस.
माझ्यावर एवढे उपकार कर. ती भाकरी घेऊन ये-
थून पलीकडे हो कसा. ऊठ. तूं कां बाबा उगाच
रडतोस ?”

तो म्हातारा जरासा भानावर आला. त्यानें आ-
पले डोळे पुसले. पटकूर आंवरून घेतलें. आणि ल-
क्ष्मीकडे वर डोळेकरून तीस म्हणाला, “ मुली तूं
काय म्हणतेस ? ”

“ ती भाकरी तूं कुणाला दाखवूं नकोस. पदरांत
नीट बांधून घे नी दूर कोठें तरी जाऊन खा. ”

यावर तो म्हातारा म्हणाला, "मुली, मी भिक्षा मागतों तर खराच. तुमच्यासारख्या श्रीमंतांस मी उपदेश कसा करावा? पण मी एक गोष्ट सांगतों. मला तूं पुष्कळ अन्न घातलेंस तर माझें बरेंच झालें. पण घरांत तुला रागावतात याकरतां मला तूं पैशा-एवढा तुकडा घालायचास. पण हें काय! ही एक भाकरी, हा इतका भात, वरती वरण, भाजी; एक ठाव झाला. ही काय भिक्षा?"

"हें पहा म्हाताऱ्या," लक्ष्मी म्हणते, "तूं मला सांगतोस तें खरें आहे. तूं त्या दिवशींच आमच्या-वर उपकार करून ठेवले आहेस ते कधीं फिटतील ते फिटोत. पण हें पहा म्हाताऱ्या, मी अन्न फुकट-चें बघितलें म्हणून तुला घातलें अशी गोष्ट नाहीं. माझ्यानें तुला कांहींएक जास्त सांगवत नाहीं. तुला फार भूक लागली असेल, तिसरा प्रहर उलटून गेला. ही भाकरी आतां कोठें तरी जाऊन खा, नाहींतर आपल्या मुलांबाळांना नेऊन दे."

"बाई मला मुलें बाळें असतीं तर आज माझ्या हातांत झोळी कां येती? तें राहूं दे." असें म्हणून तो म्हातारा थोडा वेळ स्तब्ध बसला, आणि त्यानें एकदम लक्ष्मीला विचारलें, "मुली तूं जेवलीस?"

लक्ष्मीला रड्याचा हुंदका आला: ती कांहींच उ-त्तर देईना.

"ए मुली?" तो म्हातारा म्हणाला.

"त्याची बाबा तुला चौकशी कशाला हवी? तें कांहीं तूं मला विचारूं नकोस. तूं आपला घरीं जा."

"तर मग तूं जेवली नाहींस?" त्यानें विचारलें.

तिनें कांहींएक उत्तर दिलें नाहीं. आणि मागें वळून कोणीं आपलें बोलणें ऐकत नाहींसें पाहून ती पूर्ववत् त्याच्याकडे टक लावून पाहूं लागली.

"हां समजलों समजलों," तो म्हातारा म्हणाला, "माझा तरक एकूण खरा आहे. बाईसाहेबांची स्वारी जेवली नाहीं. म्हणूनच मला इतकें हें अन्न !"

म्हाताऱ्याला बोलतां बोलतां इतका आवेश आला होता कीं, आपण आहों कोठें हेंसुद्धां तो विसरून गेला. तो मोठ्यानें बोलूं लागला तेव्हां लक्ष्मीला वाटलें कीं आतां कोणीं तरी म्याच्या ओरडण्यानें उठून आपला घात होतो.

आतां अधिक बोलणें कामाचें नाहीं, म्हणून "म्हातारेबाबा, आतां तुम्ही जा, आणि उद्यां याच वेळेला या." एवढें बोलून ती घरांत पार निघून गेली. कारण त्या म्हाताऱ्याच्या मुद्रेवरूनच तिला दिसून आलें कीं हा आतां थोडेंथोडकें बोलून राहणारा नव्हे.

लक्ष्मी निघून गेली असें पाहून निरुपाय होऊन तो म्हातारा चालता झाला. त्या मुलीनें उपाशी राहून आपण तिचें अन्न खाणें त्यास बरें वाटेना, परंतु टाकावयाचें नाहीं म्हणून त्यानें तें अन्न खाल्लें.

दुसऱ्या दिवशीं तो भिकारी भिक्षा मागत काळ्यांच्या दारांत आला. लक्ष्मी त्याला घालण्याकरतां अर्धी भाकरी, भात, भाजी घेऊन आली, परंतु त्यानें आपलें पटकूर पुढें न करतां तिला तूं जेवलीस का म्हणून विचारलें, व तिनें होय म्हणून सांगितलें.

"हें तूं खरें सांगतेस ?" त्यानें विचारलें.

" तूं माझ्या हातची एवढी भाकरी घे नी मला जाऊं दे."

" नाहीं नाहीं, मी ती घेणार नाहीं; आज तूं मला खरें नाहीं सांगितलेंस तर मी तोंडांत पाणी घालणार नाहीं." तो म्हातारा निकरावर येऊन म्हणाला.

" पण कां तुझा हा म्हाताऱ्या निश्चय?" लक्ष्मीनें विचारलें, "माझी इतकी कींव कां तूं करतोस ?"

" मुली तूं वेडी आहेस. कींव भलत्याचीच का येईल ? कींव तसाच परसंग ज्याजवर असेल त्याची यायची. तूं उपाशी नेहमीं राहणार म्हणजे—"

"पण माझी दया करणारा आज पृथ्वीच्या पाठीवर कोणी राहिला नाहीं. मला या घरीं दिली तेव्हांच त्याचा निकाल लागला आहे. त्या नाहींशा झालेल्या पाटलानें माझें नशीब फुटकें म्हणून त्यावेळेसच ठरविलें आहे."

" तर मग त्या पाटलाचे ते शब्द तुला लागले असें दिसतें ?" त्या म्हाताऱ्यानें विचारलें.

" छे बाबा, ते कां लागावे ? तो तर माझ्या कल्याणासाठीं मनापासून झटला. त्यानें काय कृत्य केलें तें जगजाहिर होऊन गेलेंच आहे. तो पाटील लग्नाच्या पूर्वीच म्हणत होता कीं मी त्या कारकुनाला आडवा येऊन पायावर धोंडा घालून घेतला. मग त्या मेल्या वामनरावानेंच त्याच्या जिवाला कांहीं अपाय केला—तो परवां म्हणाला मी त्याला काळ्या पाण्यावर पाठवलें—पण तें त्याच्या पाठीमागच्या बोलण्यावरून खरें नाहींच. बापडा एकदा येऊंदे नी आपली भांडीं परत घेऊंदे, म्हण-

जे बाबांनीं इतके दिवस तीं सरकारांत जाऊं न दिल्याचें सार्थक होईल. पण पहा लोक कसले चांडाळ आहेत ते,ते तीं भांडीं त्याला सुखानें का देतील? त्यांनीं मध्यें सतराशें लचांडें उभीं केलीं आहेत. त्यांतून तो बिचारा निभावेल तेव्हांना ?"

"काय ?" तो भिकारी विचारतो, "त्या पाटलाला तीं भांडीं मिळूं नयेत म्हणून कोणीं लचांडें उभीं केलीं आहेत ?"

"भांडीं मिळूं नयेत म्हणून एवढेंच नव्हे, तर तो आला तर खरोखरच काळ्या पाण्यावर नाहीं गेला म्हणजे पुरे आहे. ती मेली एक आमच्याच गांवची माव—पण मी बोलतें काय !" लक्ष्मी जीभ चावून आपल्याशीं पुटपुटते, "ते जे एके आंगाला जाऊन मसलत करीत होते, ती लोकांला कळावी म्हणून का ? मी आंत ऐकत होतें म्हणून तें लोकांला का सांगावें ?"

"मुली काय पुटपुटतेस ?" त्यानें विचारलें.

"नाहीं कांहीं." ती म्हणाली, "पण असे त्या पाटलाचे मजवर उपकार आहेत. तो माझें 'कमनशीब' म्हणून जें बोलला, तें मला आठवलें म्हणजे मला उलट या घरांत त्याच्या योगानें समाधानच होतें. त्याचे जसे मजवर उपकार आहत, तसे तुझेही आहेत. त्या दिवशीं तूं मला डागूं दिलें नाहींस त्या मेल्या काका वैद्याच्या सांगण्यावरून."

"मीही त्या पाटलाची गोष्ट ऐकली आहे." तो भिकारी म्हणाला, "मामलेदारांच्या घरीं

—चंदनास—ही मी भिक्षेला जात असतों. तिथें मला पुष्कळ भिक्षा मिळती. त्यांच्या घरचें ' पाटलाचें जेवण ' म्हणून म्हणतात तें तुझ्याच लग्नांतलें असेल ? तूंच का ती मुलगी. "

" होय. " लक्ष्मी म्हणाली.

" तर मग ती तुझी आईच. " तो भिकारी म्हणाला, " आन ती बोलत होती तें तुलाच. "

" काय काय म्हाताऱ्या ? " तिनें विचारलें, " माझी आई मला काय बोलत होती ? "

" मग ते कोणाबद्दल, पण मी पंधरा दिवसांपूर्वी भिक्षा मागायला गेलों तेव्हां तुझी आई, एक मावशीबाई म्हणून कोणी आहे—तुझी आईच तिला ' मावशीबाई ' म्हणाली म्हणून मला तिचें नांव ठाऊक,—त्या बाईला म्हणाली कीं, ' पोरगी हल्लीं सरी कोठें आहे हें जर कळवती, तर तिचा शोध वामनरावांकडून नाहींतर दुसऱ्या कोणाकडून लाविवला असता. मग दुसरी तिला कोणी मुलगी आहे कोण जाणें ? "

लक्ष्मी चित्रासारखी तटस्थ राहिली. सरी नुकतीच मावशीबाईनें सोडवून नेली ! मावशीबाईचा अंत किती ! वामनरावांचा अंत किती ! ह्या दोघांशीं विठ्ठलपंतांची मसलत, त्यांचा अंत किती ! आतां काय कोणाबद्दल बोलावें !

" बरें मुली, तूं आपलें अन्न आंत नेऊन ठेव. तूं उपाशी राहून मी तुझें अन्न खावें मला शोभत नाहीं. मी तुझ्या घरीं भिक्षेला ही येणार नाहीं तूं असें करतेस तर. " असें म्हणत तो उठून चालूं लागला.

" अरे ए बाबा, " लक्ष्मी त्याला म्हणते, " तूं जाऊं नको. मला अन्न जाईना, म्हणून मी खाल्लें नाहीं. "

" तें तुझें अन्न राहूं दे. मी उद्यां येईन त्या वेळेस तूं जेवलेली असलीस तर मी तुझें ऐकेन. " असें म्हणून तो म्हातारा निघून गेला.

भाग पंचविसावा.

विचार करतां करतां शेवटीं लक्ष्मीनें आपला एक निश्चय केला. ह्या गांवांत तूं जेवलीस कीं नाहीं असें आपल्याला विचारणारा ममतेचा असा हाच कायतो भिकारी राहिला आहे. ही एक गोष्ट, आणि दुसरी गोष्ट अशी कीं आपण स्वतां म्हणून सरीचें कोणाजवळ कांहीं सांगितलें नाहीं ही आपली चूक आहे, कांकीं आपल्या मनांतलें दुःख जर कोणाला सांगितलें नाहीं, तर त्याचें निवारण कोण कसें करणार ? हा म्हातारा आपणच होऊन जर सरीविषयीं विचारतो आहे, तर तें आपण त्याला कां सांगूं नये ? त्यालाच निरोप घेऊन आईकडे पाठवावा म्हणजे झालें.

दुसरे दिवशीं तो म्हातारा आपल्या वेळेवर आला. त्या मायलेंकी हातपाय ताणून घोरत पडल्याच होत्या. लक्ष्मीनें त्याला तुकडा आणला. म्हाताऱ्यानें पूर्ववत् तिला तूं जेवलीस कीं नाहीं म्हणून विचारलें; त्यानें जेव्हां तिजकडून शपथ वाहून घेतली, तेव्हां त्यानें तो तुकडा घेतला.

" म्हाताऱ्या तुझें नांव काय? ". लक्ष्मीनें त्याला विचारलें.

" माझें नांव बाई तुला काय करायचें आहे ? मला भिकारी नाहींतर म्हातारा म्हण म्हणजे झालें. "

" बरें म्हातारेबाबा, तुम्हीं मामलेदारांच्या घरीं सरीचद्दलचा मजकूर ऐकला म्हणतां ? "

" हां; आन् ती मुली तुझी बयाच म्हणाली. "

" तुम्ही आतां चंदनास केव्हां जाणार आहां. "

" माझें काय ? मी इथे भिक्षा मागतों, तिथय-बी मागतों. कोठयबी तुकडा मागून पोट भरणार. उद्यां नाहीं तर आतां देखील मी चंदनास जाईन. "

" मामलेदाराच्या दारांत ? "

" मामलेदाराच्या दारांत तर लई भिक्षा, पुष्कळ अन्न मिळतें. तिथें तर मी पाहिल्यान जातों. "

" माझी आई ओळखीची आहेच तुमच्या ? रमाबाई ? "

" तीच सरीचें मावशीबाईजवळ बोलत होती म्हणून मी सांगितलेंना ? "

" सरीचा मजकूर काय तो आहे तुम्हांला ठाऊक ? "

" मला बाई भिकाऱ्याला काय ठाऊक असणार ? "

" मी सांगितला तर ? तुम्ही जसे आतां चंदनचा मजकूर मजजवळ सांगितला, तसा मी सांगतें. तो माझ्या आईजवळ सांगाल ? मात्र तो तिसऱ्या कानाला कळवायचा नाहीं. "

" मी सांगेन तशी वेळ मला मिळाली तर—काय सांगायचें ? "

" तुम्ही एवढा मजकूर सांगाच. सरीची संगळी

हकीगत मी आतां सांगत बसत नाहीं. एवढा निरोप आईला आधीं जाऊंदे, ह्मणजे ती कांहीं उपाय योजील. माझा तर नाइलाज आहे. आईला एवढेंच सांगा कीं ज्या मावशीबाईजवळ तूं सरीचा शोध वामनरावांकडून लाववीन ह्मणून बोललीस, त्याच मावशीबाईजवळ सरी गेली आहे!"

"असें काय?" तो भिकारी ह्मणाला.

"इतकेंच नव्हे, त्याच वामनरावांचा नी मावशीबाईचा स्नेह आहे, इतर माणसेंही—पण राहूंदे तें. समजलां तुह्मी ह्मातारेबाबा, आईला ह्मणावें शोध लावायचा असेल तर वामनरावांस न कळवितां दुसरीकडून लाव."

"जाऊं तर मी! आतां निघालों तरी सानचा पोंचेन. सकाळीं तिथली भिक्षा घेऊन दोनप्रहरला इथे येईन."

"पण ह्मातारेबाबा, ह्या कामगिरीबद्दल तुह्मांला द्यायला मजजवळ कांहीं नाहीं?"

"मला कांहीं नको मुली तुझें. कुठेंही भिक्षा मागून पोट भरणारा मी. इथे तर तुझे गुण मला भिक्षेला पुरे आहेत."

"नाहीं पण माझी आई तुह्मांला कांहीं दिल्याशिवाय राहणार नाहीं. तिनें नाहीं दिलें तर पहातां येईल."

"मुली, आणखी आहे कांहीं निरोप सांगायचा!"

"भाऊचें लग्न कधींचें ठरलें तेवढें कळूंदे."

उद्यां मी खचित परत येतों असें तिला वचन देऊन तो म्हातारा चंदनास जावयास निघाला.

ईश्वरानेंच हा मनुष्य आपल्याला पाठवून दिला असं लक्ष्मीला वाटलें. आतां आईला आपण वरचेवर निरोप पाठवीत जाऊं, व आपलें तोंड अगदींच शिवून टाकल्यासारखें झालें होतें, त्याला वाट झाली असें पाहून तिला आनंद झाला. आतां आंपले हात-पाय जखडून टाकलेले ह्या म्हाताऱ्यानें मोकळे केले, ह्याच्या मध्यस्थीनें तरी आपला हेतु सिद्धीस नेऊं, म्हणून तिला हर्ष झाला.

रेवगांव आणि चंदन ह्यांच्यामध्यें एक मोठा डोंगर आहे. हा डोंगर चढणीउतरणीला फारच कठीण आहे. ह्या डोंगराच्या खालीं उजठ्या आंगाला वाटवें. म्हणजे वाटण्याहून चंदनास जाण्यास दोन वाटा झाल्या,—एक सपाटीवरची परस्पर वाटण्याहून, आणि दुसरी रेवगांवच्या वाटेला मिळून; ही वाट-ण्याकडची वाट रेवगांवच्या वाटेला थेट ह्या डोंग-राच्या शेंड्यावर मिळते. परंतु वाटण्याहून रेवगां-वास येण्याला वाट एकच. म्हणजे ह्या डोंगरावर चंदनच्या वाटेला मिळून मग रेवगांवास यावयाचें. ह्या वाटांचें आम्हांला पुढें गरज आहे. असो. तो म्हातारा भिकारी फारच अशक्त होता, तो इतका कीं डोंगर चढावयास त्यास महाप्रयास पडले. तो उतरण उतरून जाऊन चंदनांत शिरून वासुदेव-पंतांचे दारीं येई तों दोन घटका रात्र होऊन गेली.

रात्रीची भिक्षा मागावयास म्हणून आपण मामले-दारांचे दारीं जावें, आणि त्या मुलीच्या आईची भेट झाल्यास पहावें, म्हणून तो म्हातारा वासुदेवपंतांचे दारांत येऊन उभा रहाणार, तों त्यांच्या घरांत कां-

हीं गडबड चालली असल्याचें त्याला दिसलें, म्हणून तो मागें परतला. हा काय प्रकार आहे तो कळावा म्हणून तो तेथेंच डावे बाजूस जें ओसाड घर होतें त्यांत शिरला, तों त्याच घराच्या मधल्या भिंताडापलीकडे कोणी कुजबुजत आहेत असें त्याला वाटलें !

" काय इश्न्या ? " असें कोणी तरी आंत कोणाला विचारल्याचें त्याच्या कानावर आलें.

"सोडा, सोडा मला. सदवा मला सोड." तो म्हणाला.

" न्हाई, आम्ही न्हाई सोडणार तुला. " सदवा म्हणाला.

" मी तुमच्या अलीकडे वाटेलासुद्धां जात नाहीं, कीं तुमचें पाटलाचें घर पेटलें कीं आहे तें आज कित्येक दिवस मला माहित नाहीं. मी आपली तंबाखू ओढायची जागा निराळीच केली आहे. आतां तुमचा आमचा कांहींच संबंध नाहीं. "

" आम्ही तरी त्या पाटलाच घर कुठ पेटवतो हवो. आम्ही बी ती बैठक दिली सोडून. अक्षी वंगाळ. भुताची— "

" बाबा नकोरे, नकोरे, " विष्णु बाबरून म्हणतो. "मी तुझ्या पायां पडतों, साष्टांग नमस्कार घालतों, पण तेवढें नांव काढूं नको. "

" बर तें न्हाऊंदे. आमची गोष्ट कबूल कर म्हणजे झालें. "

" हो एकदा कबूल इश्न्या. " राम्या म्हणाला.

" हां तर ! " विष्णु म्हणतो, " वामनरावानें तुम्हांला बाबांकडून कर्ज सोडवीन म्हणून वचन दिलें, परंतु मला त्यांत काय फायदा ? "

"तुझ्या बाबाला येवढाली रुप्याची भांडी मिळतील ती !"

"बाबाला फायदा. मला काय ?" विष्णूनें विचारलें.

"मावशीबया तुला सोडील." सदबा म्हणाला.

"आन् हे पहा इश्न्या," सोनजी म्हणतो, "पाटील मुदतीत हजर जर झाला तरुच तुझी न् आमची साक्ष. न्हाई झाला, तर मग आम्ही न्हाई."

"नाहीं बाबा, मी नाहीं. तें माझ्या आंगावरच्च येईल. मी बाबांला विचारीन आणि मग कबूल करीन."

"छत्, त्या तारखपावतर तुझ्या बाबाला तर न्हाईच कळवायाच. चल तर तू आता मामलदाराच्या पुढ. मावशीबयाबी त्याच्या पुढ सरी करती हये. रमाबाईची सरी चोरणारा गिरस्त हजर केलाय बगा, म्हणूनशानी आम्ही त्याला म्हणणार."

"सोडा मला मावशीबाई !" विष्णु म्हणाला.

"तूं कबूल हो." सोनजी म्हणाला.

"आर तो न्हाई होणार. ओढ त्याला." राम्या म्हणाला.

"बाबांनो तुम्ही काय म्हणतां ?" विष्णूनें विचारलें, "मी कशी साक्ष द्यावी ? आमच्या बाबांच्या कोठारांत अशीं अशीं रुप्याचीं व इतर भांडीं होतीं, त्याची बातमी मी त्या पाटलाला दिली. ठीक आहे. पण तुम्ही कसें सांगणार ?"

"आम्हीबी म्हणणार कीं आम्हास्नी पाटलान गर्ती विठ्ठलपंतांच्या कोठ्यांत जाऊनशानी भांडी आणायला लावल. हे त्यान पाटीलकीच्यां जोरावर

केल. आनू त्यो पाटीलकीच्या जोरावर अम्हांस्नी म्हणाला की कोणाप बोलाल तर तुम्हांस्नी ठार मारून टाकीन. ”

“ बरें. ” विष्णु विचारतो, “हें कोणच्या दिवशीं! अर्थातच ही गोष्ट पाटील नाहींसा झाल्या त्या पूर्वीची पाहिजे ?”

“ त्ये काय त्यो जत्तीवाला कारकून वामनराव आन् ही मावशीबया सांगल त्यापरमाण. काय, मावशीबया, आम्ही म्हारुतीच्या देवळांत कधीं यायच ? इश्न्या कबूल झाला. ”

परंतु उत्तर मिळालें नाहीं, म्हणून त्यानें पुन्हां विचारलें, “ काय, मावशीबया न्हाई ! निघून गेली ? मावशीबया ? ”

“ गेलीच बरका; केव्हा गेली कोण जाण. ” राम्या म्हणाला, “ आम्ही म्हंगालो ती हथ हयेच. मावशी गेली तर आपणाला हथ रहून काय हयेच यच ? चला आपुण जाऊं. ”

असें बोलणें होऊन ते छपत छपत त्या भिंताडाचे पलीकडील आंगानेंच निघून गेले.

मामलेदारांचे घरांत कसली गडबड चालली आहे, ती त्या भिकाऱ्यास त्या ओसाड घरांत बसून कळेना, म्हणून तो हळूच पुढें जाऊन काय प्रकार चालला आहे तो अंधेरांत ऐकत बसला, व एकंदर जें बोलणें आणि जो ओरडा त्याच्या कानावर आला, त्याचा सारांश त्यानें काढला तो येणेंप्रमाणें:—“ वासुदेव पंतांच्या मुलाचें लग्न आठ दहा दिवसांपूर्वी पुराण येथें झालें. मुलगी तिकडचीच केली. लग्न उरकून

त्यांस चंदनास येऊन दोन तीन दिवस झाले. त्यांनीं नवऱ्या मुलीला बरोबर आणिलें. परंतु ही मुलगी मनस्वी हट्टी निघाली. चंदनास आल्यावर जेवीना, खाईना, आणि सारा दिवस रडत बसून तोंडानें म्हणे कीं मला एथून एक कोसावर माझी चुलत बहीण आहे तेथें पोंचवा. काळोख पडतांच ती मुलगी एकाएकीं नाहींशी झाली. तिच्या आंगावर सर्व दागिने होते. तिनें जीव दिला कीं काय कोण जाणें!"

वासुदेवपंत संतापून गेले होते, रमाबाई आक्रोश करीत बसली होती, आणि घरांतील सर्व मनुष्यांची धांवाधांव चालली होती, म्हणून अशा प्रसंगीं येथें बसणें नीट नव्हे, कदाचित् आपल्यालाच पकडतील, म्हणून तो भिकारी तेथून निघाला. लक्ष्मीला मी दुसऱ्या दिवशीं येतोंच म्हणून त्याचें वचन होतें, म्हणून तो रोजच्या वेळीं दुसऱ्या दिवशीं काळ्यांचे दारीं आला. लक्ष्मी तर त्याची चातकासारखी वाट पहात होती; कारण; माहेराहून कांहीं अलीकडे कळलें नाहीं तें कळेल, व भावाच्या लग्नाचे वेळीं आईची गांठ पडल्यास पुढें काय करावयाचें त्याचाही विचार करतां येईल, म्हणून तिला मोठी आशा होती. परंतु ह्या भिकाऱ्यानें जेव्हां तिला लग्न होऊन गेल्याची बातमी सांगितली, तेव्हां तर तिची खात्री होऊन गेली कीं मी चोरी केली असें बाबांना कळलें म्हणून त्यांनीं मला बोलाविलें नाहीं, कीं काळ्यांच्या घरीं निरोपही आला नाहीं.

ह्या गोष्टीनें लक्ष्मीला जो मोठा धक्का बसला, त्याचे योगानें तिला त्याच वेळीं सणसणून ताप आला. सा-

यंकाळीं तिला थंडीची हुडहुडी भरली ती इतकी कीं तिनें तिला त्याच रात्रीं अंथरुणास खिळविलें.

भाग सव्विसावा.

लक्ष्मीचा ताप एक एक दिवस दुणावत चालला. काशीबाईला स्वयंपाकाचें काम आपल्याकडे घेणें भाग पडलें. आणि जेव्हां लक्ष्मीला अन्नपाणी कांहीच चालत नाहीं असें आढळलें, तेव्हां काका वैद्यांला बोलावण्याचा बेत ठरला.

काशिनाथपंतकाका वैद्य म्हणजे एक त्या गांवांतलि भिक्षुक ब्राह्मण होता. हा वैद्यगिरी शिकल्याचें कधीं कोणास माहित नव्हतें, तरी त्या दोनचार आडाणी गांवांत त्याचें प्रस्थ बरेंच चाले. एकीकडे 'शुभमंगलसावधान' ह्मणून लग्न लावून दुसरीकडे कोणाचा प्राण चालला असल्यास तो धरून ठेवण्याकरतां मात्रा ह्मणून कौलाचा तुकडा उगाळून देण्यास काका खांकेला बटवा मारून तयार असत. बरें, यांची मात्रा घेऊनही तो रोगी हट्टानें मेलाच, तरी काका त्याजवर न रागावतां आपल्या मंत्रसामर्थ्यानें त्याला स्वर्गास पाठविण्याची त्यानंवर कृपादृष्टि करीत. काकांस ह्मणजे पैसाच हवा, आणि तो त्यांस मिळतच असे, असें नाहीं. धान्य, लांकूडफाटें, भाजीबावांस ह्मणून त्यांस एखादा पंजा, त्यांच्या बायकोला एखादें जुनेर, जें कांहीं रोग्याला अनुकूल असेल तें त्यानें द्यावें. ब्राह्मण रोगी असला तर त्यानें देवाला एक मेहुण मांगेन ह्मणून नवस केला पाहिजे, व तें सांगते वेळीं वैद्यबुवांचेच मेहुण सांगितलें पा-

हिजे. पोरक्या बाया असत तर त्यांजपासून यो राज-वैद्यांनीं कोणापासून एखादा सोन्याचा मणिचं, कोणा-पासून मोतींच, कोणापासून मंगळसूत्रच घ्यावें, तेव्हां औषध द्यावें.

हे दिवस म्हणजे पावसाच्या तोंडचे: कुळांस अड-चिण्याची विठ्ठलपंत काळयांची हीच वेळ. कुळें पाव-साळच्या शेतकीची तरतुद याच वेळेस करणार: सावकार याच वेळीं त्यांचे पाठीस लागणार. कोणास, रुपयांचें म्हणा, व्याण्याचें म्हणा, विठ्ठलपंतांचें कर्ज नाहीं, त्यानें दामदुप्पट व्याजानें किंवा वर्तावळयानें ह्याच वेळीं त्यांजपासून काढावें; कोणास विठ्ठलपंतांचें कर्ज आहे, आणि त्यानें तें ह्यांचें न देतां सोम्यागो-म्याचें आणखी काढलें, तर त्या कर्ज काढलेल्या रु-पयांवर किंवा व्याण्यावर ह्या सावकाराचा हल्ला आ-लाच. अशा प्रकारच्या वसुलाच्या गर्दीत विठ्ठलपंत ए-खादे वेळीं घरीं जेवावयास वेळेस येत नसत,एवढेंच नव्हे, एखादे वेळीं त्यांना घरीं येण्याला मध्यान्ह रात्र होई, आणि एखादे वेळीं परस्पर वसुलाला गेलेल्या गां-वावरच ते वस्ती करीत. घरच्या माणसांनीं त्यांचें पा-न झांकून ठेवावें, आणि आपली वेळ झाली म्हणजे निजावें. यजमान येतील—जेवतील; न येतील—रा-हील तसेंच अन्न.

विठ्ठलपंतांच्या पैशाला मोहोर यायचा तो ह्या ऋ-तूंत, अमा हा हंगामाचा समय टाकून, काका वैद्य मृत्यूच्या पाठीस लागून गांवोगांव भटकणारा, त्याच्या पाठीमगें तो सावकार पैशाची पाठ सोडून कसा लागे-ल ? तरी पण त्यांची एकदां भेटाभेट झाली. वाटल्या-

च्या एका कुळाला विठ्ठलपंत बोलवून बोलवून थकले, कुळाचा निरोप कीं मी आजारी आहें, कसा येऊं! शेवटीं विठ्ठलपंत त्याजकडे आपण स्वतां जाण्यास निघाले.

इकडे कूळ आपल्या खाटल्यावर पडलें आहे, त्याच्या हातापायाच्या काड्या होऊन पोट हांड्याएवढें झालें आहे, गाल बोट बोट खोल जाऊन प्राण डोळ्यांमध्यें आले आहेत. जवळ तीं चार चिलींपिलीं भाकरीचा तुकडा लांकडाच्या परळांत घेऊन खात बसलीं आहेत. त्यांची आपआपसांतच भाकरीसाठीं ओढाताण चालली आहे, व तीं त्यांतच भांडताहेत—ओरडताहेत—बोचकारताहेत—चावताहेत—आणि एकमेकांच्या झिपऱ्या धरून ओढताहेत. सगळ्यांचीं वयें एकपासून सहासातांच्या दरम्यान, त्या बच्यांना काय माहित आपल्या बाबांची आतां अवस्था काय होणार ती! आतां आपण भाकरी खात आहों ही कोठून आली—कोणीं मिळविली—ती पुढें आतां कशी मिळेल—ती बाबांची यापुढें कांहींएक आपल्याला न समजेशी अवस्था झाल्यावर बंद होईल—व आपल्यास उपाशी मरावें लागेल, हें त्या बाळांस कसें समजणार! तीं तर अज्ञान बाळेंच; पण देवा, ती घरधनीण गंगाई, म्हणजे त्या रोग्याची बायको—जिनें रडें आलेलें झांकण्याकरितां आपला डावा हात आपल्या तोंडावर धरला आहे, आणि आपला उजवा हात,—थोडक्याच घटकेचा जो आपला सोबती, ज्याच्या संगतीं आपण इतकीं वर्षें घालविलीं, आणि ज्याच्या जाण्यानें आपल्याला ह्या जगांत सर्व कांहीं नाहींसें होणार,—त्याच्या त्या उदरव्यथेनें भरलेल्या पोटावर

हलकेच ठेविला आहे, तिची अवस्था काय ! ज्या बाईनें पोरें भाकरीसाठीं रडतात हें पाहून, व त्यांस दुसरीकडे कोठें यावेळीं पाठविण्यास जागा नाहीं व समय नाहीं हें जाणून, तीं मुलें कशीं तरी गप राहोत, व हें जग सोडून जाणाऱ्या त्या क्लेश भोगणाऱ्या प्राण्यास जातांना तरी त्रास न होवो—म्हणून पडग्यांत भाकरी व कांदा दिला आहे; कीं जिनें आपली अशी समजूत केली कीं, आपलीं लहान लहान लेकरें भाकरी खात आहेत हें तो आतां परलोकास जाणारा प्राणी पाहील, व अशी भाकरी माझ्या बाळांस मिळो असा तो जातांना त्यांस आशिर्वाद इच्छील, आणि परलोकीं गेल्यावर देवाजवळ तो लागलीच हीच प्रार्थना करील. ज्या साध्वीच्या अश्रूंचा असा क्रम चालला आहे कीं डोळे पाण्यानें डबडबून भरून यावे, परंतु ते पुसण्यास दोन्ही हात गुंतले गेल्यामुळें सवड सांपडूं नये,—कारण एक हात पतीच्या पोटावर दिलेला तो त्या ममताळू पत्नीला काढावासा वाटत नाहीं, आणि दुसरा हात आपल्या तोंडावर दिलेला तो हालविण्यास त्या दीन अबलेला धीर होत नाहीं, कीं, कदाचित् हात काढला असतां आपला हुंदका बाहेर फुटेल,—म्हणून जिनें, ओठे भरून आले व अतःपर दृष्टीस न पडणारें आपल्या पतीचें मुख दिसेनासें झालें, म्हणजे आपल्या त्या रडून व जागरणानीं सुजलेल्या पांपण्या मिटाव्या, आणि तिला न समजतां डोळ्यांचे तें पाणी टपाटप तिच्याच नवऱ्याच्या शुष्क गालांवर पडावें; जिच्या त्या तेथें असलेल्या मुलांतील थोरल्या मुलानें पहावें

कीं आईला आज कांहीं तरी विशेष झालें आहे, पण काय झालें आहे नकळे, म्हणून जो माकरी खावयाच्या नादांतच आईच्या तोंडाकडे टकमक पहातो आहे, व ती आईही ह्या गुलामाला ह्यांतलें कांहीं तरी समजलें आहे म्हणून जाणत आहे, त्या अबलेची, परमेश्वरा, काय दशा व्हावी ! ज्या घरधनिणीनें, समोरच खळ्यामध्यें धान्याचे भारे टाकले आहेत, व ते पुष्कळ गुरें लागून ओंसूत खाताहेत, हें पहात असतां आपलें आतां नुकसान होईल, धनी मेल्यावर तर आपल्याला कोणी एक दाणा देणार नाहीं, व दिलाच तर तो प्राणघेण्या सावकार देणार, हें जाणत असतांही तिनें गुरें हांकून लावूं नयेत काय ? तें या वेळीं कसचें सुचणार ? पण दुष्ट दैवा, सावकाराची तिला आठवण होते न होते तों, तिच्या पतीला स्वर्गींचा काळ घेऊन जाण्याच्या पूर्वीच तेथें तिचा सावकार विठ्ठलपंत काळे प्रत्यक्ष काळासारखा येऊन उभा राहिला !

विठ्ठलपंत ती कुळाची स्थिति पाहून तोंड हिरमुसलें करून मान हालवीत गंगाईस म्हणतोः—

"हं:, एकूण स्वारी आमच्या हातावर तुरी देऊन चालली वाटतें ? ठीक आहे; आतां बोलून काय उपयोगाचें ? माझ्यांकडूनच फसलें; मी बाकी इतके दिवस ठेवावी कां ? बरें, काय चिंता आहे ? माझ्या नरकांत फेडायला येईल."

"अहो पण मी आहेंना ?" गंगाई म्हणाली.

"तुला काय घेऊन चाटायची आहे ? आज मी सफाई बुडालों."

" विठ्ठलपंतनाना, " गंगाई म्हणाली " तुमचे रुपये आतां देतों बरें ? उगाच त्या प्राण्याला ह्या वेळीं प्राण सोडतांना का श्रापतां ? किती झाले तुमचे रुपये?"

तीन त्रीक नऊ नी चार त्रीक वारा असा विठ्ठलपंत हिशेब करीत बसला, आणि म्हणाला, " आमचे चवतीस रुपये झाले."

"दोन विसा नू चार. दहाचे इतके रुपये झाले अं !

" बया हिशेब करून पहा. " विठ्ठलपंत म्हणाले.

" जळ्ळा आमचा हिशेब ! " गंगाई म्हणाली, " ती गंजविर पन्नास रुपयांची वैलाची जोडी आहे, ती घेऊन जा. परस्पर मागल्या आंगानें जा; प्राण सोडतांना तरी कारभाऱ्यांच्या दृष्टीस पडायला नको. आणिक त्यांतून माझा थोरला सोनजी वैद्याला बोलवायला गेला आहे म्हणून बरें आहे, तो आला तर मग काय करील कोणास ठाऊक ! "

"बरें आहे. घरीं गेलों म्हणजे खत पाठवून देतों."

" खत पोंचलें आम्हांला. वैल गेल्यावर खत ठेवून तरी तुम्ही आमचें वेणार काय ?"

कोणालाही वाटेल कीं विठ्ठलपंतांसारखा निर्दय मनुष्य कोणी नसेल ! किंबहुना कोणी अशीही शंका घेतील कीं, ज्याला हृदय म्हणून आहे, त्याच्यानें अशा प्रसंगीं असे शब्द बोलवतील तरी कसे ! विठ्ठलपंत प्रसंग ओळखणारा होता हें निःसंशय आहे; परंतु तो कोणचा प्रसंग ? त्याला माहित होतें कीं अशा आणिबाणीच्या प्रसंगीं आपण दोन जर अधिक उणे शब्द बोललों, तर आपले रुपये आपण मागूं त्याच्याहूनही दामदुप्पट उभे राहणारे आहेत !

ती पडत्या फळाची आज्ञा मिळतांच विठ्ठलपंत कासरा लावून बैलांची जोडी घेऊन चालला; इतक्यांत सोनजी वैद्याला घेऊन आला. रोग्याचे प्राण तर निघून गेल्यासारखेच होते,व वैद्यबुवांची खेप फुकट झाली होती. आईची किंकाळी कानीं पडून बापाच्या मृत्यूचें वज्र लेंकाच्या हृदयावर पडतें आहे, तों त्यानें बैल नेतांना विठ्ठलपंतांस पाहिलें, आणि तो कुऱ्हाड उचलून त्यांचे आंगावर धांवला.

कुऱ्हाड विठ्ठलपंताचे डोक्यांत पडणार, तों गंगाईनें आणि वैद्यानें मध्यें येऊन सोनजीचे हात धरले, आणि विठ्ठलपंतांस मृत्यूच्या तोंडून सोडविलें.

"वर रे सोनारड्या," सोनजी देहभान सोडून ह्मणाला, " तुझा जीव न्हाई घेतला तर या बापाच्या पोटचाच मी नव्ह. "

काकांस हांकावयास लावून व आपण कासरा धरून विठ्ठलपंत बैल घेऊन आपल्या घरीं गेला.

भाग सत्ताविसावा.

काकांस विठ्ठलपंतांचे घरून ह्मणजे कांहीं प्राप्ति होती असा अर्थ नाहीं, परंतु कधीं रुपायाभर उसना लागल्यास तो मिळावा ह्मणून काकांस त्यांच्या शब्दास जपावें लागे. लक्ष्मीला ताप येतो असें काकांनीं ठरविलें, आणि त्याप्रमाणें त्यांनीं गोळी देऊन काढा द्यावयास सांगितलें.

परंतु सकाळींच उठून चुलींत विस्तव घालून काढा ठेवून तो वरचेवर किती उरला हें पाहून, अष्टमांश उतरून निववून अर्धी गोळी उगाळून 'ऊठ काढा वे,'

असें ह्या हतभाग्य दुखणेकरणीला ह्मणणारें मायेचें कोण आहे बरें? दुर्दैव पाठीस लागलें ह्मणजे तें थोडक्यांत सोडीत असतें काय? काढा करण्याचें काम आक्कावाईकडे आलें. रोगी आणि त्यांची शुश्रूषा करणार यांची जोडी चांगली जमली.

आपल्यावर चोहोंकडून संकटें प्राप्त झाल्यामुळें आणि कामाच्या दगदगीमुळें हा ताप आला आहे अशी लक्ष्मीची खात्री झाली होती, तरी काढा घेऊन आपण लवकर बरें व्हावें असें तिला वाटे; व याच कारणाकरितां तिचा आणि ठकीचा पहिल्याच दिवशीं तंटा झाला. ती रागावेल या भयानें लक्ष्मी जपूनच तिला ह्मणाली:—

"पाणी किती आठ वाट्या घातलें होतें नव्हे बरें?"

" हो हो आठ वाट्या. " आक्का तिला दटावून ह्मणत.

" ती आपली धाकटी चंद्री वाटी? "

"हो हो, ती—तीच, घे लवकर मला उशीर झाला."

" अहो घेतें पण—"

" पण नाहीं नी बीण नाहीं, " आक्का दिमाखानें ह्मणते, " काढा कडू असला ह्मणून काय झालें? "

" होय, 'पण' मी नाहीं ह्मणत. तरी पाणी आठ वाट्या होतेंना?"

आक्का कावून एक एक अक्षर उच्चारून ह्मणते, "हो—य—पा—णी—आ—ठ—वा—ट्या—हो—तें—तें—आ—ट—वू—न—ए—क—वा—टी—उरिवलें. समजलीस."

" हें पाणी दोन वाट्या उरलें आहे. " लक्ष्मी न संतापतांच ह्मणाली.

आक्का फारच चवताळली. तिनें तें काढ्याचें पातेलें उचलून रागानें पाय आपटीत चुलीच्या डोंबलावर नेऊन आदळलें, आणि खालीं मोठा जाळ लावून घागर घेऊन पाण्याला चालती झाली. कारण हें काम आतां तिच्याकडे आलें होतें.

लक्ष्मीला पुढचें भविष्य कळलेंच होतें. फारा वेळानें ठकी विहिरीवरून परतली आणि घरांतून चुर्र असा आवाज लक्ष्मिचे कानावर आला!

"हं आतां वाटीभर राहिला," आक्का काढा आणून लक्ष्मीला म्हणते, "घे लवकर आटप."

"आतां आटपायचीच वेळ आली आहे."

ठकी खवळून जाऊन म्हणते, "इतकें करून सवरून तुला फिरून उपकार नाहीं तो नाहींचना! ठीकच ग बाई, मला तूं ठाऊक आहेस. मी काढा केला आहे हा येथें ठेवतें, वाटलें, तर घे; नाहीं, तर नको घेऊं." असें बोलून ती निघून गेली, व जातां जातां म्हणाली, "आपण करून मार्गावर ठेवावें, पुढें ज्याची त्याची मर्जी."

ती गेल्यावर लक्ष्मीनें काढा पाहिला तों तें निखालस पाणी! काढा आटून जाऊन पातेलें कोरडें ठणठणीत झाल्यावर आंत पुन्हां पाणी घालून ढवळल्यामुळें त्याला तांबूस रंग मात्र आला आहे.

ही फिर्याद ठकीनें काशीबाईकडे नेली; व ती सुनेला येऊन बोलली, "मला हें भविष्य कळलेंच होतें. ती तुझी वैरीण, तूं तिची वैरीण. पण लक्ष्मी, तुझें नी तिचें हाडवैर असलें म्हणून काढ्यानें नाहीं

कांहीं केलें ? काढा मीच तिला करायला सांगितला होता. ऊठ चल, घे आटप. ”

आक्का तेव्हां लाडानें ह्मणते, “ आईग, मी कीं नाहीं, मी कीं नाहीं, तिला असें मग्राशीं ह्मटलें तेव्हां ती माझ्या आंगावर खेंकसून ह्मणाली, ‘ आतां आटपायचीच वेळ आली आहे.’ ”

“ होय काग लक्ष्मी ? ” काशीबाई ह्मणाली, “बरें आहे, मी हें ऐकून ठेवलें आहे. सगळ्याच गोष्टीची हौस; दुखण्यानें पडायची हौस, औषधाची हौस, आटपायची हौस.”

एकही शब्द न बोलतां लक्ष्मीनें विनतकरार डोळे मिटून तें पाणी घशाखालीं ओतून दिलें. सासू निघून गेली, पण नणंद पळभर मागें राहून लक्ष्मीला ऐकूं येईसें तालावर घोंकीत चालली,—“ भल्लें झालें, खाश्शी झाली, भल्लें झालें, खाश्शी झाली. ”

यापुढें नेहमीं असाच कसा तरी निरानिराळ्या प्रकारचा काढा लक्ष्मीचे खोलींत आणून टाकावा, आणि आक्कानें चालतें व्हावें. लक्ष्मीनें काढा मोरींत ओतून टाकावा. काढ्याचीच अशी अवस्था झाल्यावर पथ्याचें सांगावयास नको च. आक्कानें घाणेरडा, विचकटलेला, आंतून पाणी धावतें आहे असा भात, आणि आंत कोळसे तरंगताहेत असें सार तिजपुढें आणून टाकावें, आणि चालतें व्हावें; दोन घटकांनीं उष्टें काढायला ह्मणून यावें, आणि अन्न तसेंच राहिलें आहेसें पाहून “ कां, आटपायचें आहे वाटतें मनांत, ” असें तिला विचारून अन्न नेऊन गाईला घालावें.

गेल्या दुखण्यामुळें काशीबाईचा कुळांकडील पैसा

फार थकलेला होता, त्या पैशाला औषधपाणी करतांनाच काशीबाईला पुरेसें होई. आतां सुनेचें काढा पथ्यपाणी बिनतक्रार चाललें आहे, अशा समजुतीनें ही सावंकारीण पैसा गोळा करीतच राहिली. काका धन्वंतरी मधून मधून येंत असत, त्यांच्या जवळ तिनें सुनेच्या प्रकृतीविषयीं विचारावें, व त्यांजकडून बऱ्याचें उत्तर यावें. क्वचित् स्वतां येऊन सुनेला तिनें प्रत्यक्ष विचारल्यास तिनेंही 'मला बरें वाटतें' म्हणून म्हणावें. काशीबाई स्वस्थ राहिली; तिच्या भरंवशावर विठ्ठलपंत स्वस्थ राहिला; आधीं त्याला फारच असल्या गोष्टींची चौकशी हवी होती ! त्या म्हाताऱ्या भिकाऱ्यानें दारांत यावें, ओरओरडून जावें, त्यालां भिक्षासुद्धां मिळूं नये, मग लक्ष्मी दुखणेकरी असल्याचें त्याला कोण सांगणार ?

ह्या दुखण्यांत लक्ष्मीला घरांत बोलत त्यावरून चंद्रनाकडची एवढींच बातमी कळली कीं, तिच्या भावजयीला त्याच रात्रीं कोणीं नेऊन तिच्या चुलत बहिणीच्या घरीं पोचविलें; त्या पोंचविणारानें तिच्या आंगावरचे सर्व दागिने काढून घेतले; ती मुलगी तिला तेथें पोंचविणाराचें नांव कांहीं केल्या सांगत नाहीं. याच वेळीं माहेरीं तरी चोरी कां व्हावी, तेव्हां आपलें नशिबच फुटलें आहे असें तिला वाटूं लागलें. तिकडची चोरी सांपडल्याचें तरी कोणाकडून कळतें, निदान मावशीबाई तरी कांहीं बातमी आणती, तर तेवढें जिवाला समाधान झालें असतें, असें तिला वाटे; परंतु मावशीबाईच घरांत आल्याचें तिला आढळत नसे. म्हाताऱ्याचीही तिला आठवण

होई, परंतु बाहेर यावयास तिला शक्ति कोठें आहे ? तें तिचें दुखणें सामान्य होतें काय ? चोहोंकडून संकटांनीं व्याप्त होऊन आशा सुटल्याचें दुखणें तें, त्यानें तिची भयंकर अवस्था करून सोडली. औषध नाहीं, पाणी नाहीं, पोटाला अन्न नाहीं, दुखलें खुपलें विचारणें नाहीं, धिराचें बोलणें कीं ममतेचा शब्द नाहीं, फार तर काय, दोन चार वेळां ती कैदाशीण आक्का तिला शिव्या हांसडावयास काढा पथ्यपाणी खोलींत ठेवण्याचे निमित्तानें येई, त्या वेळीं काय तो तिच्याशीं असा दुसऱ्या माणसाचा तिच्या कानावर शब्द, आणि तेवढेंच काय तें तिला दुसऱ्या माणसाचें वारें; ह्या शिवाय उभ्या दिवसांत कीं रात्रींत मनुष्यानें तिकडे फिरकूं नये. खोलींत तो उदासवाणा काळोख, त्या काळोखामध्यें त्या बिचारीनें आपल्या कर्माशीं हंसत पडावें! तिचें उठावयाचें अवसान तर कधींच गेलें होतें; हातांपायांच्या नळ्या मोकळ्या पडल्या; गालफडें इतकीं बसलीं कीं जणूं काय तीं आंतून एकमेकांस चिकटलीं आहेत; खाटल्यावर इकडे तिकडे सरतांना तिच्या पाठीच्या कण्याला मोठमोठाले खट्टे पडले. डोकीला लांब सडक असे भाराभर केंस होते, ते चट सारे झडून जाऊन बैराग्याच्या जटेप्रमाणें गुंतून गेलेली एक बट राहून तिचें सर्व डोकें पांढरें फटफटीत पडलें. तिनें वारंवार ह्मणावें, " देवा, माझा किती अंत पहातोस ? मला कां तूं सोडवीत नाहींस ?"

भाग अठ्ठाविसावा.

लक्ष्मी अशी होऊन पडली आहे तों एके दिवशीं काका परिपाठाप्रमाणें तिची नाडी पहाण्याकरतां आले. कोणीं बराबर नसलें तरी वैद्यबुवांची रोग्याजवळ एकट्यानीं जाऊन प्रकृति पहाण्याची घसण पडली होती. त्याप्रमाणें वैद्यबुवा एकटेच असून लक्ष्मीची नाडी पहाण्याकरतां आपला हात पुढें करतात तों लक्ष्मीनें उशाखालची एक बुगडी काढून त्यांचे हातावर ठेवली.

"हें काय हें!" काका म्हणतात, "ही कशाला हवी? तूं असून कोठें बरी झाली आहेस? घे आपली परत; नको एखादी पिडा. विठ्ठलपंतांशीं गांठ आहे."

लक्ष्मीनें ती बुगडी त्यांस घेण्याविषयीं खुणाविलें. डोळे भरून आले असून गळा दाटून आल्यामुळें तिच्या तोंडावाटें शब्द उमटेना. तिनें खुणावून वैद्यबुवांस समजाविलें कीं बुगड्या माहेरच्या असून त्या आईनें दिलेल्या सासरच्यांस माहित नाहींत, याकरतां तुह्मांला घेण्याला हरकत नाहा.

"पण तूं चांगली बरी झाल्यावांचून मी तुजपासून हें घ्यावें काय म्हणून?" वैद्यानें विचारलें.

बोलल्यावांचून ह्यांला कांहीं समजावयाचें नाहीं म्हणून लक्ष्मीनें आपला रड्याचा आलेला कढ नाहींसा करून घसा खांकरून मोकळा केला, व बांहरून कोणीं ऐकत नाहीं असें त्यांला पाहण्यास खुणावून आपण बोलण्यास तयार झाली.

" काका – "

तरी पण तिच्यानें बोलवेना; डोळे पुन्हां भरून आले, कंठ पुन्हां दाटून आला, तों काका ह्मणतात– " उगी उगी बाई, रडूं नको बरें—मी तुला लवकर बरी करतों. रडून काय होतें बरें ? गुण येतां-येतां येईल. "

लक्ष्मी डोळे पुसून ह्मणूं लागली:–" काका मला–"

" काय तुला ! तुझी कशावर वांछा गेली आहे ? "

" काका बोललें तर बाहेर फुटेल ? "

" भलतेंच. मनांतसुद्धां आणूं नको स. एकदां गोष्ट मला सांगूं नको ह्मटल्यावर—प्राण गेला तरी नाहीं बाहेर फुटायची. "

" हळुहळु; बाहेर कोणीं ऐकेल. पण मी मागतें त्याप्रमाणें आणून द्याल ? ही एक बुगडी दिली आहे, आणून दिल्यावर राहिलेली दुसरी देईन. "

पहिल्या एका बुगडीनेंच वैद्यबुवांचा लोभ चाळविला होता, आणि आतां दुसरीचें वचन मिळतांच त्यांच्या लोभानें आपलें डोकें वर उचललें. " तुला काय पाहिजे तें सांग तर पाहूं," वैद्यबुवा ह्मणाले, " आणून देतों तुला. "

" अगदीं तुमचें वचन ?" तिनें विचारलें.

" बरें वचन जा. " ते ह्मणाले.

" मला पैशाचें कांहीं तरी आणून द्या. "

" हात् तिच्या, " वैद्यबुवा ह्मणतात, " ह्याला कशाला वचन हवें होतें ? पैशाचें सोडून दोन पैशांचें कां होईना ? काय पाहिजे तुला ? "

" काका तुम्ही काय समजलां ? " लक्ष्मी ह्मणते,

"माझी कांहीं खाऊन जगण्याची इच्छा नाहीं—"

"म्हणजे!" वैद्य म्हणतात, "हें तूं काय भलभलतेंच बोलतेस? चल जा." असें बोलून काका बुगडी टाकून निघून जाणार, तों लक्ष्मीनें झटदिशीं हात लाव करून त्याच धातर धरले.

"हें तूं काय आरंभलें आहेस?" त्यांनीं विचारलें.

"दुसरें कांहीं नाहीं," लक्ष्मी म्हणते, "मला कसली तरी पूड नाहीं तर कांहीं औषध द्या आणून. मी ह्या जिवाला फार त्रासलें आहें. ह्या दुखण्यानें मी मरणार हें तुम्हांला दिसतें आहे, तर आतां उगीच कुजत किती दिवस रहावें? तुम्ही औषध दिल्यास जिव आहे तों पर्यंत मी कोणाजवळ ही गोष्ट बोलणार नाहीं; मेल्यावर तर शंकाच राहिली नाहीं. हिला विष देऊन ह्यांनींच मारली असें कोणाच्या मनांत देखील यायचें नाहीं, कां तर मी मरायलाच टेकलें आहें. एक बुगडी राहिली आहे, तेवढी कांहीं तरी आणून द्या नी घेऊन जा. मी तुमच्या पायां पडतें पण मला उठायला अवसान नाहीं, काय करूं? मला तुम्ही संकटांतून सोडविल्यासारखें होईल; तुम्हांला पाप न लागतां उलटें येथें पुण्यच लागणार आहे; तर एवढी कृपा करा. तुम्ही नाहीं म्हटलें तरी मी आपल्या जिवाला कांहीं तरी करून घेणारच; मग एवढा शें दिडशेंचा ऐवज उगाच कां बुडविता!"

काकांनीं कांहीं वेळ स्तब्ध राहून शेवटीं ती गोष्ट कबूल केली. लक्ष्मीनें त्यांजपासून आज संध्याकाळचे आंत औषध आणून देतों असें वचन घेऊन त्यांस

जाऊं दिलें. काकांची स्वारी आपल्या घराकडे चालली. वाटेनें लक्ष्मीला औषध कसें द्यावें ह्या विषयीं त्यांचा विचार चालला होता. ते आपल्याशींच बडबडत चालले:—"काय हरकत आहे असें केलें ह्मणून? तिला असलें औषध द्यायला कोणची नड आहे? एक फुटकें मोतीं माझ्या बायकोच्या नाकाला मिळतांना मारामार, मग एवढाल्या बुगड्यांची कशाला गोष्ट हवी? ती ह्मणते हेंही खरेंच. तिनें ह्या सोनारड्याच्या घरीं किती दिवस कुजत पडावें? तिला औषध दिल्यावर ती कोणाजवळ बोलणार नाहीं हें खचित आहे. ती मरायलाच टेंकली आहे, तर माझ्याच औषधानें कांहीं झालें अशी शंकासुद्धां कोणाच्या मनांत यायची नाहीं. एकंदरींत तिला—देण्याला कांहीं हरकत नाहीं. आज दहा वर्षें बायको ह्मणते आहे कीं, कान मात्र उगाच टोंचून ठेवले आहेत, पण त्यांना सोन्याचा कीं मोत्यांचा विटाळ नाहीं. घे आतां ह्मणावें बुगड्या,—तीनशें रुपयांच्या बुगड्या. हिला हें औषध द्यावें. तें—तें. त्यांत आणखी घालावी ती पूड—काम निर्भय. पातळ करून द्यायला सांगूं. तिजजवळ वाटी आहेच. तेथेंच काढ्याची रुप्याची वाटी पडली होती; विळ्या सोनाराचा डौल मात्र पाहून द्यावा; सून मेली तरी हरकत नाहीं. रात्रीं मध्यान्हीला सामसूम झालें कीं द्यायला सांगूं. राहिलें आहे काय तिच्या कुडींत? प्रहर पुरे आहे. उजाडायचे आंत निकाल. पुढच्या व्यवस्थेला सकाळीं काकाला पाचारण आहेच. रात्रीं केव्हां गेली जाणें!"

ह्या बेताप्रमाणें सायंकाळचे आंत वैद्यांनीं लक्ष्मीला औषध आणून दिलें, व तें केव्हां कसें द्यावयाचें हेंही सर्व तिला सांगून ते बुगडी घेऊन चालते झाले.

हा दिवस मोठ्या आनंदांत लक्ष्मीनें घालविला. ती ठकीशीं आपण होऊन दोन गोड शब्द बोलली. काशीबाईनें निजते वेळीं तिचा समाचार घेतला, तेव्हां तिनें आज माझ्या जिवाला पुष्कळ बरें वाटतें म्हणून सांगितलें.

सर्व मनुष्यें निजून जिकडे तिकडे सामसूम झालें. मध्यान्हीची वेळ येऊन ठेपली, आणि ह्या अशा काळरात्रीला हें संपूर्ण जग काळोखामध्यें गढून जाऊन त्यांतील मनुष्यमात्र झोंपेमध्यें गर्क झालें आहे, अशा वेळीं लक्ष्मीची काळझोंपेची तयारी होते!

आपण आत्महत्या करतों हें पाप आहे, असें लक्ष्मीच्या मनांत मुळींच आलें नसेल काय? तिचा ह्याच गोष्टीचा विचार चालला होता. खोलीमध्यें दिवा टिकटिक जळतो आहे, आणि लक्ष्मी आपण करीत आहों हें ठीक नाहीं, असें मनन करीत प्रेतवत् अंथरुणावर पडली आहे. जिवंत राहून जिवाला यातना द्यावयाच्या त्यापेक्षां मेलें म्हणून काय हरकत आहे? आपल्यावांचून ह्या जगांत काय अडलें आहे? हालअपेष्टा सोसा पण प्राण स्वतां आपण होऊन निघून जाईपर्यंत त्याची वाट पहात रहा, त्या पेक्षां त्याला आतांच घालवला तर? मरतें म्हणजे मी आपल्या जिवाला सोडवणूकच करतें आहें.

लक्ष्मीचा असा मरणाचा निश्चय झाला. तिला काय तें एकाच गोष्टीविषयीं वाईट वाटलें. म्हणजे,

आपल्यावर जो चोरीचा आळ आला आहे, तो आळ तसाच अझून असून आपण मरणार. परंतु मग तिला ह्या गोष्टीनें आनंदच वाटूं लागला. तिनें विचार केला कीं आपण चोरी केली नाहीं ह्याविषयीं आपलें मन निर्मळ आहे. दुसऱ्या कोणीं तें कर्म केलें असल्यास कधीं नाहीं कधीं तें बाहेर येणारच. आपण मेल्यावर तें जर बाहेर आलें, तर आपण निरपराधी ठरूं. मेल्यावर नांव पाठीमागें रहावें ह्मणतात, अशा रीतीनें तरी माझी आठवण दुसऱ्यांना होईल. 'अरेरे, गरीब बिचारी ती आतां जिवंत नाहीं,' असें ह्मणून तरी लोक हळहळतील. त्यावेळेस तरी आपली आठवण लोक करतीलच.

मध्यरात्रीचा समय प्राप्त झाला त्यावेळीं लक्ष्मीनें आपलें मन घट्ट केलें. दिवा मंद जळतच होता. दार लावून घेतलें होतें, परंतु त्याला कडी लावली नव्हती. पहिल्यानें तिच्या मनांत आलें कीं दाराला कडी लावावी, परंतु तिला उठण्याचें सामर्थ्य नव्हतें. पुन्हां आपण कसेंही करून दाराला जर कडी लावली, तर मग मोठेंच लोकांना संशयाला कारण झालें, असेंही तिच्या मनांत आलें. तिनें वैद्यानें सांगितल्याप्रमाणें पूड टाकून वाटी तयार केली, आणि ती हातांत घेऊन तिनें ईश्वराची आपल्या हातून पूर्वी कधीं अपराध झाले असल्यास त्यांची, व ह्या आत्महत्येच्या पातकाची क्षमा करण्यासाठीं मनोभावानें प्रार्थना केली. आईबाप, सासुसासरे ह्यांचें कल्याण चिंतून त्यांजविषयीं ईश्वरापाशीं तिनें हवा मागितला. नंतर ती आपल्या नवऱ्याविषयीं देवाची

प्रार्थना करूं लागली कीं, "देवा, रामा, मी हें अमृत तर आतां प्राशन करतेंच. जय तुळसादेवी, मातुश्री, मी हें प्राशन करणारच. मरणानंतर माझी गती तुला वाटेल तशी कर. माझी अधिक कांहींएक मागून घेण्याची इच्छा नाहीं, पण तेवढें—तिकडे,—मी काय मागूं, देवीमाते, तुजजवळसुद्धां मागण्याला मी लाजावेंना? आतां पुरे ती लज्जा. पण नाहीं. माझ्या मनांत काय मागायचें आहे हें तुला समजतेंच आहे. मग मी तोंडानें तरी कशाला बोलूं! चांगली मति निपजूं दे. चोरी, दरोडा, दगलबाजी कुठे कांहीं—"

तों दार थाडदिशीं उघडलें, आणि आंत कोणी घुसून त्यानें लक्ष्मीच्या हातांतील वाटी हिसकावून घेऊन पार निघून गेला!

त्या जाणाराची लक्ष्मीला जी पाठीमागून थोडीशी झलक दिसली, तीवरून तिला वाटलें कीं ज्यांच्याविषयीं आपली ईश्वरापाशीं प्रार्थना चालली होती, तेच हे गृहस्थ!

"देवा," ती आपल्या कपाळाला हात लावून डोळे मिटून म्हणते, "रुप्याची वाटी गेली ना? देवा, तूं मला सुखाचें मरूंसुद्धां देत नाहींस इतकें तूं कां माझ्या हात धुवून पाठीस लागलें आहेस! आतां ही वाटी सरीसारखा किती गोंधळ करील भगवान् जाणे. सकाळीं वाटीची चौकशी होईल, मी काय सांगूं? मी डोळे मिटले आहेत असेच एकदांचे देवा मिटूंदेत—"

इतक्यांत वाटी वाजली. लक्ष्मी पाहते तों तीच रुप्याची वाटी रिकामी होऊन खोलींत पडली आहे!

भाग एकूणतिसावा.

हा प्रकार कसा काय झाला तो सांगितला पाहिजे. त्याच रात्रीं मध्यान्हीपर्यंत रेवगांवच्या मारुतीच्या देवळांत मावशीबाई,. वामनराव, विष्णुपंत व वाटवेकर चोर, ह्यांची कचेरी भरली होती. ह्या कचेरींत कसली वाटाघाट चालली होती हें वाचकांच्या लक्ष्यांत येऊन चुकलेंच असेल. पाटलाची दौलत तोंडांत टाकावयाचें वामनरावाच्या मनांत होतें, व त्या करतां त्यानें विठ्ठलपंतांस आपल्या हाताशीं घेतलें होतें. विठ्ठलपंत त्यांनीं ह्मटल्याप्रमाणें फक्त 'होचे धनी' होते, व त्याबद्दल त्यांस निम्मे हिस्सा मिळावयाचा होता. मावशीबाईच्या मदतीनें वामनरावाची अतोनात खटपट चालली होती. पाटील हजर झाल्यास त्याच्यावर कर्ज चढविण्याकरितां त्या वामनरावानें विठ्ठलपंतांच्या नांवचे कर्जरोखे करून ठेवले होते. तो हजर न झाल्यास त्याच्यावर चोरीचा आरोप आणावयाचा होता. विठ्ठलपंतांला त्यानें ह्या देवळांत बोलाविलें नाहीं; कारण 'पाटलाला बाबांच्या कोठारांत भांडीं आहेत हें मीं कळविलें,' अशी साक्ष विष्णूकडून गरज पडल्यास देवविण्याची होती. विठ्ठलपंतांनीं कदाचित् ही विष्णूकडून साक्ष देवविण्याचें कबूल केलें नसतें, ह्मणून वामनराव त्यास आयत्या वेळेस उभा करणार होता. खल जे आहेत, त्यांनीं दुष्ट बेत करीत असावें, परंतु त्या बेतांत नडी किती येतात व त्यांवर ते कशी माती लोटीत असतात, हें त्यांचें त्यांनाच माहित. असो. वाटवेकरास व विष्णूला मावशीबाईनें वामनरावास पैदा क-

रून दिलें, व तो त्यांस आतां कसें बोलावें तें शिकवीत होता. भांडीं किती होतीं, कोठें होतीं, तीं कोणीं कशीं आणलीं, कधीं आणलीं, इत्यादि त्यानें त्यांस शिकाविलें तों मध्यरात्र झाली. नंतर वाटेकर आपल्या गांवास निघाले, व विष्णु आपल्या तंबाखू ओढावयाच्या जागीं चालला. जेव्हां तो चंदनास किंवा वाटण्यास जाण्याच्या वाटेजवळजवळ आला तेव्हां तो घाबरून गेल्यासारखा झाला. "काय करावें, तो आपल्याशीं ह्मणतो, "हींच ती जागा. हींच ती वाटण्याची वाट, पण मला इकडून गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ह्या शिवाय दुसरी वाटच नाहीं."

त्याचें पाऊल पुढें नीट पडेनासें झालें. त्याचें भय दुणावत चाललें. तो मागेंपुढें पाहूं लागला.

"अरे देवा!" तो आपल्याशीं ह्मणतो, "झाड कोणीं हलवलें! तेंच कीं काय? आतां काय करूं! तेंच भूत, तेंच-तेंच. परमेश्वरा तूंच आतां संभाळणार आहेस."

"उभा." असा शब्द त्याच्या कानावर आला! त्याच्यापुढें कोणीं येऊन उभें राहिलें! तो गर्भगलित झाला. त्याची बोबडी वळली. त्याचे पाय मोडून जाऊन तो एकदम खालीं बसला.

"ऊठ." भूत ह्मणालें, आणि विष्णु उठला.

"चल." भूत ह्मणालें, आणि विष्णु तें भूत आडरानांत शिरूं लागलें त्याच्या मागून जाऊं लागला. विष्णूनें आपल्या आंगीं होतें नव्हतें तेवढें धैर्य आणून विचारलें, "कुठे? तूं कां—"

"चुप." असें ह्मणून भुतानें त्याच्या आंगावर

आपली काठी उगारली; आणि तें ह्मणतें, " नीट उत्तर दे. भिऊं नको. भ्यालास कीं पकडला. जो भीत नाहीं, त्याच्यावर आमची शक्ति चालत नाहीं. भुतांचें सगळें उलटें आहे. भिऊं नको, बोल."

विष्णूनें ह्या त्याच्या सौम्य वाणीवरून आपल्या आंगांत अवसान आणिलें, आणि तो ह्मणाला, " बोलतों. पण माझ्या आंगाला ते हात लावूं नकोस. जसें कांहीं लोखंड. तूं माझ्या पाठीस कां लागलें आहेस?"

" तूं आमच्यांतला आहेस." भूत ह्मणालें.

" कसा? मी ब्राह्मण, मनुष्य आहें."

" तूं पिशाच आहेस. रात्रीचा भटकत असतोस."

" मग?"

" चल. तूं आमचा आहेस. आतां कोठें चाल्ला आहेस? चल त्या नदीच्या डोहांत."

" मला सोड." विष्णु ह्मणाला.

" रात्रीं फिरणारास आह्मी पकडीत असतों. चल त्या नदीच्या डोहांत. त्या डोहांत मी जीव दिला हें तुला ठाऊक नाहीं?"

" मी समजलों. मी तुला ओळखलें."

" तुमचे काय बेत चालले आहेत ते मला कळले आहेत. मावशीबाई, वामनराव,— "

" मी नाहीं पण त्यांत जाणार. "

"तूं खुशाल जा. तुला मी त्या डोहांत नेतों. चल."

" तेवढें मला नको. मी रात्रीचा फिरणार नाहीं."

" मी तुला नेणार. तुझीं कृत्यें मला कळलीं आहेत. खतांचें रुमाल—कुठकरण्याचा दरवडा—माव-

शीबाईला दिलेली सरी. सगळें आह्मास्नी कळतें. तुझी साक्ष–"

"नाहीं नाहीं, मी साक्ष देणार नाहीं."

"दे तूं जिवंत राहिलास तर. तुला बुडवणार. मारणार."

"तसें नको करूं.मी आईबापांचा एकटाच आहें. मी मेलों तर बायको पाठीमागें–"

"भुतांशीं लबाड नये बोलूं. आतांच मारीन. तुझें बायकोशीं सरळ आहे?"

"नाहीं."

"का? कारण? तिचा काय अपराध?"

"कारण नाहीं. तिचा अपराध नाहीं."

"तुला मी नेणार; तिचा कां त्याग केलास?"

"आतां नाहीं करणार. सोड मला."

"मला दहींभात देशील?"

"देईन."

"तिच्या हातचा? तिजकडून? तिला तूं सांगून?"

"हो. तिजकडून. कुठे द्यायचा?"

"तुमच्या आवळीच्या झाडाखालीं ठेवा. तिजकडून–तिला तूं सांगून–नाहीं तर तुझ्या उरावर बसेन. तर मग तुझी बायको दुखणकरी आहे, तिला बरी करूं?"

"कर."

"जा तर, धांवत जा. तुझी बायको औषध घेत असेल तिची वाटी हिसकावून घेऊन तिचें औषध ओतून टाक."

"औषध कसें मी ओतून टाकूं?"

"तुला माहित नाहीं–भुतांचें सगळें उलटें आहे ? औषध ओतून टाकल्यावर ती आठपंधरा दिवसांनीं बरी होईल. जा. पळ. पुन्हां रात्रीचा हिंडलास तर डोहांत बुडवीन. जा. पळ. मागें पाहूं नको, भिऊं नको, नाहीं तर तुला मी डोंगराएवढा दिसेन. "

विष्णु मागें न पहातां पळत सुटला. तो घरीं आला. लक्ष्मीच्या खोलींत जाण्याला त्याला एकाएकीं धीर होईना. त्यानें दाराशीं कानोसा घेतला, परंतु त्याला कांहीं ऐकूं येईना. शेवटीं लक्ष्मीला त्यानें ईश्वराचें नांव घेतांना ऐकलें, तो आंत दार उघडून गेला, आणि तिची वाटी हिसकावून घेऊन बाहेर ओतून देऊन त्यानें ती आंत नेऊन ठेवली.

विष्णूनें बाहेर जातांना लक्ष्मीच्या खोलीचें दार लावून घेतलें. नवऱ्याचाच जेव्हां तिला संशय आला, तेव्हां लक्ष्मीचें मन अस्वस्थ राहील यांत मोठें नवल नाहीं. एकाएकीं त्यांला उपरति होऊन त्यानीं आपल्या हातांतून वाटी काढून कशी घ्यावी ? त्यांना हें सगळें कळलें आहे कीं काय ? काका वैद्य बोलला कीं काय नकळे, असे नाना तरंग तिच्या मनांत आले, व उद्यां काकांस विचारूं असा तिनें बेत केला.

भाग तिसावा.

परंतु त्या दिवसापासून काकांनीं त्या घरीं आपलें काळें केलें. त्या रात्री लक्ष्मीला जी अद्दल घडून आली तिच्याविषयीं घरांतही तिनें कोणाकडून ऐकलें नाहीं. घरांतल्या माणसांचे व्यापार, बोलणीं चालणीं पाहिल्या-

प्रमाणेंच चाललीं होतीं. आपल्या हातांतुन वाटी नेणारे विष्णुपंतच असा तिच्या मनाचा कायमचा ग्रह झाला होता. त्यांनीं वाटी नेऊन आंतलें औषध बाहेर ओतून जेव्हां ती पुन्हां आंत आणून ठेवली, तेव्हां आपला काय उद्देश होता हें कोणीकडून तरी त्यांच्या कानीं गेलेंच गेलें आहे अशी तिची खात्री झाली. तिला आशा लागली. एकूण आपल्या जिवाची काळजी ह्यांला आहे असें तिला वाटून तिच्या मनाचें समाधान झालें. जगावेंसें तिला वाटूं लागलें. विष्णुपंतांस ही गोष्ट करण्यास दुसऱ्या कोणीं लाविलें कीं काय तें समजून घेण्याची तिला इच्छा उत्पन्न झाली. जिवाची आशा लागल्यामुळें ठकी कसलें का अन्न आणीना, तें ती अळेंबळें खाऊं लागली. आक्कानें " मी सुखाची जी बसत होतें, नें तुझ्यानें पाहवेना, ह्मणून तूं दुखणें घेतलेंस, " असें वरचेवर ह्मणावें तरी लक्ष्मी तिकडे मुळीं लक्षच देईनाशी झाली.

विष्णुपंतांस कितपत पश्चात्ताप झाला, त्यांच्या प्रकृतींत जास्ती कांहीं सुधारा झाला आहे कीं काय, हें एकदां कळतें तर बरें झालें असतें, असें तिला वाटूं लागलें. एक दिवस रात्रीं लक्ष्मीच्या मनाला बरीच हुशारी वाटत होती. तिला आतां वाटलें कीं आपल्या नवऱ्याच्या प्रकृतींत जर कांहीं फेरबदल झाला असेल तर पहावा. तिनें बरीचशी रात्र होऊं दिली, आणि सगळीं माणसें निजलीं असें पाहून ती भिंतीला धरून सांवरत सांवरत उठली,आणि खुरडत ओटीचे दारापर्यंत आली. येथें कोणी निजलें आहे

कीं नाहीं एवढें पाहण्यापुरतें ओटीवर दिसत असे. लक्ष्मीनें पाहिलें तों विष्णुपंत आपल्या जागीं निजले आहेत; ते विष्णुपंतच्च अशी जेव्हां तिची खात्री झाली, तेव्हां तिच्या आनंदाला पारावारच्च नाहीं. तिला बरीच हुशारी वाटूं लागली. त्या दिवसापासून तिनें रात्रीं सामसूम झालें ह्मणजे ओटीचे दारीं खुरडत यावें, आणि विष्णुपंत निजलेले आहेत-से पाहून समाधान पावून जाऊन स्वस्थ निजावें. तिला चांगली झोंप येऊं लागली. थोड्याच दिवसांत तिला उठून चालण्याचें अवसान आलें.

पांदणी रात्र होती. लक्ष्मी नित्याप्रमाणें उठून ओटीचे दारांत जाऊन पहाते तों विष्णुपंत नाहींत ! तिचा हिरमोड झाला. ती जाऊन निजली खरी, परंतु तिच्या मनाला तो चटका लागून राहिला. जरा कांहीं बाहेर वाजलें कीं तिनें हळूच उठून यावें, परंतु विष्णुपंत निजलेले नाहींत असें पाहून परत जाऊन निजावें. दोन तीनदां असें झालें. पंहाटेस तीन वाजण्याच्या सुमारास तिला बाहेर कोणाची काठी वाजल्यासारखा भास झाला, ह्मणून ती उठून दारांत आली. तिला ओटीवर कोणीं दिसलें नाहीं, परंतु आंगणांत कोणी मनुष्य असल्याचा तिला भास झाला, ह्मणून ती पुढें आली. चंद्र मावळावयास गेला होता तरी चांदणें चांगलें स्वच्छ पडलें होतें. तिनें पाहिलें तों तो तिच्या ओळखीचा ह्मातारा भिकारी !

" कोण, मुली ? तुझा नवरा निजला आहे घरांत !" त्या ह्माताऱ्यानें तिला विचारलें.

"नाहीं." लक्ष्मी म्हणाली.

"नाहीं ! म्हणजे ! अरे देवा !" असें म्हणून तो म्हातारा तसाच मागें परतला.

त्याला असा घाबरलेला परततांना पाहून लक्ष्मीही घाबरली. तिला असा कांहीं तरी मोठा प्रसंग आहे खरा म्हणून धास्ती पडली. तो म्हातारा काठी टेंकीत भराभर चालला होता, त्याला जाऊन खरा काय प्रकार आहे तो विचारावा असें तिला वाटलें. म्हातारा बराच लांब गेला, तेव्हां त्याला ती तेथून भलत्याच वेळीं कशी हांक मारील ? तिच्यानें तसेंच अर्धवट कळून स्वस्थ राहवेना, म्हणून म्हाताऱ्याला गांठून विचारावें असा तिनें बेत केला. ती निघाली, परंतु म्हातारा तर काठीवर एकसारखा भराभर चालला होता; लक्ष्मीच्या आणि त्याच्यामध्यें बरेंच अंतर पडलें. धांवून त्या म्हाताऱ्याला गांठावें तर तिच्या आंगीं इतकें अवसान नव्हतें. ती बरीच दूर आली, तेव्हां तिला मागेंही परततां येईना. चंद्र डोंगराआड गेला होता, त्यामुळें चांदणेंही नाहींसें झालें. थोडासा प्रकाश होता, त्यामुळें लक्ष्मीला म्हाताऱ्यावर नजर ठेवतां येई, परंतु तो झाडांच्या गर्दीत शिरला म्हणजे तिला कांहींच दिसेनासें होई. म्हातारा डोंगर चढूं लागला, लक्ष्मीही त्याजवर नजर ठेवून डोंगर चढूं लागली. परंतु दोघांमध्यें अंतर फारच पडलें ! चंद्राचा उरलासुरलेला प्रकाशही गेला—लक्ष्मी रानांत एकटी पडली—म्हाताराही पुढें दिसेनासा झाला—मागें परतावें तर तीही पंचाईत, आलेल्याच वाटेनें आपण सरळ जातों म्हणून कशावरून? आधींच तिच्या आंगीं अवसान नव्हतें, त्यांत ती इ-

तकी चालत आली, तशांत तिचें धैर्य खचून गेलें. 'आतां काय करावें! ही कुठली मला चांडाळणीला बुद्धि सुचली,' म्हणून ती बडबडूं लागली. मोठें अवसान आणून म्हाताऱ्याला हांक मारावी तर भीतीनें एवढा शब्द उमटतो आहे कोठें? वाघळाचे पंख फडफडले तरी तिच्या उरांत धडकी भरे; रात्रीचा किर्र शब्द ऐकून तिचें काळीज थरारून जाई; जरा कोठें सरसरलें कीं तिच्या काळजाचा तुकडाच पडे. इतक्यांत सरकण एक कोल्हा बाहेर आला, त्याबरोबर तिनें एक किंकाळी फोडली!

म्हातारा एक वळण घेऊन वरच्या टेंकाडावर म्हणजे थेट लक्ष्मीच्या डोक्यावर आला होता, त्याला ही किंकाळी ऐकूं गेली. तो स्वभावतःच दयाभूत अंतःकरणाचा पडल्यामुळें कोणाची किंकाळी आहे ती पहावी म्हणून त्याला बुद्धि निपजली. तो परतला. उतरावयास त्याला वेळ लागला नाहीं. तो पाहतो तों वाटेंत एका धोंड्यादर कोणी बसलें आहे?

"म्हातारे बाबा, आतां तूंच माझा त्राता आहेस," असें म्हणून लक्ष्मी गळा काढून रडूं लागली. तिची म्हाताऱ्यानें समजूत केली. नंतर त्यानें अशी कशी आलीस म्हणून तिला विचारलें. लक्ष्मीनें कसा प्रकार झाला तें सांगितलें, व त्याला तूं कोठें चाललास म्हणून विचारलें. तो म्हणाला, "ही चंदनची वाट आहे. तूं इकडून गेली आलेली आहेस, परंतु रात्रीचें म्हणून तुला ओळखत नाहीं. आतां तूं चालवेल तितकें जलद चालून मजबरोबर चल."

एवढें बोलून तो म्हातारा पूर्वीप्रमाणें भराभर डों-

गर चढूं लागला. लक्ष्मी तशीच त्याजबराबर निघाली. पंहाटेचा गार वारा सुटला होता, व लक्ष्मी लुगडें नेसली होती तेवढेंच, म्हणून म्हाताऱ्यानें आपल्या आंगावरचें पटकूर काढून लक्ष्मीचे आंगावरटाकलें, आणि म्हणाला कीं, "तुझें तापाचें आंग आहे, हा गार वारा घेऊं नकोस." तिनेंही त्याचें तें पटकूर आपल्या आंगाभोंवतीं गुंडाळून घेतलें.

तीं दोघें त्या डोंगराच्या शेंड्यावर म्हणजे जेथें वाटण्याकडची वाट मिळते त्या सुमारास आलीं. अंधेर पडला होता तरी वाटण्याच्या वाटेनें कोणी मनुष्य येत आहे असें त्यांना स्पष्ट दिसलें. तो मनुष्य तिच्यावर येणार, तों मागाहून चार मनुष्यांनीं येऊन त्याला गांठलें, व त्याच्या सभोंवार गराडा घातला!

"धांव धांव धांव," तो म्हातारा लक्ष्मीला म्हणाला, आणि तीं दोघेंही त्या जाग्याकडे धांवत चाललीं. 'ताड, तोंड, ताड,' असे सोंट्याचे तीन तडाखे त्यांच्या कानावर आले, आणि तो सोंटे बसलेला मनुष्य धाडकण खालीं पडला.

खालीं पडला हा आपला नवराच कीं काय, असें लक्ष्मीच्या मनांत येत आहे तों "हाण इश्न्या," असें त्या मारेकऱ्यांतील कोणी बोलला. विष्णु आपला हात उंच करून त्या पडलेल्या मनुष्यावर बडग्याचा घांव घालणार, तों लक्ष्मीनें एकदम जाऊन त्याला कंवटाळून त्याचा हात धरला. त्यानें इकडे तिकडे पाहिलें, आणि "भ्—भ्—भूत" असें बोलून तो लक्ष्मीसकट खालीं पडला!

ते मारेकरी पळणार, इतक्यांत सरकारचे चार

शिपाई व त्यांच्यावरचा हवालदार असे एका कैद्याला घेऊन तेथें येऊन धडकले.

" पकडा, पकडा ह्या सर्वांस, " असा त्या हवालदारानें आपल्या शिपायांस हुकूम केला. " पकडा ह्यांना, " तो ह्मणाला, " मी हा कैदी संभाळतों. "

हवालदाराचा असा हुकूम सुटतांच ते शिपाई बंदुका घेऊन त्या मारेकऱ्यांच्या आंगावर गेले. ते मारेकरी पूर्वींच गडबडून गेले होते, त्यांजला पकडण्यास त्या शिपायांस कठीण गेलें नाहीं. त्यांनीं त्यांच्या हातांतील बडगे काढून घेतले. म्हातारा जवळच उभा होता; लक्ष्मी व विष्णु हींही उठून निरनिराळीं झालीं होतीं. तीं सर्व माणसें मारेकऱ्यांतच गणलीं गेलीं, ह्मणून त्या सर्वांस त्यांनीं कैद केलें. शिपायांनीं त्या मारेकऱ्यांच्या डोकीचीं पागोटीं काढून त्यांनीं त्यांचे हात बांधले.त्यांनींही आपखुशीनें शिपायांच्या स्वाधीन होऊन पळून न जाण्याचें कबूल केलें. ह्माताऱ्याचे हात बांधावयास त्याचे आंगावर कांहीं नव्हतें, ह्मणून त्याजपासून मी पळणार नाहीं असा जाब घेऊन व त्याच्या अशक्ततेकडे पाहून त्यांनीं त्यास तसेंच राहूं दिलें. त्याच्या बराबर असलेल्या मुलीच्या संबंधानेंही त्यांना विशेष बंदोबस्त हवा असें वाटलें नाहीं, ह्मणून तिलाही त्यांनीं तसेंच राहूं दिलें.

आधीं आरोपी लोकांचा असा बंदोबस्त करून हवालदार त्या खालीं पडलेल्या मनुष्याला किती लागलें आहे, तो मेला आहे कीं जिवंत आहे त्याच्या चौकशीस लागला. चित झालेला मनु-

प्य कोण आहे तें समजेना, व उजेडावांचून त्याला किती लागलें, काय झालें, तेंही कळावयाचें नाहीं, म्हणून त्यांना चुडीची पंचाईत पडली. त्यांनीं त्या मनुष्याच्या उराला हात लावून पाहिला तों तो चांगला धडधडत होता. याला न्यावा कसा ह्याचीही त्यांना पंचाईत पडली. खालीं वाटवें गांव होता, तेथच्या लोकांस 'चुडी आणा रे,' म्हणून त्या शिपायांनीं आरोळी ठोकली.

वाटव्यामध्यें सगळीं घरें लांब होतीं; वरच्या बाजूला म्हणजे ही वाटेवरून मारलेली हांक ऐकूं जाण्यापुरतें असें गंगाईचें घर काय तें जवळ होतें. तिला ही आरोळी ऐकूं गेली. आरोळी कोण मारतें तें ऐक म्हणून ती आपल्या मुलास उठवायास जाते तों मुलगा जाग्यावर नाहीं! ती तशीच अंधेरांतून वर धांवून आली. शिपायांनीं त्यांना गरज असलेल्या गोष्टींची तिला माहिती विचारली. तिनें सांगितलें कीं चुडीला माझ्या घरीं कांहीं नाहीं. पाळणा तुम्हांला हवा असल्यास मी आणून देतें. ती परत गेली, आणि तिनें त्यांस पाळणा, काठ्या, वांसा, दोऱ्या वगैरे सामान आणून दिलें. नंतर ती त्या कैद केलेल्या मारेकऱ्यांकडे पाहून म्हणाली, "कोण सोनजी?"

"ओ बया." तो म्हणाला.

"चुप बैठो." तो हवालदार म्हणाला. "बाई, तूं तेथें खालीं बैस, नाहीं तर तुलासुद्धां कैद करीन." त्यानें तिला बसवून घेतलें, आणि शिपायांकडून त्या मारेकऱ्यांचे हात सोडवून त्यांजकडून त्यानें पाळणा

तयार करविला. त्यानें त्या चित झालेल्या मनुष्यास आंत घातलें, आणि पाळणा त्याच चार मारेकऱ्यांच्या डोकीवर दिला. नंतर त्या हवालदारानें गंगाईस जाऊं दिलें. ओळख निघाली तेव्हां हिला आधीं जाऊं देऊन उपयोगाचें नाहीं, कांहीं गोंधळ आणील, म्हणून हा वेळपावेतों त्यानें तिला अडकावून ठेवलें होतें..

" चल बाई, " तो हवालदार आपल्या पूर्वीच्या बरोबर आणलिल्या कैद्यास म्हणाला.

" अरे हो येतें पण, मोठा हवालदारडा मला ठाऊक आहेस. मला शिवशील तर खबरदार, बाशा मामलेदाराला सांगेन. "

तो तिचा शब्द ऐकतांच सर्व कैदी आपआपल्या मनाशीं म्हणतात, " काय ! मावशीबाई ! "

भाग एकतिसावा.

वाटेनें एक शब्दही न बोलतां मावशीबाईसह तो सर्व खटला चंद्रन येथें फौजदार कचेरींत उजाडावयाचे आंतच उतरला. लक्ष्मीला इतक्या लांब येण्याची वास्तविक ताकद नव्हती, परंतु ती कशी आली हें तिच्या जिवालाच माहित. उजाडावयाला थोडा अवकाश होता, याजकरितां तोंपर्यंत सर्व खटला तसाच ठेवून उजाडल्याबरोबर मामलेदारांस जाऊन कळवूं, अशा इराद्यानें फौजदारानें आपल्या शिपायांकडून कैदींस कोठड्यांतून कोंडून ठेवविलें. लक्ष्मी व म्हातारा भिकारी हींही मारेकऱ्यांच्याच मंडळींतलीं आहेत अशी मजबूत अर्थातच अद्यापपर्यंत होती, ह्याकरितां त्यांनाही निरनिराळ्या खोल्यांतून कोंडून ठेविलें.

नंतर शिपाई दिवाबत्ती घेऊन पाळण्यांतून आ-णलेल्या मनुष्याच्या चाकरीला लागले. तो मनुष्य सावध होऊन त्यांजबळ पाणी मागूं लागला. शि-पायानीं प्रसंगाला उचित अशीच त्याची जोपासना केली, व त्याला मोठाल्या खोंका पडल्या होत्या त्या भरून आणि त्याला साखरहळद चारून त्यांनीं खाटल्यावर नेऊन निजविलें.

उजाडल्याबरोबर मामलेदार उठले, माहींत तोंच एक आनंदाची बातमी सांगण्याकरतां ह्मणून फौज-दारानें आपल्या एका शिपायास त्यांचे घरीं पाठवि-लें. शिपाई हंसत हंसत मामलेदारांस विनोदानें ह्मणाला, " चोरीच्या शोधाबद्दल आपण वचन दिल्याप्रमाणें बक्षिसाचे रुपये काढून ठेवावयास फौ-जदारसाहेबांनीं सांगितलें आहे. माईसाहेबांला फसवून नेऊन त्यांचे दागिने पळवणारी बाई रात्रीं धरून आणली आहे. " ही आनंदाची बातमी ऐ-कतांच वासुदेवपंत तसेच फौजदारकचेरीकडे निघाले. येतां येतां शिपायानें त्यांस वाटेंत एक दुखापतीचा खटला पकडून आणला आहे ह्मणून सांगितलें, परंतु त्याकडे त्यांचें विशेष लक्ष्य गेलें नाहीं.

मामलेदारांसमोर बाईस आणिलें, परंतु तिनें मुळींच चोरी केल्याचें नाकबूल केलें. तिला पुन्हां कोठडींत घालून ही बाई रेवगांवास कशी सांपडली, तिचा शि-पायांनीं कसा पत्ता लावला, इत्यादि नानाप्रकारची चौकशी वासुदेवपंत करीत आहेत तों रमाबाई, का-शीबाई व ठकी तेथें आल्या!

त्या तिघीही कावऱ्याबावऱ्या होऊन गेलेल्या दिसत

होत्या, आणि ठकी व काशीबाई ह्यांनीं तर आपलीं तोंडें झांकून घेतलीं होतीं. जवळ येतांच काशीबाई गळा काढून रडूं लागली ! वासुदेवपंतांस गोंधळल्यासारखें झालें. कांहींच प्रकार त्यांच्या ध्यानीं येईना. तों इतक्यांत गंगाई तेथें आली, आणि "सावकारांस कितपत लागलें आहे," ह्मणून तिनें एकदम प्रश्न केला.

" काय ! विठ्ठलपंत ! " वासुदेवपंत दचकून ह्मणाले, आणि काशीबाई ओकसाबोकशीं रडूं लागली. शिपायांसही जखमी झालेले मामलेदारांचे व्याही असें कळलें, आणि त्यांनीं त्या सर्वांस विठ्ठलपंतांचे कोठडींत नेलें.

परस्पर ओळख पटली. विठ्ठलपंतांस बायको मुलगी भेटली. त्यांस इजा बरीच झाली होती, तरी त्यांच्या जखमा श्रमसाध्य होत्या. बोलावयाचें असान आल्यावर त्यांनीं मला मारेकऱ्यांनीं कोठें गांठलें तें सांगितलें, आणि काशीबाईला विचारलें कीं, " ही हकीगत तुह्मांस इतक्या लवकर कळविली कोणीं; विष्णु तुमच्या बराबर कां नाहीं आला; आणि घर लक्ष्मीच्याच स्वाधीन करून आला कीं काय ? " ह्याला काशीबाईनें उत्तरें दिलीं कीं, " ही हकीगत गंगाई रेवडीनें आह्मांला कळविली; विष्णु ओसरीवर निजलेला नव्हता; आह्मी लक्ष्मीच्या खोलीच्या दारांत जाऊन लक्ष्मीला हांक मारिली, परंतु तिनें हांक दिली नाहीं, याकरतां तिला झोंप लागली असावी अशा समजुतीनें तिला न उठवितां सध्यां घाईघाईनेंच ओटीच्या दाराला कुलूप लावून आह्मी आलों आहों, "

"असो." वासुदेवपंत सुस्कारा टाकून विठ्ठलपंतांस ह्मणाले, "तुह्मांला ईश्वरानेंच वांचविलें ह्मणावयाचें. आजचा सुदिनच आहे समजावयाचा; तुह्मी मारेकऱ्यांच्या हातून वांचलां, आमच्या चोरीचाही पत्ता लागला-"

"पण रावसाहेब," फौजदार हंसत हंसत विनोदानें ह्मणतो, "तेवढी याद असूंद्या. तेवढे-तेवढे शिपायांस दोनशें रुपये बक्षिसाचे-"

"आन् मला हजार रुपये बक्षिसाचे. आजचा सुदिनच आहे." असें शेजारच्या कैद्यांच्या कोठडीच्या जाळींतून तोंड घालून कोणी बोलला, आणि सर्वजण तिकडे आश्चर्यानें पाहूं लागले.

"आं:!" विठ्ठलपंत ओरडून ह्मणतात, "अरे हरामखोरा! अरे हा आमच्याच गांवचा भिकारी! अरे हा माझा खून करायला तयार झाला! अरे मी याच्या बापाचें काय गांठोडें खाल्लें होतें? त्या दिवशीं मी ह्याच्या तोंडांत दिली होती ह्मणून? बरें आणखी आणा पाहूं कोण मला मारायला टपले होते ते? आणा मला पाहूं दे."

शिपायांनीं राम्याला त्याच्या कोठडींतून पुढें आणला; त्याला विठ्ठलपंतांनीं ओळखलें, व तोंडानें शिव्यांचा सपाटा चालविला. पुढें त्यांनीं सदबाला आणलें, त्यालाही त्यांनीं ओळखलें. पुढें देवजीला आणलें, त्याला पाहतांच गंगाई समोरच्या झाडाखालीं जाऊन स्फुंदत बसली होती, ती "माझ्या सोन्याला सोडवाहो, सोडवाहो," ह्मणून आक्रोश करीत वासुदेवपंतांचे पायां पडूं लागली.

"ह्या गुलामांना अगदीं सोडूं नका," विठ्ठलपंत ह्मणाला, "ह्यांना एकेकाला काळ्यापाण्याची सजा द्या. मी ह्मशीचें दूध काढावें ह्मणून पहांटेचा वाट-व्याहून घरीं जात होतों, तों हरामखोरांनीं ही संधि साधली. हे सगळे माझे कर्जदार आहेत. आणा पाहूं आणखी कोण कोण रामोशी आहेत ते?"

शिपायांनीं जाऊन विष्णूला आणलें. परंतु त्यानें आपलें तोंड धोतरांत गुरगुटून घेऊन मान खालीं घातली होती; ती तो वर करीना.

"हा कोण बरें? ह्याचें तोंड वर करा पाहूं?" विठ्ठलपंत ह्मणाले. शिपाई त्याचें तोंड वर करूं लागले, परंतु तो त्यांस बधेना.

"काय ह्या मारेकऱ्यांमध्यें ब्राह्मणही आहेत?" वासुदेवपंत ह्मणाले.

"पण मेला आपलें तोंड वर करतोय कुठे? आतां लाजतोय." रमाबाई काशीबाईलाम्हणून म्ह-णाली. त्या तिघीही एके आंगास उभ्या होत्या.

शेवटीं धोतर काढून शिपायांनीं त्याची मान वर केली. आणि तो विष्णु असें जेव्हां सगळ्यांनीं ओ-ळखलें, तेव्हां त्यांनीं आपलीं तोंडें मागें फिरविलीं!

कोणाच्याही तोंडांतून ब्र निघाला नाहीं, तेव्हां शिपायांस त्यांचें हें नातें कसें कळणार? त्यांतील एक ह्मणाला, "महाराज, अझून आपण पाहिलें आहे कोठें? ह्या मारेकऱ्यांमध्यें एक बाईही आहे!" असें म्हणून त्यानें जाऊन लक्ष्मीला आणलें. भिकाऱ्यानें दिलेल्या पटकुरानें आपलें तोंड तिनें झांकलें होतें. तिला उभें राहण्याचें अवसान मुळींच नव्हतें, ह्मणून

ती आल्याबरोबर गुढघ्यांत मान घालून खालीं बसली. तिची तशी दशा झालेली असल्यामुळें तिला कोणीं ओळखील असा संभवसुद्धां नव्हता. शिपायांच्यानें मान वर कर म्हणून तिजवर सक्ती करवेना. वासुदेवपंतांसही तितका निष्ठुर हुकूम करवेना.

त्या म्हाताऱ्या भिकाऱ्याला मात्र त्याच्या कोठीच्या बाहेर काढलें नव्हतें. त्यानें खिडकींतून वासुदेवपंतांच्या हातांत देण्याकरतां जवळच्या शिपायाजवळ कांहीं दिलें; तें हातांत घेऊन वासुदेवपंत वाचून पाहून म्हणतातः—

"काय! आंगठी! वेणू!"

'वेणू' म्हणतांच वेणूनें आपली मान वर केली.

सर्वजण किती लज्जित झालीं असतील? वासुदेवपंतांस किती दुःख झालें असल? रमाबाई किती श्रमी झाली असेल? विठ्ठलपंत काशीबाई किती खेद पावलीं असतील? विष्णूला किती विस्मय वाटला असेल!

लक्ष्मीनें उठून वासुदेवपंतांचे पायांवर लोटांगण घातलें. तिला लाथेनें झुगारून द्यावी कीं वर उचलून घ्यावी हेंच त्या गृहस्थास उमजेना!

"महाराज, ह्या मुलीकडे कांहींएक अपराध नाहीं." तो म्हातारा म्हणाला.

"तूं कोण?" वासुदेवपंतांनीं त्याला विचारलें. "तूं ही आंगठी घेऊन गेला होतास, तर तूंच तो नाहींसा झालेला वाटण्याचा पाटील असावास?"

"हां सरकार." म्हातारा म्हणाला, "तोच आपल्या पायाचा चाकर हा वेळपावतर आपल्या कृपेनें

जिवंत आहे. मला हजर करील त्याला आपण हजार रुपयांचें बक्षीस लावलें होतें. परंतु आतां मीच होऊन हजर झालों आहें. तरी माझी बक्षिसावर इच्छा नाहीं. मी मागतों तें द्यावें म्हणजे झालें.

वासुदेवपंतांनीं त्यास कोठडींतून बाहेर काढविलें आणि त्यांनीं त्याला म्हटलें, "काय, माग पाहूं ?"

"पहिल्यानें ह्या वेणूताई आपल्या पायांशीं रडत पडल्या आहेत त्यांना वर घ्या पाहूं ? त्या मारेकऱ्यांतल्या नव्हत. पितृहत्येच्या पातकापासून आपल्या नवऱ्याला सोडविण्याकरतां त्या आल्या होत्या."

हें ऐकून वासुदेवपंत व रमाबाई ह्या दोघांसही तिचा गहिंवर आला. रमाबाईनें पुढें होऊन तिला वर उचललें; वासुदेवपंतांनीं तिचे अश्रु पुसले; दोघांनाही प्रेमाचे उमाळे येऊं लागले; तिची ती दशा पाहून दोघांच्याही डोळ्यांतून खळखळां पाणी आलें. त्या दोघांनींही तिच्या आंगावरून हात फिरवला. ती आईबापांची माया पाहून वेणूला रडयाचा हुंदका आला; आणि इकडे त्यांचें तें प्रेम पाहतांच त्या सज्जन म्हाताऱ्याचें अंतःकरण सद्गदित होऊन त्याच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या.

इतक्यांत मामलेदारांचा शोध करीत वामनराव तेथें आले. त्यांस पाहतांच पाटलानें आपल्या लंगोटीचें शेवट सोडून त्यांतून एक पुडकें काढून त्यांचे आंगावर फेकून दिलें, आणि तो म्हणाला, "हें घ्या रावजी, पहा त्यांत काय आहे तें. आन् राहूंद्यात तुमचीं तीं सगळीं कारस्थानें."

वामनराव काळा ठिक्कर पडला. वासुदेवपंतांनीं तें पुडकें घेऊन पाहिलें तों त्यांत सनदा आहेत. पाटलाकडे दौलत होती किती, काय, वगैरे सर्व मजकूर त्यांत आहे; व त्यांतच एका यादीमध्यें रुप्याचीं सर्व भांडीं वजनासुद्धां लागलेलीं आहेत!

"हें काय? हा काय प्रकार आहे?" वासुदेवपंतांनीं त्यास विचारलें.

"मी तें कशाला बोलून दाखवूं?" पाटील ह्मणाला. "हे तुमचे व्याही,—महाराज, रागावूं नका,—आनू हे वामनराव. त्यांचें कृत्य त्यांना विचारा. मी त्यांचें पाप उच्चारून आपली जीभ विटाळवीत नाहीं."

विठ्ठलपंतानें आपलें तोंड झांकून घेतलें. वासुदेवपंतांनीं पाटलास विचारलें, "पाटीलबुवा, तुह्मी गेलां होतां कोठें? आमच्या घरीं जेवण घालून तुह्मी नाहींसे कां झालां?"

"विठ्ठलपंत, वामनराव," पाटील त्या दोघांस ह्मणाला, "तुमचें कर्म तुमच्या बराबर. जो तो आपआपल्या कर्माप्रमाणें फळें भोगतोच आहे. परंतु आजचा खरोखरच सुदिन आहे, याकरतां मी बोलतों ह्याची क्षमा करा." नंतर तो वासुदेवपंतांकडे पाहून ह्मणाला, "रावसाहेब, हे सगळे ह्या जोडीचे खेळ आहेत. आतां मी पाल्हाळ लावीत बसलों तर ही वेळ नव्हे, तरी थोडक्यांत सांगतों. हा सावकार कुळांना कसा पिळून पैसा काढतो हें आज मी सांगायला नको, त्याचें प्रायश्चित्त त्यांना आतां मिळालेंच आहे. त्यांच्या मदतीला हे सरकारचे कारकून. मी ह्यांना हरकत करीं ह्मणून ह्या दोघांचेंनू

माझें वांकडें पडलें. प्रसंग आला ह्मणून मी एक परात ह्या सावकाराकडे गहाण ठेवली, तेवढ्यावरून त्यांनीं ताडलें कीं ह्याजकडे जास्त भांडीं असावींत. त्याच वेळेला वेणूताईच्या लग्नाचें ठरत होतें. मला सावकारांचे प्रतापी मुलगे ठाऊक होते, आतां समोर उभे आहेत हेंच पहाना,–वेणूताई, तुह्मी रडूं नका, रावसाहेबांनीं विचारलें ह्मणून मला सांगायचें भाग पडलें आहे.–मी रावसाहेबांकडे माझ्या पाटिलकीला दत्तकाचा अधिकार मिळावा ह्मणून खेपा घालीत होतों; कारण मला मूलबाळ कोणी नाहीं. ह्या बाईसाहेब रमाताई आनू वामनराव लग्नाचें बोलत असतांना मी तेथें होतों. मी मध्यें बोललों ह्मणून वामनरावांनीं मला धमकी देऊन मला माझ्या रुप्याच्या भांड्यांची ओळख दिली. त्या वेळेस मला फार वाईट वाटलें. तें दुःख आणि त्या दोघांशीं माझें वांकडें, ह्या दोन गोष्टी, आनू तशांत मी ह्या वेणूताईचें रडकुंडें झालेलें तोंड पाहिलें, आनू मी त्यांना वचन देऊन चुकलों कीं 'तुमच्या कल्याणासाठीं झटण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं;' परंतु माझ्यानें लग्नांत मोडती कशी घालवेल? मोठमोठ्या ब्राह्मणांच्या घरीं लग्न ठरतेन् त्यांत एक कुणबट आडवा येतो! तरी रावसाहेब आपण लग्न ठरवायला सावकाराच्या घरीं गेला तेव्हां मी त्या घरीं येत होतों, पण हे दोघे मोठमोठ्यानीं बोलत होते ते शब्द कुंपणाच्या पलीकडेच माझ्या कानांवर आले. वामनरावांची त्यावेळेस जी प्रतिज्ञा ऐकली, तीवरूनच मला मोठें भय पडलें. नंतर विठ्ठलपंतांची व वामनरावांची कांहीं खटपट

चालत असल्याची मला कुणकुण कळली. ती खटपट काय तें मला कळेना. इतक्यांत लग्नाच्या पूर्वी दोन दिवस कांहीं कारण नसतां वामनरावांनीं मला पाटिलकीचे कामाला म्हणून पुराणास पाठवून दिलें. आठ दिवस येऊं नको असा मला त्यांचा हुकूम होता. मी तेव्हांच सगळ्या गोष्टी ताडल्या आनू माझा संशय खरा झाला. मी बेत केला कीं हे दोघे ब्राम्हण माझ्या राशीला लागले आहेत, त्यांजबराबर टिकाव धरणें कठिण, तर दत्तकाच्या भरीला न पडतां आपण आपल्या हातींच सर्व गोष्टींची व्यवस्था लावावी. वामनरावांस न कळत मी रात्रीचा परत आलों, आणि येतांना सगळ्या गांवकऱ्यांस शेवटीं एक जेवण द्यावें अशा इराद्यानें मी त्याच रात्रीं तिकडून बरोबर धान्य आणून खोलींत सांठवून ठेवलें. प्रसंग कसा येईल म्हणून मी बरोबर रुपये घेतले होतें. दुसऱ्या दिवशीं तुमच्याकडचें जेवण होणार होतें. तेथें मी वामनरावांच्या दृष्टीस न पडतांच गेलों. मला चंदनाची साठ वर्षांची माहिती आहे. तेथें एवढ्या मंडळीला आयत्या वेळेला इतकें अन्न कसें मिळणार ? मी सगळ्या गोष्टी ताडून पाहिल्या. त्यांत वेणूताईचें जेव्हां गोरेंमोरें तोंड पाहिलें, तेव्हां तर मला कींवच आली. त्यांनीं भोळ्याभावानें ती आंगठी दिलेली पाहून मी तसाच मागें परतलों. त्यावेळीं मी मुद्दाम त्यांची आंगठी बरोबर घेतली; कारण, आपण रावसाहेब भले गृहस्थ आहां हें मला माहित आहे, परंतु न जाणों, काळ आहे, 'हें काम तुला कोणीं सांगितलें होतें, तूं आमची बेअदबी केलीस,'

असें जर मला कोणीं म्हणालें असतें, तर मला वेणू ताईचा हुकूम आहे म्हणून मी ती आंगठी दाखविणार होतों. मी गांवांत गेलों, परंतु तेथला प्रकार माझ्यानें खरोखर सांगवत नाहीं. त्याच वेळीं वामनरावांनीं मला काळ्या पाण्यावर पाठवतों म्हणून धमकी दिली, आणि मी पाहतों तों खरोखरच त्यांचा तसा यत्न चालला आहे! त्या दिवशीं संध्याकाळींच ही चावडीची. कोठडी माझ्या कपाळीं येते, असा सुमार मला दिसून आला. जें जन्मांतही नाहीं,—आतां ती कोठडी माझ्या नशिबीं आली आहे, परंतु प्रसंग पाहून त्यांत मला आनंदच आहे,—जें जन्मांतही नाहीं, तें एकून मला भय पडलें, व त्या भांड्यांचे कागदपत्र मिळवावे हाच उपाय सुचून मी तसाच निघालों. भांडीं सदरेवर आणून टाकलीं तेंही मला बरेंच वाटलें. वेणूताईची आंगठी परत देण्यास मला सवड झाली नाहीं."

"मग पाटील तुम्ही परतलां केव्हां, आणि ह्या खटल्यांत सांपडलां कसे?" वासुदेवपंतांनीं विचारलें.

"मी महाराज गेलों तो एकाच जागीं होतों काय? कागदपत्रासाठीं सगळें हिंदुस्थान फिरलों. कानड्यांत गेलों. कागद कोणीं देईनात. हिंडतां हिंडतां नाकीं नऊ आले. कित्येक जागीं पोटाला मिळेना, म्हातारपण तर हें असें, भिक्षा मागत फिरलों, पण सगळे कागद मिळवले. दोन वर्षांनीं मी परत आलों. माझ्या ह्या प्रवासानें माझ्यांत इतका फरक झाला होता कीं मला येथें कोणीसुद्धां ओळखलें नाहीं. आपण बक्षिस लावलें तें येथें आल्यावर मी ऐकलें.

' मी मेलों, मी रेवगांवच्या डोहांत बुडालों, मी भूत होऊन बसलों, ' अशाच लोकांच्या कल्पना चालले‌ल्या मला सगळीकडून ऐकूं येत. भिक्षा मागायची तर मला सवय झालीच होती, ह्याकरितां माझ्या दुस्मानांचे अझून बेत कसे काय चालले आहेत ते पहाण्यास मला चांगली सवड सांपडली. "

" मग आम्हांस मुलांना डागूं दिलें नाहीं ते पाटील तुम्हीच ? " विठ्ठलपंतांनीं विचारलें.

" मीच तो. परंतु त्याचेपूर्वी तुमच्या सावकरीची काय दशा उडून गेली असती हें तुम्हांला माहित आहे काय ? मी रात्रीचा आपल्या सोप्याच्या आंतल्या बाजूला दडून बसूं लागलों तों एका रात्रीं बाहेर ओटीवर राम्या, सोन्या, ह्या पोरांना कांहीं मसलत करतांना मी ऐकलें. तुमच्याच कर्जानें ते नासून गेले होते. त्यानीं नाहीं नाहीं ते उपाय योजले. शेवटीं विष्णूला त्यांनीं आपल्यांत घेतलें. मी खचित सांगतों कीं तो पोर अगदीं भोळा आहे; त्याला चांगलें वळण मात्र पाहिजे होतें. मला आंत बसून रोज त्यांचे काय बेत चालत ते ऐकावयास सांपडत. दुसऱ्या दिवशीं तुमचीं खतें चोरून नेण्याचा त्यांनीं बेत केला. विष्णूला त्यांनीं गळ घातली, व तो कबूल झाला. आतां काय करावें ! तुमच्या घरीं जाऊन कोणाला सांगावें ? सारा दिवसभर तुमच्या घराभोंवती फिरूनसुद्धां मला वेळ सांपडली नाहीं. ही मुलगी फक्त मला माहित. हिला लिहितांवाचतां येतें हें मी चंदनास पाहिलें होतें. शेवटीं त्याचा उपयोग करून घेतला. व मला यशही आलें. मी एक चिठ्ठी लिहून

हिच्या ती दृष्टीस पडेसें केलें, व तिनें त्याप्रमाणें व्यवस्थाही केली. सावकारसाहेब, ही मुलगी खरोखरच तुह्मांला लक्ष्मी मिळाली आहे, परंतु तिचें तुह्मीं मातेरें किंहो करून टाकलेंत ! ”

“ तरीच बरें का !” काशीबाई म्हणाली, “ आह्मी ह्मणालों रुमाल आंतल्या फडताळांत आले कसे ! पण हें तिनें सांगूं नये का ? ती तरी कशी सांगेल ? सासुरवाशीणच ती, पण बिचारी किती भिडस्थ आहे तें आतां आह्मांला कळतें आहे ! ”

“ असो.” पाटील ह्मणाला, “ तात्यांनीं विचारलें त्याचें सांगतों. एकंदर सर्व बाहेर येईलच, परंतु त्या एका बाईच्या शिकवणीवरून एका रात्रीं विष्णूला ह्या तिघांनीं मार देण्याचा बेत केला. पोरगा फुकट मार खाणार, ह्मणून त्याची मला दया येऊन मी त्याच्या दारीं जाऊन शिळ घालून त्याला बाहेर बोलावलें. तो बराचसा लांब आल्यावर मी त्याचें मनगट धरलें कीं काय प्रकार आहे तो त्याला सांगावा. तो मला भुतानें धरलें ह्मणून भ्याला तो इतका कीं तो खालीं बेशुद्ध पडला. भलतेंच लचांड झालें पाहून मी अवसान नव्हतें तरी त्याला उचलून खांद्यावर वेतलें, आणि त्याच्या घरांत नेऊन ठेवणार तों वळचणीखालीं कोणीं असल्याचा मला भास झाला. कोण आहे कोण जाणें, ह्मणून मी त्याला तेथेंच टाकून दूर जाऊन उभा राहिलों. ती ही मुलगीच होती. तीही बेशुद्ध पडली. चोरीची हाकाटी होऊन सगळा गांवकरी तेथें आला. मीही त्यांतच घुसलों. दोघां मुलांनाही डागण्याचें ठरलें. मला खरा प्रकार माहित होता,

ह्मणून मी त्यांस डाग्गूं दिलें नाहीं."

वासुदेवपंत हंसून ह्मणाले, " आह्मी ऐकलें होतें कीं त्या दोघांसही भुतानें पछाडलें. तर पाटील तुह्मीच भूत होतां एकूण?"

" असें तर खरेंच." पाटील ह्मणाला, "त्या रात्रीच माझ्या घरांत कोणी आहे म्हणून ह्या पोरांस संशय आला. त्यांनीं सकाळींच पाहिलें तों आंत पावलें उमटलेलीं ! त्यांची खात्री झ्हाली कीं पाटील मरून भूत झाला तो रात्रीचा येथें वसत असतो! रावसाहेब, मी भूत ठरलों तर खराच, पण त्यापासून काय फायदा झाला पहा! त्यांनीं तें घर वर्ज्य केलें. वाईट मसलता करण्याची त्यांची जागा गेली. लक्ष्मी आजारी आहे असें मला कळलें म्हणून ती किती आजारी आहे हें काकांस विचारावें याकरतां मी एके दिवशीं ते तिची प्रकृति पाहून परत चालले होते, त्यांचे मागून चाललों. परंतु काकांस भलतेंच कांहीं बडबडतांना ऐकलें! लक्ष्मी दुखण्याला व घरच्या जाचाला आणि हालअपेष्टेला त्रासून रात्रीं विष घेऊन मरणार असें मला कळलें! त्याच रात्रीं विष्णूला पकडून रानीचा भटकणार नाहीं असें त्याजपासून वचन घेतलें, व लक्ष्मीचा विषाचा पेला काढून घेवविला."

विठ्ठलपंतांसुद्धां त्या सर्वांस ह्या पाटलाचे आमच्यावर मोठे उपकार आहेत असें वाटूं लागलें. वासुदेवपंतांनीं त्याला विचारलें, "पाटील, तुह्मी या मारेकऱ्यांतच कसे सांपडले गेलां तें आह्मांला कळलें नाहीं?"

"सांगतों. माझ्या जिनगीबद्दल ह्या सर्वांचे बेत चालले होते, त्यामुळें मी नेहमीं यांच्या पाठीवर अ-

सें. यांची आतां एकच जागा नव्हती, त्यामुळें यांचे सगळे बेत मला कळत नसत. ते कोणाला तरी ठार मारणार अस्मा मला ह्याच रात्रीं संशय आला, त्यामुळें मला सगळा बंदोबस्त करावयास अवकाश झाला नाहीं. भुताच्या धास्तीनें विष्णु घरीं निजूं लागला, परंतु मी रात्रीं लक्ष्मीला जाऊन विचारतों तों आज तो घरीं नाहीं! मी घाबरून तसाच निघालों. खरें कळल्याशिवाय कोणास सांगताही येईना. ही मुलगी माझ्या पाठीमागून आली हें मला अर्ध्या वाटेला कळलें. ते ह्यांना मारीत आहेत तों आम्ही तेथें मेलों. हे पळूं लागले तों हवालदारसाहेब तेथें आले, आन् आम्हां सर्वांस्नी त्यांनीं पकडलें. हे विठ्ठलपंत असें आम्हांला आतां कळलें."

"मग गंगाई कशी आमच्या घरीं मी पडलों म्हणून ओरडत गेली?" असें विठ्ठलपंतांनीं विचारलें.

"तात्या साहेब, रावसाहेब, माझ्याकडे पाहून तरी माझ्या सोन्याला . सोडवाहो!" गंगाई म्हणाली, "तात्यांनीं बैल नेले त्या दिवसापुन तो म्हणत होता मी सावकाराचा जीव घेईन. रात्रीं मला शिपायांनीं वर बोलावलें, आन् त्याला पकलेला जेव्हां पाहिलें तेव्हांच मी समजलें. मी लागलीच तात्यांच्या घरीं गेलें. आन् दोघीबी रमाबाईला घेऊन इथ आल्या."

"महाराज," पाटील हात जोडून म्हणतो, "माझें म्हाताऱ्याचें शेवटीं एवढें ऐकलेंच पाहिजे. मला ते हजार रुपये नकोत. ह्या सर्वांस सोडून द्यावें. विष्णुपंताकडेही कांहीं अपराध नाहीं. त्यांची अशी फटफजिती झाली एवढी शिक्षा त्यांना पुरे आहे."

"पण मादरचोद ह्यांच्याबराबर आला कसा?" विठ्ठलपंतांनीं विचारलें.

"त्ये ह्याराज मी सांगतों." सदबा ह्मणाला. "आह्मीच त्याला ओढून आणला. इश्नूला सरीचा धाक आह्मास्नी ठावा होता. आह्मी तर तात्याच्या सावकारीला लई कटाळून गेलो. त्याला ठार मारण्याचा आह्मी बेत केला. इश्नूलाबी धाक दाखवून आह्मी आमच्यांत ओढ-ला. त्याला आह्मी काय करायचें तें पहिल्यान सांगितल न्हाई. आह्मी सांपडलों तर खटला रावसाहेबांच्या पायाशीं येणार, त्यांत इश्नु त्यांचा जावई असला ह्मंजे त्याच्या बराबर आह्मांला बी सुटका मिळल, अशी आमची मसलत होती."

हा वरील प्रकार ऐकत असतांना जो तो ठकू-आक्काच्या तोंडाकडे पाहत होता. तें पाहून तिला वाटलें कीं आपण आज कांहीं मोठें भूषणच पैदा करून ह्मणलें आहे. सूर्य बराच वर आला होता, आणि त्याचे किरण थेट चावडींत आले होते. ठकूआक्कानें मोठ्या कौतुकानें आपलें तोंड त्या किरणांच्या समोर धरलें. तेव्हां तर शिपाई आपआपसांत हसूं लागले!

"ठके नथ कशाला अडकिवली आहेस ती?" विठ्ठलपंत तिला दटावून ह्मणतात, "मगाचपासून तुला दोन तीनदां डोळे वटारले, समजूं नयेस का तूं?"

"हेंग काय? एवढी थोरली खोट्या मोत्यांची नथ तूं कोठून आणलीस?" काशीबाईनें विचारलें.

"नथ खोट्या मोत्यांची? वा ग वा आई!" ठकी ह्मणते, "तूं बरीच कीं ग आहेस! मामंजीनीं मला नथ पाठवून दिलीना? मी इतके दिवस ती काढली

नाहीं, पण झटलें आतां चंदनाला यायचें, नाकांत घालावी. सव्वाशें रुपयांची नथ ! बाई लहान सहान का आहे ती ! मावशीबाई झणाली, 'आज दोनशें रुपये तर वाटचा चोर देईल ! "

" आज हवालदारांनीं पकडून आणली ती एक मावशीबाईच आहे. " फौजदार झणाला.

" आणा, आणा पाहूं तिला पुढें ! " मामलेदार झणाले. तिला शिपायांनीं आणलें तों तिला सर्वांनीं ओळखलें. रमाबाईसुद्धां सर्वांनीं तोंडांत बोटें घातलीं !

" मावशीबाई, " ठकी तिजजवळ जाऊन झणते, " आज तुझी झा नथेची किती किंमत करतां ? "

" झा नथेची ? " मावशीबाईनें विचारलें, " फार तर दोन तीन आणे ! "

" काय बोलतां तुझी मावशी ? " ठकी तिजपुढें हात ओंवाळून झणते, " मामंजीपासून तुझी चना ही नथ आणून दिलीत ? "

" वाहवा ग वाहवा ! " मावशीबाई झणते, " आपलें एक गरीबसें सांपडलें कीं त्याच्यावर सगळ्यांनीं आळ आणीत असावें. हा पहा एक हवालदारडा ! "

" पहा कशी बाई मस्ती आहे ती ! " हवालदार झणाला, " ती कांहीं केल्या आपल्या आंगाला आझांला शिवूं देत नाहीं. माझ्या मनांत तिचा एकदां झाडा घ्यावयाचा आहे. "

झाडा घ्यावयाचा हुकूम झाला. परंतु ती बाई झणाली कीं, " माझीं आतांशा व्रतें चाललीं आहेत, झणून मी सोंवळ्यानींच असतें, मला कोणी शिवूं नका. "

" बाई आझी कोणी शिवत नाहीं, तुझीच चि-

रगुटें झाडून आह्मांला दाखवा ह्मणजे झालें." असें वासुदेवपंत ह्मणाले.

"वारे वा:!" मावशीबाई ह्मणते," मोठा मामलेदारडा झालास ह्मणून बायकांची अब्रू घ्यायला नको शिकूं. वासुदेव, तूं पदवीला पावलास ह्मणून मी तुला वाशाच म्हणणार, आहे का तुला आठवण आपण लहानपणीं एके जागीं खेळलों आहों तीं? गवताच्या गंजींत बदाबद बदाबद मी तुझ्या पाठीवर नी तूं माझ्या पाठीवर उड्या मारीत असंस—"

"मत करो बाई," फौजदार तिला दरडावून म्हणाला, "एवढी आंगावरची चौघडी काढून टाक ह्मणजे आम्हांला पुरे आहे."

मावशीबाई म्हणते, "तुम्हांला सरकारचे कायदे माहित नाहींत? बायकांवर सख्ती करतां काय? ह्या मेल्यांच्या देखत मी उघडी का होऊं! आंगावरचा एक तीळदेखील मी तुम्हांला दाखवणार नाहीं."

सर्वांदेखत चौघडी काढावयास हरकत नाहीं, ह्मणून वासुदेवपंतांनीं रमाबाईला तिच्या आंगावरची चौघडी ओढावयास सांगितलें. परंतु ती बाई एकटीला का दाद देते? काशीबाईनें व ठकीनें तिला आवरून धरलें. व रमाबाईनें चौघडी काढली.

"अगबाई बाई बाई," रमाबाई ह्मणते, "काय तरी चौघडी जड ही!" आणि असें ह्मणत तिनें ती चौघडी खालीं टाकली, तों ती बदादिशीं वाजली. चौघडी झाडून पहातां आंत कांहीं बांधलेलें नाहीं. शिपायांस ती बाई चौघडीला शिवूं देईना, ह्मणून वासुदेवपंतांनीं ती जाऊन उचलली. तिच्या पोटांत त्यांना कांहीं टणक

लागलें म्हणून ते ती उलगडूं लागले तों ती शिवलेली ! शिपायांनीं ती उशिवली, आणि पहातात तों आंत वासुदेवपंतांच्या सुनेचे दागिने! नवी करकरीत घनवडी तल्याच दोऱ्यानें शिवून आंत दागिने घालून ठेवले होते !

" मावशीबाई खरेंच हो खरेंच ! " काशीबाई ह्मणते, " तुह्मी मागें ह्मटल्याप्रमाणें तुमच्या घनवडीला दोन हजार रुपये आज वाटचा चोर देईल. "

परंतु त्या दागिन्यांवरोवरची सरी कोठें सांपडेना ! बाई लुगडें पालटून देण्यास कबूल नाहीं. आणखी गंगाईला मदतीला लावून त्या बायकांनीं तिला एका कोठडींत नेलें, आणि क्षणाभरानें चौघीही ओरडत आल्या, " दोन सऱ्या ! दोन सऱ्या ! सरीच्या फांशाला फांसा अडकवून मावशीबाईच्या कंबरेंत सोन्याचा करगोटा ! "

वेणूनें आपली सरी तेव्हांच ओळखली. पाटलानें सरीची सगळी हकीकत बाहेर आणली. मावशीबाईनें त्या मुलीला पळविली त्यावेळीं ती शेजारील ओसाड घरांत कशाला आली होती हेंही त्यानें सांगितलें. ठकीच्या नथेचीही मजा उडून गेली. मावशीबाईनें कसा उपदेश केला, आपण कसे रुपये चोरले, मावशीचा तसा उपदेश नव्हता तरी किल्ली कशी लक्ष्मीच्या अंथरुणांत नेऊन टाकली, मावशीबाईनें नथ आणून देतें तों घरीं मात्र घालावयाची नाहीं अशा प्रकारचा तिजजवळून करार करून घेऊन नथ कशी आणून दिली, दहा रुपये अडकवून ठेवलेले कसे मावशीबाईला दिले, वगैरे झाडून सारें तिनें कबूल केलें.

विष्ठलपंतांनीं माझी कांहीं फिर्याद नाहीं म्हणून सांगितलें तेव्हां विष्णु व वाटवेकर सुटतील, आणि पाटलाची विनंति मान्य होईल यांत मोठें नवल नाहीं.

विष्ठलपंत व काशीबाई ह्यांचे चांगले डोळे उघडले. त्या दिवसापासून त्यांची सुनेवर तर भक्ति फारच बसली. विष्ठलपंत लवकरच बरे झाले. त्यांनीं सावकारींत आपला हात सैल केला. वासुदेवपंत व रमाबाईसही ईश्वरानेंच ही मुलगी अपणांस दिली असें वाटूं लागलें.

मावशीबाईच्या नवऱ्यानें मरते वेळीं जर तिला खरोखरच दळणकांडण करून पोट भर म्हणून सांगितलें असलें, तर ती आतां त्या उद्योगास लागली खरी. तुरुंगांत तिजकडे हेंच काम आलें. वामनरावांचेंही ह्या चोरींत आंग होतें असें सरकारच्या नजरेस आलें. मावशीबाई दळायला आणि वामनराव तिच्या दळणाचा हिशोब मांडायला कारकून! मागाहून त्यांनीं सरकारी पैशांत अफरातफर केल्याचाही त्यांजवर आरोप उपटला, म्हणून त्यांची काळ्या पाण्यावर बदली झाली. ते त्या पाटलास काळ्या पाण्यावर पाठविणार होते तें साधलें नाहीं.

तो देवमाणूस पाटील पुढें फार दिवस जगला नाहीं. वासुदेवपंतांनीं बळानें त्याच्या पदरांत हजार रुपये बांधले, व आपण वचनांतून मुक्त झाले. त्यानें ते रुपये व आपलीं सगळीं भांडीं लोकांचें कर्ज फेडण्यांत घालविलीं. आणि आपल्या गांवांत कोणाला कर्ज नाहीं असें पाहून त्यानें सुखानें डोळे मिटले. पाटलानें मला जिवदान दिलें असें वेणूनें नेहमीं म्हणत असावें.

आणि आतां लक्ष्मीविष्णूचा जोडा किती आनंदानें, किती गोडीगुलाबीनें राहूं लागला ! विष्णु लक्ष्मीच्या संगतीनें, आपण हिचे किती ऋणी आहों हें वारंवार मनांत आणून, तिच्या विचारानें वागूं लागला. लक्ष्मीही त्याच्याविचारानें वागूं लागली. दोघांतिल प्रीति दिवसानुदिवस वृद्धिगत होत गेली. त्यांनीं ठकीला माहेरपणाला म्हणून वारंवार बोलावणें धाडलें, पण तिनें जें एकदां फजित पावून सासर सुधारलें, ती पुन्हां तोंड दाखवावयास आली नाहीं. वेणू त्या घरची खरोखरच लक्ष्मी होऊन बसली. थोड्याच दिवसांत तिला सुपुत्र झाला. पुढें तो रांगूं लागला. त्या दांड-ग्या पोरानें तिच्या कडेवर धड बसूंच नये, तर खालीं पडलेल्या काशीबाईच्या रुपयांमध्यें व विठ्ठलपंतांच्या गहाणाच्या दागिन्यांमध्यें ढवळाढवळी करण्या-करतां तिच्या कंबरेवरून खालीं उडी घालूं लागावें. जी वेणू पूर्वी त्रासून आपला जीव विषाचे स्वाधीन करणार होती, तिच्या तोंडचे आपल्या मुलाला " अरे ऐकरे बाबा, ह्यानें तर मला जीव नकोसा करून सोडला आहे, " असे लाडके शब्द ऐकून कोणाला बरें समाधान होणार नाहीं? आणि त्याचे बोबडे बोल ऐकून आमच्या वेणूच्या आनंदाचें मोल कोण करील ?

समाप्त.